
म. ग्रं सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ७३५

REFBK-0026472
REFBK-0026472



# माझे जपानचे अनुभव

# माझे जपानचे अनुभव

चं. ग देशपांडे

REFBK 0026472

REFBK-0026472

राजहंस प्रकाशन / पुणे

**माझे जपानचे अनुभव**


**प्रकाशक :**

दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे – ४११ ०३०

●

**प्रथमावृत्ती :**

१५ ऑगस्ट १९९१

●

किमत : रुपये साठ



© चं. ग. देशपांडे
विजिगिषा बँक ऑफ इंडिया
स्टाफ कॉलनी, बी–६,
गोखलेनगर, पुणे ४११ ०१६


●


**मुद्रक :**

अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय
४३९ शनिवार पेठ
पुणे – ४११ ०३०

# प्रस्तावना

'जपान' जगात खळबळ माजविणारे एक राष्ट्र. स्वत:च्या आश्चर्यजनक प्रगतीने जगाला अवाक् करून सोडणारा एक चिमुकला देश. 'ही एवढी जादूची किमया घडली कशी? त्या मागील पार्श्वभूमी काय?' हे जाणून घेण्याची उत्सुकता अनेकांप्रमाणे मला पण होती. तेथे जाण्याचा व काही काळ रहाण्याचा योग आला आणि सत्य, सुंदर, मंगलाची नित्य होणारी आराधना दृष्टोत्पत्तीस पडली. अनुभवास आली.

या भूतलावर अनेक अर्थाने प्रगती केलेला असा कुठला देश असू शकतो याची मला तरी पूर्वी कल्पना नव्हती. परंतु तेथे आलेल्या अनुभवाने मी स्तिमित झालो.

सद्य:स्थितीत मानवतावाद खऱ्या अर्थाने आचरणात आणणारे जपान हे एक महान् राष्ट्र आहे. माणूस व माणुसकी दोन्ही येथे गवसतात. सुसंस्कृतपणा आणि मानवता यांचे ठायी–ठायी दर्शन घडते. प्रामाणिकपणा, विनयशीलता, सहकार्य, शिस्त, देशप्रेम वगैरे सद्‌गुणांचे अनुभव जपानमध्ये पुरेपूर येतात. मलाही आले. नेत्रदीपक औद्योगिक प्रगतीमुळे संपत्तीचा ओघ इकडे वळला आहे. परंतु या आर्थिक प्रगतीच्या ओघातही, दोन्ही हातांच्या ओंजळीमध्ये जपल्या जाणाऱ्या दीपातील ज्योतीप्रमाणे जपानी माणसाने स्वत:च्या घराची जपणूक केली आहे. त्याचे घरपण अभंग आहे. ठायीठायी आलेल्या चांगल्या अनुभवाने मी गदगदून गेलो. काही-वेळातर विश्वास न बसावा इतक्या स्वरूपात गोष्टी सामोऱ्या आल्या.

प्रशिक्षणाच्या निमित्ताने फॅक्टरीत सुद्धा बराच काळ गेला. तेथील अनुभव-सुद्धा विलक्षण वेगळा. कामगार – मालक हे नाते प्रेमाचे सुद्धा असू शकते याची जाणीव देऊन गेला.

कारखान्यातील मालक – कामगार हे नाते एका सुखद व प्रेमळ कुटुंबात बदलल्याने त्याला जे गोंडस रूप आले आहे ते येथे दिसून येते. 'प्रेमाला मर्यादा नसतात.' हे वाक्य दोन्ही बाजूने सत्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न येथे दिसून येतो. कामगार भरभरून कारखान्यास देतो तर त्या कामगाराचे व त्याच्या कुटुंबियांचे सुख जपण्यात मालकवर्ग दंग असतो. अशा प्रकारे खऱ्या अर्थाने

सहकार्याचे जीवन जगत असलेली ही मंडळी कामातील व जीवनातील आनंद लुटत आत्मरंगी रंगून गेली आहेत.

जपानमध्ये व जपानी कारखान्यात आलेले अनुभव इतके उत्कट होते की, स्वकीयांना 'किती सांगू नी किती नाही.' असे होऊन गेले होते. नातेवाईक व मित्रांना पत्ररूपाने अनेक गोष्टी कळविल्या. त्यांनी सुद्धा समाधान, आश्चर्य व आनंद व्यक्त केला. माझ्या एका मित्राने उद्गारलेले वाक्य खूपच बोलके आहे. तो म्हणतो, "जपानबाबतचे हे अनुभव वाचताना पृथ्वीवर राहून स्वर्गातील आनंद अनुभवावयास मिळतो." तेथील माझ्या बहुसंख्य नोंदी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी अनेकांनी आग्रह धरला. चांगल्या गायकाला दिली गेलेली दाद सहजतेने व न रहावून बाहेर पडते. तितक्याच सहजतेने जपान व जपानी कारखान्यातील माझे हे अनुभव लेखणीतून कागदावर पाझरले आहेत. अनेकांच्या प्रयत्नांनी त्यास पुस्तकरूप प्राप्त झाले एवढेच.

धन्यवाद.

१५ ऑगस्ट १९९१

चं. गं. देशपांडे

# अनुक्रमणिका


स्कॉलरशिपसाठी निवड व जपानला प्रयाण १
जपानला आगमन ४
होस्टेलमधील माझे जीवन ७
जनरल ओरिएन्टेशन कोर्स –
शिक्षणाची एक सुंदर पद्धत ११
अ) जपानी भाषेचा कोर्स १३
ब) दुपारचा विरंगुळा –
लेक्चर्स, फिल्म व मिनी ट्रिप्स १६
जपानी घरात दोन दिवस ३०
शॉपिंग याने खरेदी ४०
भ्रमंती आसमंतातील ४७
रेल्वे-प्रवास ५२
टेलिफोनबाबत थोडेसे ५९
योकोहामातून फेरफटका ६२
राजधानी टोकियो ६८
पार्ट्यांमधील सहभाग व उत्सवप्रिय जपानी ७५
बर्फाच्छादित पहाडावरील स्कीइंग ७९
मी पाहिलेले अपघात, अनुभवलेले भूकंप व
हवामानासंबंधी ८६
तोत्सुका शहराचे आमंत्रण ९६
मला भेटलेल्या गमती – जमती १०१
जपानी माणसे – एक अवलोकन १०४
सटर फटर ११३
क्योटो, नारा, नागोया, शहरी, पर्ल आयलंड आणि
मात्सुशिता व टोयोटाच्या उद्योगनगरात १२२

## जपानी कारखान्यांतील अनुभव


| | |
|---|---|
| हितगुज | १५० |
| फॅक्टरीशी तोंडओळख | १५२ |
| फॅक्टरीतील सुरुवातीचा काळ | १५४ |
| दिवसाची सुरुवात | १६१ |
| कामाच्या वेळा व मधल्या सुट्टीत | १६३ |
| कामाच्या वेळेत | १६५ |
| कामगारांचे एकमेकांशी संबंध | १६९ |
| कामगारांमधील पार्टर्या, सहली वगैरे | १७१ |
| जपानी कामगार व मी | १७२ |
| कामगारांबद्दल काही विशेष नोंदी | १७३ |
| शिस्त, वक्तशीरपणा, स्वच्छता, ओव्हर-टाईम वगैरेबाबत | १७४ |
| सहकारी रोबोट | १७७ |
| लायब्ररीत | १७९ |
| मी एक दुभाष्या | १७९ |
| क्वालिटी अॅश्युरन्स विभागात | १८० |
| फॅक्टरीतील तज्ज्ञांसमवेत | १८१ |
| कारखान्यातील समारोपाचा दिवस | १८३ |
| भारताकडे प्रयाण | १८५ |

५३४
६४५२
३।१०।८५

# स्कॉलरशिपसाठी निवड व जपानला प्रयाण

' जपानी स्कॉलरशिपसाठी निवड झाली असून जपानला येण्यासाठी तिकिट व व्हिसासाठी गॅरंटी लेटर पाठविले आहे. ' ही बातमी समजताच खूप आनंद झाला. केव्हा एकदा घरी येऊन ही सुवार्ता देतो असे झाले. घरी ही बातमी सांगताच घरातील सर्वांच्या कामामध्ये एक आनंदी वेग आला. प्रत्यक्ष उड्डाणाचा दिवस हा " झिरो काउंट डाऊन " ठरून उरलेल्या ' काउंट डाऊन ' दिवसांचे वेळापत्रक आखले गेले. स्वत:च्या पैशाने परदेशात जाऊन मजा मारणे या वर्गाच्या जवळपासही न फिरकणाऱ्या वर्गातील मी असल्याने ' कुटुंबातील पहिली फॉरेन ट्रिप या कल्पनेच्या सुखद, अनुभवातून सर्व जात होतो.

' जपान ' – जाण्यापूर्वीच्या कल्पना सुरू झाल्या. जे वाचले, जे ऐकले व स्क्रीनवर बघितले त्यावरून त्या देशाबद्दल, तेथील वातावरणाबद्दल व एकंदर सर्व येऊ घातलेल्या अनुभवांबद्दल स्वत:चे असे एक मत ठरविलेले असते. त्याची उजळणी करण्यात मन वेगाने धावत सुटले होते. स्कॉलरशिप पेपरबरोबर आलेल्या इतर माहितीमधील, टोकियोच्या नारिता एअर पोर्टवर उतरल्यापासून स्कॉलरशिप असोसिएशनच्या होस्टेलवर कसे जावयाचे याची नकाशासहित सविस्तर माहिती माझ्या पूर्व-प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलाची सुद्धा पाठ झाली होती व ती त्याने माझ्याकडून घोकून घेतली होती.

जाण्याचा दिवस झाला. दोन टॅक्सींमधून कुटुंबीय तसेच आप्तेष्टांसमवेत मुंबईच्या सहार एअर पोर्टवर थडकलो. प्रत्येक अनुभव साठवत होतो. हौसेपोटी स्वदेशात ३ – ४ वेळा विमान-प्रवास घडवून आणला होता. परंतु जंबोमधून प्रथमच. त्यामुळे माझ्या बरोबरील इतरांनी ' विमानात कुठे काय असतं ते नीट बघ

व न विसरता गेल्या गेल्या कळव' अशी विशेष सूचना दोन-तीन वेळा केली होती.

इतर सर्वजण वरती प्रेक्षकांच्या गॅलरीकडे वळले. मी पण सामान ताब्यात देऊन पुन्हा वरती प्रेक्षकांच्या गॅलरीकडे गेलो. मागे रेंगाळणाऱ्या पत्नीस हाक मारली. मुद्दाम चुपके चुपके आणलेला रजनीगंधाच्या फुलांचा गुच्छ तिला दिला. जपानसारख्या देशात होऊ घातलेल्या परदेशगमनाच्या सुखद क्षणांत दुःखद विरहाची जाणीव झाली. दोघांच्याही डोळ्यांत पाणी तरारले. दुसऱ्याला अभिमानाने सांगावयाचा परंतु विरहाने ढकलावयाचा काळ, सोनेरी किनार असलेल्या ढगांत दडलेला होता तो काळा विरह. मुले समोरच उभ्या असलेल्या मोठ्या विमानांच्या वैशिष्टयांचा उल्लेख करण्यात दंग होती. जुदाई झाली.

कस्टम्स चेकिंग मधून कॅरिडॉर मार्गे हवाई सुंदरीच्या हास्य मुद्रेने केलेल्या स्वागताचा स्वीकार करीत विमानात प्रवेश केला. प्रवाशांना बसण्यासाठी विमानात दोन मजले होते. आत गेल्यावर डाव्या हाताला म्हणजेच विमानाच्या पुढील भागात फर्स्ट क्लासच्या ६० सीट्स्, नंतर उजव्या हाताला इकॉनॉमी क्लासच्या ३०० सीट्स् होत्या. समोरील जिना चढून गेल्यावर वरती पुढील बाजूस पायलटची केबिन अर्थात कॉकपीट व मागे एक्झिक्युटिव्ह क्लासच्या प्रत्येक रांगेत चार अशा एकूण २२ सीटस् होत्या. त्यातही पुन्हा दोन भाग होते. एक होता नॉन स्मोकिंग झोन व दुसरा अर्थातच स्मोकिंग झोन. एक्झिक्युटिव्ह क्लासमधील दुसऱ्या रांगेतील खिडकीची सीट मला मिळाली होती. प्रवेश केल्यापासून आप्तेष्टांच्या सूचनेप्रमाणे प्रत्येक गोष्ट न्याहाळत सीटवर स्थानापन्न झालो. सीटशी, तसेच त्याच्या सुखसोईशी ओळख करून घेऊन त्याचा आस्वाद घेत खिडकीतून प्रेक्षकांच्या सज्जात स्वतःची माणसे कुठे दिसतात का ते न्याहाळू लागलो. पण यश आले नाही. विमानात इतरही प्रवासी आले. प्रत्येकाच्या वागण्यावरूनच त्यांच्या परदेशवारीतील नवखेपणा अगर सराईतपणा जाणवत होता.

सीटला अनेक सोयी होत्या. दिवा, पंखा वगैरेच्या बटणांशिवाय एक हेडफोनही होता. हेडफोन कानाला लावला व त्याचा प्लग खुर्चीच्या हाताजवळील मल्टी चॅनेल सॉकेटमध्ये घातला की निरनिराळ्या चॅनेलवर संगीत, विविध भाषांतील गाणी, इत्यादी ऐकावयास मिळे. कुठलाही प्रकार निवडा, बराच वेळ मी वाद्य संगीत व हिंदी गाण्यांचा आस्वाद घेत होतो. विमानातील इतर सुविधा म्हणजे आतील अंदाजे एक इंच जाड गालिच्याची घाण (?) पायाला लागू नये म्हणून वुलनचे मोजे होते. सर्व खाणे व पिणेसुद्धा मोफत होते. चॉकलेट, खारेदाणे, काजू, बदाम यांपासून ते चहा, बिअर, शॅम्पेन वगैरे सर्व व ते पण मागाल त्या वेळी हजर असे.

विमानाचा स्टाफ व क्रू मेंबर्स आले. त्यांची नेहमीच्या पद्धतीने कामे सुरू झाली. अनाउन्समेंट झाली. विमान हलके संथ गतीने रनवेपर्यंत आले व रनवेवर वळल्यावर पळू लागले. वेगाने धावू लागले. काही काळ जमिनीशी संपर्क सुटावा इतकी गती घेतली गेली व नंतर अलगद जमिनीपासून अलग होऊन तिरकस होऊन विमान आकाशाकडे झेपावू लागले. उंच, अधिक उंच. समुद्रावरून वळून परत जमिनीवरच्या आकाशात आले. जमिनीवरील वस्तू दिवाळीच्या किल्ल्यातील वस्तू-प्रमाणे लहान लहान दिसू लागल्या. विमानातील सुरुवातीचा प्रवास चांगला झाला.



समुद्रावर विमान उतरविण्याची वेळ आली तर घ्यावयाच्या खबरदारी-बाबतच्या सूचना एका विमान-कर्म-चाऱ्याने प्रात्यक्षिकासहित करून दाखविल्या. ठरल्याप्रमाणे कलकत्ता आले. वरून इतक्या उंचीवरून विमान जात असताना खाली सर्वत्र अतिशय दाट पांढऱ्याशुभ्र ढगांचे सलग पुंजकेच पुंजके फक्त दिसत होते. ढगामधून विमान खाली येताना मात्र दृश्य खूपच सुंदर दिसते. नंतर बँकॉक आले, येथील त्यांच्या विमानतळावरील वाह-तूक करणाऱ्या सुंदर थायी गाड्या बघितल्या. आम्ही बँकॉक सोडले. उंची अंदाजे ३० हजार फूट ( जास्तीत जास्त ३५ हजार फूट ) व वेग अंदाजे ताशी ६०० मैल असा होता. नंतर हाँगकाँग आले. हाँगकाँग येताना वरून दृश्य फारच सुंदर दिसत होते. समुद्रात घुसलेली विमानाची धावपट्टी स्पष्ट नजरेत भरत होती. आजूबाजूच्या समुद्रातील पुढे जाणाऱ्या लाटा त्यावर आरूढ झालेल्या होड्या. बाजूच्या डोंगरावरून खाली गेलेला नागमोडी रस्ता व त्यावरून धावणाऱ्या इवल्याशा मोटारी ही सर्व जिवंत दृश्ये मन प्रसन्न करीत होती. विमान खाली येऊ लागले तसेतसे हे सर्व स्पष्टपणे दिसत होते. हाँगकाँगला विमानातील प्रवाशांना खरेदीसाठी २० मिनिटे दिली होती. त्यासाठी ट्रँन्झिट व्हिसा देण्यात आला होता. तेथील ड्यूटी फ्री शॉप्स बघितली. ड्यूटीची कसर भरून काढणाऱ्या तेथील वस्तूंच्या किंमती विशेष नजरेत भरल्या. येथे सर्वत्र पावणेपाच फुटी उंचीच्या फिक्कट निळा व चॉकलेटी स्कर्ट घालून इकडून तिकडे तुरुतुरु धावणाऱ्या मुली दिसल्या. पाश्चात्त्य पद्धतीची केशभूषा व वेशभूषा केलेल्या या येथील कर्मचारी मुली हसून स्वागत करून गळयात पडत (म्हणजे माल खरेदी करण्याच्या उद्देशानेच फक्त – शब्दशः नव्हे. ) येथील सर्व वस्तू बघून आकाशमार्गे

टोकियोकडे निघालो. या प्रवासात विमान चायना सी वरून जाताना अंदाजे अर्धा तास खूपच थरथरत होते. येथे हा नेहमीचाच अनुभव असतो असे हवाई सुंदरीने मला सांगितले, नंतर मात्र अतिशय संथ, अगदी पोटातील पाणीही न हालता ते पुढे गेले.

हेडफोनमधून संगीत ऐकत असतानाच एकदम हेडफोनमधून आवाज आला – " अटेन्शन प्लीज " ... अनाउन्समेंट झाली. " अर्ध्या तासातच आपण टोकियोच्या के. सी. नारिता इंटरनॅशनल एअरपोर्टवर पोहोचणार असून तेथील स्थानिक वेळेप्रमाणे आत्ता ... वाजले आहेत. तेथील तपमान सध्या ... असून तुरळक पावसाची भुरभूर चालू आहे ... वारा ... गतीने वहात आहे ... " अनाउन्समेंट संपली. प्रवाशांपैकी काहींची चुळबूळ सुरू झाली.

भूतलावरील वैशिष्टयपूर्ण इतिहासात ठळकपणे प्रसिद्धी मिळविणारा आणि जगातील लोकांना अनेक वेळा आश्चर्यचकित करून सोडणारा देश ' जपान ' दृग्गोचर होऊ लागला.

स्वच्छ व गुळगुळीत धावपट्टीच्या दिशेने विमान खाली येतानाचे दृश्य विशेष नजरेत भरत होते. आखीव रेखीव रस्ते, त्यावरून होणारी तुरळक वाहतूक, गडद रंगाच्या मोठमोठया टाक्या लक्ष वेधून घेत होत्या. १० नोव्हेंबरला ठरलेल्या वेळेप्रमाणे दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी टोकियोच्या नारिता एअरपोर्टवर विमान पोहोचले.

## जपानला आगमन

फारच सुंदर, प्रशस्त, रेखीव आणि स्वच्छ विमानतळ. त्यावर हसतमुखाने स्वागत करणारे खास युनिफॉर्ममधील जपानी कर्मचारी. प्रशस्त व लांबलचक कॅरिडॉरमधून जाताना ठिकठिकाणी एका बाजूला नजरेत भरतील अशी विविध प्रकारची रंगीत छोटी छोटी माहितीपत्रके ठेवली होती. ही पत्रके परदेशी माणसाला जपानमध्ये वावरायला खूपच मदत करतात. पासपोर्ट - व्हिसाची तपासणी झाली. सामानाच्या बॅगा अंडाकृती बेल्टवरून संथ गतीने फिरत होत्या. सामान ताब्यात घेतले. नंतर अर्थातच कस्टम चेकिंग, या ठिकाणी काउंटरचे बाहेर उभ्या असलेल्या कस्टम अधिकाऱ्याने विचारले, तुम्हांला काही डिक्लेअर करावयाचे आहे का ?" व सहज आपलेपणाने ' जपानला यावयाचा हेतू काय ? ' असे विचारले. "मी येथे जपानी स्कॉलरशिपवर टेक्निकल ट्रेनिंग घेण्यासाठी आलो आहे. मला काहीही

डिक्लेअर करावयाचे नाही." एवढे ऐकल्यावर त्या कस्टम अधिकाऱ्याने पारंपरिक पद्धतीने नम्र भावाने लवून नमस्कार केला. व उलट सामान चेक न करताच स्वत: जातीने माझ्या दोन्ही बॅगा पलीकडे आणून दिल्या. हे विशेष भावले. समोरच पलीकडे चौकशी या काउंटरवर गेलो असता तिथे पोहोचण्यापूर्वीच स्मित वदनाने तयार असलेल्या जपानी तरुणीने " वेलकम टू जपान " व " मी तुम्हांला काय मदत करू शकते ? " असे मृदूपणे विचारले. " मला – युएनो या स्टेशनवर जावयाचे आहे . . . " मी म्हणालो. तिने मला पलीकडील काउंटर नं. २३ वर जावयास सांगितले. या काउंटरवरील तरुणीकडूनही पुन्हा त्याचप्रमाणे स्वागत झाले. तिने मला तिकिट दिले व बाहेरच उभ्या असलेल्या बसने जावयास सांगितले. " ही बस तुम्हाला एका रेल्वे स्टेशनवर घेऊन जाईल व तेथून तुम्ही सरळ युएनो या ठिकाणी जाऊ शकाल. " अगदी व्यवस्थित योग्य मार्गदर्शन.



आपोआप सरकत्या काचेच्या दरवाज्यातून बाहेर पडताच बस उभी होती. रिमझिम पाऊस पडत होता. बसमध्ये ५० माणसे बसू शकतील एवढी प्रशस्त जागा होती. परंतु बसमध्ये आम्ही तीन चार जणच होतो. ड्रायव्हरचे मागे सामान ठेवायची आटोपशीर जागा होती. या बसने मी एका रेल्वे स्टेशनवर आलो. तेथून रेल्वे गाडीने अंदाजे तासाभराने युएनो या स्टेशनवर आलो. गाडीतून जाताना दुतर्फा सुंदर शेती, घरे, नदी वगैरे दिसत होते. विशेष उल्लेख करावयाची बाब म्हणजे आपण चित्रात बघतो त्याचप्रमाणे येथे सर्वत्र रंग भरलेला व दिलेला होता. कुठलीही गोष्ट रंग उडालेली नसून पुलाचे कठडे, घरे अगदी रेल्वेखाली

असलेल्या पुलाचे आधारसुद्धा रंगवलेले होते. सुरुवातीला लागली ती या जपानी लोकांची सुंदर प्रकारे रंगविलेली व बहुतांशी दुमजली अशी आटोपशीर घरे. सरकत्या दारांच्या खिडक्या व त्या बाहेर असलेल्या लटकत्या आटोपशीर कुंड्या आणि त्यांतील त्यांचा 'मिनी बगीचा' घरावरील अँटेना व तिरप्या छपरावरील सोलर पॅनेल नजरेतून सुटत नव्हते. युएनो रेल्वे स्टेशनवर मला उतरून घ्यायला स्कॉलरशिप अँथॉरिटीचा एक माणूस आला होता. त्याने मला 'देशपांडे सान का ?' म्हणून विचारणा करून व्यवस्थित रिसीव्ह केले. व्हिजिट कार्डाची देवाण-घेवाण झाली. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. ओझे हलके करण्याच्या उद्देशाने माझ्या दोन बॅगांपैकी एक बॅग त्याने फारच आग्रहाने मागून घेतली. पाच मिनिटांतच आम्ही दोघे पायीच जवळच्या दुसऱ्या एका रेल्वे स्टेशनवर आलो. त्याने असोगो या स्टेशनचे तिकिट काढून दिले. मार्ग व अंदाजे लागणारा वेळ याबाबत सविस्तर माहिती दिली. मला द्यावयाचा आउटफिट अलाउन्स दिला. माझी ज्या होस्टेलमध्ये व्यवस्था केली होती त्या योकोहामा केन्श्यू सेंटर ( वाय. के. सी. ) असोगो येथील ऑफिसमध्ये फोन केला. मी कितव्या डब्यातून प्रवास करीत आहे याची कल्पना दिली. असोगो स्टेशनवर मला रिसीव्ह करायला येणाऱ्या वाय. के. सी. च्या स्टाफचे नाव सांगितले. काही मिनिटांतच केहिन–तोहोकु लाइन या निळ्या रेल्वे गाडीत बसवून दिले. ठराविक जपानी पद्धतीने अभिवादन केले. गाडीची सरकती दारे बंद झाली व गाडीने वेग घेतला. प्रत्येक स्टेशनवर काही ठराविक अंतरावर जपानी, तसेच इंग्रजी भाषेत गावाचे नाव लिहिलेले असते व ते गाडीतील प्रवाशांना कुठलेही श्रम न घेता बसल्या जागेवरून वाचता येते. गाडीमध्ये सुद्धा स्टेशन यायच्या आधी पुढील स्टेशन कुठले येणार याची लाउड स्पीकरवरून आगाऊ कल्पना दिली जाते. साधारणतः दीड तासाने असोगो स्टेशन आले. तेथे ठरल्याप्रमाणे वाय. के. सी. च्या स्टाफने मला व्यवस्थित रिसीव्ह केले. आम्ही दोघे टॅक्सीने योकोहामा केन्श्यू सेंटर ( वाय. के. सी. ) या असोगो येथील माझी व्यवस्था जिथे केली होती त्या होस्टेलमध्ये येऊन पोहोचलो. त्या ठिकाणी एक रूम देण्यात आली. त्यातील सुविधा प्रात्यक्षिकासहित त्याने समजावून दिल्या. संपूर्ण इमारत अर्थक्वेकप्रुफ असल्याचे सांगून त्याने आपसूकच भीतीची व ती नसल्याची जाणीव करून दिली. वाय. के. सी. होस्टेलमधील इतर सर्व सुविधा, रेस्टॉरंट, लॉबी, लायब्ररी, म्युझिक हॉल, लॉन्ड्री, स्पोर्टस् वगैरेंच्या जागा दाखविल्या आणि नम्रपणे अभिवादन करून माझा निरोप घेतला. अशा प्रकारे चुकू म्हटले तरी आपणास चुकू न देता उपलब्ध असलेल्या व तंतोतंत वेळापत्रका-प्रमाणे चालणाऱ्या वाहतुकीच्या सहाय्याने या जपान्यांच्या पूर्ण आदरातिथ्यासहित मी जपानमध्ये माझ्या नियोजित स्थळी येऊन पोहोचलो.

# होस्टेलमधील माझे जीवन

योकोहामा केन्द्यू सेंटर ( वाय. के. सी. ) या होस्टेलमधील माझी खोली तिसऱ्या मजल्यावर होती. खोलीत सर्व सुविधा होत्या. पलंग, त्यावर मऊ बेड, मऊ ब्लँकेट व वरती एक छानशी चादर. खोलीत सर्वत्र एक जाड गालीचा होता. वस्तुतः संपूर्ण होस्टेलमध्येच अगदी जिन्यावरसुद्धा गालीच्याचा थर होता. खोली ऊबदार राखण्यासाठी बाजूला एक आटोपशीर मशीन होते. आवाज न करता याच्या सहाय्याने खोली ऊबदार राखली जाई. टेबल, खुर्ची, अद्ययावत कपाटे व खुर्चीसमोर भितीवर लटकणारा टेलिफोन होता. याच्या सहाय्याने जगातील कोणाशीही संपर्क साधता येत असे. ' आणीबाणीच्या वेळी कसे बाहेर पडाल ? ' याची सविस्तर माहिती नकाशासहित खोलीच्या मुख्य दरवाज्याच्या आतील बाजूस चिकटविली होती. खोलीच्या पश्चिमेला छानदार डिझाइनचा व त्यानंतरचा झिरझिरीत टेनिस जाळीचा पडदा सरकविल्यावर काचेचे दोन मोठे सरकते दरवाजे होते. या दरवाज्यातून पलीकडे असलेल्या मोठ्या गॅलरीतून रस्त्यावरून धावणाऱ्या गाड्या दिसत. खोलीमधील भितींना वरून छानसे भेणकापडाचे अस्तर होते.

पहिल्याच दिवशी खोलीतील सपाता मला लहान होतात हे फोनवरून मी खाली काउंटरवर कळविताच एकजण धावत माझ्या खोलीमध्ये आले. त्यांनी त्याची खात्री करून घेतली व स्वतः हातात त्या सपाता घेऊन धावत जाऊन स्टोअर-रूममधून माझ्या मापाच्या सपाता घेउन आले व दिलगिरी व्यक्त करून माझा निरोप घेतला. नंतर चौकशी केली तेव्हा मला कळले की, ते या होस्टेल-मधील असिस्टंट मॅनेजर होते. त्यांच्या या अदबीच्या वागणुकीने तर माझे जपानी लोकांबद्दलचे असलेले चांगले मत अधिकच चांगले झाले.

प्रत्येक मजल्यावर टॉयलेट होते. त्या ठिकाणी अनेक सुंदर बेसिन्स व बाथरूम्स होत्या. या ठिकाणी जवळ जवळ २४ तास गार आणि गरम पाणी मिळत असे. बाथरूम मधील समोरील दोन तोटींच्या सहाय्याने गार व गरम पाण्याचे योग्य मिश्रण करून आवश्यकतेनुसार कोमट पाण्याचे शॉवर स्नान तासन्तास करता येई. अनेकांना येथे कंठ फुटतो व बाथरूममधून शीळ किंवा गाण्यांचे सूर ऐकू येतात.

जपानमधील इतर होस्टेलप्रमाणेच वाय्. के. सी. हे पण एक ठराविक नमुन्याचे होस्टेल होते. मुख्य प्रवेशद्वारात लागोपाठ दोन काचेची दारे. आत-बाहेर करताना आतील तपमान टिकून राहावे यासाठी ही ओळीने दोन दारांची व्यवस्था. या मधल्या जागेमध्ये एक पब्लिक टेलिफोन पण होता. कोणीही त्यात येन टाकून

फोन करू शकत असे. प्रवेशद्वारातून आत आल्यावर चौकशीचे काउंटर व त्यामागे उभा असलेला वाय्. के. सी. चा मोनोग्राम असलेल्या गडद लाल ब्लेझरमधील हसतमुख जपानी. 'मी आपली काय सेवा करू शकतो?' किंवा 'यस प्लीज,' वगैरे सारख्या अर्थाच्या जपानी वाक्यांनं स्वागत करून सेवेस तत्पर असे. त्याच्या मागे अनेक गाळचांचे शेल्फ होते. प्रत्येक गाळ्यावर रूम नंबर होते व त्या त्या रूममधील संबंधित पत्रे, किल्ल्या, काही निरोपाचे कागद इ. त्यात ठेवण्यात येई. एका बाजूलाच टेलिफोन एक्सचेंज होता. तर दुसऱ्या बाजूला विविध माहितीपत्रके, नकाशे व हॉस्टेलमध्ये लागणाऱ्या इतर साहित्यांचा समावेश होता. याच काउंटरच्या मागील भागात वाय्. के. सी. च्या अंदाजे १० लोकांच्या ऑफिस-स्टाफ ची कामाची व्यवस्था होती.

कोणीही पाहुणा आला व त्याला हॉस्टेलमधील कोणाही व्यक्तीला भेटावयाचे असल्यास बाहेरील लॉबीमध्ये व्यवस्था असे. तेथेच मल्टी चॅनेल टी. व्ही. असून बाजूला दररोजची इंग्रजी आणि जपानी वर्तमानपत्रे, तसेच साप्ताहिके, पाक्षिके, मासिके वगैरे ठेवलेली असत. प्रशस्त लॉबीच्या एका कोपऱ्यात सुंदर पियानो होता. कोणीही आपली बोटे त्यावरून फिरवू शकत असे. एका बाजूला असलेल्या कपाटात जपानी बाहुल्या व बुद्धिबळासारख्या 'गो' नावाच्या जपानी खेळाचे साहित्य ठेवलेले असे. अनेक वेळा गो या खेळामध्ये वाय्. के. सी. चा स्टाफ व येथील विद्यार्थी रंगून गेलेले मी बघितले होते. तेथील टी. व्ही. समोर कायम काही मंडळींचा गराडा पडलेला असे. विशेष अतिथींसाठी याच लॉबीमध्ये काही केबिन्स पण होत्या.

हॉस्टेलच्या मध्यभागीच आटोपशीर अशी बाग होती. हॉस्टेलच्या प्रत्येक विभागात विविध कुंड्या व कुंड्यातील झाडांचा हिरवा रंग प्रामुख्याने जीवनातील सदाबहाराची याद करून देत असे.

तळमजल्यावरच जेवणाची मेस होती. प्रवेश केल्यावर मेसच्या डाव्या हाताला किचन होते. तेथील ४-५ जपानी तरुण-तरुणी नेहमीच्या उंच टोपीसहित असलेल्या पांढऱ्या ड्रेसमध्ये ओव्हन, गॅस, वगैरेवर काही तरी करण्यात मग्न असत. तर एक मध्यवयीन जपानी स्त्री त्या सर्वांवर देखरेख करून पदार्थ चविष्ट व रुचकर व्हावेत म्हणून सक्रिय नेतृत्व करीत असे. किचनच्या एका कोपऱ्यात वापरलेल्या डिशेस, चमचे वगैरे धुवून, वाफवून, स्वच्छ करुन ठेवण्यामध्ये आमचा एक जपानी दोस्त होता.

मेसमध्ये प्रवेश केल्यावर उजव्या हाताला काचेच्या कपाटात डिशमध्ये आजचे पदार्थ व त्याचेपुढे त्याचे नाव, त्याचे कोड नंबर, किंमत वगैरे लिहिलेली असे. आपण बाजूला ठेवलेल्या छापील कागदावर आपला खोली नंबर, वस्तूचे नाव

किंवा कोड नंबर व किंमत लिहून सही करून हा कागद बाजूच्या मशीनमध्ये घालावयाचा म्हणजे त्यावर तारीख व वेळेचा शिक्का पडत असे. एका ट्रेमध्ये हा कागद ठेवून तो किचनच्या काउंटरवर ठेवल्यास काही वेळाने ' . . . . सान ' (श्रीमान किंवा श्रीमती) असे नाव पुकारले जाई व आपली डिश 'दोझो ' (म्हणजे प्लीज) या नम्र भावनेने सादर केली जाई.

मेसमधील प्रत्येक ठेबलावर टेबलक्लॉथ व त्यावर फुलदाणीमध्ये सुबक व विविध रचनेमध्ये ठेवलेली फुले जेवणामध्ये प्रसन्नता आणीत असत. बाजूला ठेवलेल्या एका मशिनमधून गार पाणी, गरम पाणी व जपानी हिरवा चहा ज्याला ' ओचा ' म्हणतात, या प्रत्येकासाठी निराळी अशी एकूण तीन बटणे होती. सकाळी ६ ते ९, दुपारी १२ ते २ व संध्याकाळी ६ ते ९ अशा मेसच्या वेळा असल्या तरी एका बाजूच्या कपाटात थंड पेये, फळे इ. खाद्य पदार्थ तसेच ओव्हनमध्ये उष्ण पेये पण ठेवलेली होती. अर्थात् त्यासाठी सेल्फ सर्व्हिस होती त्याचा पण निराळा कागद आपण तेथेच ठेवलेल्या बॉक्समध्ये टाकावयाचा. सेल्फ सर्व्हिसचे पदार्थ २४ तास सेवेला हजर असत. अर्थात् याबाबत तुमच्यावर पूर्ण विश्वास – मुख्यतः जपान-मध्ये सर्वत्रच – तुमच्यावर पूर्ण विश्वास टाकलेला मी बघितला आहे. कोणीही अविश्वासाने तुमच्याकडे बघत नाही. अगदी डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये सुद्धा. मी वाय्. के. सी. मधील एका जपानी अधिकाऱ्याशी यासंबंधी बोललो असता आश्चर्य वाटले व ते म्हणजे विकसनशील देशातून येऊन सुद्धा येथील विद्यार्थी या वाता-वरणात सेल्फ सर्व्हिसबाबत प्रामाणिक असून आजतागायत तेथून घेतलेल्या वस्तू व त्यांची नोंदलेली किंमत यांच्यामध्ये तफावत आढळलेली नाही. हा मुख्यतः सत्-संगतीचा परिणाम असावा. एका बाजूला व्हेंडर मशिन होते. त्यात २६० येन टाकले की बीअरचा एक टिन बाहेर येई. जपानमध्ये सर्वत्र बीअर पिणे हे फारच कॉमन आहे.

मेसच्या दुसऱ्या एका बाजूला आतील लॉबी होती. या ठिकाणी सुद्धा मल्टी चॅनेल टी. व्ही. होता. त्या समोर अनेक कोच व विविध आकारांतील टी-पॉय दिमतीला हजर होते. कित्येक जण जेवताना टी. व्ही. प्रोग्रॅमचा आस्वाद घेणे पसंत करीत असत. त्यांच्यासाठी ही खास व्यवस्था होती.

जपानी लोक जेवताना कमीत कमी, तसेच मृदू आवाजात संभाषण करीत. हसण्याचा प्रसंग आला तरी बाजूच्या टेबलावरील माणसाला आपल्या हसण्याचा त्रास होणार नाही याची दक्षता घेत.

बहुतेक सर्व विद्यार्थ्यांना येथे आल्यावर पहिले चार दिवस आजूबाजूच्या वातावरणाशी समरस होण्यासाठी सुट्टी असे. त्यामुळे पहिल्या या चार दिवसांतच

आजूबाजूला वावरणाऱ्या सर्व जपानी माणसांचे वागणे, बोलणे इत्यादींची आपल्यावर छाप पडल्याशिवाय राहात नाही. व आपल्या वागण्या-बोलण्यामध्ये झालेला आपसूक फरक आपणास विशेष जाणवतो.

मेसच्या एका बाजूला लागून म्युझिक-हॉल होता. यात काही वाद्ये व अनेक एल्. पी. रेकॉर्डस् होत्या. रेकॉर्ड तसेच कॅसेट लावता येईल अशा सुविधा असलेला स्टिरिओ, ॲम्प्लिफायर कम रेडिओ व दोन मोठे लाऊड स्पीकर तेथे होते. याच म्युझिक-हॉलमध्ये तुम्ही संगीताचा पूर्ण आस्वाद घेऊ शकता कारण या हॉलमध्ये आपल्या आवडत्या कॅसेट लावून तन्मयतेने नाचताना विविध देशांच्या अनेक युवक-युवतींना मी बघितले होते. हॉल साउंडप्रुफ असल्याने एकदा का हॉल बंद केला की बस. फोनशिवाय इतर सर्व संपर्क संपत.

जमिनीखालील पहिल्या तळघरात स्टोअर-रूम होती. तर त्या खालच्या तळघरात टेबल-टेनिससाठी प्रशस्त रूम व टेबल होते.

होस्टेलच्या गच्चीवर स्वयंपूर्ण अशी लॉंड्री होती. वॉशिंग मशिन, ड्रायर ॲटोमॅटिक इस्त्री व टेबल वगैरे सर्व काही होते. याच लॉंड्रीच्या खिडकीतून वाय्. के. सी. चा आसमंतच नव्हे तर, जपानी लोकांना परमप्रिय असलेल्या फुजी पर्वताचे पण दर्शन होत असे.

होस्टेलच्या पश्चिमेला असलेल्या सुंदर लॉनची व त्या भोवतालच्या झाडांची योग्य प्रकारे निगा राखलेली होती; तर होस्टेलच्या पूर्वेला साकुराच्या झाडाखाली बेसबॉलच्या खेळामध्ये होस्टेलवासी रंगून जात.

ग्राउंड फ्लोअरवरच एकूण तीन मोठे क्लास-रूम्स होते. एक क्लासरूम कम लॅंग्वेज लॅबोरेटरी ( भाषा–प्रयोगशाळा ) होती. येथे बसून आपल्याजवळील कॅसेट टेबलामध्ये समाविष्ट असलेल्या रेकॉर्डरमध्ये घालून हेडफोनच्या सहाय्याने शांतपणे कॅसेट ऐकण्याची सोय होती. हेडफोनलाच पुढे जोडलेल्या माइकवर आपण बोलले असता ते आपणास ऐकू येते. आम्हाला देण्यात आलेल्या जपानी भाषेच्या अभ्यास-क्रमासाठी ही खास व्यवस्था होती. अर्थात् या क्लासरूममध्ये जेव्हा शिक्षक मध्ये बोलत असत तेव्हा ते सुद्धा ऐकू येई दुसरी एक क्लासरूम फारच प्रशस्त होती. तिच्या एका संपूर्ण भिंतीवर जपानचा नकाशा – उंच-सखलपणासहित कायमचा लावलेला होता. याच रूममध्ये स्लाइड-शो, प्रोजेक्टर-शो तसेच व्हिडिओ-शो या सर्वांची व्यवस्था होती. आम्ही आमच्या काही लहान पार्ट्या पण याच रूममध्ये साजऱ्या केल्या होत्या.

या सहा मजली होस्टेलच्या इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर २५ खोल्या होत्या. त्यात इंडोनेशिया, बांगला देश, भारत, हॉंगकॉंग, सिंगापूर, थायलंड,

मलेशिया, ब्राझिल, बोलेव्हिया, केनिया, कोरिया, चीन ग्रीस, वगैरे १८ देशांतील ८० लोक रहात होते.

अशा प्रकारे खाणे – पिणे, खेळ, मनोरंजन, अभ्यास, संगीत वगैरेचा योग्य मिलाफ असलेले एक छोटेखानी विश्वच वाय्. के. सी. मध्ये वसलेले होते. त्यामुळे स्वतःच्या इतर कामाशिवाय बाहेर जायची आवश्यकतापण भासत नसे.

## जनरल ओरिएंटेशन कोर्स – शिक्षणाची एक सुंदर पद्धत

सर्वसामान्य स्कॉलरशिप घेऊन जपानला आलेल्या बहुतांशी विद्यार्थ्यांना सर्वप्रथम जपानी भाषा काही प्रमाणात तरी अवगत करून घ्यावी लागते. त्यासाठी जपानमध्ये व्यवस्थित आखणी केलेले असे कोर्सेस आहेत व त्यांचा कालावधी १ आठवडा, ५ आठवडे, ३ महिने असा असतो. स्कॉलरशिपचा एकूण कालावधी किती आहे यावरून विद्यार्थ्याने कोणचा कोर्स घ्यायचा हे ठरविले जाते. माझ्या स्कॉलर-शिपचा कालावधी ५ महिन्यांचा होता म्हणून मला ५ आठवड्याचा कोर्स घ्यावा लागला.

हा कोर्स फारच चांगल्या प्रकारे आखला होता. गेली १८ वर्षे सातत्याने हा कोर्स स्कॉलरशिप असोसिएशनतर्फे घेतला जातो. प्रत्येक कोर्सनंतर विद्यार्थ्यांना एक फॉर्म दिला जातो. त्यामध्ये विद्यार्थ्यांना हा कोर्स कसा वाटला, कोणत्या अडचणी आल्या, तसेच अमुक एक गोष्ट या कोर्समध्ये असती तर फार बरे झाले असते, अशा वाटणाऱ्या गोष्टी कोणत्या, वगैरेंचा तपशील विद्यार्थ्याने भरून द्यावयाचा असतो, व ज्या गोष्टींबाबत इतर विद्यार्थ्यांशी, तसेच शिक्षकांशी चर्चा करणे आवश्यक वाटते, अशा गोष्टींची क्लोजिंग मीटिंग म्हणजे शेवटच्या मीटिंगमध्ये काही आडपडदा न ठेवता खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा होते. अशा वेळी खूपच चांगल्या सूचना येतात. तर काही विनोदी गंमतशीर व मीटिंगमध्ये रंग भरणाऱ्या सूचना सुद्धा विद्यार्थी बिनधास्त करतात. तेथील स्टाफसुद्धा त्या नुसत्या विनोदाने घेत नाहीत, तर जमल्यास त्यात मसालासुद्धा टाकून एकूण मीटिंग खुमासदार करतात. परंतु, मूळ मुद्याचा धागा कुठेही सुटू दिला जात नाही. खरंच. हसत खेळत कसे जगावे हे या जपानी लोकांकडून शिकावे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांकडून आलेल्या एकूण एक सूचनांवर वाय्. के. सी. च्या स्टाफ मीटिंगमध्ये चर्चा होते. आत्तापर्यंत बऱ्याच उपयुक्त सूचनांची अंमलबजावणी केली गेल्यामुळेच हा ५ आठवड्यांचा जनरल ओरिएंटेशन कोर्सचा कालावधी स्कॉलरशिपच्या एकूण कालावधीमध्ये एक सुखद स्मृतींची ठेव देऊन जातो.

या ५ आठवड्यांच्या कोर्सचा आठवडा सोमवार ते शनिवार असे. शनिवारी दुपारी व रविवारी पूर्ण दिवस सुट्टी असे. रोज एकूण दोन सत्रे ( सेशन्स ) असत. पहिले सत्र सकाळी ९ ते १२-३० व दुसरे सत्र दुपारी २ ते ५. पहिल्या सत्रामध्ये सलग जपानी भाषेचा क्लास असे. तर जपान व जपानींची ओळख जास्त चांगल्या पद्धतीने व्हावी यासाठी दुसरे सत्र राखून ठेवलेले असे. यामध्ये जपानचा भूगोल, इतिहास, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण, सामाजिक स्थिती वगैरे विषयांवर जपानी तज्ज्ञांची व्याख्याने असत. किंवा फॅक्टरी, इलेक्ट्रिसिटी बोर्ड, जवळच्या ऐतिहासिक अगर भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेटी असत. काही वेळा फिल्म्स दाखविल्या जात.

दुसऱ्या सत्रातील पहिला, तिसरा व पाचवा शुक्रवार ' मिड कोर्स ' मीटिंग-साठी राखून ठेवलेला असे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रत्येक ग्रूपचा जो संबंधित जपानी ग्रुप को-ऑर्डिनेटर असे, त्याच्याशी दिलखुलास चर्चा होत असे. या चर्चेच्या वेळी मात्र प्रोफेशनल ट्रॅन्सलेटर दुभाष्या आवर्जून उपस्थित असे. विद्यार्थी व ग्रुप को-ऑर्डिनेटर यांचे म्हणणे एकमेकास योग्य प्रकारे भाषांतरित करून सांगितले जाई. खाणे व सॉफ्ट ड्रिंकच्या व्यवस्थेमुळे या मीटिंग्ज चविष्ट होत. या बैठकांचा मुख्य उद्देश म्हणजे हा कोर्स विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त उपयुक्त होण्याच्या दृष्टीने काय करता येईल, तसेच स्कॉलरशिप असोसिएशनला विद्यार्थ्यांना काही विशेष निरोप द्यावयाचे असतील तर ते या मीटिंगमध्ये ग्रूप को-ऑर्डिनेटर मार्फत दिले जात. माझ्या एका ब्राझिलीयन मित्राने मीटिंगमध्ये अशी सूचना केली होती की, आमची एक जपानी शिक्षिका खूपच सुंदर हसते व ती तासामध्ये १० ते १२ वेळा तरी हसते, म्हणून तिच्या तासाचा अवधी वाढवून मिळावा. अशाच एका संदर्भात दुसऱ्या एकाने त्याच्या सौभाग्यवतीस गमतीने पत्रात लिहिले होते की " ........ मागील पत्रात तू येथील बायकांबद्दल विचारले होतेस पण त्यासाठी नीट निरीक्षणाची आवश्यकता आहे. एखाद्या बाईकडे जास्त वेळ बघायला सुद्धा पैसे पडतात ( फॉरेन एक्स्चेंज ) त्यामुळे फॉरेन एक्स्चेंच वाच-विण्यासाठी ( कारण तेवढ्याच पैशात तुला एखादी साडी येईल ) म्हणून येथील बायकांकडे मला कानाडोळा करावा लागतो. हां ! जपानी भाषा शिकवायला मात्र तीनही जपानी बायकाच आहेत. वय वर्षे अनुक्रमे २५, २९ व २५, तिन्ही फारच सुंदर ... ... मला म्हणावयाचे की फारच सुंदर शिकवितात ...... "

दुसरे सत्र हे विद्यार्थ्यांचे आवडते व हवेहवेसे वाटणारे सत्र असल्याने ते दुपारी २ ला किंवा कधी त्या आधी जरी सुरू झाले तरी ते ५ ला न संपता बऱ्याच अधिक कालावधीपर्यंत ओढले जाई.

पहिल्या दोन ' मिड कोर्स ' मीटिंगमध्ये विद्यार्थ्याला सुरुवातीला आलेल्या अडचणी समजावून घेणे, तसेच एकमेकांची ओळख करून देऊन त्यांचा बुजरेपणा

घालवणे. 'होस्टेल लाईफ हे वैयक्तिक असे निराळे नसून सर्वांचे एकत्रित राहाण्याने ते एका मोठ्या कुटुंबासारखे बनवून ते अधिक आनंदी बनविणे' हा उद्देश मनावर बिंबविणे हा असतो. प्रत्येकाला सुरुवातीलाच एक चांगला दृष्टिकोन या मीटिंगमध्ये लाभतो. कोणाच्या काही सूचना असतील, काही विशिष्ट ठिकाणांना कुणाला आवर्जून भेट द्यावी असे वाटत असेल त्या ठिकाणांच्या नावांची चर्चा पण याच मीटिंगमध्ये घडते व त्या भेटी घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. यामध्ये पोलिसखात्याचे ऑफिस, हॉस्पिटले, भुयारातील रेल्वेचे खोदकाम व बांधकाम चालू असलेले ठिकाण, अगर रेल्वेचे नियंत्रणकक्ष, कचऱ्यापासून वीज तयार करणारे जनरेटिंग स्टेशन, वृद्धांकरिता असलेल्या सुविधा वगैरे वगैरे कुठल्याही सूचनांचा समावेश होऊ शकतो.

पाचव्या शुक्रवारी सकाळी जपानी भाषेची शेवटची परीक्षा असते. संध्याकाळी शेवटची मिड कोर्स मीटिंग असते. या मीटिंगमध्ये दुसऱ्या दिवशी आयोजित केलेल्या होम व्हिजिटसंबंधी सूचना दिल्या जातात. प्रत्येकाला कुठल्या तरी एका जपानी कुटुंबात एक दिवस घालविण्याची संधी मिळते व उंबऱ्याच्या आत जपानी कसे वागतात, कसे राहातात इत्यादींचे अवलोकन यामुळे करता येते. नंतरच्या आठवड्यात संपूर्ण एक आठवड्याची सफर आयोजित केलेली असते. त्या सफरीबावतच्या सूचना व त्यानंतर सुरू होणाऱ्या प्रॅक्टिकल ट्रेनिंगबावतच्या वैयक्तिक सूचना यांचाही समावेश या मीटिंगमध्ये असतो. ही आमची मीटिंग खूपच हास्यविनोदात रात्री साडेआठपर्यंत चालली होती.

## जपानी भाषेचा कोर्स

विद्यार्थ्यांनी जपानी भाषा खूपच चांगल्या प्रकारे अवगत करून घ्यावी या दृष्टीने पहिल्या दिवशीच्या 'वेलकम अॅन्ड एक्सप्लनेटरी' मीटिंगच्या वेळी एका वक्त्याने बोलताना सांगितले की, जपानी लोकांना इंग्रजी भाषेचे ज्ञान हे जवळजवळ नसतेच. अगदी एखाद्या जपानी मुलीला तुम्ही म्हणाला की, 'आय लव्ह यू' तरी तिला त्याचा अर्थबोध व्हायचा नाही. तेव्हा तुम्ही जपानी भाषा जास्तीत जास्त आत्मसात करून घ्या. लगेच त्याच दिवशी दुपारी माझ्याच ग्रूपमधील एका इंडोनेशियन मित्राने हाच प्रयोग करावयाचा ठरविले. त्याने एका जपानी सुंदर तरुणीला 'आय लव्ह यू' असे म्हटल्यावर तिने त्यास सुंदर इंग्रजीतच 'आय फील व्हेरी सॉरी दॅट आय कॉन्ट हेल्प यू' असे उत्तर दिल्यावर माझ्या मित्रास आश्चर्य वाटले. परंतु ते जास्त काळ टिकले नाही, कारण दुपारच्या पहिल्याच मीटिंगमध्ये आम्हाला

कळले की ती जपानी सुंदर तरुणीच आमच्या ग्रूपची इंग्रजी ट्रान्सलेटर आहे.

जपानी भाषा ही डायरेक्ट मेथडने शिकविली जाते. शिक्षक पण इतर भाषेचा माध्यम म्हणून उपयोग न करण्याचा कसोशीने प्रयत्न करीत. तरीसुद्धा इंग्लिश, स्पॅनिश, चिनी वगैरे भाषा जाणणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ग वेगवेगळे असत.

सुरुवातीला आम्हाला सर्वांना जपानी भाषा शिकण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व वस्तू दिल्या गेल्या. त्यामध्ये पुस्तके, वह्या, डिक्शनरी, पेन्सिली, पेन, पेन्सिलीला टोक करावयाचे पाते इत्यादी वस्तूंपासून ते पुस्तकातील प्रत्येक धड्यात समाविष्ट केलेल्या शब्दांचे उच्चार, संभाषणाची लकब व प्रश्नोत्तरे यांचा समावेश असलेल्या कॅसेट्स होत्या. एकूण दिलेल्या तीन पुस्तकांपैकी मुख्य पाठ्य पुस्तकात सुरुवातीला शब्द-रचना, संभाषण, उदाहरणे, एक्झरसाईज व प्रश्नोत्तरे यांचा समावेश होता.

आठवडाभर म्हणजे सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी ९ ते १२–३० या वेळात जपानी भाषेचा क्लास भरे. या वेळात विद्यार्थी व शिक्षक यांच्या सवडीने दोनदा दहा मिनिटांची सुट्टी मिळे. दररोज प्रथम रोजची परीक्षा असे. त्यानंतर आदल्या दिवशी झालेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेवर चर्चा होई. परीक्षेत सर्वच्या सर्व मार्क मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष उत्साहवर्धक असा शेरा मिळे. दररोज परीक्षा असल्यामुळे परीक्षेची भीती अशी राहात नसे, व विद्यार्थ्यांकडून रोजच्या रोज अभ्यास केला जातो की नाही याची पण खातरजमा होत असे. नंतर प्रत्यक्ष अभ्यासाला सुरुवात होई. यात दररोज काही जपानी शब्द, त्यांचे उच्चार, वाक्य-रचना, त्यांची वैशिष्ट्ये वगैरे समजावून दिले जात व ते विद्यार्थ्यांकडून घोकून घेतले जाई. प्रत्यक्ष वस्तू व चित्रांचे तक्ते यांचा शिकविण्यात मोठा भाग असे. एखादी वाक्यरचना लक्षात यावी यासाठी ती अनेक उदाहरणे देऊन मनावर इतकी ठसविली जात असे की, दिवसभर ती वाक्य रचना वापरून विद्यार्थी एकमेकांत बोलत असत. होस्टेलमधील इतर जपानी मंडळी, अगदी मेसमध्ये भांडी स्वच्छ करणारा जपानीसुद्धा, त्यात तितक्याच विनोदाने व खेळीमेळीने सहभागी होत असे आणि काही काही वेळा त्यातील बारीक खाचाखोचा, अपवाद इत्यादी समजावून सांगत व अचूक वाक्यरचना लक्षात राहावी यासाठी सहकार्य करीत.

जपानी शब्दसंग्रह, शब्दांचे उच्चार, वाक्यरचनेची घाटणी व संभाषण यांवर शिकविताना विशेष भर होता. जपानी भाषा ही जगातील दोन नंबरची अवघड भाषा समजली जाते. ( पहिला नंबर चिनी भाषेचा लागतो. ) ही नुसती अवघड भाषा आहे असे नाही तर, बोलताना होणाऱ्या विविध उच्चारांमुळे सुद्धा त्याचा निराळा अर्थबोध होतो. जपानी भाषेच्या तीन लिप्या आहेत. (१) हिरागाना. (२) काताकाना व (३) कांजी. हिरागाना व काताकाना या दोन्हींमध्ये प्रत्येकी

४६ मुख्य अक्षरे (कॅरॅक्टर्स) आहेत. तर कांजीमध्ये अनेक आहेत. व प्रत्येक अक्षर हे अक्षर नसून तो एक शब्दच असतो. हिरागाना व काताकाना बरोबरच जपानी जीवनात कांजी ही दररोजच्या वापरातील प्रमुख लिपी आहे. जपानी भाषेतील वर्तमानपत्र वाचण्यासाठी हिरागाना व काताकाना शिवाय एखाद्याला कमीतकमी २००० कांजी अक्षरे वाचता आली पाहिजेत.

परदेशी नागरिकांना वरील तिन्ही लिप्या शिकणे हे एक अवघड काम आहे, परंतु यावर तोडगा म्हणून जपानी लोकांनी एक युक्ती वापरलेली आहे. ती म्हणजे जपानी उच्चारलेला शब्द हा, ए टू झेड ही इंग्रजी भाषेतील रोमन अल्फाबेट्स ( मुळाक्षरे ) वापरून लिहिणे. या लिपीस त्यांनी ' रोमाजी ' असे नाव दिले आहे. अर्थातच आमचा लहान ५ आठवड्यांचा कोर्स रोमाजीमधून होता. म्हणजे उच्चार जपानी व लिपी रोमन.

या अभ्यासक्रमात एकूण ३० धडे होते व त्यामध्ये, विद्यार्थ्याला पुढे प्रॅक्टिकल ट्रेनिंग, तसेच आसपास वावरताना उपयोगी पडतील अशा ७६३ शब्दांचा समावेश होता. सुरुवातीच्या धड्यांमध्ये या शब्दांचा भरणा जास्त होता. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला दिवसाकाठी स्वतःचा असा अडीच तास तरी अभ्यास करावा लागत असे. लँग्वेज लॅबोरेटरी ( भाषा प्रयोगशाळा ) पहाटे ५ ते रात्री १२ पर्यंत उघडी असे. स्वतःची कॅसेट घेऊन जाऊन कोणीही विद्यार्थी त्याचा कधीही उपयोग करीत असे. रूममध्ये बसून कॅसेट ऐकावयाची असेल तर काही दिवसाकरिता रेकॉर्डरसेट होस्टेलच्या मुख्य काउंटरवरून घेता येत असे.

माझ्या वर्गात एकूण आम्ही १५ विद्यार्थी होतो. त्यांपैकी तिघाजणांनी जपानला येण्यापूर्वीच जपानी भाषेचा दोन वर्षांचा कोर्स त्यांच्या देशातच पूर्ण केला होता. त्यामुळे त्यांना या जपानी भाषेच्या शिक्षणाच्या वेळी विशेष सायास घ्यावे लागले नाहीत. तरी पण त्यांना हा पाच आठवड्याचा कोर्स करावा लागला. त्यांना अर्थातच जपानी लिपीमधून लिहिण्यासाठी शिक्षकांकडून उत्तेजन मिळत असे.

सकाळच्या क्लासच्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळी सुद्धा विद्यार्थ्यांना शिक्षकांबरोबर वैयक्तिकरीत्या जपानी भाषेच्या शिकविण्यातील अडीअडचणींसंबंधी चर्चा करता येत असे. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या जपानी शिक्षकांकडून सुद्धा विशेष प्रोत्साहन मिळे.

एक दिवस दुपारी आम्ही आमच्या शिक्षकांबरोबर एका मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गेलो. तेथे आमच्याकडून काही संभाषणे घडवून आणण्यात आली, त्यानंतर सर्वजण एका हॉटेलमध्ये गेलो. तेथे प्रत्येकाने आपणास काय पाहिजे ती

वस्तू स्वत: मागावयाची. कितीही डिशेश मागवा (कारण खर्च वाय्. के. सी. चा होता) परंतु प्रत्येकाने स्वतःच त्या हॉटेलमधील वेटरपाशी अचूक डिशेश मागवायच्या हा कटाक्ष होता. हॉटेलमधील वेटरमध्ये शाळकरी विद्यार्थिनींचा भरणा जास्त होता. तोंडावरील ठराविक जपानी पद्धतीचे स्मित ओसांडवीत त्या तिथे वावरत होत्या. अभ्यासाला अर्थार्जनाची जोड मिळावी म्हणून ही तडजोड. अर्थात् विकसित समाजातील पूर्ण सुरक्षिततेची व सहाकार्याची हमी त्यात समाविष्ट होती. हॉटेलमध्ये खूपच मजा आली. शिक्षक कोण व वेटर कोण यांचा काही काळ संभ्रम पडला. आमच्यापैकी एकाने तर तेथील वेटर मुलीलाच आमच्या वाय्. के. सी. त तुम्ही शिक्षकाची नोकरी का करीत नाही ? असा सवाल सुद्धा केला.

डिपार्टमेंटल् स्टोअर्समधील कर्मचारी असो किंवा हॉटेलमधील वेटर किंवा जपानमध्ये कुठेही वावरताना आसपासचा जपानी असो, सर्वजण आपल्यास आपल्या जपानी भाषेचे ज्ञान वृद्धिगत करण्यात कळत-नकळत सहाय्य करीत असतात. टिंगलटवाळीचा मागमूसही नव्हता. त्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांतील बुजरेपणा लोपून धीटपणे पुढे येऊन संभाषण घडत असे. चुकीच्या ठिकाणी इतर जपानी मंडळी ती वाक्यरचना दुरुस्त करून मग त्याचे उत्तरपण देत. अशा प्रकारे समाजातील इतर घटकसुद्धा आमच्या ओरिएन्टेशन कोर्समध्ये हातभार लावीत होते. अर्थात् जपानच्या ५ महिन्यांच्या वास्तव्यात हे चित्र कायम असेच होते.

जपानी भाषेच्या कोर्सची सांगता झाली. त्या वेळी जपानी भाषेच्या पुढील शिक्षणाच्या दृष्टीने प्रोत्साहन मिळावे व उपयुक्त ठरावे म्हणून काही पुस्तके, हिरागाना व काताकाना लिपीचे रायटिंग पॅड वगैरे सर्वांना देण्यात आली. नंतर काही दिवसांनी एक सुंदर पार्टी आयोजित करण्यात आली. त्यामध्ये प्रत्येकाने कुठल्याही विषयावर काही वेळ जपानी भाषेतून बोलावयाचे होते. कुठल्याशा एका कंपनीची दोन जपानी माणसे पाहुणे म्हणून आली होती. काही जणांनी आपल्या कुटुंबाविषयी माहिती दिली तर 'सात वर्षांपूर्वी एका सुंदर, तरुण व चांगल्या शिकलेल्या तरुणी बरोबर माझा विवाह झाला ... ' अशा शब्दांत सुरुवात करून एकाने पार्टीत फारच रंगत आणली.

अशा प्रकारे आधुनिक भाषाशिक्षणाच्या उपलब्ध असलेल्या सर्व सुविधांच्या सहाय्याने योग्य आखणी करून व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करून हलक्याफुलक्या रीतीने शिकवला गेलेला जपानी भाषाशिक्षणाचा हा एक सुंदर कोर्स मी अनुभवला.

## दुपारचा विरंगुळा

आम्हा सर्वांना हवेहवेसे वाटणारे दुसरे सत्र म्हणजेच दररोजचा दुपारचा

कार्यक्रम. याचे आमचे सूत्रधार असावयाचे आमच्या ग्रुपचे तरुण व सर्वांशी हसत खेळत मिळून मिसळून वागणारे ग्रुप को-ऑर्डिनेटर. आवश्यक त्या वेळी ट्रॅन्सलेटर पण यांत सामील व्हायची. या सत्रात जपानी तज्ज्ञांची व्याख्याने, व्हिडीओ किंवा प्रोजेक्टरच्या सहाय्याने दाखवावयाच्या फिल्म्स आणि ट्रिप्स यांचा समावेश होता.

## सुंदर भाषणे (लेक्चर्स)

कोर्सच्या दुपारच्या विरंगुळ्यामध्ये सहा जपानी तज्ज्ञांनी व्याख्याने दिली. प्रत्येक लेक्चरर आपल्या विषयात पारंगत असून आपल्या विषयातील इत्थंभूत माहिती खुमासदारपणे देत असे. सर्वांत सुंदर व्याख्यान झाले ते टोकियो युनिव्हर्सिटीच्या डॉ. सुझुकी हिडेओ या प्राध्यापकांचे. 'जपानचा भूगोल' या विषयावर ते इंग्रजीतून बोलले. सतत सव्वा दोन तास ते बोलत होते व आम्ही सर्वजण मंत्रमुग्ध होऊन ते ऐकत होतो. लेक्चर द्यावयाची त्यांची शैलीसुद्धा सुंदर होती. ते शांतपणे एक एक मुद्दा समजावून सांगत. त्याला गमतीची झलक देऊन मूळ मुद्द्यापासून व्यावहारिक दृष्टिकोन समजावून सांगत. पृथ्वीची जडण, घडण जपान मधील बांधकामे, भूकंप, ज्वालामुखी, उष्ण झरे इत्यादी मुद्द्यांवरून ते व्यावहारिक दृष्टिकोनाकडे वळले. त्यात जपानची लोकसंख्या, त्याची घनता व त्यामुळे जपानी लोकांच्या जीवनावर, त्यांच्या वागण्यावर, एवढेच नव्हे तर त्यांचे आयुर्मान, मनोरचना तसेच अर्थ-व्यवस्थेवर झालेले परिणाम हे मुद्दे त्यांनी भौगोलिक दृष्टिकोनातून विशद करून सांगितले. जपानचे हवामान कसे आहे ? धान्याच्या उत्पादनापासून ते जपानी भाषा कशी बनली ? हवामानामुळे घरातील संबंध कसे ताणले गेले व त्यामुळे घटस्फोटांची संख्या बर्फ जास्त पडणाऱ्या प्रदेशात कशी वाढली वगैरे फार सुंदर प्रकारे व विनोदी शैलीने त्यांनी समजावून दिले. १९४५ नंतर घटना बदलली तरी घरातील प्रॉब्लेम्स तसेच राहिले हे त्यांनी जपानी घरांतील काही किस्से सांगून नमूद केले.

लेक्चर संपल्यावर त्यांनी सोबत आणलेली भूकंपावरील एक फिल्म दाखवली. "जॅपनीज पीपल मस्ट टॉलरेट अर्थक्वेक" हे या फिल्ममधील पहिलेच वाक्य काहीतरी निराळे सांगून गेले. भूकंप होणार हे कसे ओळखावे ? भूकंपापासून संरक्षण कसे करावे ? याचे शिक्षण शेतकऱ्यांच्या बायकांपासून ते शाळेत जाणाऱ्या तिसऱ्या-चौथ्या इयत्तेतील मुलांपर्यंत सर्वांना आहे व ते सातत्याने ते पडताळून पाहात असतात. भूकंपाचे बरेच आधी भाकित करता येते. अर्थक्वेक रिसर्च सेंटरच्या सहाय्याने टोकियो अर्थक्वेक सेंटरने आधी सांगून लोकांना जागरूक करून जी फिल्म घेतली तिचा पण समावेश या फिल्ममध्ये होता. भूकंपाच्या भाकिताच्या आधी व प्रत्यक्ष भूकंपाच्या वेळच्या परिस्थितीचे फार सुंदर चित्रण या फिल्ममध्ये

होते. जमीन कशी पुढे सरकत गेली, घरे कशी पडली वगैरे सर्व या फिल्ममध्ये व्यवस्थित टिपले होते.

दुसरे लेक्चरर होते डॉ. हुजीहीको फुजिकी या कोकुशिकान युनिव्हर्सिटीतील इतिहासाच्या प्राध्यापकांचे. यात त्यांनी अश्मयुगापासून तो आजतागायत घडलेला जपानचा इतिहास समजावून दिला. ते जपानीतून बोलले व ट्रॅन्सलेटरने त्यांचे भाषण इंग्रजीतून भाषांतर करून सांगितले. त्यामुळे लेक्चर जरी चांगले झाले तरी सततच्या भाषांतरामुळे ते अडथळ्याच्या शर्यतीप्रमाणे भासले. लोकांची आडनावे, धर्माचा प्रसार, देशाचे नाव या सर्वांचा इतिहासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी परामर्ष घेतला. जपानी भाषेत जपानला निप्पोन असे म्हणतात. निप्पोन म्हणजे सूर्याचा उगम. परदेशी लोकांनी उच्चारातील सोयिस्करपणामुळे निप्पोनचे जपान केले. जपान हा शब्द येथील लोकांना सुद्धा फार आवडला व ते स्वतःला जॅपनीज म्हणवू लागले. जपानमधील शिक्षण, उद्योगधंदे, पार्लमेंट-व्यवस्था, दुसरे महायुद्ध वगैरे गोष्टींची पण त्यांनी इतिहासाच्या दृष्टिकोनातून दखल घेतली. सोबत काही स्लाइड्स आणल्या होत्या त्या दाखवल्या.

'जपान इकॉनॉमी' या विषयावर किओ युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर निहेई यांचे भाषण झाले. इतिहासातील ठळक घटना, त्या वेळचे प्रमुख उद्योगधंदे व कामगार–मालक यांचे नाते यांत कसकसा फरक पडत गेला, ते त्यांनी सादर केले. केमिकल कंपनी, मरीन कंपनी, ट्रेड कंपनी, बँक वगैरे वगैरे विविध प्रकारच्या उद्योगांचे एकाच नावाखाली नियंत्रण करणारा मुख्य मध्यवर्ती असा एक गट असे. त्यास 'झाईबात्सु' असे म्हणत. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानमध्ये अशा गटाचे सरकारवर सुद्धा वर्चस्व होते. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जपानमध्ये त्यास बंदी घालण्यात आली. मित्सुबिशी या एकाच नावाच्या झाईबात्सुखाली २७ प्रकारच्या कंपन्या होत्या. आजसुद्धा त्या अस्तित्वात आहेत. परंतु कायद्यामुळे त्यांचे निरनिराळ्या नावाने विकेंद्रीकरण करावे लागले. सर्वात शेवटी सध्या जपानने केलेल्या वेगवान आर्थिक प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. जपानचा आर्थिक प्रगतीचा वेग हा जगात सर्वोच्चच नसून आश्चर्यजनक आहे. परंतु आर्थिक प्रगतीबरोबरच प्रगत राष्ट्रांच्यामधील आर्थिक सुबत्तेतून उद्भवणाऱ्या डोकेदुखीचे भय जपानला भेडसावतेय व हे खुद्द अनेक जपानी लोकांचे मत आहे. बोलता बोलता ते हळूच असेही बोलून गेले की, पाश्चात्य वस्तूंची नक्कल करण्यात जपानी लोक वाकबगार आहेत. त्यांनी पुढे असेही सांगितले की, जपानी लोक नुसती नक्कल करून थांबत नाहीत तर त्या मालात काही सुधारणापण घडवून आणतात व नंतरच तो माल बाजारात आणतात.

नॅशनल रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनचे हिरोशी यांचे 'जपानमधील शिक्षण' या विपयावर लेक्चर झाले. आकडेवारी, आलेख वगैरेंवर त्यांचा विशेष भर होता. जपानमधील शिक्षणप्रसार, त्याचा इतिहास, शाळेचे वर्ष, शाळेतील शिक्षणाची पद्धत, उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या इत्यादी विषय त्यांनी चर्चिले. परंतु एका सुरात झालेले त्यांचे भाषण विद्यार्थ्यांपर्यंत विशेष पोहोचले नाही.

टोकियो मेट्रॉपॉलिटन युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर कोयानो शोगो यांनी 'जॅपनीज सोशल कंडिशन्स' या विषयांवर इंग्रजीतून सुंदर भाषण केले. जगाची लोकसंख्या, जपानी लोक लाजाळू का ?, जपानमध्ये स्त्रीचा दर्जा या विषयावर ते बोलले. जपानी भाषा फार समृद्ध आहे व कुठल्याही क्षेत्रामध्ये ते दुसऱ्या भाषेची मदत घेत नाहीत, हा मुद्दाही त्यांनी विशद केला. जपानी कुटुंब-व्यवस्था त्यांनी विस्ताराने सांगितली. पूर्वीची एकत्र कुटुंबपद्धती व सध्या जास्त प्रमाणात आढळणारी विभक्त कुटुंबपद्धतीची, तसेच त्यांच्यातील संपत्तीचे वाटप व या सर्वांमागील कारणमीमांसा याची त्यांनी तपशीलवार माहिती दिली.

जननप्रमाण यासंबंधी विनोदाने बोलताना त्यांनी सांगितले की दुसऱ्या महायुद्धावरून सैनिक परत आले. ते बेकार होते व त्यानंतर एका वर्षाच्या आतच जपानमध्ये फार मोठ्या प्रमाणावर बालके जन्माला आली. त्यास 'बेबी-बून (एक)' असे म्हणतात. ज्या वेळी जपानने उद्योगधंद्यांमध्ये जगात चांगला जम बसविला, राष्ट्र खूप श्रीमंत झाले त्यानंतर काही काळातच जास्त प्रमाणात अपत्ये जन्मली. त्यास 'बेबी–बून ( दोन )' असे म्हणतात. परंतु मध्यंतरी आखाती राष्ट्रांनी तेलाचे दर खूपच वाढविले व त्या वेळेनंतर हेच अपत्य-जन्माचे प्रमाण एकदम ढासळले. याला त्यांनी बर्थरेट मॅप वर 'ऑईल शॉक' या नावाने ओळखतात असे सांगितले. जपानी लोकांचे आयुर्मान दुसऱ्या महायुद्धापूर्वी ५० च्या आत होते तर १९७१ साली ते ७० च्या पुढे गेले हे त्यांनी फार खुमासदार रीतीने कथन केले.

"जपानमध्ये प्राप्तिकर गोळा करणारी यंत्रणा मुळातच इतकी पद्धतशीर व जटिल आहे की, त्यातून कोणालाही सुटणे केवळ अशक्य. त्यामुळे जपानमध्ये ९९ टक्के काळा पैसा नाही" ते म्हणाले. "तसेच कुठल्याही व्यक्तीने कितीही पैसे साठविले तरी त्यावर फक्त पुढील एक पिढी बसुन खाऊ शकते. परंतु तिसऱ्या पिढीला मात्र पैसा राहात नाही व हे पूर्णपणे माहिती असल्यामुळे प्रत्येकाला कष्टाची सवय जडली आहे. मोठ्या माणसांच्या विक्रीला निघालेल्या घरांच्या जाहिराती अधूनमधून येत असतात व त्यामागे कष्टाचा अभाव अगर जुगार ही मुख्य कारणे आहेत. जो काही पिढ्यान् पिढ्या श्रीमंत वर्ग जपानमध्ये आहे त्यात शेतकऱ्यांचा भरणा अधिक आहे. कारण जपानमध्ये जमिनीला प्रचंड भाव आहे व तो वाढतच आहे."

एक भाषा, एक देश व निधर्मी राष्ट्र या मुद्द्यांवरून ते 'हसणे' या मुद्द्यावर आले. हास्याचे अनेक प्रकार आहेत व ते चेहऱ्यावर उमटताच जगात विशेषत्वाने जपानी लोकच त्याला योग्य प्रकारे टिपतात व समजतात. हा पण मुद्दा त्यांनी सुंदर प्रकारे अभिनयासकट समजावून सांगितला. जपानी लोकांच्या वागण्यामध्ये यास विशेष महत्त्व आहे. दुसऱ्याला आनंदी करणारे हास्य हे एक फार 'हुकमी' व 'चकटफू' साधन आहे हे पण त्यांनी शेवटी सांगितले. जास्तीत जास्त कमी बोलणे यास जपानमधील व्यवहारात मान दिला जातो, जपानचा धर्म, संस्कृती, गरीब-श्रीमंत, जपानमधील हिंसा, दंगेधोपे हे मुद्दे पण ते विसरले नाहीत एकंदरीत हे व्याख्यान पण फारच सुंदर झाले.

एक दिवस प्रोफेसर मात्सुओका यांचे 'एन्व्हाइरोनमेन्टल प्रॉब्लेम' या विषयावर व्याख्यान झाले. नैसर्गिक हवामानापासून जपान कसा दूर चाललाय व याच्या उलट दिशेने जाण्यासाठी आता जपानी कसे धडपडत आहेत याची माहिती त्यांनी दिली.

एकंदरीत जपानी लेक्चरर्स सुद्धा कसलेल्या वक्त्याप्रमाणे मंत्रमुग्ध करणारी भाषणे करतात याची खात्री पटली. प्रोफेसर शोगो यांनी स्वतःच असे सांगितले होते की, जपानमध्ये लोक विशेषतः आपल्या आवडत्या विषयामध्येच नोकरी करतात व त्यांना त्या मिळतात, मग ते लेक्चरर्स तरी त्याला अपवाद कसे वरे असतील ?

**फिल्म्स् :**

दुपारचा दुसरा विरंगुळा म्हणजे फिल्म्स. सुरुवातीलाच वाय. के. सी. मध्ये उपलब्ध असलेल्या एकूण फिल्म्सची यादी आम्हाला दिली गेली होती व त्यातील कोणत्या फिल्म्स बघण्यामध्ये रस आहे हे आम्ही त्यांना सांगितले होते. परंतु अपेक्षेप्रमाणे सगळ्याच फिल्म्ससाठी मागणी आल्याने काही फिल्म्स दुपारच्या २ ते ५ या वेळात तर उरलेल्या रात्री ९ च्या पुढे दाखविण्यात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने Festivals in Japan, Sports in Japan, Recreation - The Japanese Way, Children in Town & Village, Economy in Japan, Visual history of Japan, Human relation in Japan, Business nippon, Labour Management Relation in Japan, Why Japanese Cars are Popular, Life of a Japanese mechanic, R & D for progress, Latest Technology In Steel Fabrication in Japan वगैरे फिल्म्स होत्या. एकंदरीत जपानी लोकांच्या उदात्त, गतिमान व प्रगतिशील आयुष्याचे या फिल्म्समधून दर्शन घडले. अर्थात् जपानची विविध अंगाने जास्तीत जास्त माहिती व्हावी हाच या फिल्म्स दाखविण्यामागील हेतू होता.

## मिनी ट्रिप्स :

दुपारचा तिसरा व आम्हा सर्वांना मनापासून आवडणारा विरंगुळा म्हणजे छोटया छोटया ट्रिप्स. होस्टेलची एक मिनी बस होती. त्यात २२ लोकांची बसण्याची व्यवस्था होती. बस सर्व सोयींनी युक्त अशी होती. बसमधून अपेक्षित स्थळी जाईपर्यंत व तेथून परत होस्टेलमध्ये येईपर्यंत बराच कालावधी लागे. कधी कधी तर आम्ही रात्री ९/१० वाजता परत येत असू. अशा वेळी बसमध्ये आम्हीच आमची करमणूक करीत असू. बसमधील प्रत्येक खिडकीचे वरील बाजूस एक सॉकेट असे. त्यामध्ये माईकला जोडलेल्या वायरचा प्लग घातला की माईक समोर आमच्यापैकी कोणाचा तरी सूर लागायचा. गाडीच्या छतामध्ये लपलेल्या चारी लाऊड-स्पीकरमधून तो ऐकू येई. सर्व त्यावर ताल धरायचे. आमचे ग्रुप को-ऑर्डिनेटर व ट्रॅन्सलेटर सुद्धा त्यावेळी आमच्यापेक्षा वेगळे नसत. चक्क एक निर्भेळ करमणूक. मिनी बस खाद्य पेयांनी भरलेली असायची. फ्रूट ज्यूस किंवा चहा कॉफीचे टिन्स, वेफर्स, बिस्किटे वगैरे पदार्थ बरोबर असल्याने या ट्रिप्स खूपच चवदार होत. निरनिराळ्या देशांतील आम्ही मंडळी आपापल्या कुठल्याही चिजा सादर करीत असू. अगदी शिळेवरचे गाणेसुद्धा. माझ्या एका मलेशियन दोस्ताला 'रमया वतावया . . .' हे गाणे फारच आवडले. त्यांनी ते पाठ करून नंतर एका पार्टीत सुद्धा सादर केले होते.

आम्ही भेट देण्यासाठी जेथे जाऊ त्या प्रत्येक ठिकाणी सुरुवातीला आमचे खास जपानी पद्धतीच्या स्मित-वदनाने स्वागत होई. त्यानंतर तेथील एका रूममध्ये बसविले जाई, बहुतेक ठिकाणी गेल्या-गेल्या ग्रीन टी किंवा ज्याला जपानीत 'ओचा' असे म्हणतात तो चहा दिला जाई. मला सुरुवातीला हा चहा एवढा आवडायचा नाही. पण नंतर मी त्याची सवय करून घेतली व कित्येक वेळा होस्टेल मध्ये सुद्धा तो घेत असे. कारण देऊ केलेला पदार्थ स्वीकारण्याने जपान्यांना विशेष आनंद होतो व पुढील गोष्टी पण विशेष सहकार्याने घडवात, हे कळून चुकले. या चहात 'सी' व्हिटॅमिन प्रामुख्याने असते असे मला एका जपानी दोस्ताने सांगितले होते. 'ओचा' पान झाल्यावर त्या प्लॅन्टची माहिती सांगण्यात येई. नंतर त्या प्लॅन्टचे माहितीपत्रक दिले जाई. या बरोबरच काही वेळा त्या प्लॅन्टमध्ये चाल-णाऱ्या कार्याची फिल्मसुद्धा दाखवली जाई व नंतर प्रत्यक्ष प्लॅन्ट दाखवला जाई. त्यानंतर परत पहिल्या रूममध्ये एकत्र येऊन कोणाला शंका असल्यास त्याचे निरसन केले जाई व सर्वांत शेवटी आम्हा सर्वांना या प्लॅन्ट-मार्फत एक छोटीसी भेट-वस्तू, अगर एखादा खाद्य पदार्थ देण्यात येई. प्रत्यक्ष प्लॅन्ट-भेटीच्या वेळी आम्हा प्रत्येकाला एक लहानसा वायरलेस रिसीव्हर दिला जाई. त्याचे श्रवणयंत्र कानाला लावावयाचे. तेथील अधिकाऱ्याने जपानीत सांगितलेली माहिती आमच्या

ग्रूपची ट्रॅन्सलेटर तिच्या पेनच्या मागे लावलेल्या लहानशा वायरलेस ट्रॅन्समीटर-वरून भाषांतर करून इंग्रजीतून सांगत असे. त्यामुळे १०० फुटांच्या परिसरात पांगलेल्या आम्हा प्रत्येकाला ती माहिती व्यवस्थित ऐकायला मिळे.

आम्ही भेट दिलेल्या ठिकाणांपैकी एक होते, कचऱ्यापासून वीज निर्माण करणारे जनरेटिंग स्टेशन. या ठिकाणी अनेक गाड्यांमार्फत आसपासच्या विभागातील कचरा एकत्र करून एका ठिकाणी आणला जाई. तो बंदिस्त भट्टीत जाळला जाई व त्यापासून वीज निर्माण केली जाई. बाहेरून पंचतारांकित हॉटेलप्रमाणे भासणाऱ्या या फॅक्टरीत, फॅक्टरीच्या आवारात व मुख्य प्लॅन्टभोवती कमालीची स्वच्छता होती. एवढेच नव्हे तर, मुख्य ऑडिटोरियममध्ये प्लॅन्टची माहिती दिल्यावर आम्हाला आमचे बूट बाजूला काढून त्या स्वच्छ प्लॅन्टमधील सपाता वापरूनच प्लॅन्ट बघावा लागला. एका खूप उंच ठिकाणाहून बंदिस्त काचेच्या केबिनमधून ऑपरेटर कार्याचे नियंत्रण करीत होता. या केबिनच्या समोर भरपूर लांबरुंद व प्रचंड खोल अगदी दरी वाटावी एवढ्या मोठ्या खड्ड्यातील कचरा अजस्र यांत्रिक हाताने पकडून पुढील एका विभागात टाकला जातो. तेथून तो खाली सरकत धगधगणाऱ्या तिरप्या उताराच्या भट्टीत येतो. येथून पुढे एक मोठा थर्मल पॉवर प्लॅन्ट असून त्याच्या सहाय्याने विजेची निर्मिती केली जाते. तर कचरा जळाल्यानंतर भट्टीच्या खाली येणारी राख पुढे खाली एका निराळ्या खड्ड्यात आणून टाकली जाते. तेथून ती परत क्रेनच्या सहाय्याने ट्रकमध्ये भरून खत-प्रकल्पाकडे नेली जाते. अशा प्रकारे कचऱ्यापासून वीज व नंतर खतासाठी वापर करून कचऱ्याचा पूर्ण निचरा केला जातो. या प्रकल्पापासून खूप अंतरावर या प्रकल्पाची ९० मीटर उंचीची व २.६ मीटर व्यासाची चिमणी असून त्यातून धूर बाहेर पडत असतो.

या थर्मल पॉवर प्लॅन्टची भव्य वातानुकूलित कंट्रोल रूम सर्व अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज होती. प्रत्यक्ष धगधगत्या भट्टीसकट एकूण सर्व प्लॅन्टमधील निरनिराळ्या ठिकाणच्या प्रक्रिया दाखविण्यासाठी येथे अनेक टीव्ही मॉनिटर्स होते. तर तेथील लांबलचक कंट्रोल डेस्कसमोर बसलेल्या जपानी लोकांचे हात समोरील विविध पॅनेल्सवरील दर्शकावरून पुढील योग्य ती कृती करण्यात मग्न होते.

याच ठिकाणी तयार होणाऱ्या विजेचा उपयोग करून जवळच असलेल्या वृद्ध लोकांच्या क्लबच्या पोहोण्याच्या तलावाचे पाणी गरम राखले जाई. वृद्धासाठी विनामूल्य चालवलेला हा क्लब पण बघितला. ही त्या गावाने वृद्ध लोकांसाठी केलेली खास सोय ऊर्फ सेवा होय. एकंदरीतच जपानमध्ये वृद्धांना खूप मान मिळतोच परंतु त्यांच्यासाठी अनेक सुविधा, अतिशय अल्प दरात किंवा बहुतांशी मोफत उपलब्ध करून दिलेल्या असतात. वृद्धावस्थेत सुखाने राहाण्यासाठी सरकार व समाजाने केलेले हे एक सत्कृत्यच होय.

असेच एक दिवस दुपारी आम्ही श्री. कावामुरा हिडेयोशी या एका सत्तरी ओलांडलेल्या तरुण जपानी माणसाच्या लहानशा फॅक्टरीला भेट दिली. या फॅक्टरीत फक्त नंबर छापावयाच्या निरनिराळ्या प्रकारच्या मशिन्सचे उत्पादन होते. भेट देण्यापूर्वी ह्या गृहस्थांनी होस्टेलमध्ये स्वतः येऊन त्यांच्या फॅक्टरीचा व त्या मागील त्यांच्या आयुष्याशी निगडीत असलेला इतिहास सांगितला. त्यांनी वयाच्या १२ व्या वर्षापासून या फॅक्टरीचा ध्यास घेतला होता, व १९२४ साली पदवी घेतल्यापासूनच ते या फॅक्टरीच्या मागे लागले ते आजतागायत. सध्या त्यांच्या फॅक्टरीत २५ लोक काम करतात. उत्पादन होऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक मशीनमध्ये २० लाख वेळा वापर करण्याची क्षमता आहे व त्याची सरकारमार्फत खातरजमा झाली आहे असे त्यांनी अभिमानाने सांगितले. याच फॅक्टरीत त्यांचा स्वत:चा असा लहानसा रिचर्स अॅन्ड डेव्हलपमेंट विभाग आहे. या ठिकाणी त्यांनी अनेक दिवस व रात्री घालवून मॅन्युअल, सेमी अॅटोमॅटिक व अॅटोमॅटिक नंबरिंग मशिन्सचे निरनिराळे प्रकार शोधून काढले आहेत. आज त्यांच्या मशिन्सना परदेशातूनसुद्धा खूप मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

फॅक्टरी ही फॅक्टरी नसून ते कामगारांचे एक घरच असून त्यांचे एकमेकांशी संबंध हे घरातील संबंधाप्रमाणेच असतात. हे संबंध लहान फॅक्टरीत विशेष प्रमाणावर असतात. प्रत्येक कामगार हा त्याच्या कामाला, त्याच्या फॅक्टरीला व राष्ट्राला पूर्णपणे वाहून घेतो हे त्यांनी आवर्जून सांगितले. त्यामुळे कामगारांचे प्रश्न कधीही उभे राहिले नाहीत, परंतु फॅक्टरी बंद करावी असे अनेक प्रसंग आले परंतु ते त्यातून तरले. आमच्यापैकी एकाने त्यांना प्रश्न केला की, 'अशा वेळी डोक्याला त्रास नाही का झाला ?' तेव्हा ते म्हणाले, 'मी प्रयत्नांची पराकाष्ठा करून कारखाना तगवला पण डोक्याला त्रास करून घेतला नाही. कारण डोके आपले आहे मग त्याला त्रास का बरे द्यावयाचा ?'

त्यांच्या लहानशा फॅक्टरीत त्यांची एक बऱ्यापैकी प्रशस्त रूम होती. तेथे मोठ्या टेबलाभोवती त्यांच्या फॅक्टरीतील कामगार आठवड्यातून एकदा एकत्र बसून येणाऱ्या अडीअडचणींचा, तसेच प्रगतीचा मागोवा घेत असत. ध्यास, चिकाटीत्यास आलेले मूर्त स्वरूप व झगडा यांचे ही लहान फॅक्टरी हे एक उत्तम उदाहरण होते.

सरकारी मदतीच्या संदर्भात बोलताना ते म्हणाले, "लहान कारखानदारांना जपानमध्ये सरकारतर्फे थोडीफार मदत मिळते. परंतु मध्यम व लहान कारखाने हे गरीबच राहतात. लहान फॅक्टरीत कामगारांना दर वर्षी अंदाजे पाच टक्के पगारवाढ देतात" याच वेळी त्यांनी एक वाक्य उच्चारले ते कायमचे मनात राहून गेले. ते म्हणाले, "जपान सरकार खूप श्रीमंत आहे पण येथील लोक गरीब आहेत."

एक दिवस लेक्चर व दुपारचे जेवण लवकर संपविण्यात आले व दुपारी १२-४५ ला आम्ही मिनीबसने निघालो ते २-४० ला टोकियो जवळील ' तनाशी फॅक्टरी ऑफ सिटिझन वॉच कंपनी ' मध्ये पोहोचलो. तेथे नेहमीप्रमाणे प्रथम लेक्चर व नंतर २५ मिनिटे सिटिझन वॉच कंपनीसंबंधी फिल्म दाखविण्यात आली. नंतर ५-३० पर्यंत आम्ही त्यांचा घड्याळाचा कारखाना बघितला.

१९३० साली स्थापन झालेल्या या कारखान्यामध्ये कामगारांची संख्या ३१०० असून पुरुष व स्त्रिया यांचे प्रमाण ७:३ असे आहे. पेन्शनचे वय ६० वर्षे आहे. सिटीझन वॉच कंपनीच्या सर्व कारखान्यांतील कामगारांची संख्या १० हजारांच्या वर आहे. तर जगामध्ये एकूण ८६ प्रमुख ठिकाणी यांची सर्व्हिस स्टेशन्स आहेत. मेकॅनिकल, ॲनॉलॉग व डिजिटल अशा तिन्ही प्रकारच्या घड्याळांचे उत्पादन या कारखान्यामध्ये होते व त्यांचे उत्पादनाचे प्रमाण सुद्धा अनुक्रमे ६ : ३ : २ असे आहे.

या कंपनीतर्फे क्रिस्टल ऑसिलेटर व लिक्विड क्रिस्टल सेल यांचे बरोबर मशीन टूल्स व प्रिंटर्स वगैरेंचेसुद्धा उत्पादन होते. या कंपनीची प्रतिवर्षी १०.५ बिलियन्स येन एवढी विक्री होते. सिको व कॅसिओ या कंपन्या त्यांचे मुख्य स्पर्धक असले तरी ही कंपनी घड्याळ बनविण्यामध्ये जगात प्रथम क्रमांकावर आहे असा त्यांचा दावा होता. आम्ही त्या कारखान्यातील ॲटोमायझेशन, एका मोठ्या पत्र्यापासून घड्याळाचा मूळ सांगाडा कसा बनतो. तसेच आय्. सी. कटिंगपासून बेस प्लेट वर क्वार्टझ क्रिस्टलसकट सर्व असेंब्ली कशी बसते व त्यासाठी बारीक सारीक भागांची जुळवणी कशी होते ते बघितले. तेथील पांढऱ्या शुभ्र कपड्यांतील कामगारांचे कामातील वाकबगार व सफाईने हलणारे हात न्याहाळले. डिजिटल विभाग हा काचेमधूनच न्याहाळला. कारण त्यासाठी स्वच्छतेची फारच खबरदारी घ्यावी लागते. या ठिकाणी क्वार्टझ क्रिस्टल व्हॅक्युम सिलींग पद्धतीने असेंब्लीमध्ये पक्का केला जातो. पुढे डिजिटल प्लेटची पूर्णावस्था, लिक्विड क्रिस्टलचे इंजेक्शन वगैरे बघितले. दोन्ही म्हणजे ॲनॉलॉग व डिजिटल वॉचसाठी क्वार्टझ क्रिस्टल ऑसिलेटरचा वापर करण्यात येतो व क्वार्टझ क्रिस्टलचा बिनचूकपणा ( ॲक्युरसी ) ही हा क्रिस्टल ज्या कोनातून कापला गेला आहे त्यावर अवलंबून असते. हा कोन एका डिग्रीच्या ३६०० व्या भागापर्यंत अचूकपणे कापला आणि मोजला जातो. त्यासाठी एक्स-रे ॲनालायझरचा वापर करतात. त्यामुळे वर्षाला जास्तीत जास्त एकूण ३ सेकंदांचा फरक पडू शकतो. इतक्या अचूक वेळेची घड्याळे बनविली जातात. वरील केसवर सुद्धा ऑयॉनप्लेटिंग केले जाते. त्यामुळे त्याचे सौंदर्य दीर्घकाळ टिकून रहाते. ॲनॉलॉग व डिजिटल असे दोन्ही प्रकार एकत्रित असलेली ॲना-डिजी घड्याळेसुद्धा या कंपनीतर्फे बनविली जातात व याचाच वेळेतील इतर २७ निरनिराळ्या प्रकारच्या कार्यांसाठी वापर करता येतो.

फुजी पर्वताच्या सान्निध्यात या कंपनीची रिसर्च डिव्हिजन आहे. कॉम्प्युटरच्या सहाय्याने नवीन डिझाईन तंत्राचा वापर तेथे करण्यात येतो. घडयाळासाठी विशिष्ट प्रकारची आय्. सी. बनविण्यात आली आहे. फक्त १२० घन मिलीमीटर जागा व्यापणारे घडयाळ, तसेच १ मिलीमीटरपेक्षाही कमी जाडी असणारे क्वार्ट्झ क्रिस्टलच्या सहाय्याने एकूण फक्त ३.१ मिलीमीटर असणारे घडयाळ या कंपनीने मागील दशकात बाजारात आणले. सर्वांत लहान आकाराची घडयाळे या कंपनीतर्फे बनविली जातात व त्यांच्या टेस्टिंगसाठी लेसरचा वापर करण्यात येतो. हाँगकाँग येथील काईताक इन्टर नॅशनल एअरपोर्ट येथील सिटिझन वॉच कंपनीची निऑन साईन ही एशियातील सर्वांत मोठी निऑन साईन आहे.

होस्टेलला परतण्यापूर्वी आम्ही फॅक्टरीच्या एका रूममध्ये एकत्र आलो. त्या वेळी जेव्हा तेथील एका अधिकाऱ्याला कळले की, मी भारतातून आलो आहे, तेव्हा त्याने माझी आवर्जून चौकशी केली. त्याने सांगितले की, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलालजी नेहरूंनी १९५६ साली जपानमध्ये या कारखान्याला भेट दिली होती व त्यानंतर म्हणजे १९६० साली सिटिझन वॉच कंपनी आणि बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स कंपनी यांचा सहकार्याचा करार झाला व जपानी तज्ज्ञांच्या सहाय्याने आज एच्. एम्. टी. कंपनीतर्फे भारतात दरवर्षी ३० लाखांच्या वर घडयाळांचे उत्पादन होते.

टोकियो इलेक्ट्रिक पॉवर कंपनी ही जपानच्या ९ इलेक्ट्रिक कंपन्यांपैकी एक असून जगातील खाजगी कंपन्यांपैकी विजेच्या उत्पादनात प्रथम क्रमांकाची कंपनी म्हणून गणली जाते. १८८३ साली स्थापन झालेली ही कंपनी आजमितीस उद्योगधंद्यात अव्वल क्रमांक मिळविणाऱ्या जपानच्या राजधानीच्या आसपासच्या ४० हजार चौरस किलीमीटर परिसरातील उद्योगधंदे, तसेच घरगुती वापर यासाठी अष्टौप्रहर अखंडपणे विजेचा पुरवठा करते. होस्टेलपासून बसने अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर असलेल्या मिनामी योकोहामा थर्मल पॉवर स्टेशन या टोकियो इलेक्ट्रिक पॉवर कंपनीच्या थर्मल पॉवर स्टेशनला एक दिवस आम्ही भेट दिली. एकूण पाच तास चाललेल्या या भेटीमध्ये सुरुवातीला नेहमीप्रमाणे मोठ्या प्रशस्त लेक्चररूममध्ये त्यांच्या एका विभागाच्या प्रमुखाने कंपनीचा इतिहास आकडेवारीसकट जपानी भाषेतून धडाधडा म्हणून दाखविला. आमच्या ट्रॅन्सलेटरची त्या वेळी फारच तारांबळ उडाली. भाषण संपले व बाजूला उभ्या असलेल्या त्यांच्या असिस्टंटने एक बटन दाबले असता मंद सुरात एक संगीत सुरू झाले. खिडक्यांचे पडदे सरकू लागले. फळयाच्या वरील बाजूस भिंतीमध्ये दडलेला स्क्रीन हळूहळू उलगडू लागला. रूममधील दिवे मंद होत गेले. व संगीत थांबले तेव्हा स्क्रीन पूर्णपणे खाली आला होता. रूममध्ये पूर्णपणे अंधार होऊन मागील प्रोजेक्टरमार्फत फिल्म

दाखविली जाऊ लागली. अगदी जेम्स बाँडच्या पिक्चरमधल्यासारखे वाटले. फिल्म संपल्यावर सुरुवातीच्या बरोब्बर उलट क्रिया. यानंतर आम्ही प्रत्यक्ष थर्मल पॉवर स्टेशनचा एक भाग बघितला. हे बघत असताना आमच्यातील काहींनी विचारलेल्या काही प्रश्नांना तेथील अधिकाऱ्यांनी मनमोकळेपणाने व विनासंकोच 'मला माहीत नाही परंतु बघून नंतर तुम्हाला कळवीन' अशीपण उत्तरे दिली. खरोखरच त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे काही दिवसांनी आमच्या शेवटच्या मीटिंगमध्ये आमच्या ग्रुप को-ऑर्डीनेटरने वाचून दाखविली.

या स्टेशनमध्ये एकूण चार शिफ्टमध्ये काम चालते. उन्हाळ्यामध्ये विजेला मागणी विशेषत्वाने असते. ७३८ इलेक्ट्रिक स्टेशन्स असलेल्या जपानच्या या भूमीवर प्रतिवर्षी दोन नवीन थर्मल पॉवर स्टेशन्स कार्यान्वित होत असतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर तेथील विद्युत्प्रसार होत आहे.

एकंदर प्लँटची भव्यता, नीटनेटकेपणा, टापटीप, स्वच्छता व कामगारांमधील कामाची निष्ठा विशेष नजरेस पडत होती. प्लँट बघत असताना १०० मीटर उंचीच्या तीन चिमण्यांच्या एकत्रित केलेल्या तोंडातून बाहेर पडणारा धूर आसमंत धुरकट करीत होता हे पण नजरेतून सुटले नाही.

कुठल्याही हुद्याची व्यक्ती असो व ऐनवेळी कुठल्याही प्रकारचे काम पडो, आपल्या असिस्टंटची वाट न बघता झटकन ते काम हातावेगळे करणे हे जपानी लोकांच्या अंगवळणी पडलेले आहे. अगदी कचरा उचलणे, फळा ढकलणे किंवा इतर तत्सम कुठल्याही दर्जाचे काम असो येथील जपानी सर्व कामे स्वतः हाताने करीत. या कंपनीच्या ऑफिसमध्ये ऑन-लाईन कॉम्प्युटर सिस्टिमचा वापर केल्यामुळे गिऱ्हाइकांचे प्रश्न तसेच अडी-अडचणी त्वरेने व कार्यक्षमतेने हाताळल्या जातात.

डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात एक दिवस खूपच सपाटून थंडी पडली होती. त्या दिवशी दुपारी सव्वाला आमचा ग्रूप नेहमीच्या मिनी बसने निघाला. त्या दिवशी योकोहामा सब-वे कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे मायोका सब-वे स्टेशनच्या कन्स्ट्रक्शनचे काम चालले होते. त्या ठिकाणी भेट आयोजित केलेली होती. कन्स्ट्रक्शनच्या जवळच असलेल्या आगगाडीच्या दोन डब्यासारख्या साईट-शेडमधील एका शेडमध्ये आम्ही प्रवेश केला. आतमध्ये भिंतीवर नकाशे चिकटवलेले होते. आसपास वावरणाऱ्या बांधकामावरील एकसारख्या ड्रेसमधील माणसे दुसऱ्या महायुद्धातील चित्रपटांच्या प्रसंगाप्रमाणे भासत होती. खूपच गारठा असल्याने प्रथम आम्हा सर्वांना गरम टी व कॉफी देण्यात आली. सब-वेच्या खोदकाम व बांधकामाबाबत थोडक्यात माहिती सांगण्यात आली व प्रत्यक्ष बांधकाम बघण्यासाठी आम्ही सर्वजण हेलमेट घालून बांधकाम झालेल्या प्रशस्त जिन्याने जमिनीखाली शिरलो.

बांधकाम फारच पद्धतशीरपणे चाललेले होते व यामध्ये विद्युत्‌यंत्राचा वापर प्रामुख्याने करण्यात येत होता. जमिनीखाली काम चालू असलेल्या या सब-वेच्या छताची उंची जमिनीपासून कमीत कमी १४ मीटर तर जास्तीत जास्त ३० मीटर एवढी होती. सब-वेच्या रुळाच्या जागेच्या एका बाजूला प्लॅटफॉर्म तर दुसऱ्या बाजूला चक्क भिंत असते. गाडी सुरू होण्यापूर्वी गाडीची काचेची दारे बंद होत असल्याने भिंतीला आपटून अपघात वगैरे प्रकार येथे नाहीत. जमिनीच्या पोटातून जाणाऱ्या सब-वे साठी प्रथम बोगदा निर्मिती व यांचे व्यवस्थित बांधकाम ही कामे हातात घ्यावी लागतात. निर्मितीचे मुख्य तीन प्रकार आहेत. सुरुवातीला अपेक्षित बोगद्याच्या दोन्ही बाजूला लहान बोगदा करून भिंती बांधून घेतल्या जातात व नंतर बोगद्याच्या वरील कमानीच्या जागेतील भाग खणून तेथे पक्क्या कमानीची उभारणी केली जाते व नंतर मधील भागातील खोदकाम केले जाते. यास 'ॲडव्हान्स साईड वॉल्स अँड अप्पर हाफ कटिंग मेथड' असे म्हणतात, तर 'शिल्ड ड्रिव्हन टनेलिंग मेथड' चा वापर विशेषत: जेथे जमीन मऊ आहे तेथे केला जातो. यांत बोगद्याच्या व्यासापेक्षा थोड्या अधिक व्यासाच्या सिलिंड्रिकल स्टील टनेलिंग मशीनचे सहाय्य घेतले जाते. सुरुवातीला उभी खोदाई करून त्यातून हे मशीन खाली सोडले जाते. नंतर या मशीनमार्फत जमिनीतून जमिनीला समांतर पुढे पुढे खोदाई केली जाते व खोदलेल्या भागामध्ये रिअिनफोर्स्ड कॉन्क्रीट व स्टीलच्या सहाय्याने पक्की रिंग तयार केली जाऊन बोगदा तयार केला जातो. 'ओपन कट' पद्धतीत स्टीलचे खांब दोन्ही बाजूला जमिनीत उभे गाडले जातात. त्यावर बीम टाकले जाऊन त्यावर स्टीलच्या प्लेट्स टाकल्या जातात व नंतर त्यावर भर टाकली जाऊन रस्ता पूर्ववत केला जातो. त्याच वेळी खांब व बीमच्या आतील भागातील खोदकाम करतात. अशा वेळी आधीच जमिनीतून गेलेल्या गोष्टींबाबत फारच खबरदारी घेतली जाते व त्या सर्व गोष्टी पूर्ववत्‌ असल्याची खात्री केली जाते.

या बांधकामामध्ये सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. एवढेच नव्हे तर, हे खोदकाम व बांधकाम चालू असताना जनतेला कुठल्याच प्रकारे त्रास होऊ नये याचीसुद्धा फार खबरदारी घेतलेली असते. यासाठी जमिनीखालून गेलेल्या गोष्टींशी संबंधित अशा लोकांशी सतत संपर्क ठेवला जातो. त्यांच्यासोबत वारंवार मीटिंग्ज घेऊन प्रथम चर्चा व नंतरच पुढील निर्णय घेतले जातात. टोकियो गॅस कंपनीने तर एक विशेष इन्स्पेक्टर नेमून आपल्या पाइप लाइनच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवले होते. ट्रॅफिक सेफ्टीसाठी बांधकाम कंपनीचा माणूस २४ तास ठेवलेला असतो. त्याच्या सहाय्यासाठी दिवे, सुरक्षिततेच्या जाळ्या व इतर साहित्यपण असते आणि तो खरोखरीच ऑन ड्यूटी असतो. खोदकाम होत असताना आसपासची जमीन खचणे वगैरेसारखे काहीही प्रकार होत नाहीत याची खात्री केली जाते. खोदकामालगतच्या पाण्याच्या पातळीची उंचीसुद्धा सातत्याने पडताळून पाहिली जाते. कामावरील

उपकरणापासून आवाज व हादऱ्यांपासून उपसर्ग होऊ नये म्हणूनसुद्धा फार खबरदारी घेतलेली असते व एवढे सर्व करूनही या कामाबाबत काहीही मत किंवा अडचण व्यक्त करावयाची असेल तर सरकारतर्फे तसेच कंपनीतर्फे अशी दोन स्वतंत्र ऑफिसेस उघडलेली आहेत.

मायोका सब-वेचे कन्स्ट्रक्शन बघून आम्ही सर्वजण तडक बसने कन्नाई स्टेशनच्या दहाव्या मजल्यावरील रेल्वे कंट्रोल रूमला भेट देण्यासाठी निघालो. वाटेत जाताना दुतर्फा फारच सुंदर नगरी नजरेस पडत होती. सुंदर रेखीव रस्ते, घरे, गाड्या, दुकाने इत्यादी सर्व डोळयांनी पीत होतो. फारच सुंदर ! कंट्रोल रूमच्या १० व्या मजल्यावरून तर समोरील रेल्वे स्टेशन, त्यावरील अनेक ट्रॅक्सवरून जाणाऱ्या आगगाड्या, बाजूचे स्टेडियम, पुलावरून व पुलाखालून जाणारे नागमोडी व लांबलचक रस्ते आणि त्यावरील सुसंबद्ध वाहतूक, फास्ट स्पिड ट्रॅकवरून जाणारी सुसाट वहाने, विविध आकारांतील रंगीत निऑन साईन्स दिव्यांच्या झगमगाटात सर्व काही फारच सुंदर व आकर्षक दिसत होते.

'रेल्वे वाहतूक सुरू झाल्यापासून जपानमध्ये रेल्वेचा एकही अपघात झाला नाही' तेथील वक्त्याचे हे पहिलेच वाक्य कायम मनात राहून गेले. दहाव्या मजल्यावरील लांबलचक रूममध्ये मध्यभागी कंट्रोल डेस्क होते व त्यापुढील व्हिज्युअल बोर्डावर सध्या रेल्वे कुठून कुठे चालली आहे हे नजरेस पडत होते. गाडीमध्ये अगदी ड्रायव्हर बेशुद्ध जरी पडला तरी त्या गाडीचे गाडीमधील अॅटोमॅटीक यंत्रणेमार्फत नियंत्रण केले जाते किंवा या कंट्रोलरूममधून सुद्धा त्या गाडीचे नियंत्रण करता येते ही माहिती विशेष नवलाईची वाटली. हॉस्टेलमध्ये परत आलो त्या वेळी रात्रीचे ९ वाजले होते.

एक दिवस आम्ही जवळच असलेल्या कामाकुरा या प्रसिद्ध ठिकाणी गेलो.

**कामाकुरा**


तिन्ही बाजूंनी हिरव्या गर्द वनश्रीने नटलेले व एका बाजूने सागरी किनाऱ्याने वेढलेले कामाकुरा हे एक स्वतःच्याच वैचित्र्याने निराळे उठून दिसणारे असे ठिकाण आहे. स्थानिक तसेच परदेशी पर्यटकांचे हे आवडते स्थान. योकोहामापासून जवळ आहे. योकोहामा, टोकियो वगैरे परिसरातील रहिवासी उन्हाळ्यामध्ये येथील सगामी बीचकडे धाव घेतात. येथील मस्त हवा आणि रेल्वेच्या सुंदर व जलद वाहतुकीमुळे टोकियोपासून एक तासाच्या अंतरावर असणाऱ्या ह्या ठिकाणी अनेकांनी आपले कायमचे वसतिस्थान केले आहे. ऐतिहासिक दृष्टिकोणातूनही प्रसिद्ध असलेल्या या परिसरात पुरातन मंदिरे, श्राईन्स आणि पर्यटकांना आकर्षित करणारी अशी अनेक कलादालने आहेत.

'**त्सुरुगाओका हाचिमान गु श्राईन**' हे हाचिमान श्राईनच्या प्रसिद्ध तीन श्राईन्सपैकी एक. कामाकुरातील खास आकर्षण. यातील मुख्य देवता युद्धाशी निगडित असल्याने अनेक शूर वीर व महायोद्धे युद्धापूर्वी येथे येऊन या देवतेची यथासांग पूजा करून व आशीर्वाद घेऊनच रणांगणावर शत्रूस सामोरे गेले. दरवर्षी साधारणतः एक कोटीच्या आसपास लोक या ठिकाणी भेट देऊन जातात.

**काके बोटाके** ( म्हणजे झुलता बुद्ध ) : बुद्धिझम आणि शिंटोझम यांचा सुरेख संगम दर्शविणारी बुद्धाची मूर्ती आणि सूर्याची प्रतिमा असणारा आरसा येथे पाहावयास मिळतो.

**हासे कॅनन ( म्हणजे दयेची देवता )** . दयेच्या देवतेच्या अनेक मूर्ती व पुतळे अस्तित्वात आहेत. त्या सर्वांत सुंदर व सर्वांत उंच असलेली लाकडाची मूर्ती येथे बघावयास मिळते.

**दाईबुत्सु म्हणजे ग्रेट बुद्ध** : जपानने राष्ट्रीय ठेव म्हणून जाहीर केलेली व पर्यटकांचे खास आकर्षण ठरलेली कामाकुरा येथील ही बुद्धाची मूर्ती. ध्यानमग्न अवस्थेत बसलेला बुद्धाचा लाकडी पुतळा इ. स. १२३८ मध्ये उभारण्यात आला. सन १२५२ मध्ये त्यावर ब्राँझ धातूचे कवच चढविण्यात आले. पहिला शोगुन



योरितोमो व सम्राट शी- जो यांच्या विनंतीवरून धर्मगुरू झोको यांनी समाजातून वर्गणी गोळा करून हा पुतळा उभारला. नंतर या पुतळ्याच्या बाजूने सुंदर इमारतीचे बांधकाम करण्यात आले परंतु हे बाजूचे बांधकाम लढाया, वादळे, भूकंप आणि सरतेशेवटी १४९५ साली झालेल्या तुफानी समुद्र लाटांनी भुईसपाट केले आणि

तेव्हापासून ४२ फूट उंचीचा आणि २ लक्ष १० हजार पौंड वजनाचा दयासागर बुद्धाचा हा पुतळा स्वतःच पाऊस, वारा, तळपता सूर्यप्रकाश आणि हिमवर्षावास टक्कर देत अजूनही उघड्यावर शांतपणे टिकून आहे.

कामाकुरा गु श्राईन, दुमजली प्रवेशद्वार, नृत्यमंडप ही कामाकुरा येथील अजूनही काही प्रेक्षणीय स्थळे आहेत.

अशाप्रकारे ५ आठवड्यांच्या दररोजच्या दोन सत्रांतील एकत्रित अभ्यास, लेक्चर्स, फिल्म्स व मिनी ट्रिप्स यांचा मनमुराद आस्वाद घेऊन आम्ही जपानी भाषेची परीक्षा पण पार पाडली. त्यानंतर वेध लागले होते होम व्हिजिटचे, म्हणजे जगात उद्योगधंद्यामध्ये फार मोठी उलथापालथ घडवून जपानला प्रचंड प्रमाणात आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणारा हा जपानी स्वतःच्या घरात कसा वागतो ? कसा वावरतो ? संसारात व मुलाबाळांत कसा रमतो, हे त्याच्याच संगतीत त्याच्याच घरात राहून अवलोकन करणे ही फार मोठी आकर्षक बाब होती.

## जपानी घरात दोन दिवस

जपानी घरामधील वातावरणाबाबत आम्हा सर्वांना कुतूहलापोटी उत्सुकता होती. होम व्हिजिटपूर्वी साधारणतः तीन आठवडे आम्हा प्रत्येकाकडून एक फॉर्म भरून घेतला होता. त्यामध्ये नाव, वय, शिक्षण, नागरिकत्व, जेवणातील आवडते आणि नावडते पदार्थ व ज्या कुटुंबात जाऊ इच्छिता तेथे आवश्यक वाटणाऱ्या गोष्टी वगैरे माहिती विचारली होती. भेट देऊ इच्छितो त्या कुटुंबात एक- दोन लहान मुले असल्यास मला जास्त आवडेल असे मी लिहिले होते.

समारोपाच्या बैठकी (क्लोजिंग मीटिंग) मध्ये आमचे ग्रुप को-ऑर्डिनेटर व ट्रॅन्स्लेटर यांच्यासह आमच्या ग्रुपची खेळीमेळीच्या वातावरणात होम व्हिजिटची चर्चा चालली होती. यामध्ये घरात प्रवेश करताच आपले बूट दारातच काढा. तेथे ठेवलेल्या सपाता घाला, ते तातामीवर दाराकडे तोंड करून ठेवा असे सांगितले. जपानी पद्धतीने कसे बसावे हे फळ्यावर सचित्र दाखवायचा प्रयत्न केला गेला. जपानी पेहरावाबाबतची माहिती, तसेच जेवताना व इतर वेळी म्हणावयाची जपानी भाषेतील शिष्टाचाराची विविध प्रकारची वाक्ये त्यांनी सांगितली. अशा प्रकारे Y. K. C. होस्टेल मधून जाणारा प्रत्येक विद्यार्थी हा जपानी घरात जाताना अगदीच अनभिज्ञ नसावा याची त्यांनी काळजी घेतली. होम व्हिजिटबाबतच्या शंका-कुशंका व त्यातून निर्माण होणारा हास्य-विनोद यामुळे आमची ही मीटिंग

बराच काळ चालली होती हे नंतर लक्षात आले. ज्या कुटुंबात मी जाणार होतो त्या कुटुंबाची थोडक्यात माहिती मला वाचून दाखविण्यात आली होती.

जपानमधील एशियन क्लबतर्फे ' जपानी कुटुंबास भेट ' हा कार्यक्रम घडवून आणला जातो. या मागचा मुख्य उद्देश म्हणजे अशा प्रकारच्या सहवासामुळे एकमेकांना काही अंशी समजून घेणे व परस्परसंबंध वृद्धिगत करणे हा होय. यासाठी जपानी यजमान कुटुंबीय आणि एक किंवा दोन परदेशी पाहुणे मंडळी यांच्या सोयीने एक दिवस नक्की केला जातो. त्या दिवशी पाहुणे मंडळी जपानी यजमान कुटुंबियांकडे जेवायला जातात. अर्थातच मित्रत्वाचे वातावरण निर्माण होते. गप्पा होतात व एकमेकांचे आचार-विचार समजून घ्यायला संधी मिळते.

विविध प्रकारच्या स्कॉलरशिप्सवर किंवा संस्थांमार्फत ट्रेनिंगसाठी जपानमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना या एशियन क्लबच्या जपानी कुटुंबास भेट या कार्यक्रमात समाविष्ट केले जाते, तर ज्या जपानी कुटुंबियांना अशा कार्यक्रमात यजमान म्हणून भाग घ्यावयाचा असतो अशी कुटुंबे या क्लबमध्ये आपले नाव नोंदवितात. परंतु विद्यार्थ्यांचे वसतिस्थान वा प्रवासात मोडणारा वेळ या गोष्टींमुळे फक्त टोकियो व योकोहामाच्या आसपासच्या प्रदेशातीलच जपानी कुटुंबीय मंडळींचा यजमान म्हणून सध्या समावेश केला गेला आहे.

एकदा का यजमान व पाहुणे या दोघांच्या सोईने दिवस ठरला की, या क्लबतर्फे यजमानांना एकूण येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या (अर्थात् ही जास्तीत जास्त तीन असते). त्यांची नावे, प्रत्येकाची वैयक्तिक माहिती, धर्म, जेवणातील आवड-नावड, येत असलेल्या भाषा (इंग्रजी, तसेच जपानी मधून कितपत बोलता येते ?) व भेटीची सोयिस्कर वेळ वगैरेची माहिती पुरविली जाते.

भेटीच्या दिवशी या क्लबच्या स्टाफपैकी एकजण या विद्यार्थ्यांना यजमानांच्या घराजवळील स्टेशनवर घेऊन येतात. त्या ठिकाणी दोघांची एकमेकांस ओळख करून देतात व काढता पाय घेतात. या क्लबतर्फे नंतर जपानी यजमानांना एक प्रश्नपत्रिका पाठविली जाते व या कार्यक्रमाबद्दलची मते मागविली जातात. तर ज्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाबद्दल काही माहिती या क्लबला द्यावयाची असेल त्यांनी कोऱ्या कागदावर को–ऑर्डिनेटरमार्फत ही माहिती क्लबकडे पाठवायची असते. गेल्या तीन वर्षांमध्ये एकूण ९५० विद्यार्थ्यांनी ४०० जपानी कुटुंबांसमवेत या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला आहे. एकंदरीत या कार्यक्रमाची आखणी फारच चांगली असून त्यामागील उद्देश सुद्धा मला खूप आवडला. हा कार्यक्रम आम्हा विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर जपानी यजमान कुटुंबियांना सुद्धा फार रुचला आहे. वर्षातून एकदा छापल्या जाणाऱ्या या क्लबच्या अहवालात असे म्हटले आहे की, गेल्या तीन वर्षांतील या कार्यक्रमावरून असे अनुमान निघते की धर्म, संस्कार, खाण्या-

तील आवडी-नावडी, चालीरीती, भाषा वगैरे गोष्टी, की ज्या या कार्यक्रमात अडथळा उत्पन्न करतील अशी शंका होती ती शंका पूर्णतः फोल ठरली असून हा कार्यक्रम अपेक्षेपेक्षा खूपच यशस्वी ठरला आहे. यजमान व पाहुणे या दोघांनीही 'हा पहिला भेटीचा कार्यक्रम म्हणजे केवळ एक वेळची भेट नसून ती मैत्रीची सुरुवात आहे व आमची पत्रांची देवाण घेवाण पण दीर्घकाळ चालू आहे' असे नमूद केले आहे. अर्थातच क्लबच्या संस्थापक मंडळींना यात विशेष आनंद झाला. आहे व हा क्लब म्हणजे दोन्ही चाहत्यांना एकमेकांना सांधणारा चांगला उत्तम दुवा ठरला आहे.

ठरल्याप्रमाणे आम्ही सकाळी ९ वाजता होस्टेलच्या लॉबीमध्ये येऊन हजर झालो. आमच्या ग्रूपपैकी मी व श्रीलंकेचा विजेदासा अशा दोघांना योकोहामा-जवळील मित्स्युक्यो या गावी राहात असलेल्या मात्सकुरा या कुटुंबियांत जावयाचे होते.

क्लबचे क्रियाशील सभासद तेथे आले. क्लबच्या या कार्यकर्त्यांमध्ये २५ ते ४५ वर्षांच्या महिलांचा भरणा अधिक असून हौसेपोटी अगर पार्टटाईम ड्यूटी म्हणून ते या क्लबचे कार्यकर्ते होतात. प्रत्येकीने आमच्या ग्रूपमधील प्रत्येकी दोघांना ते ज्या फॅमिलीमध्ये भेट देण्यास चालले आहेत त्यांचे नाव, गाव इ. सांगितले व लवकरच आमच्यातील प्रत्येकी दोघेजण या एक-एक कार्यकर्त्याबरोबर जवळील इसोगो किंवा कामीओका स्टेशनकडे टॅक्सीने किंवा बसने निघाले. मी, विजेदासा व क्लबची कार्यकर्ती असे तिघेजण इसोगोहून ट्रेनने योकोहामाला आलो. प्लॅटफॉर्मवरील टेलिफोनवरून त्या कार्यकर्तीने मात्सकुरा कुटुंबियांस फोन केला व आम्ही ट्रेनने मित्ससुक्यो गावी येत आहोत असे सांगितले. योकोहामाहून ठरल्याप्रमाणे आम्ही मित्सुक्यो गावी आलो. ४१ वर्षांचे श्री. तडाकी मात्सुकुरा स्वतः आम्हाला स्टेशनवर न्यायला आले होते. एशियन क्लबच्या कार्यकर्तीने आमची मात्सुकुरांशी ओळख करून दिली व आमचा निरोप घेतला. त्यांच्या गाडीतून आम्ही त्यांच्या घरी गेलो. घर एकदम वरच्या म्हणजे सातव्या मजल्यावर होते. त्यांच्या घरी ते स्वतः, पत्नी सौ. तोमोको, मोठी सात वर्षांची मुलगी हिरोको व चार वर्षांचा मुलगा ऋईची, असे त्यांचे चौकोनी कुटुंब होते. टोकियोतील शांपू व सोप बनविणाऱ्या फॅक्टरीत स्वतः मात्सुकुरा रिसर्च मॅनेजर होते. पत्नी पूर्णपणे गृहिणी तर मोठी मुलगी पहिलीत व मुलगा बालवाडीत होता. त्यांच्या घरी आमचे फारच उत्साहासे स्वागत झाले. आम्ही येणार म्हणून मुले दोन दिवसांपासून सगळीकडे नाचत सांगत होती असे त्यांनी सांगितले. दोन्ही मुले आमच्या स्वागतासाठी फारच उत्सुक होती. सुरुवातीला ती थोडी बुजली होती. थोड्याशा सहवासामुळे आपोआपच मोकळेपणाने वावरू लागली. मात्सुकुरा

व त्यांच्या पत्नी यांस थोडे इंग्रजी येत होते व आम्हाला थोडे जपानी, परंतु भाषेची अडचण अशी कधी भासलीच नाही.


मी त्यांना चंदनाचा हत्ती व धुपाच्या कांड्याचे पाकीट भेट दिले. धुपाची एक कांडी त्यांनी पेटवली. सौ. तोमोको मात्सुकुरा या आमच्या जेवणाबाबत फार साशंक होत्या. परंतु आमच्या हिरव्या कंदिलामुळे त्यांचा जीव भांड्यात पडला. त्यांनी अनेक प्रकारचे जपानी पदार्थ केले होते. घरगुती व मैत्रीच्या वातावरणामुळे खूप गप्पा झाल्या. आमचे जेवण त्या वेळी एक तासापेक्षाही खूप वेळ चालले होते हे लक्षात आले.

सौ. मात्सुकुरा या उत्तम ग्लायडरपटू होत्या. त्यांचा पूर्वीचा अल्बम आम्ही बघत असताना त्यांच्या पूर्वीच्या दिवसांचे त्या प्रफुल्लित चेहऱ्याने वर्णन करून सांगत होत्या. त्या खूपच बोलक्या होत्या. पूर्वी त्या जपान एअरलाइन्समध्ये एअर-होस्टेस होत्या. लग्नानंतर त्यातून निवृत्त होऊन सध्या मात्र पूर्ण वेळ गृहिणी. "मी चूल व मूल याकडेच पूर्णवेळ लक्ष देते व ते मला आवडते." असे त्यांनी आनंदाने सांगितले. "मी माझे सर्वस्व माझ्या कुटुंबासाठी समर्पित करते व याचमुळे माझ्या घराचे सुंदर घरात – स्वीट होम – मध्ये रूपांतर झाले आहे. ते बघण्यातच मला विशेष सुख वाटते." प्रगत राष्ट्रातील गृहिणीचे हे वाक्य मला विशेष जाणवले. घरकाम, स्वैंपाक, मुलांना शाळेतून ने–आण त्या स्वतः करतात. दुपारच्या वेळी मात्र न चुकता टेनिस-कोर्टवर टेनिस खेळायला जातात.

त्यांचा एकूण चार खोल्यांचा ब्लॉक होता. तो स्वच्छ, नीटनेटका आणि व्यवस्थित लावलेला होता. एका खोलीत एका कोपऱ्यात मोठा पियानो होता. त्याचे स्वर आम्हा सगळ्यांनाच आनंदित करून गेले. श्रीयुत मात्सुकुरा आपल्या सात वर्षांच्या कन्येकडून पियानो शिकतात, हे ऐकून आश्चर्य वाटले. तिची लहान बोटे त्या पियानोवर जलद व सहजपणे फिरत होती व आम्हा सर्वांना सुखवीत होती. खरोखरच तो दिवस फार सुंदर गेला. आम्ही सुद्धा काही गाणी म्हटली. ती हिरोकोने टेप केली पण त्या आधी, ते गाणे सादर करण्यापूर्वीची विशिष्ट जपानी स्टाइलची कॉमेन्ट्री द्यायला चिमुकली हिरोको विसरली नाही. छोकरा जरा शांत होता. त्याला पण काहीतरी दाखवयाचे होते. तो आम्हाला हाताला धरून त्याच्या अभ्यास ऊर्फ खेळाच्या खोलीत घेऊन गेला व त्याचे हात खेळातील मेकॅनोचा काहीतरी प्रकार करून दाखविण्यात मग्न होते. नंतर त्याने त्याच्या वर्गशिक्षिका सांगतात त्यातील एक गोष्ट त्याच्या वयाला शोभेल अशा प्रकारात सांगितली.

जपानी पद्धतीची प्रसिद्ध बैठक सुद्धा आम्ही अनुभवली. त्यासाठी तातामीवर मधल्या बुटक्या टेबलाच्या चारी बाजूला आम्ही बसलो होतो. परत गप्पा रंगल्या.

अधूनमधून आमच्या ॲटोमॅटिक कॅमेऱ्याचे फ्लॅश आमचे ते आनंदी प्रसंग प्रकाशमान करीत होते. त्यांच्या छोटयाशा बाल्कनीत लहानशी बाग होती. बागेतील एका बाजूला लटकविलेल्या पिंजऱ्यात त्यांचा पाळीव पक्षीपण होता.



जपानीमध्ये व्यक्तींच्या नावापुढे आदर दर्शविण्यासाठी ' सान ' हा शब्द लावतात. या जपानी लोकांना परमप्रिय अशा त्यांच्या फुजी पर्वतापुढे पण ते सान हा शब्द लावतात. मात्सुकुरांचे एका खिडकीतून फुजीसानचे दर्शन होते, ते त्यांनी मला आवर्जून दाखविले.

साधारणतः ठरलेल्या वेळेपेक्षा खूपच जास्त वेळ होऊन गेला होता. परंतु त्यांनी मनापासून आम्हाला अजून एक दिवस राहाण्याचा आग्रह केला होता. शिवाय दुसऱ्या दिवशी रविवारच होता. आम्हा दोघांची झोपायची सुद्धा सोय आहे हे त्यांनी अगदी त्यांच्या बेडरूममध्ये नेऊन सुद्धा दाखविले. हिरोकोने तर ' विलाससान

व विजेदासान यांची झोपण्याची जागा ही ' अशी घोषणा पण केली. आपण रात्री सुद्धा खूप खेळू, गप्पा मारू वगैरे त्यांनी सांगितले. औपचारिकपणाचा भाव पूर्वीच लोपला होता हे आमच्या ध्यानात आले होते, तरी आम्हाला सोमवारी एका आठवड्याच्या दूरच्या ट्रिपला जावयाचे आहे हे त्यांना सांगितल्यावर त्यांनी पुन्हा त्यांच्या घरी येण्याबाबत विनंती केली. कमीत कमी जपान सोडण्यापूर्वी न विसरता एकदा तरी अवश्य या असा आग्रह केला. तेव्हा मात्र जरूर येईन असे मी सांगितले. एव्हाना बाहेर अंधार पडून बराच वेळ लोटला होता.

संपूर्ण कुटुंब त्यांच्या टोयोटामधून आम्हाला निरोप द्यायला स्टेशनवर आले होते. सौ. तोमोकोसान स्वतः ड्रायव्हिंग करीत होत्या. एका ग्लायडरपटूला या कारमधून जाताना अधून मधून होणारा ट्रॅफिक जॅम त्रास देत असेल नाही का, असे मी विचारताच त्यांनी सांगितले की, सुरुवातीला ते फार जाणवायचे पण आता बरीच सवय झाली आहे. स्टेशन आले, आम्ही तिकिटे काढली. दोन्ही मुलांचे चेहरे फारच केविलवाणे झाले. होते. त्यांचे डोळे पाण्याने तरारलेले दिसत होते. सायोनारा ! आम्ही गाडी पकडली परंतु त्यापूर्वी पुन्हा नक्की म्हणजे अगदी नक्की येऊ असे आश्वासन दिल्यावरच निरोप दिला गेला घरापासून हजारो मैल दूर गेल्यावर आपले घर गवसावे असे वाटत होते. जरी ही एक दिवसाची होम व्हिजिट होती तरी तो वस्तुतः आमच्यातील मैत्रीच्या बीजारोपणाचा दिवस होता.

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात मला काही भेटकार्डे आली. त्यांतील एक होते मात्सुकुरा कुटुंबियांचे. जपानमध्ये त्यांच्या पंचांगाप्रमाणे प्रत्येक वर्ष हे एका ठराविक प्राण्याचे मानले जाते व त्या प्राण्याचे चित्र असलेली भेटकार्डे मिळतात. आजतागायत दरवर्षी नववर्षानिमित्त असे प्राण्याच्या चित्राचे भेटकार्ड मला येत असते.

असाच एक दिवस माझ्या रूममधला फोन खणखणला. ' मोशी मोशी ' म्हणत मी फोन घेतला. ' मी मात्सुकुरा बोलतोय. ' तिकडून आवाज आला आपुलकीने माझ्या घरच्या लोकांची तसेच माझ्या ट्रेनिंगबाबत व इतरही सर्व चौकशी झाली व शेवटी मी त्यांच्याकडे परत केव्हा येणार ते त्यांनी विचारले. एप्रिलचा पहिला आठवडा नक्की केला.

त्यांच्या घरी मी पहिली होम व्हिजिट-दिल्यावर एशियन क्लबकरिता एक लेख दिला होता. तो लेख क्लबच्या त्रैमासिकात छापून आला होता. तो अंक या क्लबने न चुकता माझ्याकडे व मात्सुकुरांकडे सुद्धा पाठविला होता. त्यामुळे तुमचा लेख फार आवडला हे पण त्यांनी फोनवर सांगितले.

मार्चच्या शेवटच्या आठवड्यात मी एक दिवस त्यांना फोन केला व भेटीची तारीख व वेळ नक्की केली. " आम्ही तुमच्या भेटीच्या दिवसाची फार आतुरतेने

वाट पाहात आहेत " हिरोको फोनवर म्हणाली.

३ एप्रिलला मी पुन्हा श्री. मात्सुकुरांकडे गेलो होतो आणि त्यांच्या घरून थेट हॉस्टेलमध्ये परत आलो. भराभरा प्रथम माझी रोजची डायरी लिहिली त्या डायरीतील पानच जसेच्या तसे खाली देत आहे.

३ एप्रिल : " मो अिची दो ! " जपानी भाषेतील एक फार सुंदर शब्द म्हणजे ' वन्स मोअर, ' आनंद द्विगुणित करणारा शब्द होय. पुन्हा एकवार होम व्हिजिट ! नव्हे ! माझ्याच कुटुंबियांची भेट – खरोखरच फार सुंदर कल्पना. घरापासून दूर अंतरावरचे घर. या वेळी आम्ही खूपच मजा केली. मुक्तपणे. कारण आम्ही पूर्वी भेटलो होतो. परिचयाचे स्नेहामध्ये केव्हाच रूपांतर झाले होते. मधल्या काही दिवसांच्या विरहामुळे तर स्नेह अधिकच दाट झाला होता.

मित्स्युक्यो स्टेशनवर गाडीतून उतरून माझी नजर मात्सुकुरामंडळीपैकी कोणी दिसते का याचा शोध घेत होती. तेवढ्यात माझ्या हाताला घट्ट पकडून ' विलाससान ! ' असे म्हणत स्मित वदनाने हिरोको माझा हात हलवू लागली. मला पण आनंद झाला. तेवढ्यात माझ्या दुसऱ्या हाताला ऋईची बिलगला. दोघा मुलांच्या चेहऱ्यांवरील आनंद ओसंडताना मी अनुभवत होतो. जपानमधील एका स्टेशनवरील हे अगदी अनपेक्षित दृश्य. दोन लहान जपानी मुले एका परदेशी माणसाचे हात पकडून आनंदाने बागडत व मित्स्युक्यो स्टेशनच्या जिन्यावरून उड्या मारत खाली येत आहेत. आसपास वावरणारी जपानी जनता काही क्षण स्तब्ध झाल्याचे माझ्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. ' परदेशी लोकांपुढे जपानी लोक खरोखरच लाजाळू आहेत. ' हे स्वत: जपानी लोकांचे, स्वत: बाबतचे मत, परंतु या ठिकाणी तर अगदी उलट दृश्य होते. जिन्याच्या पायथ्याशी श्री. मात्सुकुरा उभे असलेले मला दिसले ते थोडे काळजीत होते. कारण ट्रॅफिक जॅम मुळे त्यांना स्टेशनवर यायला त्यांच्या अपेक्षेपेक्षा थोडा उशीर झाला होता व गाडीची पार्किंगची जागा शोधेपर्यंत वेळ गेला. परंतु त्यांच्या दोन्ही मुलांनी त्यांचे काम केले होते.

आम्ही चौघेजण त्यांच्या टोयोटा क्राऊन गाडीतून थेट त्यांच्या घरी आलो, " कोन - निची - वा " ( शुभदिन ) दोन महिलांच्या या आवाजाने व स्मित वदनाने माझे त्यांच्या घरी स्वागत झाले. मी येणार म्हणून मुद्दाम सौ. मात्सकुरांनी त्यांच्या सत्तरी ओलांडलेल्या आईला अपार्टमेन्टवर बोलावले होते. त्यांना बघून मला माझ्या आजीची आठवण झाली. गप्पा सुरू झाल्या. आमच्या समोरच्या टेबलावर दोघींनी एक एक वस्तू आणून ठेवण्यास सुरुवात केली. ' सर्वांनी एकदम जेवायला बसू या, ' या माझ्या आग्रहामुळे आम्ही सर्वजण एकत्र जेवलो. खाण्या-पिण्याला गप्पांची जोड मिळाली होती. माझे ताट व ग्लास सदाबहार ठेवण्याचा

त्यांचा प्रयत्न चालला होता. त्या दिवशी मी पण थोडे अधिकच जेवलो असेन. अधून मधून मुले ओबाऽसान (म्हणजे आजी) म्हणून आपल्या आजीला काही तरी आठवण करून देत होती. ओबासानचे संथ व वृद्ध आवाजातील परंतु मंजूळ जपानी ऐकायला मला फार आवडत होते. ऐकत राहावेसे वाटत होते. माझ्या पाच महिन्यांच्या जपानमधील वास्तव्यात माझ्या भोवती वावरणाऱ्या जपानी मंडळी-मुळे माझे जपानी सुधारले होते. त्याचा मी या वेळी खरोखरीच आभारी होतो. कारण ओबासानचे प्रत्येक वाक्य मला समजत होते. दोनही मुले खाताखाता मधूनच उठून इकडे तिकडे हसत आनंदाने पळापळी करीत होती. या वेळी ऋईची खूपच धीट व मोकळा झाला होता हे बघून मला खूप आनंद झाला. जेवताना आम्ही अनेक प्रकार खाल्ले. मी प्रत्येक वेळी माझ्या पुढील पदार्थाचे नाव विचारीत असे व मला आठवतंय की तो पदार्थ पोटात पोहोचेपर्यंत विसरून पण जात असे. परंतु 'नोरी' मात्र मी विसरू शकणार नाही. समुद्रातील वनस्पतीपासून बनवलेला पापुद्रा होता तो. गळ्याभोवती उपरणे असावे त्या प्रमाणे भाताच्या लहान मुदीभोवती त्याची बैठक होती. जेवणापूर्वी मी सोबत आणलेले पापड त्यांना दिले. ते ओव्हनमध्ये कसे भाजावयाचे त्याचे प्रात्यक्षिकपण करून दाखविले. त्यांना ते खूपच आवडले.

थंडीतील थंड उन्हाचा तो दिवस होता. दुपारी आम्ही त्यांच्या गाडीने एका मोठ्या पार्कमध्ये गेलो. आजी मात्र घरीच राहिल्या होत्या. गावाबाहेरील बागेकडे जाणारा रस्ता मोकळा होता. त्यावरून सुसाट वेगाने आमची गाडी सुटली होती. जेव्हा सबंध मात्सुकुरा फॅमिली गाडीत असते तेव्हा स्टिअरिंग व्हीलचा ताबा हा सौ. मात्सुकुरांकडे असतो. सहज, सुंदर व सुसाट वेगाने ड्रायव्हिंग करताना त्यांना सुखकर वाटत होते. आम्ही त्या पार्कमध्ये पोहोचलो. मुले माझ्या बरोबर नाचत चालली होती तर माझ्या बरोबर रमलेल्या आपल्या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंदात आई, वडील सुद्धा सामावून गेले होते.

भल्या मोठ्या पार्कच्या मागील बाजूने आम्ही आत शिरलो तेव्हा सुरुवातीला शुकशुकाट होता. गर्द झाडीतून आम्ही पुढे जात होतो. बागेत बरीच तळी होती. काही वेळाने बागेच्या मध्यभागी आलो तेव्हा बरीच जपानी मंडळी दिसू लागली. ती बाग बहुधा जपानी लोकांसाठीच राखीव बाग असावी असे वाटले. कारण एवढ्या मोठ्या बागेत मीच फक्त एकटा परदेशी होतो. शाळा-कॉलेजांतील ट्रिप्स करता आलेले विद्यार्थी, प्रियकर-प्रेयसी, कुटुंबीय मंडळी, वृद्ध जोडपी, असे अनेक प्रकारचे जपानी चेहरे तेथे वावरत होते. बागेमध्ये लाकडाच्या ओंडक्यांनी बनविलेले अनेक खेळाचे प्रकार होते. झोपाळे, झुलते पूल, सी-सॉ, मेरी-गो-राउंड इत्यादी. त्या दिवशी आमच्या दोघांच्याही कॅमेऱ्यातील रोल सहज फूटभर पुढे सरकले असावेत. ऋईची खूपच मुक्तपणे वावरत होता. त्याने त्याच्या खेळातील नैपुण्य

आवर्जून मला दाखविले. एका मोठ्या अंदाजे १५ मीटर उंचीच्या भुसभुशीत डोंगराच्या उतारावरून लहान मुले खाली घसरत होती. घसरताना खाली कागदी पुठ्ठे धरून घसरगुंडी खेळत होती. दोन्ही मुले मनसोक्त घसरगुंडी खेळली. हिरोको तशी शांत होती तरी गुपचुप गमती करण्यात पटाईत होती. त्या दिवशी हिरोकोच्या चेहऱ्यावर एक निराळ्याच प्रकारचा आनंद दिसत होता. बराच वेळ बागेत ती माझ्याच बरोबर होती. आम्ही सर्वजण सहवासाचा आनंद लुटत होतो.

बागेतील एका डोंगराला साकुरायामा असे म्हणतात. यामा म्हणजे पर्वत. या डोंगरावर सर्व साकुराची झाडे होती. साधारणतः एप्रिलच्या मध्यापासून साकुराच्या फुलांनी झाड बहरायला सुरुवात होते. परंतु आम्ही थोडे आधी आलो होतो त्यामुळे बहर दिसला नाही. साकुरा ही जपानी लोकांची अजून एक प्रेमाची चीज. साकुरावर ते मनापासून प्रेम करतात. फुललेला साकुरा मला बघायला मिळावा म्हणून त्या बागेतील काही ठिकाणी त्यांनी शोध घेतला. शेवटी त्यांनी गावाबाहेरील लवकर फुलणारी काही झाडे आठवली म्हणून आम्ही सर्वांनी गाडीतून बऱ्याच ठिकाणी शोध घेतला व शेवटी एका ठिकाणी बहराला नुकतीच सुरुवात झालेला फिक्कट गुलाबी रंगाचा साकुरा दिसल्यावर त्यांना खूप आनंद झाला. तरीसुद्धा त्या म्हणाल्या की, फक्त एक आठवडा थांब व जपानभर साकुरा दिसेल. अनेक साकुराच्या झाडांनी डवरलेला भाग फारच प्रसन्न, सुंदर व मोहक दिसतो. अर्थात् ही गोष्ट त्यांच्या हातातली नव्हती तरी पण साकुराचे योग्य त्या रूपांत दर्शन मला घडविता न आल्याने त्यांचा आनंद अर्धोन्मीलित होता. ‘तुझे परतीचे तिकिट नक्की झाले आहे का ? नाहीतर परत एकदा आमच्याकडे आलास तर बरे होईल. आपण साकुराची स्पेशल ट्रिप करू या.’ त्यांनी आपली चाचपणी केली. नंतर गावाबाहेरील शेती-वाडीजवळील टेनिस-कोर्टावर गेलो. त्याच्या मागे असलेल्या शेतीतील सोजी तोडली सोजी म्हणजे कुत्र्याच्या छत्रीसारखी दिसणारी व अंदाजे जमिनीपासून वीतभर उंचीत वाढणारी वनस्पती होय. त्याची भाजी फार छान लागते. सोजी तोडल्यानंतर वाटेतील एका दुकानातून मुलांनी सर्वांसाठी आईसक्रीम कॅन्डी आणली. तोपर्यंत त्यांच्या आईने निरनिराळ्या पेयांच्या बाटल्यापण गाडीच्या डिकीत टाकल्या. तेथून आम्ही थेट त्यांच्या अपार्टमेंटवर आलो. येताना आम्हाला पुन्हा एकदा त्यांनी त्या अर्धबहारीत साकुराच्या झाडाजवळ आणले, त्या झाडाला उद्देशून त्या म्हणाल्या, “विलाससान कडून सायोनारा” त्यांना थोडे गहिवरून आले होते.

घरी आल्यावर त्यांनी लगबगीने सोजीची भाजी करून त्याची डिश टेबलावर आणली. पुन्हा एकदा जेवणाचे टेबल निरनिराळ्या पदार्थांनी भरू लागले. जपानी लोकांचा अत्यंत आवडता पदार्थ म्हणजे मासा. मी माझ्या एका बंगाली मित्राकडे एक दोन वेळा मासा चाखला होता. परंतु या समुद्र-प्राण्याच्या काट्यामुळे माझ्या

मनात उगीचच पण एक प्रकारची भीती होती. त्या दिवशी त्यांच्या टेबलावर माशाचा ‘आजी हिमोनो’ नावाचा प्रकार केला होता. खारवलेला व वाळवलेला मासा होता तो. माझ्यासाठी बशीत त्यांनी दोन मासे ठेवले होते व मला खाण्याबद्दल विनंती केली. मी त्यांना आग्रह करता तर फक्त थोडाच टेस्ट करतो, म्हणून अगदी थोड्या भागाची चव घेतली. तो फारच चांगला लागला म्हणून त्यांनी मला ते दोन्ही गट्टम करावयाला लावले. खाताना आम्ही परत गप्पात रंगून गेलो होतो. बोलता बोलता दुसऱ्या महायुद्धाचा विषय निघाला व मी आजींना त्यांचे अनुभव विचारू लागलो. तेव्हा त्या टोकियोजवळ राहात होत्या. युद्ध पेटले व मग त्या त्यांच्या पती-बरोबर व या लहानशा तोमोको (आत्ताच्या सौ. मात्सुकुरा) बरोबर किइगो या एका खेडेगावी गेल्या. त्या सांगत होत्या, “एक दिवस पाठीला तोमोकोला बांधले होते. व नदीच्या काठाने जात असताना एकदम वरती विमाने घरघरू लागली. नदीच्या पलीकडच्या तीरावर बाँबस्फोट होताना बघितले. तोमोको त्यावेळी दोन वर्षांची होती. बाँबवर्षाव होताना मग जवळपास आडोशाला धावत जाऊन झाडाझुडपात, द्राक्षाच्या बागेत किंवा जमिनीखाली खोदलेल्या खंदकात लपून बसत असू. अन्न-धान्याची खूपच चणचण भासत होती. खेडेगावी धान्याची जास्त चणचण नसली तरी आम्ही अनेक उपास काढले आहेत. त्या वेळच्या स्मृती सहजासहजी पुसल्या जाणे कठीण आहे. अजूनही त्या ताज्या आहेत, काल-परवा घडलेल्या घटना वाटतात त्या. त्यानंतर जवळजवळ १० वर्षांचा काळ खडतर अवस्थेत गेल्यानंतर जपानला हे चांगले दिवस दिसू लागले.” त्या बोलत होत्या मी स्तब्ध होऊन ऐकत होतो. “दुसऱ्या महायुद्धानंतर जपान्यांनी जो धडा घेतला तो म्हणजे दुसऱ्या देशावर सामर्थ्यानिशी हल्ला करून एखादी गोष्ट हस्तगत केल्याने होणाऱ्या फायद्यापेक्षा शांतताप्रिय मार्गाने व्यापार व व्यवहार केल्याने कितीतरी पट अधिक फायदा होतो.” त्यांनी बऱ्याच आठवणी सांगितल्या. परंतु अनेक खडतर काळातून गेल्यानंतरचे आताचे सुख सुद्धा त्यांनी उपभोगले व एक प्रकारचे शांत, समाधानी व सुखकर आयुष्य जगल्याचे तेज त्यांच्या चर्येवर दिसत होते. “सर्व काही मिळाले. जे दिवस राहिलेत ते या सर्वांच्याबरोबर सुखात घालवत आहे.” आजी बोलत होत्या.

पुन्हा एकवार पूर्वीच्याच प्रसंगाची पुनरावृत्ती झाली. राहाण्याचा खूप आग्रह झाला “आता परत कधी येणार? आजच्या दिवस तरी राहा .. ..” वगैरे शब्द ऐकू आले पण... काही वेळा ‘पण’ हा शब्द खूप वाईट असतो. तो आपले सुख हिरावून नेतो. त्यांच्या फार आग्रहाने मी माझी त्यांच्या घरातून नंतर कन्नाई या ठिकाणी जाऊन करावयाची खरेदी रद्द केली. त्या दिवशी आम्ही एकत्र आल्यावर दहा तास कसे संपले होते ते कळले पण नाही. सर्वांनी एकत्र फोटो काढले व शेवटी मी जड अंतःकरणाने आजींचा निरोप घेतला. आम्ही सर्व त्यांच्या गाडीतून स्टेशन-

कडे निघालो. त्यांच्या बालकनीतून आजी मला हात हलवून स्मित वदनाने सायोनारा करीत होत्या.

आम्ही पाचजण स्टेशनवर आलो. मुलांच्या चेहऱ्यावर केविलवाणे भाव पसरले होते. ' आता पुन्हा भेट केव्हा ' याचे उत्तर फक्त काळच देऊ शकत होता. त्यांच्या डोळयांतील पाणी स्पष्ट दिसत होते. विरह हा फार असह्य परंतु अटळ असतो. मी येणार म्हणून दोन दिवस आधी नाचून आजूबाजूला सर्वांकडे सांगत असणारे ते दोन्ही बछडे शांत व केविलवाण्या नजरेने बघत होते. त्यांना मी जवळ घेतल्यावर हिरोकोचा हुंदका मला ऐकू आला. दोन भेटींत आम्ही खूपच जवळ आलो होतो. " या नको, पुढच्या ट्रेनने जा. " हिरोकोचे म्हणणे मी मान्य केले. दोघा छोकऱ्यांना एक एक वार उचलून कडेवर घेतले. ती मला फारच बिलगली आणि आपोआपच माझे ओठ त्यांच्या गालावर टेकले. हिरोकोच्या डोळ्यांतून खाली ओघळलेले अश्रू मी पुसले. भारतात गेल्यावर तुला मी आमचे फोटो पाठवीन... वगैरे वगैरे सांत्वनपर वाक्ये मी बोलत होतो. मात्सकुरा पती-पत्नींनी हस्तांदोलन केले. त्यांना पण गहिवरून आले होते. पुढची पण ट्रेन आली व शेवटी त्या गाडीने मला त्यांच्यापासून दूर नेले. जातांना प्लॅटफॉर्मवर संथ गतीने हलणारे त्या चौघांचे हात मला दिसत होते. गाडीमध्ये बसताना मी पण माझे डोळे रुमालाने टिपले. मनगटावरील घड्याळ बघितले. रात्रीचे दहा वाजून गेले होते.

भारतात परतण्यापूर्वी पुन्हा एकवार आम्ही सर्वजण फोनवर बोललो. अजूनही आमचा पत्रव्यवहार होतो आहे. हिरोको मला अधून मधून जपानी लिपीतून पत्र लिहिते. कार्टून काढते. तर आईवडील कुटुंबियांची व जपानची खबर देत असतात. ते कुठल्या ट्रिपला गेले तर तेथील फोटोसहित मजकूर मला माझ्या भारतातील पत्त्यावर मिळत असतो. पुन्हा एकवार मी त्यांच्यात दुरून सहभागी होतो परंतु भावनेचे खेळ कोणाला कळलेत ? हेच खरे !

## शॉपिंग याने खरेदी

आमच्या वाय्. के. सी. च्या होस्टेलमध्ये दिवसाच्या गरजेच्या सर्व वस्तू मिळायच्या तरी काही दिवसांनी आम्हाला असा शोध लागला की जवळपासच्या डिपार्टमेंटल स्टोअर्स किंवा ज्याला ' सुपर मार्केट ' म्हणतात तेथील माल थोडा स्वस्त मिळतो म्हणून खरेदीसाठी आम्ही कधी कधी गटाने तर कधी मी एकटाच बाहेर पडत असे.

जपानचे चलन येन आहे. येन या चलनामध्ये १, ५, १०, ५०, १०० व ५०० येनची नाणी आहेत तर ५००, १०००, ५००० व १०,००० येनच्या नोटा आहेत. परंतु नाणे एकच – येन. सर्व व्यवहाराकरिता फक्त येन एवढे एकच नाणे आहे. तेथील व्यवहार करताता मला असे आढळले की, आपले बिल कितीही झाले तरी उरलेले सर्व येन व्यवस्थित परत मिळत. नाणे टंचाई हा प्रकार तिथे नाही. तसेच येनच्या नोटा कधीही फाटलेल्या, चुरगळलेल्या, फार घड्या केलेल्या अशा मला बघायला सुद्धा मिळाल्या नाहीत. दोन येन नाहीत त्या ऐवजी गोळ्या घ्या वगैरे गमती तिथे अजून पोहोचल्या नाहीत.

होस्टेलमधील मालाच्या भावाबद्दल बोलायचे झाले तर २०० मिलीलीटर दुधास ८० येन, १ केळे ८० ते ९० येन, टीन कॉफी १२० येन, ब्रेड स्लाइस प्रत्येकी ४० येन, लहान बटर पॅक १५ येन, चिज ४० येन, २ चमचे मध ४० येन, बशीभर भात १५० येन, सफरचंद प्रत्येकी १५० येन व संत्रे प्रत्येकी ६० येन असे भाव होते. सर्व माल हा अतिशय स्वच्छ असे. उकडलेले अंडे ७० येन. दोन अंड्यांचे आम्लेट १८० येन.

होस्टेलपासून जवळच एक इरुकु स्टोअर्स नावाचे लांब-रुंद डिपार्टमेंटल स्टोअर्स होते. येथे मांस, मासे, भाजीपाला, फळफळावळ, ब्रेड, खाण्याचे इतर पदार्थ कपडे, सेंट, औषधे वगैरे वगैरे सर्व काही मिळावयाचे. तसे हे एक मजलीच स्टोअर्स होते. परंतु कुठल्याही गावाच्या रेल्वे स्टेशन जवळील डिपार्टमेंटल स्टोअर्स मात्र ५ ते ९ मजल्यापर्यंत असत. आपल्याकडील वाण्याच्या दुकानासारखी दुकाने येथे नाहीत. बहुतेक जपानी जनता अशा डिपार्टमेंटल स्टोअर्समधूनच मालाची खरेदी करते. स्टोअर्समध्ये खाद्य पदार्थांसारख्या वस्तू वजन करून व्यवस्थित प्लॅस्टिकच्या पिशवीत पॅक करून नीटनेटक्या ठेवलेल्या असत. अशा स्टोअर्सच्या प्रवेशद्वारात अनेक बास्केट्स ठेवलेल्या असतात. जास्त माल घेणाऱ्यांसाठी लहान मुलांना फिरायला नेतात त्याप्रमाणे ढकलगाडी असून त्यास दोन किंवा तीन बास्केट्स अडकविलेल्या असतात. त्यातील बास्केट घेऊन आपण स्वतःच आपल्या हाताने रॅकवरील आवश्यक त्या वस्तू बास्केटमध्ये घ्यावयाच्या. आपल्याजवळ असलेल्या पिशव्या अगर इतर वस्तू बाहेर ठेवायची गरज नसते. गिऱ्हाइकांवर येथील विक्रेत्यांचा पूर्ण विश्वास असतो. गिऱ्हाइकांकडे नम्र व विश्वासपूर्वक नजरेनेच येथे बघितले जाते. स्टोअर्समधील मालामध्ये भावाची घासाघीस नसते. तरीपण आसपासच्या स्टोअर्समधील मालात थोडासा फरक असू शकतो. मालाची किंमत व वजन त्यावर चिकटविलेले असते.

काही स्टोअर्स लांबरुंद अशी पसरलेली आहेत. अशा स्टोअर्समध्ये विविध विभाग असून त्यांत सर्व माल मिळत असे. तर काही अनेक मजली स्टोअर्स सुद्धा

लांबीरुंदीला मोठी आहेत. बहुतेक सर्व स्टोअर्सच्या इमारतींमध्ये जमिनीखालीपण कमीत कमी दोन तरी मजले असतात. जमिनीखालील पहिल्या मजल्यावर भाजीपाला फळफळावळ, किराणामाल वगैरे दररोजच्या आहारातील वस्तूंची विक्री चाले. अशा ठिकाणी जपानी गृहिणींची फार गर्दी असते. काउंटरचे बाहेर प्लॅस्टिकच्या पिशव्यांचे रोल गुंडाळलेले असत. ते मोफत असत. जमिनीखालील दुसऱ्या मजल्यावर स्टेशनरी हार्डवेअरचे सामान वगैरे विकायला ठेवलेले असते, प्रत्येक मजल्यावरील माल त्याच मजल्यावर विकला जातो. सर्वसामान्यपणे स्टोअर्समध्ये गेल्या गेल्या समोरच रुमाल, सेंट, बॅगा, वगैरे विविध वस्तू, तसेच सेलचा माल मिळतो, तर दुसऱ्या मजल्यावर संपूर्ण स्त्रियांचे व लहानमुलांचे कपडे हँगरला अगर स्त्रियांच्या किंवा मुलांच्या पुतळ्यांना अडकविलेले दृष्टीस पडतात. विक्रीस ठेवलेल्या कपड्यांचे निरीक्षण करीत पुढे जात असताना मधेच ठेवलेले हे पुतळे आपणास चांगलेच फसवतात. प्रत्येक कपड्यावर त्याची किंमत लटकविलेली असते. रेडिमेड कपड्यांची विक्री येथे होते. अर्थात् कापड घेऊन शिवायला टाकणे हा प्रकार मला तरी येथे आढळला नाही. चौथ्या मजल्यावर पुरुषांचे सर्व प्रकारचे कपडे, पाचव्या मजल्यावर खेळाचे साहित्य, खेळाडूंचे ड्रेस, तर सर्वांत वरच्या मजल्यावर मोठमोठे फर्निचर वगैरे विकत मिळायचे. विविध प्रकारची, परंतु फारच सुंदर फिनिश असलेली मुलांची अभ्यासाची टेबले, खुर्च्या, सायकली वगैरे सुद्धा विक्रीस असतात. अर्थात काही डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये हे मजल्यावरील सामान वर खाली असते.

स्टोअर्समध्ये सर्वत्र वरच्या अगर खालच्या मजल्यावर जाण्यासाठी स्वतंत्र असे ॲटोमॅटिक फिरते जिने असल्यामुळे चढउताराची दगदग नसते. तर थेट ३ ऱ्या ४ थ्या वगैरे वरील मजल्यावर जाण्यासाठी लिफ्टची पण सोय असते. अशा स्टोअर्सच्या बाहेरसुद्धा काही विक्रेत्यांनी कित्येक वेळा सेलकरिता कपडे ठेवलेले मी बघितले आहेत. परंतु रहदारीस त्यामुळे अडथळा निर्माण करण्याबाबत मात्र हे लोक तसे अडाणीच आहेत.

कॉर्नफ्लेक्स, तसेच ब्रेडचे खूपच प्रकार येथे बघायला मिळाले. खाद्यपदार्थ मिळतात त्या विभागात बऱ्याचदा मध्यभागी काचेच्या भिंतीच्या आतमध्ये ब्रेडचे विविध प्रकार विक्रीस 'ठेवलेले असत. अशा काचघराच्या प्रवेशद्वारापाशी बश्या ठेवलेल्या असत. त्यांतील बशी घेऊन स्टीलच्या चिमट्याने तो ब्रेड आपण बशीत घ्यावयाचा. प्रवेशद्वारापाशीच असलेल्या काउंटरवरील व्यक्ती तो व्यवस्थित पॅक करून देत असे. येथे सर्वत्र सेल्फ सर्व्हिस असून आपण स्वतः माल घ्यावयाचा.

दाराजवळ काउंटरवर अनेक जपानी मुली त्या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या ठराविक ड्रेसमध्ये उभ्या असतात. समोर त्यांचे काउंटिंगचे मशीन असते. मालाची बेरीज करून मशीनमधून बाहेर आलेल्या मालाच्या किंमतीची चिठ्ठी आपल्याला

दिली जाते. आपण पैसे देईपर्यंत सर्व माल व्यवस्थित एका प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून त्या हसतमुखाने व नम्र भावनेने आपल्याला सादर केला जातो. विकत घेतलेली प्रत्येक गोष्ट येथे प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून, त्या पिशवीच्या वरच्या उघड्या तोंडाला चिकटपट्टी चिकटवून दिली जाते. अशा चिकटपट्टीवर व या प्लॅस्टिकच्या पिशवीवर त्या स्टोअर्सचे नाव छापलेले असते. यामुळे खरेदीला पिशव्या घेऊन बाहेर पडणे हा प्रकार येथे नाही. भारतात परतण्यापूर्वी मी एक मोठी बॅग खरेदी केली होती ती सुद्धा त्यांनी त्यापेक्षा मोठ्या एका प्लॅस्टिकच्या पिशवीतून घालून मला दिली होती. अशा पिशवीतून माल दिला याचाच अर्थ त्या बाबतची पैशाची देवघेव पूर्ण झाली आहे या करिताच प्रत्येक वस्तू ही खरेदीनंतर अशाप्रकारे दिली जात असावी.

स्टोअर्समध्ये पैशाची देवघेव करणाऱ्या बहुतांशी मुली असतात तर आतमध्ये माल व्यवस्थित लावण्यासाठी पुरुष मंडळी असतात. काही काही वेळा भल्या मोठ्या स्टोअर्समधील आपणास पाहिजे तो विभाग लवकर मिळाला नाही तर अशा वेळी या स्टोअर्समधील मुली अगर पुरुष मंडळी, कोणालाही आपण विचारायचा अवकाश, की लगेच ते आपल्या स्वतःच्या हातातले काम तिथेच टाकून लगबगीने तुम्हाला बरोबर योग्य ठिकाणी घेऊन जाऊन मार्गदर्शन करतील. या वेळी चेहऱ्यावर 'काय त्रास आहे?', 'जरा थांबा', 'मला माहिती नाही' किंवा 'त्या दुसऱ्याला विचारा' वगैरे सारखे भाव अजिबात नसून उलट सेवा करण्यात संधी मिळाली हाच भाव त्यांच्या स्मितवदनाने प्रदर्शित होई.

आमच्या होस्टेलपासून जवळच दोन रेल्वेस्टेशन्स होती. एक होते इसोगो तर दुसरे कामीओका. दोन्ही स्टेशनांजवळ दुकाने व डिपार्टमेंटल स्टोअर्स होती. परंतु कामीओका स्टेटनजवळ खूपच होती. तो भाग चांगलाच गजबजलेला होता. शिवाय तेथील वस्तू पण थोड्या स्वस्त होत्या. त्यामुळे मी खरेदीला कामीओकास जाणे जास्त पसंत करीत असे. मोठाले लांबलचक दाणे असलेल्या भाजलेल्या १८० ग्रॅम शेंगा ३३० येनला मिळत. मोठा ब्रेड २६० येन, ५ केळी १३० येन, ६ अंडी १२० येन, १० लहान कांदे १६० येन वगैरे भाव होते.

डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये दारातच सेलला ठेवलेल्या वस्तू ही माझी दुसरी आवडती खरेदी असायची. या वस्तू त्यांच्या नित्याच्या भावाच्या खरोखरच १० ते २५ टक्के अशा कमी भावात मिळायच्या. एखादा सीझन संपला अगर काही माल जास्त काळ विकला गेला नाही तर अशा वस्तू सेल म्हणून विक्रीला काढल्या जायच्या. यामधून मी रेनकोट, कंगवे, डब्या, डिशेस, सुंदर चमचे, पर्सेस, स्वेटर्स वगैरेची खरेदी केली होती.

मोठमोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समधील अजून एक गमतीचा प्रकार म्हणजे त्यामध्ये कित्येक ठिकाणी हुबेहूब आपल्या आकाराचे अनेक पुतळे निरनिराळ्या स्टाइल्समध्ये उभे असतात. हे पुतळे आपणास अनेकवेळा फसवितात व हे माहीत असूनही मी काही वेळा फसलो. एकदा तर मस्त गंमत झाली. एका डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या दारात एकजण आपल्या प्रेयसीची वाट बघत टक लावून स्तब्ध उभा होता. मला त्याचा स्कार्फ बरावासा वाटला म्हणून मी जवळ बघायला गेलो तर तो हलला ! तेव्हा मला तो पुतळा नसल्याचे लक्षात आले. मग काय आम्हा दोघांनाही हसू अवरेना.


या डिपार्टमेंटल स्टोअर्सपेक्षा खूपच लहान अशी काही काही दुकाने दिसली. उदाहरणार्थ, स्टेशनरी किंवा मुलांची खेळणी. परंतु अशा दुकानांतून खरेदीसाठी लोकांनी यावे म्हणून त्या दुकानदारांना काहीतरी आकर्षण ठेवावे लागायचे. उदा., प्रत्येक खरेदीवर लहानशी भेट अगर कार्टूनचे चित्र वगैरे.

दारामध्ये नाताळबाबा सारखाच परंतु सुटाबुटातील पांढरा दाढीवाला असलेल्या केंचुकी फ्राईड चिकनची लाल पांढरे पट्टे असलेली दुकानेपण बहुतेक गावांत अनेक ठिकाणी दृष्टीस पडतात. या दुकानांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ विकत मिळतात. दर व त्या पदार्थांची चव सर्वत्र अगदी सारखी असते. सुंदर पॅकिंग करून हे खाद्यपदार्थ दिले जातात किंवा तिथे बसून खाण्यासाठी सुद्धा सोय असते. अशाच प्रकारची मॅकडोनाल्डची पण दुकाने प्रमुख शहरांत आहेत. अशा ठिकाणचे भाव थोडे कमी असतात परंतु सर्वत्र सेल्फ सर्व्हिस असते.

छोट्या वस्तूपासून ते अगदी मोठमोठी खरेदी या डिपार्टमेंटल स्टोअर्स किंवा ज्याला ' सुपर मार्केट ' असेही म्हणतात अशा ठिकाणी होते. एकंदरीत खाद्यपदार्थ जपानमध्ये मात्र कमालीचे महाग आहेत. पण रेडिओ, टीव्ही, रेकॉर्डर, किंवा इतर विद्युत् सामान मात्र खूपच स्वस्त व दर्जेदार आहे. परंतु त्यासाठी योकोहामा किंवा त्या जवळील कन्नाई अगर टोकियोचा परिसर, त्या जवळील विशेषतः आखियाबारा वगैरे सारखी ठिकाणे प्रसिद्ध आहेत. अखियाबारा हे संपूर्ण नगर तर अशा असंख्य दुकानांनीच बनलेले आहे व बहुतेक सर्व ठिकाणी परदेशी नागरिकांना टॅक्स फ्री माल मिळतो. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशा ठिकाणी किमतीमध्ये घासाघीस पण फार चालते. काही ठिकाणी तर चक्क बारगेन काउंटर असतात. बहुतेक दुकानांतून ऑडिओ व व्हिडिओ उपकरणांचीच गर्दी खूप असते. माझ्या एका मित्राला लक्स मिटर हवे होते म्हणून मी आखियाबारामध्ये खूप हिंडलो व एका ठिकाणी ते मिळाले सुद्धा. परंतु त्यापूर्वी काही दुकानदारांना लक्समिटर म्हणजे काय हे समजावून द्यावे लागले. ' प्रकाश मोजणारे यंत्र ना ', ' मग नक्की व्हिडीओ ' म्हणून एक विक्रेता तर चक्क व्हिडीओ इक्विपमेंटचा कॅटलॉग काढून बघू लागताच त्याला

मी ते उपकरण पुन्हा एकदा समजावून दिल्यावर तो म्हणाला, 'हे नाव मी प्रथमच ऐकतोय.' थोडक्यात काय तर ऑडिओ-व्हिडीओ इक्विपमेंट विकणारी मंडळी त्याच्याच मध्ये खूपच बुडून गेलेली असतात. काही काही ७ ते १० मजली इमारती-च्या सर्वच्या सर्व मजल्यांवर निरनिराळ्या प्रकारची परंतु फक्त ऑडिओ व व्हिडीओचीच इक्विपमेंट्स मिळतात.

टोकिओ जवळील शिंजुकु या गावी स्टेशनपासून थोड्या अंतरावर असलेल्या योदोबाशी या प्रसिद्ध कॅमेऱ्याच्या चार मजली इमारतीत सर्व मजल्यावर कॅमेरे त्यांची सह-साधने व सुटे भाग मिळतात. पण तेथे सुद्धा बारगेन चालतो. परंतु, फक्त जपानी लोकांसाठी विक्री असलेल्या कुठल्याही ठिकाणी जपानी माणूस मालाच्या




किमतीबाबत घासाघीस करताना बघितला नाही. अनेक मजली इमारतीत एकच वस्तू विकली जाते. अशा अनेक इमारती येथे आहेत. संध्याकाळनंतर असे विभाग विद्युत् रोषणाईने झगमगून जात तर वाद्यांच्या सुंदर संगीताने गजबजून जात असत.

परदेशीयांना सहाय्य व्हावे या हेतूने 'टूर कंपॅनियन' नावाचे अंदाजे ४० पानी एक प्रसिद्ध साप्ताहिक निघते. त्याची किंमत जरी काही येन असली तरी

अनेक मोठमोठ्या हॉटेलमधील लॉबीमध्ये त्याचे गठ्ठे ठेवलेले असत. ते कोणालाही फुकट मिळत असे. या साप्ताहिकामध्ये येत्या आठवड्यातील विशेष कार्यक्रम कोठे आहेत, 'चुकवू नये असे' वगैरे सारखी सदरे असतात. प्रसिद्ध दुकाने, हॉटेल्स, विविध देशांची रेस्टॉरंट्स, कुठली खरेदी कोठे कराल, तसेच असाकुसा, शिबाशी, गिंझा, आखियाबारा, शिंजुकु, शिबुया वगैरेसारख्या प्रसिद्ध विभागांचे इमारतीच्या स्केचेस सकट नकाशे दिलेले असतात. टीव्ही, थिएटरमधील करमणूक, नाइट शो, नाइटटूर, तसेच मोठमोठ्या सहली, परदेशी बँका, त्यांचे पत्ते, एअरपोर्टपासूनची ट्रॅन्सपोर्ट सर्व्हिस, नवीन प्रॉडक्ट्स, टूरिस्ट इन्फॉर्मेशनचे पत्ते, ब्यूटी पार्लर, परदेशी लोकांनी मार्गदर्शनसाठी फुकट टेलिफोनचा वापर कसा करावा या संबंधी माहिती, सर्वसामान्य व्यवहारात उपयोगी पडणारे जपानी शब्द तसेच 'आर यू ए जंटलमन अलोन' किंवा 'एन्जॉय यूवर टाईम वुईथ अवर इंग्लिश स्पीकिंग अॅट्रॅक्टिव्ह होस्टेस गाईड... गर्लस आर ब्युटिफूल इक्स्क्ल्युसिव्हली' अशा सारख्या मोहात पडणाऱ्या व खिसा खाली करायला लावणाऱ्या जाहिराती पण या साप्ताहिकात असतात. हे साप्ताहिक टूरिस्ट लोकांना खूपच सहाय्यभूत ठरते.

आखियाबारा येथे हिंडत असताना एक मजेशीर प्रकार दिसला. जपानमध्ये जागेच्या टंचाईवर शोधून काढलेली शक्कल होती ती. मोटारीसाठी इमारतीच्या आंतमध्ये फिरते पार्किंग होते. नव्हे! तर काही फक्त मोटार पार्किंग साठीच्याच इमारती होत्या. आपल्याकडील जत्रेतील वरून खाली फिरणाऱ्या पाळण्यासारखे होते ते. परंतु पाळणे हे गोलाकार फिरत नसून पंचकोनी अगर षट्कोनी फिरत असावेत. प्रत्येक पाळण्यामध्ये एक मोटार पार्क केलेली होती व हे पाळणे डावीकडून उजवीकडे फिरत होते. एकूण अंदाजे ३० ते ४० किंवा त्यापेक्षाही जास्त मोटारी असाव्यात. इमारतीच्या जमिनीच्या पातळीत एक फिरत्या रंगमंचाप्रमाणे गोल लोखंडी स्टेज होते. बाहेरून सरळ या स्टेजवर मोटार नेऊन ठेवली जाते व हे लोखंडी स्टेज १८० अंशातून वळवून तेथूनच मोटार बाहेर आणली जाते.

रविवारी काही प्रमुख रस्ते फक्त पादचाऱ्यांसाठीच राखीव असत. त्यामुळे अशा ठिकाणी रस्त्यावरून हिंडणारी किंवा रस्त्याच्या मध्यभागी टाकलेल्या मोठमोठ्या रंगीत छत्र्यांखाली विसावलेली जपानी तसेच देशोदेशींची मंडळी नजरेस पडत.

भारतीय व विशेषत: महाराष्ट्रीयन माणूस जगभर कुठेही भटकला व परत येताना त्याने कितीही वस्तू आणल्या, परंतु पत्नीला साडी आणली नाही तर त्यासारखा मोठा अक्षम्य गुन्हा कोणताही नाही हे पक्के लक्षात असल्याने मी प्रथम जेव्हा वर्तमानपत्रातून साडीच्या दुकानाची जाहिरात बघितली तेव्हा त्वरित नोंद केली व नंतर सवडीने योकोहामा जवळील या दोन साड्यांच्या दुकानात एक-दोन

वेळा गेलो. साडीचे दुकानदार अर्थातच भारतीय होते. त्यांपैकी एक सिंधी होता तर दुसरा सरदारजी. भारतापासून दूर अंतरावर अनेक वर्षे राहिल्याने आपल्या माणसांत राहायला मिळत नसल्याचे दुःख व आपल्या धरतीची ओढ कित्येक वेळा त्यांच्या बोलण्यातून मला जाणवली. साड्या या साधारणतः २५०० येन पासून पुढे अगदी १० हजार येन किंवा त्याही पुढील किमतीच्या होत्या. " इतकी वर्षं लग्नाला झाली परंतु साडी बरोबर मॅचिंग फॉल काही आणला नाहीत. " हे वाक्य माझ्या एका मित्राच्या स्वैपाकघरातून कडाडल्याचे लक्षात असल्याने आठवणीने प्रत्येकी २०० येनचे बऱ्याच वेळानंतर बऱ्यापैकी मॅचिंग फॉल मिळविण्यात मला यश आले. दररोज लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची खरेदी असो किंवा इतर चैनीच्या वस्तूंची खरेदी असो, गिऱ्हाईकाला येथे त्यातील विविध प्रकार बघायला मिळतात. परंतु खरेदीला जायचे म्हणजे येथे खरोखरच ओंजळी किंवा खिसा भरून नाणी व पाकिटभरून नोटा न्याव्या लागतात.

## भ्रमंती आसमंतातील

माझे होस्टेल-लाईफ सुरू झाले तेव्हा सुरुवातीला मला होस्टेलची सर्व माहिती करून दिली गेली. त्यानंतर ३–४ दिवस प्रत्यक्ष अवती-भोवती वावरल्या-नंतर आम्हा सर्व नवीन मंडळींना 'प्रवाशांना सुरुवातीला येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय' अशी एक व्हिडिओ फिल्म दाखविण्यात आली. यामध्ये बँका, ट्रॅन्सपोर्ट, टेलिफोन, दवाखाना, दुकाने, पोस्ट ऑफिस वगैरेमधील कामासंबंधी परदेशी लोकांना मार्गदर्शन होईल अशी माहिती होती. या फिल्मनंतर आम्ही आमच्या को-ऑर्डिनेटर बरोबर प्रत्यक्ष जवळच्या भागात फिरायला पण गेलो होतो.

एकट्यानेच भटकणे मला खूप आवडायचे म्हणून आसमंतात भटकण्यासाठी कित्येकदा मी एकटाच बाहेर पडत असे. I am a best friend of mine असे मी गमतीने माझ्या मित्रांना म्हणत असे. माणूस एकटा असला म्हणजे त्याचे भटकणे त्याच्या विचारांशी प्रामाणिक असते तर मित्रासमवेत बऱ्याचदा दुसऱ्यांचे विचार आपल्यावर लादले जातात व त्याप्रमाणे भटकंती होते. बऱ्याचदा मी पायीच भटकायचो. त्यामुळे आसपासच्या गोष्टी व्यवस्थित न्याहाळता येत. काही विशेष गोष्टींची मनात किंवा कागदावर सविस्तर नोंदपण करता येई. तर काही वेळा बसमधून भ्रमंती करणे अपरिहार्य ठरे.

येथील स्थानिक बस-पद्धत ही एक आदर्श बस-पद्धत आहे. कुठल्याही बस-स्टॉपवर बसचे वेळापत्रक असते. सुट्टीच्या दिवशीचे व इतर दिवशीचे वेळापत्रक

निराळे असे. त्यामुळे कोणालाही ' बस गेली का ? ' वगैरे विचारायची गरज पडत नाही. तसेच स्टॉपवर बसेस अगदी वेळेवर येतात. फरक पडलाच तर तो अगदी सेकंदाचा असतो. त्यामुळे बस येण्यापूर्वी मिनिटाच्या अवधीत स्टॉपवर लोक येतात. बस येते व बसस्टॉप लगेच रिकामा होतो.

बसमध्ये कंडक्टर नसतो. ड्रायव्हरच बसचे व बसमधील सर्व गोष्टींचे नियंत्रण करतो. ड्रायव्हरचा ड्रेस खूपच ऐटबाज असतो. बसमध्ये ड्रायव्हरची सीट उजव्या बाजूला असून त्याच्या मागे व डाव्या बाजूस स्टील बारचे रेलिंग असून डाव्या बाजूच्या रेलिंगच्या आतील बाजूस एक मोठी बॉक्स असते. डाव्या हातास प्रवाशांना आत येण्याचे दार असते. आल्यावर प्रवासी बसचे कूपन किंवा येन त्या बॉक्समध्ये टाकतात. बसचे दोनच दर असतात ७० येन व १४० येन. जादा पैसे टाकले तर ते बॉक्सच्या पुढील वाटीमध्ये पडतात. बाजूस अनेक आरसे लावलेले असतात. ड्रायव्हरला सर्व बाजूचे, बसमधील प्रवासी तसेच प्रवासी उतरतात तो दरवाज्याचा भाग मान न वळविता बघता येतो. बसमध्ये सर्वांना दिसेल असे एक घड्याळ असते. ते चालू असते व त्या घड्याळात बघूनच ड्रायव्हर बस वेळेवर सुरू करतो.

बसमध्ये पुढील अर्ध्या भागात खिडकीच्या बाजूला फक्त एक एकच सीट असून मागील अर्ध्या भागात २-२ सीट्स असतात. शेवटची सीट अखंड ५ जणांसाठी असते. बसमध्ये बसणाऱ्या प्रवाशांच्या बरोबरीनेच उभे राहणाऱ्यांसाठी जागा असते. उभे रहाणाऱ्यांसाठी धरायला पांढरी प्लॅस्टिकची सुंदर कडी असते. परंतु ती न धरता उभे रहाण्याची बहुधा येथे फॅशन असावी. वळणावर सुद्धा काही जण वाकतील पण शक्यतो कडी धरायचे टाळतात. जसे आपल्याकडे स्कूटरच्या मागील सीटवर बसणाऱ्याने हात मोकळे सोडणे, कुठेही न धरणे ही जशी फॅशन आहे त्याच प्रकारात हे मोडते. बसमध्ये ५० ते ६० लोक सहज मावत असत. ड्रायव्हरने बस सुरु करण्यापूर्वी त्या बसला रांग करून उभ्या असलेल्या उतारूंपैकी काही जण बसमध्ये जागा नसल्याने खाली स्टॉपवर राहिले आहेत, हा प्रकार मी तरी बघितला नाही. एके दिवशी अिसोगो स्टेशनवरून निघालेली बस खच्चून भरली होती. मध्यभागी उभे रहायला खूप जागा असते ती पण संपूर्ण भरली होती. बाहेर थंडी व पाऊस मी म्हणत होता तर आतमध्ये उकडून जीव चालला होता. ड्रायव्हरला अॅटोमॅटिक दार लावता येईना. स्टॉपवरील शेवटची एक बाई पण आत चढली. ती ओरडली सुद्धा, " कृपया आत सरकून घ्या. " " अजून कोणी स्टॉपवर नाही ना ?" हातामध्ये पांढरे हातमोजे चढवताना उच्चारलेल्या ड्रायव्हरच्या या वाक्याने ड्रायव्हर जवळ उभ्या असलेल्या मला व आमच्या होस्टेलमधील एकाला हसू फुटले पण इतर आसपासची जपानी जनता गंभीर होती व दाटीवाटीने उभी असताना

सुद्धा तोल जाताना इतरांना त्रास न होईल याची दक्षता घेत होती. दार कसेबसे लावले. त्यां दिवशी सर्वच्या सर्व उतारू घेतल्यावरच बस हलली.

मुख्य स्थानकापासून बस वेळेवर सुरू होताच प्रवाशांना अभिवादन करून ही बस किती नंबरची असून ती कुठल्या मार्गाने प्रवास करणार आहे या बाबतच्या माहितीची अगदी मंजूळ आवाजातील टेप बसच्या आतील छतामध्ये दडलेल्या लाऊडस्पीकरवरून ऐकू येते. बस-ड्रायव्हरच्या उजव्या हाताजवळ अनेक बटणे असून टेप या पैकीच एका बटणाने सुरू होते. शिवाय ड्रायव्हरला काही विशेष अनाउन्समेन्ट करावयाची असल्यास त्याच्या ब्लेझरला पुढील बाजूस, पेन अडकवितात. त्याप्रमाणे एक वायरलेस ट्रॅन्समिटर अडकविलेला असतो. ड्रायव्हर बोलू लागताच प्रवाशांना बसमधील स्पीकर मधून ते ऐकू येते. परंतु माझ्या तेथील वास्तव्यात याचा उपयोग ड्रायव्हरने फक्त दोनदाच केल्याचे बघितले. प्रत्येक स्टॉप येण्यापूर्वी क्षणभर संगीताचे दोन टोल पडतात. मंजूळ आवाजातील टेपमार्फत पुढे कुठला स्टॉप येणार आहे, त्या स्टॉपचे नाव सांगितले जाते. प्रत्येक प्रवाशाच्या सीट-जवळील खिडकीच्या वर एक लाल बटण असते. ते बटण दाबताच बसमध्ये अशा सर्व बटणांच्या वर असलेल्या लाल पारदर्शक चौकोनी डबीच्या आतील दिवा लागतो व त्या लाल पारदर्शक डबीवरील ' थांबा ' ही अक्षरे प्रकाशमान होतात व संगीताचे टोल पडतात. उभ्या असलेल्या प्रवाशांसाठी उभ्या राहिलेल्या जागेच्या छतांच्या बाजूला हे बटण असते. एखाद्या उतारूला पुढील स्टॉपवर उतरावयाचे असेल तर तो हे बटण दाबताच बसमधील सर्व पारदर्शक डबीमधील दिवे लागतात. ड्रायव्हरला दिसेल अशी एक पारदर्शक डबी असते. बसस्टॉप येताच ड्रायव्हरच्या सीटच्या विरुद्ध म्हणजे डाव्या बाजूस असलेल्या मधल्या भागातील ॲटोमॅटिक दरवाजा उघडला जातो. दरवाज्याची दोन्ही दारे बसच्या बाजूमध्ये शिरतात. आतल्या किंवा बाहेरील बाजूस उघडणारी दारे नसतात. बसमधून उतरताना तीन पायऱ्या असतात. त्यांपैकी एका पायरीच्या एका बाजूस दिवा असतो तर पायरीच्या विरुद्ध बाजूमध्ये सेन्सर दडलेला असतो. जोपर्यंत लाइट दुसऱ्या बाजूपर्यंत जात नाही, तोपर्यंत दरवाजा लागत नाही. अर्थात् प्रवासी आत यायचे व उतरायचे अशा दोन्ही दरवाज्यांचे नियंत्रण ड्रायव्हरच बसल्या जागेवरून करतो. एकंदरीत बसमधील प्रवासात प्रवासी व ड्रायव्हर यांचा एकमेकांशी कधीच बोलण्याचा प्रसंग येत नाही. सर्व उतारू उतरल्यावर पारदर्शक डबीतील दिवे विझतात. उतरावयाचे सर्व उतारू उतरून तसेच स्टॉपवरील सर्व प्रवासी चढले आहेत याची खात्री करून दोन्ही काचेचे दरवाजे बंद केल्यानंतरच बस सुरू होते.

मला आठवतंय की, १५ जानेवारीला मी टोकियोचा फेरफटका मारून रात्री १०-५० ला असोगोला आलो. ११-५ ला शेवटची बस होती म्हणून इतर दोन

जणांबरोबर मी पण स्टॉपवर उभा होतो. ११–१० झाले तरी बस नाही, तेव्हा त्यांपैकी एकाच्या लक्षात आले आज तर नॅशनल हॉलिडे – आज सुट्टीचा दिवस. यामुळे शेवटची बस १०–४८ लाच गेली. आता बस नाही म्हणून त्यांपैकी एकाने लगेच टॅक्सी केली व तो निघून गेला, उरलेल्या आम्हा दोघांचा टॅक्सी करण्याचा मूड नव्हता. तो थोडा बोलका होता. लगेच आमची गट्टी जमली. त्याचे नाव होते वादा. शिबा कंपनीत इंजिनिअर होता. ३० वर्षांचा असला तरी ब्रह्मचारी. वाट बघणारे कोणी नसल्याने रात्री ११–१० ला आम्ही दोघे पायीच गप्पा मारत निघालो. उंच प्रकाशमान दिव्यांमुळे रस्त्यावर सर्वत्र एकसारखा शांत उजेड पडला होता. त्यामुळे फक्त मनगटावरील घड्याळामुळेच वेळ कळत होती. आम्ही दोघेच रस्त्यावर होतो. पाळीव प्राणी आपापल्या मालकांच्या घरात वास करीत होते. रस्त्यावर भटकी जनावरे अजिबात नव्हती. कुत्र्यांचे उगीच केकाटणे वगैरे काहीही नव्हते. आसमंत शांत होता. वाटेत एका ठिकाणी इमारतीवर रंगीत दिव्यांच्या माळा होत्या. तिथे बहुधा कुठला तरी समारंभ चालला किंवा झाला असावा. परंतु त्यांना बहुधा लाउडस्पीकर मिळाला नसावा किंवा परवडला नसावा. गरीब बिच्चारा ! ढॅऽण ऽऽ ढॅण ऽऽ आवाजात आपल्या घरातील समारंभ चार गल्ल्यां पलीकडे सुद्धा कळण्याबाबत जागरूक असणारे आणि अट्टाहास धरणारे, तसेच लाउडस्पीकरने काय खपलास काय ?' म्हणून शेजाऱ्यालाच उलटे विचारून बुचकळ्यात टाकणारे आम्ही श्रीमंत लोक कुठे ? असो ! काही काही बाबतीत ही जपानी मंडळी अगदीच चिक्कू ! नाही तर काय ? काही मिनिटांतच वादासानच्या अपार्टमेंटची बिल्डिंग आली परंतु त्याने त्याची कार तेथूनच ५ मिनिटांच्या अंतरावर असलेल्या पार्किंग ग्राउंडवर पार्क केली होती. या ग्राउंडवर गाडी पार्क करण्यासाठी तो दरमहा भाडे भरतो. त्याच्या होंडा कारमधून त्याने मला होस्टेलवर सोडले. पुन्हा मुद्दाम एक–दोनदा फोन करून होस्टेलवर गप्पा मारायला तो आला होता.

परदेशी लोक दिसले की विशेषत: शाळकरी मुली फारच लाजाळू बनतात. परंतु एक दिवस मात्र मला निराळाच अनुभव आला. केन्च्युकी फ्राईड चिकनच्या दुकानवजा रेस्टॉरंटमध्ये काचेतून बाहेरील रस्त्यावरील वाहतुक न्याहाळत खात असताना माझ्या टेबलाच्या विरुद्ध बाजूस एक शाळेचा लेझर ल्यायलेली शाळकरी मुलगी येऊन बसली. इतर ठिकाणी जागा होती. परंतु तिचा माझ्याशी गप्पा मारायचा उद्देश होता. एक दोन मिनिटांतच ती बोलू लागली. 'परदेशी का ?' मी तिला जपानीत म्हणालो "नाही ! तरी पण सध्या जपानी" तेव्हा ती हसली. लवकरच तिचा उद्देश लक्षात आला. तिचा एक प्रियकर होता व त्याला असे वाटते की तिने इंग्रजी बोलावे व त्यासाठी ती जिथे संधी मिळते तिथे इंग्रजी बोलण्याचा सराव करते. "इंग्रजी बोलण्याचा मी खरोखरच खूप प्रयत्न करते पण त्याचा विश्वासच

बसत नाही." ती म्हणाली. तिच्या धीटपणाचे कौतुक वाटले. म्हणतात ना प्रेमाकरिता माणूस वाट्टेल ते करतो!

बाहेरून परत येताना बऱ्याच वेळा मी कामीओका स्टेशनवरून परत यायचो. कारण या स्टेशनवर येणारी गाडी ही प्रायव्हेट रेल्वे लाइन असल्याने तिकिट कमी असायचे. तसेच वाटेत विंडो शॉपिंगही व्हावयाचे. माझे होस्टेलही या स्टेशनापासून जवळ म्हणजे २५ मिनिटांच्या अंतरावर होते व वाटेतील ११४ पायऱ्या चढून जाताना उजव्या बाजूला लागणारे एक घर बाहेरून बघायला मला फार आवडायचे. का कोणास ठाऊक, पण काही ठिकाणे अशी असतात की, ती बघताच आपले मन विसावते. अशी ठिकाणे सूक्ष्म आनंददायी ठरणाऱ्या प्रकारात मोडतात. या लहानश्या घरातील वॉशिंग मशीन, ॲक्वेरियम वगैरे बाहेरच होते. त्या घराच्या आसपासचा मिनी बगीचा पण सुंदर होता. बगीच्यासाठी व वॉशिंग मशीनसाठी लागणाऱ्या वस्तू व अवजारे कायम बाहेरच, पण व्यवस्थित ठेवलेली असायची. एकंदरीत बाह्यदर्शनी हे घर खूपच नीटनेटके व नजरेत भरावे असे होते. भारतात परतण्यापूर्वी मी या घराचा फोटो घेताना तेथील वृद्ध घरमालक बाहेर आला व त्याने "काय कशाचा फोटो घेताय?" अशी पृच्छा केली. मी माझे मन त्याचेजवळ खुले करताच, तो सुखद हसला व म्हणाला "थांबा." लगबगीने आत जाऊन तो घरातील ससा घेऊन बाहेर आला व फोटो काढल्यावर गप्पा मारताना नंतर कळले की, घरातील इतर मंडळी केव्हाच ईश्वरचरणी विलीन झाली होती. सध्या फक्त ही दोघेच या घरात राहातात. आमच्या दोघांच्याही डोळ्यात चटकन् अश्रू तरारले. सशासकट काढलेला त्या हौशी वृद्ध घरमालकाचा फोटो माझ्या अल्बममध्ये मी जपला आहे.

एक दिवस माझी दाढ दुखत आहे हे मी माझ्या को-ऑर्डिनेटरला सांगताच त्याने दाताच्या डॉक्टरांना फोन केला. आम्ही येत आहोत याची खबर दिली. होस्टेलच्या कारने तिथे पोहोचलो. आत जाताच डॉक्टरांनी मला तपासले. प्लॅस्टिक पॅकमधून औषधाच्या पुड्या दिल्या व तिसऱ्या दिवशीची वेळ दिली. तिसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी जाऊन मी दवाखान्यामधील पेशंटसाठीच्या खुर्चीवर बसलो. ही खुर्ची विशेष आरामशीर होती. सुरुवातीला डॉक्टरांनी माझ्या दाढेचे निरीक्षण केले व नंतर माझ्या दाढेच्या आतील बाजूने एक लहानशी प्लेट ठेवली. गालाच्या बाहेरून अंदाजे दोन इंच व्यासाची एक लहानशी नळी धरली. बटण दाबले. तोंडात ठेवलेली प्लेट डॉक्टर घेऊन गेले. एक मिनिटाने येऊन मला सांगितले की आत्ताच तुमच्या दाढेचा एक्स-रे घेतला व तो बघितला. दाढेत चांदी भरायला हवी, म्हणजे बसल्या जागी त्यांनी क्ष-किरणाच्या सहाय्याने चिकित्सा करून निदान करून लगेच सांगितले. माझ्या होकारानंतर पेशंटच्या खुर्चीच्या समोर असलेल्या एका यंत्राला

चार लहान पाइप्स होते, त्यांपैकी एका पाइपच्या सहाय्याने डॉक्टरांनी माझ्या दाढेवर काही क्षण क्लोरोफॉर्मसारख्या बधीर करणाऱ्या द्रवाचा मारा केला व नंतर दाढेत अधिक चिन्हासारखी खाच घेतली. त्याचे माप घेतले. त्यात तात्पुरता एक पदार्थ भरला व आठ दिवसांनी येण्यास सांगितले. आठ दिवसांनी जाताच चांदीसारख्या धातूचा अधिक चिन्हाचा तुकडा रसायन लावून दाढेत भरला व मी निघालो. सर्व मिळून या दवाखान्यात माझा एकूण अर्धा तास सुद्धा मोडला नसेल.

कन्नाओी येथील अिसेझाकीमाला या सुंदर रस्त्यावर मी बऱ्याचदा भटकलोय. अंदाजे दोन किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावर दुतर्फा बरीच लहान मोठी सुंदर दुकाने आहेत. त्यांतील कित्येक परदेशी लोकांसाठी ड्यूटी-फ्री शॉप्स आहेत. काही ठिकाणी रस्त्यावर मध्यभागी सुंदर कमानी असून कमानीखाली मोठी झुंबरे आहेत. कडेला अधूनमधून उंच हिरवी झाडे आहेत. रस्त्यावर रंगीबेरंगी नक्षीकाम आहे. सुंदर गालीचा वाटावा असा हा रस्ता. याच रस्त्यावरील युरिंदो बुक स्टॉल हा माझा आवडता बुकस्टॉल होता. अनेक पुस्तके, डिक्शनरी, जपानच्या सुंदर देखाव्याची कार्डे याच ठिकाणी मी खरेदी केली होती.

बहुतेक मोठ्या चौकांतून पादचाऱ्यांना रस्ता क्रॉस करताना जेव्हा हिरवा दिवा लागतो तेव्हा त्या बरोबर मंद सुरातील एक संगीत पण लागते. शेवटी हे संगीत जलद होऊन बंद होते. अंध लोकांना रस्ता ओलांडताना मदत म्हणून हे संगीत; परंतु जपानच्या संपूर्ण वास्तव्यात मला असे अंध लोक दिसलेच नाहीत. तसेच टक्कल पडलेले जपानी सुद्धा अगदी थोडे म्हणजे अंदाजे ४–५ दिसले असावेत. शरीराच्या घेत असलेल्या उत्तम निगेचेच ते प्रतीक नव्हे काय ?

## रेल्वेप्रवास

जपानच्या वास्तव्यात रेल्वेचा तसाच प्लॅटफॉर्मचा व माझा संबंध अनेक वेळा आला. विशेषतः शेवटचे तीन महिने सुट्टीचे दिवस सोडून फॅक्टरीत जाताना व येताना रेल्वेचा वापर करावा लागे.

जपानमध्ये ज्या रेल्वे आहेत त्यांचे तीन मुख्य प्रकार आहेत. एक जमिनी-वरून धावणारी इलेक्ट्रिक ट्रेन. यास जपानीत 'देनशा' असे म्हणतात. दुसरी जमिनीच्या पोटातून जाणारी रेल्वे, तिला जपानीत 'चिकातेत्सु' व इंग्रजीत 'सब-वे' असे म्हणतात. तिसरी म्हणजे 'शिकानसेन' किंवा 'बुलेट ट्रेन' की जी 'सुपर एक्स्प्रेस ट्रेन' या नावाने पण प्रसिद्ध आहे. ही तिसरी रेल्वे नावाप्रमाणेच

वरील इतर दोन रेल्वेपेक्षा खूपच वेगाने जाते. टोकियो, नागोया, क्योटो, ओसाका, हिरोशिमा वगैरेसारखी मोठमोठी शहरे या बुलेट ट्रेनने जोडलेली आहेत. या बुलेट ट्रेनची माहिती पुढे ' क्योटो, नारा ..' या प्रकरणात दिली आहे. मोनोरेल नावाचा चौथा पण एक प्रकार आहे, ती हानेडा ते टोकियो या दरम्यान धावते. परंतु तिचा व माझा संबंध कधी आला नाही. सर्वसामान्य जपानी माणसाचा पहिल्या दोन प्रकारात मोडणाऱ्या रेल्वेशी घनिष्ट संबंध येतो.



सवंध जपानभर रेल्वेचे फार सुंदर जाळे पसरलेले आहे. गाड्या अगदी वेळेवर ये-जा करतात. त्यामुळे रेल्वेचा नकाशा व रेल्वेचे टाइमटेबल यांच्या सहाय्याने आपण कुठल्याही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किती वाजता पोहोचणार ते अचूक काढता येते. या देशात घरोघरी फोन असल्याने आगाऊ सूचना देऊन आपण विविध कामे ठरवून ती वेळेवर उरकू शकतो. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त वाहने बदलून निरनिराळ्या ठिकाणी वेळेवर पोहोचण्याचे व अनेक कामे करण्याचे विक्रम येथेच करायला मिळतील. मी केलेले आहेत. सकाळी विशेषतः एक गाडी बदलून लगेच दुसऱ्या गाडीने जाणारी मंडळी खूपच दिसतात. वाहनांसाठी वाट बघणे या प्रकाराकरिता आपला फारच कमी वेळ मोडतो. हे येथील सत्य आहे. मला आठवतंय की, एकदा शिखर शिंगणापूरचे दर्शन घेऊन खाली आल्यावर ' यश. टी. चा वकत आहे पाचचा, पर रातच्या बारापतुर ती कवाबी येते. ' हा तेथील गावकऱ्याने सांगितलेला अनुभव अजून लक्षात आहे. अर्थात् ही आपल्याकडील मजा काही औरच आहे व ती पण मी चाखलीय.

' रेल्वे सुरू झाल्यापासून जपानमध्ये रेल्वेचा एकही अपघात झालेला नाही. ' कन्नाओच्या कंट्रोलरूमला भेट दिली तेव्हा तेथील अधिकाऱ्याने उच्चारलेले हे पहिले वाक्य. किती सुरक्षित प्रवास नाही का ? सुरक्षिततेकरिता अनेक उपाय योजलेले आहेत. रुळातील अंतर बदलणे, रुळावर कुठला तरी मोठा पदार्थ ठेवलेला असणे, वगैरे प्रसंगी त्या लाइनवरून धावणारी रेल्वे आपोआप थांबते.

जॅपनीज नॅशनल रेल्वे ( जे. एन्. आर. ) प्रमाणेच प्रायव्हेट रेल्वेलाइनचे सुद्धा जाळे येथे अस्तित्वात आहे. या गाड्यांचे दर जे. एन्. आर. पेक्षा थोडे कमी असतात. जे. एन्. आर. ज्या भागातून जात नाही अशी कमी महत्त्वाची स्टेशने

सुद्धा या प्रायव्हेट रल्वे लाइनने जोडलेली असतात. टोकियो व त्याच्या आसपास जे. एन्. आर. च्या एकूण ३२ लाइन्स असून प्रत्येक लाइन वेगळ्या रंगात दर्शविलेली असते. असा रंगीत नकाशा तसेच प्रत्येक लाइनचे टाइमटेबल येथे मोफत मिळते.

रेल्वेच्या तिकिटासाठी प्रत्येक स्टेशनवर एक किंवा अनेक व्हेंडर मशीन्स असतात. व्हेंडर मशीनला १२० येन पासून ६४० येन पर्यंत निरनिराळ्या टप्प्याने किमती लिहिलेली अनेक बटणे असतात. व्हेंडर मशीनच्या जवळपास जपानीतून रेल्वेचा नकाशा पण असतो व त्या स्टेशनापासून कुठल्या स्टेशनपर्यंत किती येन पडतात ते लिहिलेले असते. उदा. एखाद्या स्टेशनपर्यंत २४० येन दर दर्शविला असेल तर या मशीनमध्ये २४० येन टाकून त्यावरील २४० येन लिहिलेले बटण दाबताच २४० येनचे तिकीट बाहेर येते जर जादा पैसे मशीनमध्ये टाकले तर तिकिटासोबत उरलेले पैसे परत येतात. या मशीनमधील एका भागात नोट सरकविली असता सुट्टी नाणी मिळण्याची व्यवस्था असते. जर एखाद्याचा गाडीत प्रवास करतानाच विचार बदलला व त्याने पुढील अगर अलीकडील एखाद्या स्टेशनवर उतरावयाचे ठरविले तर अशा वेळी प्रत्येक प्लॅटफॉर्मच्या एका टोकाला ' फेअर ॲडजस्टमेंट ' असा बोर्ड लावलेली खिडकी असते. या ठिकाणी आपण घेतलेले तिकिट दाखवून उरलेले पैसे देऊ अगर घेऊ शकतो.

तिकिट काढल्यावर प्लॅटफॉर्मवर जाताना चेकरकडून प्रत्येकाचे तिकिट पंच होते व प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडताना पंच केलेले तिकिट चेकरकडून गोळा केले जाते. अशाप्रकारे दोन्ही वेळा तिकिटाची तपासणी होते. येथे परदेशी लोकांकरिता अशी सोय असते की त्यांनी कमीत कमी दराचे तिकिट घ्यावयाचे व ज्या स्टेशनवर उतरणार तेथील फेअर ॲडजस्टमेन्ट खिडकीवर उरलेले पैसे द्यावयाचे. नुसते तिकिट दाखवताच आतील क्लार्क किती पैसे द्यावयाचे ते सांगतो व पहिले तिकिट ठेवून घेऊन जादा पैशाचे नवीन तिकिट देतो.

होस्टेलमधील एका जपानी मित्राने गप्पा मारताना मला एक गंमतशीर माहिती दिली. समजा तुमच्याकडे ईसोगो ते योकोहामा असा मासिक किंवा त्रैमासिक पास आहे व तुम्ही काही कामानिमित्त योकोहामाचेही खूप पुढे असलेल्या टोकियो या ठिकाणी गेलात. परत येताना कमीत कमी दराचे तिकिट काढायचे व ईसोगोला उतरताना पास दाखविला तर मात्र तुमच्या मधल्या काही अंतराचा प्रवास अर्थातच फुकट होतो. यास येथील लोकांनी ' पाइप ट्रॅव्हल ' किंवा ' टनेल ट्रॅव्हल ' असे नाव दिले आहे. परंतु ही जरी पळवाट असली तरी हा प्रकार कधी-मधी क्वचित् प्रसंगीच फक्त आढळतो. अशी पण पुस्ती त्या जपानी मित्राने जोडली. कधी कधी गाडीमध्ये सुद्धा तिकिटाची अगर रेल्वे पासाची तपासणी होते व या

तपासनीसाकडून सुद्धा फेअर ॲडजेस्टमेंटचे काम होते. त्यासाठी जादा आकार नसतो.

प्लॅटफॉर्म व गाडी हे एकाच पातळीत असल्याने गाडीत चढताना पायरी उतरणे किंवा चढणे वगैरे भानगड नाही. प्लॅटफॉर्मवर, गाडी थांबते त्यापासून अंदाजे तीन फूट अंतरावर एक जाड ठळक रेघ असते. तिच्या आत गाडी थांबेपर्यंत कोणीही जाऊ नये असा संकेत असतो. प्लॅटफॉर्मवर एक किंवा दोन गार्ड असतात. गाडीतील लोक उतरून बाहेरील प्रवासी गाडीमध्ये गेल्यावर लाल झेंडा हलवून ते खूण करतात व शिट्टी देतात आणि नंतर हाताने दोन्ही दिशेकडे गाडीच्या ड्रायव्हरला उद्देशून ऑल क्लिअरची एक मजेशीर खूण करतात. या खुणेचे मला सुरुवातीला फार हसू यायचे. गाडीची काचेची सरकती दारे बंद होतात व गाडी सुटते. संध्याकाळच्यानंतर प्लॅटफॉर्मवरील गार्ड जवळ फक्त लाल झेंडा व बॅटरी अशा दोनच वस्तू असतात.

प्लॅटफॉर्म स्वच्छ ठेवणे हे गार्डांचेच एक काम असते. कारण मी कित्येकदा गार्डलोक लांब दांडयाचा झाडू घेऊन प्लॅटफॉर्म साफ करताना बघितले आहे. आधीच्या स्टेशनवरून गाडी सुटली की त्या प्लॅटफॉर्मवरील आधीच्या स्टेशनच्या नावाच्या पारदर्शक प्लेटमागील दिवा लागतो. तरी पण गार्ड प्लॅटफॉर्मवरील केबीनच्या बाहेरच्याच बाजूला सोईस्कर ठिकाणी ठेवलेल्या माइकजवळील बटण दाबून अनाउन्समेन्ट करतो व गाडी मागील स्टेशनवरून सुटून लवकरच प्रस्तुत स्टेशनवर येत असल्याचा इशारा देतो. गाडी येऊन थांबल्यानंतर सुद्धा 'प्रस्तुत स्टेशन कुठले आहे' हे तो सांगतो व नंतर 'कृपया आपल्या चीजवस्तू विसरू नका' अशी घोषणा करतो. कारण प्रत्येक स्टेशनवर 'लॉस्ट अँण्ड फाउंड' असा एक विभाग असतो. गाडीत मिळालेल्या वस्तू लोक येथे आणून देतात व त्यामुळे या विभागाचे काम वाढते. यासाठी ही शेवटची घोषणा.

प्लॅटफॉर्मवर ४–५ ठिकाणी ठराविक अंतरावर प्लॅटफॉर्मला समांतर, त्या स्टेशनचे नाव जपानीत व इंग्रजीत लिहिलेले बोर्ड असून त्या प्रस्तुत स्टेशनच्या मागील व पुढील स्टेशनचे नावपण बाणासहित याच पाटीच्या खाली लिहिलेले असते. प्लॅटफॉर्मवर ५–६ ठिकाणी तरी आरशासहीत मिनी टेबल्स ठेवलेली असतात. प्लॅटफॉर्मवर कमीत कमी एक दोन तरी दुकाने असतात त्यात वर्तमानपत्रे किंवा स्टेशनरी दुकानचा समावेश असतो. तसेच बाजूला पब्लिक टेलिफोन सुद्धा असतात. देनशाच्या मानाने जमिनीच्या पोटातून धावणाऱ्या चिकातेत्सुचे प्लॅटफॉर्म फारच पॉश असत. टाइल्सचाच बहुतेक ठिकाणी वापर केलेला असे. या चिकातेत्सुच्या एका बाजूला प्लॅटफॉर्म व दुसऱ्या बाजूला भिंत असते. कित्येक मोठ्या स्टेशनवर प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडण्यासाठी आणि बाहेरून प्लॅटफॉर्मवर येण्यासाठी फिरते जिने असतात.

टोकियो रेल्वे स्टेशनवर तर एक कॉम्प्युटर ट्रॅव्हल गाईड आहे. या ठिकाणी भिंतीवर खूप ठिकाणचे फोटो असून त्याखाली बराच मोठा रेल्वेचा नकाशा आहे, व निरनिराळ्या प्रसिद्ध स्थळांच्या पुढे कोड नंबर दर्शविलेला आहे. त्याखाली एक मोठा कॉम्प्युटर ठेवलेला असून त्याला एकूण चार टर्मिनल्स आहेत. जर एखाद्या स्थळाची माहिती हवी असेल तर त्या स्थळाचा दर्शविलेला कोड नंबर दाबताच त्या ठिकाणी किती प्रकारे जाता येते, तसेच त्या ठिकाणाची सर्व इत्थंभूत माहिती समोरील व्हिडिओ मॉनिटरच्या स्क्रीनवर खालून वर सरकत जाताना दिसते. तेथील प्रिंट हे बटण दाबताच ही सर्व माहिती कागदावर प्रिंट करून त्या कॉम्प्युटर-मधून बाहेर येते. प्रवाशांसाठी ही मोफत सेवा दिवसातील २४ तास उपलब्ध असते.

गाडीत डब्यामध्ये समोरासमोर वेलवेट कव्हर असलेली मऊ बाके असतात एका बाकावर नऊ लोक बसू शकतात व एका डब्यात अशी एकूण सहा बाके असतात. एका डब्यात लोकांना धरून उभे रहाण्यासाठी अंदाजे एकूण ९० प्लॅस्टिकच्या पांढऱ्या गोल कड्या लोंबत असतात. शिवाय अजून जादा ३० माणसे डब्यात सहज मावतात. अशा प्रकारे एका डब्यात १७५ लोक सहज जाऊ शकत असले तरी गर्दीच्या वेळी मात्र त्यापेक्षाही जास्त लोक प्रवास करतात. थंडीमध्ये बाकाचे खालून गरम हवा येते, तर उन्हाळ्यात गाडीमधील मोठे पंखे कार्यरत असतात. एका डब्याला प्रत्येक बाजूस दोन असे एकूण चार काचेचे दरवाजे असून ज्या बाजूला प्लॅटफॉर्म येतो त्या बाजूकडील दरवाजे उघडले जातात. गाडीत जेथे जेथे शक्य आहे तेथे सर्वत्र जाहिराती दिसतात. अगदी डोक्याला लागणार नाहीत अशा प्रकारे पण जाहिराती प्लॅस्टिक वेष्टनांत मध्यभागी लटकत असतात. दरवाजाच्या जवळपास गाडीच्या मार्गाचा नकाशापण असतो. स्त्री-देहाच्या दर्शना-प्रमाणेच ख्रिमोनोची सुंदरता हे पण जाहिरातीत चित्रीत झालेले विषय आहेत. तर चक्क एका ठिकाणी Learn English as if you are learning at abroad अशी एका इंग्लिश शाळेची जाहिरात होती. एकंदरीत अब्रॉड, फॉरेन या शब्दांची क्रेझ फॉरेनमध्ये सुद्धा आहे.

गाडीत वरती सामान ठेवायला जागा असते पण पुष्कळदा जपानी मंडळी तेथे वर्तमानपत्रे किंवा कॉमिक्स सारखी मासिके वगैरे ठेवून अगर विसरून जाताना आढळतात. ठरलेल्या शेवटच्या स्टेशनवर गाडी आली की गार्ड मंडळी डब्यातील वस्तू तसेच अशी वर्तमानपत्रे, मासिके वगैरे गोळा करतात व गाडी स्वच्छ करतात. स्टेशन येण्यापूर्वी गाडीच्या डब्यातील छतात दडलेल्या लाउडस्पीकरवरून पुढील स्टेशनच्या नावाबाबत माहिती दिली जाते. व आपले सामान न विसरता बरोबर नेण्याबाबतची सूचना पण दिली जाते.

**गाडीतील जपानी** : डब्यातील जपानी याबाबत तर बरेच काही सांगता येईल. गाडीतील कुठल्याही डब्यात शिरताच आपण एखाद्या लायब्ररीत तर शिरलो नाही ना ? असा भास होतो. कारण बहुतेक जण त्यांच्या जवळील मुख्यत्वे वर्तमानपत्र अगर मासिक, पुस्तक इत्यादी मध्ये डोके खुपसून बसलेले असतात. विशेषतः सकाळच्या ट्रेनमध्ये बहुतांशी वाचन करणारी मंडळीच जास्त असतात तर संध्याकाळी परत येताना ट्रेनमध्ये वाचकांबरोबर काही मंडळी डोळे मिटून बसलेली अगर डुलत झोपलेली दिसतात. बऱ्याचवेळा मी सुद्धा गाडीतच ५-१० मिनिटांची डुलकी काढून ताजातवाना होत असे. पण एकदा मात्र मी सुद्धा फॅक्टरीतून येताना डुलकीतून जागा झालो व बाहेर बघितले तर नवीन परिसर दिसू लागला होता. गाडीने असोगो स्टेशन केव्हाच सोडले होते. लगेच पुढील स्टेशनवर मी उतरलो व समोरील विरुद्ध दिशेला जाणारी ट्रेन पकडून मागील असोगा स्टेशनला आलो. असे बऱ्याच जणांचे होते. काही वेळा तर शेवटच्या स्टेशनवर गाडी आली तरी अशा कुंभकर्णांना जाग येत नाही. मग गार्ड हळूवारपणे त्यांना जागे करून मार्गाला लावतात.

गाडीत बसलेली आम जपानी जनता ही खूपच शांत असते. एकदा बसले की, शेजाऱ्यांकडे बघणारसुद्धा नाहीत. चेहऱ्यावरील सुरकुतीसुद्धा हलत नाही. परंतु कधी कधी दोन तीन शाळकरी अगर तरुण मित्रमंडळी गाडीत शिरल्यानंतर लगेच काहीवेळा जोरजोरात गप्पागोष्टी करीत असतात. त्यांचे हसणे-खिदळणे चालू असते. काही वेळा अशा प्रकारच्या लोकांमध्ये काही बोलक्या गृहिणीपण असतात. वाकारानाओी ( माहीत नाही ) सो ऽ सो ऽ सो ( अस्सं ! अस्सं ) मादा ( नाही ) होंतो ऽ देसने ( खरं का ? ) सो देस कां ( असं ऽ कां ) ... इत्यादी प्रकारचे शब्दप्रयोग कानावर पडतात. तर कधी कधी प्रेमी युगल अगदी ' बाहोंमें बाहे 'च्या स्टाइलमध्ये किंवा प्रियकर त्याच्या गर्लफ्रेंड अगर प्रेयसीची छेड काढीत दाराजवळ गप्पा मारीत उभे असतात. तर काही धटिंगणराव तिच्या कपाळाचे चुंबनसुद्धा घेतात. अशावेळी गाडीत जर पन्नाशीच्या वरील मंडळी असतील तर ती त्यांचे लहान डोळे शक्य तितक्या मोठ्याने वटारून या जोडीकडे अधून मधून नजर वळवतील. परंतु त्यांचेकडे बघतो कोण ? त्या दोघांचे विश्वच निराळे असते. तसे बघू जाता गाडीतील प्रत्येकाचे एक स्वतंत्र विश्व असते व हरएक जण त्याच्या त्याच्या विश्वात मशगुल असतो. काही मंडळी वॉकमन सारखे स्टिरिओ टेपरेकॉर्डर खिशात टाकून व त्याचा हेडफोन कानाला लावून स्वतःच्या संगीताच्या विश्वात रममाण झालेले असतात तर काही वाचक मंडळी उभ्याउभ्या रंगून गेलेली असतात. गाडीत जागा असली तरी ही मंडळी तशीच उभी राहून प्रवास करतात. स्टेशन आले व गाडीत एखादी सीट रिकामी झाली तर उभी राहिलेली मंडळी कधी धावत जाऊन सीट पकडत नाहीत. जवळपास कोणी वृद्ध असल्यास तो तिथे बसणार आहे का याची काही मिनिटे

वाट बघतात परंतु मोकळ्या सीटसाठी धावाधाव मात्र मुळीच करणार नाहीत. कित्येकवेळा काहीजण डब्यामध्ये बसायला भरपूर जागा असली तरी एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जात असतात. उभ्या राहिलेल्या लोकांना आधारासाठी सुंदर प्लॅस्टिकच्या गोल कड्या आडव्या दांडीला लोंबत असतात. परंतु बसप्रमाणेच ट्रेन-मधील काही मंडळी या कड्यांचा आधार शक्यतो घेत नाहीत, गाडी जोरात असते पण ही मंडळी जहाजावरील लोकाप्रमाणेच स्वत:ला सावरतील, पुढे मागे होतील व शक्यतो या कड्यांच्या झोक्याचा आधार घेणे टाळतील. दोन डब्यांमधील काचेचा दरवाजा हाताने सरकवून, नंतर बंद करून एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जाणे हा एक कॉमन चाळा नजरेस पडतो. गाडीत कोणीही चरत नाहीत. परतु एकजण एकदा मला दिसला होता. त्याने तेम्पुरा म्हणजे जपानी भजी एका कागदी पिशवी-तून आणली होती. खिशातून काढून त्याने ती खाल्ली. नंतर त्या पिशवीतील कागदी नॅपकीन काढूने त्याला हात पुसले तो कागदी नॅपकीन त्या कागदी पिशवीत घालून त्याचा बोळा केला. परंतु तो गाडीत फेकून न देता स्वत:च्या खिशात ठेवला व प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर तेथील कचऱ्याच्या पेटीत टाकला.

पाठीला मुले बांधलेल्या स्त्रिया पण कधी कधी आपल्या पाठीशी असलेल्या बछड्याशी बोलत गाडीत शिरतात. लहान मुलांना न्यायची ही एक सुंदर पद्धत आहे. या मध्ये मुलाचे हात पाय मोकळे रहातात. त्याला डोके टेकवायला एक लहानशी उशी पण असते. पुढे आईची ऊब असते तर मागे व्यवस्थित असलेल्या मऊ गुंडाळीत दुलई दडलेली असते. आईचे पण दोन्ही हात रिकामे असतात. तांबूस गोरी कांती, तुकतुकीत चेहरे व फरच्या किंवा इतर सुंदर व व्यवस्थित रंगीबेरंगी कपड्यात लपेटलेल्या देहातील ही पिल्ले या स्थितीत फारच सुंदर दिसतात. ही पिल्ले शांतपणे मागे झोपलेली तरी असतात किंवा लुकलुकणारे त्यांचे इटुकले डोळे आसपासचा वेध तरी घेत असतात.

गाडी प्लॅटफॉर्मवर येते तेव्हा डब्याची काचेची दारे दोन्ही बाजूला डब्याच्या भिंतीत सरकल्यावर प्रथम आतील उतारू बाहेर पडतात, तेव्हा प्लॅटफॉर्मवरील प्रवासी दरवाज्याशी दोन्ही बाजूला गाडीच्या दिशेला काटकोनात असलेल्या पिवळ्या खुणा केलेल्या ठिकाणी रांग लावून उभे असतात. आतील उतरणारे सर्व उतारू बाहेर पडल्यानंतरच बाहेरील ही मंडळी दोन रांगेतून डब्यात प्रवेश करतात. या करीताच बरोबर या खुणेपाशी डब्याची दारे येतील अशाप्रकारे गाडी उभी राहते. या लोकांना रांगेचे फार वेड. प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडणारा जिना तसा भरपूर प्रशस्त असतो. परंतु गर्दीच्या वेळीसुद्धा ही मंडळी लगेच आपण होऊन अनेक रांगा करूनच व्यवस्थित बाहेर पडतील. रांग लावणे हे यांच्या अंगवळणीच पडलेले आहे.

सकाळच्या वेळी लोक झपाझप पावले टाकत अगर पळत स्टेशनकडे जाताना दिसतात. कित्येकवेळा वाटेतील तिकिट-चेकरला ट्रेनचा हातातील पास लांबूनच दाखवीत पळत पळत प्लॅटफॉर्मकडे धाव घेतात. परंतु संध्याकाळी मात्र ही पळापळ नसते. मंडळी आरामात असतात. अशाच वेळी मला आठवडयातून एक दोन वेळा कधी ट्रेनने येताना तर कधी प्लॅटफॉर्मवर 'एकच प्याला 'तील सुधाकरचे वंशज भेटत असत. अगदी तर्रर्र प्यालेले असतात. जपानीत बडबडत असतात. हातवारे करतात. हसतात. खाणाखुणा करतात. पण कोणाला इजा करीत नाहीत. ओसाके ही त्यांची आवडती दारू. सुटाबुटातील प्यालेला गोरापान जपानी बघून मला आश्चर्य वाटायचे. पण कधी गडबडा लोळलेले अगर पडलेले मात्र दिसले नाहीत. परंतु जवळपास कोणी परदेशी व्यक्ती असेल तर मात्र अशा वेळी इतर जपान्यांच्या चेहऱ्यांवरील शरमेचे चित्र चटकन नजरेस भरते. अशी आहे ही प्रवासी जपानी जनता !

## टेलिफोनबाबत थोडेसे

टेलिफोनची कार्यक्षम सेवा जपानमध्ये उपलब्ध असून त्याचा तितक्याच योग्यप्रकारे वापर जनतेकडून केला जातो. दिवसाकाठी बहुतेक जपानी माणूस कितीतरी वेळा परंतु बहुतेक वेळी आवश्यक तेवढेच फोनवर बोलून दूरच्या व्यक्तीशी संबंध ठेवत असतो.

जपानमध्ये एकंदरीत चार प्रकारचे टेलिफोन्स आहेत. टेलिफोनचा प्रकार हा त्याच्या रंगावरून ध्यानात येतो. रस्त्यावरील 'पब्लिक-पे-टेलिफोन्स' निळ्या रंगाचे असतात. गुलाबी अगर लाल रंगाचे 'सेमी-पब्लिक टेलिफोन' हे विशेषतः स्टोअर्स, दुकाने, तसेच सार्वजनिक ठिकाणी ठेवलेले आढळतात. खाजगी फोनचा रंग काळा असतो. पिवळ्या रंगाचे टेलिफोन्स हे विशेषतः लांब अंतरावरील फोन कॉल्स करिता वापरतात. यात सुरुवातीला १० येनची काही नाणी टाकावी लागतात व पाहिजे असलेली व्यक्ती फोनवर आल्यावर १०० येनचे नाणे टाकावे लागते.

पब्लिक टेलिफोन हा स्थानिक म्हणजेच कमी अंतरासाठी असून तो एकूण जास्तीत जास्त १८ मिनिटांपर्यंत वापरता येतो.

जपानमधील फोन-नंबर एकूण तीन गटांत विभागलेले असतात. जेव्हा तुम्ही टोकियोतून स्थानिक फोन करता तेव्हा फक्त शेवटच्या दोन गटातील नंबर फिरवावे लागतात. तिन्ही गटातील सातही आकडे ओळीने फिरविले तरी सुद्धा नंबर लागतो.

परंतु पहिल्या गटातील आकडे हे लांब अंतरावरील तसेच आंतरराष्ट्रीय टेलिफोन-साठी असतात.

येथे फोनचा वापर करण्याची पद्धत थोडी निराळी आहे. प्रथम रिसीव्हर उचलल्यावर १० येनचे नाणे टाकावे लागते व नंतर नंबर फिरवावा लागतो. नंबर न लागल्यास १० येनचे नाणे परत येते. स्थानिक कॉलला दर तीन मिनिटाला १० येन हा आकार असतो. कॉल लागल्यापासून ३ मिनिटाला काही सेकंद कमी असताना फोनमधून पिंग-पिंग असा बारीक आवाज यायला सुरुवात होते. यावरून वेळ संपत आल्याचे कळते. मग काही सेकंदांतच फोन ठेवून द्यायचा का परत १० येनचे नाणे टाकून पुढील तीन मिनिटे बोलायचे या बाबत फोन करणाऱ्या व्यक्तीला निर्णय घेता येतो. कित्येकजण सुरुवातीलाच १० येनची ५-७ नाणी टाकतात. अशा वेळी फोनवर बोलत असताना दर तीन मिनिटाला एक प्रकारचा आवाज येऊन ३ मिनिटे संपल्याचे समजते व एक १० येनचे नाणे फोनच्या बॉक्समध्ये पडते. आपण फोन ठेवल्यानंतर मात्र दर तीन मिनिटाला १० येन याप्रमाणे पैसे कापून उरलेले पैसे फोनच्या बॉक्समधून परत येतात.

सर्व टेलिफोनसाठी वापराचा वेळ व पैसे यांचे नाते ठेवल्याने आवश्यक तेवढेच व कमीत कमी वेळात फोनवर बोलून फोन ठेवणाऱ्यांमुळे पब्लिक टेलिफोनला जरी रांग असली तरी झटपट पुढे सरकत असते. नाहीतर एकदा का आठ आण्याची दोन नाणी आत टाकली की मग आपण कोणाच्या बापाचे लागत नाही. फोनवरील पलीकडची व्यक्ती व आपण, बस्स ! अगदी नुकत्याच बघितलेल्या पिक्चरची स्टोरी पण पब्लिक टेलिफोनवरून सांगून होते. " पैसे टाकलेत ! काय फुकट नाही करीत ! ...... " वगैरे वाक्ये सुद्धा काही वेळा मागील रांगेतील लोकांना ऐकविली जातात. हे चित्र जपानमध्ये गैरहजर आहे.

एकदा तर मी बाहेरून होस्टेलवर परतलो होतो व काउंटरवर रूमची किल्ली घेत होतो तेव्हा त्या होस्टेलचे मॅनेजर ऑफिसमधून उठले व होस्टेलच्या दारात असलेल्या फोनमध्ये येन टाकून बोलले व परत जाऊ लागले. उत्सुकतेपोटी मी त्यांना परत जाताना विचारले ' काय ! तुमच्या टेबलावरील टेलिफोन संपावर आहे का ? ' तेव्हा ते म्हणाले, ' नाही ! नाही ! ! मला पर्सनल टेलिफोन करावयाचा होता. ' अंगी बाणवून घेतलेल्या शिस्तीचेच ते प्रतीक नव्हे काय ?

ज्या वेळी तुम्हाला भाषेची अडचण भासते तेव्हा पिवळा किंवा निळ्या रंगातील टेलिफोन त्वरित तुमच्या मदतीला धावतो. यामध्ये १० येनचे नाणे टाका व १०६ नंबर फिरवा आणि ऑपरेटरला " Connect to T. I. C. " ( टूरिस्ट इन्फर्मेशन सेन्टर ) असे सांगताच तुमचा कॉल T. I. C. ला जोडला जातो.

तुम्ही मग आवश्यक ती माहिती इंग्रजी अगर फ्रेंच भाषेतून मिळवू शकता. टोकियो आणि क्योटो सोडून इतर ठिकाणी फोन ठेवल्यानंतर तुमचे १० येनचे नाणेसुद्धा परत येते. या दोन शहरांमध्ये कित्येक रस्त्यांवर टोपीवर उडत्या गरुडाचे चिन्ह असलेल्या निळ्या ड्रेसमधील व्यक्ती वावरत असतात. या व्यक्ती टूरिस्ट गाइड असून इंग्रजी अगर, फ्रेंच भाषेतील जाणकार असतात. त्यांची नेमणूक ही मुद्दाम परदेशी लोकांच्या मदतीसाठीच केलेली असते. तुम्हाला कुठल्याही प्रकारची माहिती ते आनंदाने व जिव्हाळ्याने पुरवितात.

पोलीस इमर्जन्सीसाठी ११० नंबर, तर ॲम्ब्युलन्ससाठी ११९ नंबर फिरवून तुम्ही थेट इंग्लिशमधून बोलून योग्य ती मदत मागवू शकता. अशा प्रकारे T. I. C. चा एक ठराविक फोन नंबर फिरविताच तुम्हाला त्या दिवसाच्या विशेष घडामोडींसंबंधीच्या माहितीची टेपसुद्धा थेट इंग्लिश अगर फ्रेंचमधून ऐकविली जाते. अशा प्रकारे विशेषत: टुरिस्टना सर्व प्रकारच्या टेलिफोनच्या सुविधा येथे उपलब्ध आहेत.

एकदा मी टोकियोजवळील मिताकाशी या ठिकाणी गेलो होतो. तेव्हा दुपारी मला अर्धा – एक तास मोकळा होता. म्हणून मी सहज बाहेर पडलो व पब्लिक टेलिफोनवरून १०६ नंबर फिरविला. " Connect to T. I. C. " म्हणताच काही क्षणातच तिकडून आवाज आला. " This is T. I. C., how best can I help you ?" तेव्हा मी फोनवर सावकाश इंग्रजीतून सांगितले, मी अमुक एका ठिकाणाहून बोलतोय व या ठिकाणाच्या जवळच्या अंतरावर एखादी बाग किंवा देऊळ आहे का ? मला त्या ठिकाणी कसे जावयाचे याबाबत माहिती समजू शकेल का ? तेव्हा तिकडून मंजुळ आवाज आला की आपण कुठून बोलत आहात ते समजले. कृपया थोडे थांबा. मी बघून लगेच सांगते, पण तत्पूर्वी तिने माझे नाव व नागरिकत्व विचारले. मी टेलिफोन धरून ठेवला होता परंतु तो पर्यंत मला दुसऱ्या बाजूकडून मंद आवाजात संगीताचे सूर ऐकू येऊ लागले. म्हणजे फोन होल्डऑन केलेल्या वेळात संगीतही ऐकविले जात होते. यामुळे दुसऱ्या बाजूकडून फोन चालू आहे, या बाबतची खातरजमा पण होते. दीड मिनिटाने संगीत बंद झाले व ऑपरेटरने तुम्हाला फोन धरून ठेवावा लागला या तसदीबद्दल क्षमस्व म्हणून मला पुढे सांगितले की, तुम्ही जिथे उभे आहात त्याच उजव्या बाजूने रस्त्याने सरळ जा. दोन चौक लागतील. वाटेत लागणाऱ्या एक दोन मोठ्या खुणापण तिने मला सांगितल्या. पुढे चौकात उजवीकडे वळा व सरळ तिसऱ्या चौकातच डाव्या हाताला ' गिनरेंज ' नावाचे देऊळ आहे. याचप्रमाणे तिने त्या देवळाच्या जवळच्या बागेत कसे जायचे ते पण सांगितले व शेवटी आमची T. I. C. ची सेवा वापरल्याबद्दल धन्यवाद दिले. मी फोनचा रिसीव्हर ठेवताच फोनमध्ये टाकलेले १० येनचे नाणे

परत आले. परदेशी लोकांना या तत्पर व कार्यान्वियित असलेल्या सेवेमुळे बराच आधार वाटतो. जर एखाद्या ठिकाणी तुम्ही अडकून पडलात व जवळपास कोणालाच इंग्रजी समजत नसेल तर अशा वेळी T. I. C. ची ही सेवा म्हणजे खात्रीचा मदतीचा हात होय.

असाच एक दिवस मी माझ्या होस्टेलमधील रूममधून फोनची डायल फिरवून थेट माझ्या क्योटोमधील श्री. हरी दामले या मित्राशी बोललो होतो. अंतर तसे खूप होते तरी फोन अगदी शेजारच्या रूममधून बोलावे इतका स्पष्ट आवाज येत होता.

००५१ हा नंबर फिरविताच आंतरराष्ट्रीय टेलिफोन ऑपरेटरला फोन जोडला जातो.

पत्नीने एकदा अचानक मला फोन केला होता. तीन मिनिटांचे फोनकरिता तिला ८४ रुपये मोजावे लागले. मला आनंद झाला परंतु ऐनवेळी अगदी तीन मिनिटांत काय बोलावे हा प्रश्न पडला. थोडक्यात काय तर फोनमध्ये पैसे वाया घालवण्यापेक्षा मी तुला एक नव्हे दोन साड्या श्रेणे पसंत करीन असे मी पत्नीस लिहिले होते.

पत्र कसे पुन्हाः पुन्हा वाचून त्याचा आनंद लुटता येतो, परंतु फोनचे तसे नसते. फोनमुळे एकदम काही क्षण भारावलेली व नंतर मात्र काहीच नाही अशी स्थिती असते. हां ! अगदी तातडीच्या वेळी मात्र फोनसारख्या तत्पर सेवेसारखी सेवा नाही. जपान सोडण्यापूर्वी दोन दिवस मी पण आधी तारीख व वेळ ठरवून माझ्या होस्टेलच्या रूममधील फोनवरून पत्नीशी बोललो होतो. फोन लावल्यापासून दोन मिनिटांत फोन लागला व बोलणे अगदी स्पष्टपणे ऐकू येत होते. जपानमधून भारतात कॉल करावयाचा असेल तर दर तीन मिनिटांस ३ हजार येन पेक्षा थोडी जास्त रक्कम मोजावी लागते.

अमेरिका, कॅनडा, कोरिया, हाँगकाँग, तैवान, ऑस्ट्रेलिया व काही युरोपियन देशांशी जपानमधून ' कलेक्टर कॉल ' नावाचा अजून एक प्रकार उपलब्ध आहे. यामध्ये फोन घेणारी व्यक्ती जर या आंतरराष्ट्रीय फोनचे पैसे भरायला तयार असेल तर या प्रकारचा फोन जोडला जातो.

## योकोहामातून फेरफटका

जे. एन्. आर. ने असोगो रेल्वे स्टेशन व पुढील दोन दोन मिनिटांच्या फरकाची पाच स्टेशन्स सोडल्यावर काही मिनिटांतच योकोहामा स्टेशन लागते.

फॅक्टरीतील ट्रेनिंगच्या वेळी ट्रेनने जाता येता वाटेत दररोज हे स्टेशन लागत असे. त्यामुळे येताना अधून मधून या स्टेशनवर उतरून योकोहामातून भटकण्याचा मोह मला फार अनिवार होई.

जपानमध्ये टोकियोच्या दक्षिणेस २९ किलोमीटरवर असलेले हे एक सुंदर बंदर व देखणे शहर आहे. लोकवस्तीबाबत टोकियोच्या खालोखाल या शहराचा नंबर लागतो. जगातील काही प्रमुख बंदरांमध्ये ' योकोहामा ' हे नाव प्रामुख्याने चमकते. जगातील सर्व बंदरांतून पॅसेंजर बोटी, मालवाहू बोटी वगैरे योकोहामा बंदराला भेटी देतात आणि त्या विशेषत: साउथ पिअरमध्ये नांगरलेल्या दृष्टीस पडतात. होनमोकु पिअर, साऊथ पिअर, दाईकोकु पिअर वगैरे बंदरातील मोठे भाग असून विस्तीर्ण डॉर्कयार्ड मधून चक्कर मारताना मोठमोठ्या क्रेन्स, स्टील स्ट्रक्चर्स व प्रचंड आवारात व्यवस्थित रचलेल्या पेट्या नजरेत भरतात. योकोहामा-मध्ये मोठ्या बोटी बांधण्याचा कारखाना आहे.

१९२३ साली झालेल्या मोठ्या भूकंपामुळे जवळजवळ सर्व योकोहामा शहर भुईसपाट झाले होते व अंदाजे २० हजार माणसे मृत्युमुखी पडली होती. त्यातून डोके वर काढून उभे राहिल्यानंतर १९४५ साली दुसऱ्या महायुद्धात या शहरावर बाँबचा पाऊस पाडला गेला होता. या शहराचा बराचसा भाग त्या वेळी उद्‌ध्वस्त झाला होता. परंतु एवढे झाले तरी येथील जनता खचली नाही व उलट दुप्पट उभारीने न डगमगता पूर्ण चिकाटीने व एक दिलाने केलेल्या अविरत कष्टांनी योकोहामा पुन्हा उभे केले. एवढेच नव्हे तर, त्यास ऐश्वर्यसंपन्नेत न्हाऊन काढले आहे. जपानमधील मोठ्या औद्योगिक व व्यापारी शहरात या शहराची गणना होते. अतिशय योग्य रीतीने विस्तारलेले व विकसित पावत असलेले हे शहर २१ व्या शतकाच्या सुरुवातीला कसे असेल व कसे दिसेल या बाबतची संपूर्ण माहिती २० वर्षे आधीच तयार आहे. तेजस्वी, श्रेष्ठ इतिहास असलेल्या व उच्च सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या सुस्थितीतील या शहराला अतिशय गतिमान, वैभव-संपन्नतेच्या शिखरावर तसेच राहता याव यासाठी, संपूर्णत: योग्य व आदर्श स्थितीत नेऊन ठेवण्यासाठी, योकोहामाच्या नागरिकाच्या सहकार्याने एक आराखडा बनविला गेला आहे. या आराखड्यात आर्ट म्युझियम, लायब्ररी, सायन्स म्युझियम, वेल-फेअर सेंटर्स, हेल्थ अँड मेडिकल केअर सेंटर्स, हॉस्पिटल्स, पार्क, रिफ्यूज डिस्पोजल फॅसिलिटीज, कल्चरल सेंटर्स, वृद्धांकरिता वेलफेअर सेंटर्स, नर्सरी, सिटिझन व्होकेशन व्हिलेज, एक्सप्रेस वेज, रॅपिड ट्रँझिट सिस्टिम्स (सब-वेज), पार्क ग्रीन लँड एरिया पर सिटिझन वगैरे वगैरे सारखे मुद्दे सविस्तर नमूद केले असून यांतील दीर्घ-काळच्या प्रोजेक्टच्या कामाला सुरुवात सुद्धा झाली आहे. एकविसाव्या शतकाच्या सुरवातीलाच योकोहामा हे जगातील एक आदर्श शहर म्हणून मान्यता पावेल.

योकोहामा स्टेशनवर उतरताच त्याचा भव्यपणा नजरेत भरतो. स्टेशनची इमारत उंच असून त्यात निरनिराळ्या मजल्यांवर विविध वस्तूंनी सजविलेली अनेक सुंदर दुकाने व रेस्टॉरंट्स् आहेत. रेस्टॉरंट्स्च्या बाहेरील शोकेसमध्ये त्या रेस्टॉरंटमध्ये मिळणारे खाद्य पदार्थ बशीमध्ये ठेवलेले असतात. परंतु हे शोकेस-मधील खाद्य पदार्थ अगदी मूळ पदार्थांसारखे हुबेहुब दिसत असले तरी ते प्लॅस्टिकचे बनविलेले असतात. स्टेशनच्या पूर्व बाजूने स्वयंचलित जिन्याच्या सहाय्याने बाहेर पडताच आपण स्टेशनच्या प्रवेशद्वारात येतो व समोर दिसते ती म्हणजे या शहराची शान. या प्रवेशद्वाराच्या वरच Poem of Yokohama चे टाइल्समध्ये चितारलेले लांबलचक भितीचित्र नजरेत भरते. समोरच जमिनीवर अनेक उंच उंच इमारती असून समोरचाच जिना उतरून जमिनीच्या पोटात शिरताच तेथील मायाबाजार दृग्गोचर होतो. वैभवसंपन्नता, उंची उंची श्रीमंती वगैरे शब्द-प्रयोगाचे वस्तुनिष्ठ अस्तित्व येथे नजरेत भरते. या ठिकाणी सुद्धा निरनिराळी दुकाने व देशोदेशींचे रेस्टॉरंट्स् असून भारतीयांचे 'हॉटेल महाराजा' याच भुयारातील स्वप्ननगरीत एका टिकाणी आहे. मी अनेक वेळा या महाराजा हॉटेल-मध्ये जाऊन माझे पोट तृप्त केले आहे. एव्हढेच नव्हे तर, हिंदी संगीताने कानाची भूकसुद्धा भागविली आहे. एकदा तर मी दुसऱ्या मार्गाने विंडो शॉपिंग करीत महाराजा हॉटेलमध्ये जाण्याचे ठरविले होते. परंतु त्या भुलभुलैय्यात पार हरवून गेलो. शेवटी पुन्हा जवळच्या जिन्याने जमिनीवर आलो व नेहमीच्या मार्गाने आत शिरून हॉटेल महाराजात आलो.

स्टेशनच्या पूर्व प्रवेशद्वाराजवळच डाव्या हाताला 'ताकाशीमाया' नावाचे एक दिव्य भव्य असे सात मजली डिपार्टमेंटल स्टोअर्स असून त्या बाहेरील कॉरीडॉर हे अनेक जणांचे संकेत स्थान असावे. संध्याकाळी या ठिकाणी अनेक मंडळी भिरभिरत्या नजरेने आपलं माणूस हुडकत तिथे काही काळ स्तब्ध उभी असतात व एकदा का आपली व्यक्ती दिसली की धावत जाऊन हातात हात घालून स्वतःच्याच विश्वात नाहीशी होतात. या 'पब्लीक'ची गरज लक्षात घेऊनच की काय योकोहामा म्युनिसिपालटीने तेथे बसण्यासाठी उत्तमोत्तम बाकांची व्यवस्था पण केली आहे. श्रीमंत मंडळींसाठी असलेल्या या ताकाहाशीमाया डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये सर्व वस्तू अशा उघड करून ठेवलेल्या असल्याने 'दाखविणे' हा प्रकारच तेथे नाही. त्यामुळे खूप उंची वस्तू येथे सहज नजरेखालून जातात.

आमच्याच होस्टेलमधील दुसऱ्या एका ग्रुपला जपानी भाषा शिकविणारा, थंड व शांतपणे बोलणारा २८ वर्षांचा त्सुचीभोची हा योकोहामाच्या जवळपास रहाणारा जपानी ब्रह्मचारी. इंग्रजी व चिनी भाषेवर याचे प्रभुत्व असून हिंदीसुद्धा बऱ्यापैकी बोलतो. त्याला त्सुची म्हटलेले आवडे माझी विमनस्क भटकंती एकदा

त्सुचीच्या लक्षात आली. एक दिवस सुट्टीच्या दिवशी संपूर्ण योकोहामात भटकण्याचा माझा मनोदय त्याने ऐकताच तो म्हणाला ‘ मी पण तुझ्या बरोबर येतो.’ सुरुवातीला मला वाटले तो माझी फिरकी घेतोय. पण शेवटी तो म्हणाला ‘मी जरी या शहरावरून रोज ये–जा करीत असलो तरी मला योकोहामा तुझ्या नजरेने बघायचे आहे. तू म्हणशील तेथे अगदी तुझ्या बरोबर मी येईन, माझ्या अस्तित्वाचा तुला अडसर बनू न देता उलट तू जसे हे शहर बघणार आहेस तद्वतच मी पण ते माहिती करून घेणार आहे ?’ मग काय ! आम्ही दोघे निघालो. खांद्याला नेहेमी-प्रमाणे कॅमेरा लटकवलेला होता.

योकोहामा स्टेशनवर पोहोचलो. स्टेशनच्या पूर्वेस असलेल्या प्रवेशद्वारातून बाहेर पडलो. समोरील चौकाच्या पलीकडील एका काचेच्या भिंती असलेल्या उंच इमारतीतील लिफ्ट काचेच्याच टॉवरमधून वरती जाताना फार सुंदर दिसत होती. आम्ही आमचा मोर्चा तिकडे वळविला. त्या लिफ्टने वरती गच्चीवर गेलो. लिफ्टने वरती जात असताना बाहेरील रस्त्यावरील लहान लहान व खोल खोल होत जाणारे दृश्य मस्त दिसत होते. समोरील स्टेशन व त्याच्या आसपासचा परिसर सुंदर दिसत होता. गच्चीवर असलेल्या जाळीमुळे आम्हाला खालच्या परिसराचा फोटो घेता येत नव्हता, तेव्हा पलीकडील उंच व अनेक खांबांच्या २६ मजली इमारतींच्या वरच्या मजल्यावर गेलो. तेथील गच्चीवरून मला स्टेशनच्या परिसराचा फोटो घ्यावयाचा होता. परंतु त्सुची मात्र सर्वांत वरच्या मजल्यावरील रेस्टॉरंटमध्ये फोटोसाठी मला परवानगी विचारू द्यायला तयार होईना. “ मी असताना ते वाईट दिसेल रे ! ” मग काय आम्ही लिफ्टने वापस खाली. त्या दिवशी आम्ही योकोहामा स्टेशनची इमारत व त्याच्या दोन्ही बाजुचा परिसर डोळ्याखालून घातला. अगदी स्वप्ननगरीतून हिंडत आहोत असाच भास होत होता. शेवटी मी त्सुचीला हॉटेल महाराजामध्ये भारतीय पद्धतीचे जेवण दिले. बिर्याणी खाताना तो खूपच घामाघूम झाला होता.

योकोहामा रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेच्या बाजूने बाहेर पडत असताना कळत नकळत कारंज्यांचा गार शिडकावा अंगावर येत होता. स्टेशनच्या बाहेरचा सर्व परिसर फारच भव्य व सुंदर दिसत होता. एका पेक्षा दुसरा सरस. कशा कशाचा म्हणून फोटो घ्यायचा हा प्रश्नच पडला. शेवटी काही फोटो काढले. थंडीपासून बचाव करण्यासाठी येथील झाडांना गुंडाळलेले गवताचे भारे बघून आश्चर्य वाटले. येथेच समोर एकमेकावरून इकडे तिकडे गेलेल्या तीन स्तरीय पुलावरील रस्त्या-वरून जलद व सहजपणे होणारी वहातुक बघितली. तो देखावासुद्धा बघणीय होता. येथेच पुढे एक स्वीमिंग सेन्टर आहे. त्या दिवशी योकोहामाचा बराच भाग आम्ही पायी तुडविला. त्सुचीमोची बिनबोभाट माझ्या बरोबर चालत होता व अगदी

माझ्यासारख्या बघ्याच्या दृष्टिकोनातून योकोहामा शहर न्याहाळत होता.



नंतर आम्ही ट्रेनने जवळच असलेल्या कन्नाओी स्टेशनवर उतरलो व तेथील प्रसिद्ध व विस्तीर्ण योकोहामा स्टेडियमचे बाजूने सिल्क सेंटरला आलो. नऊ मजली फेरो-कॉंक्रीटच्या या प्रशस्त इमारतीमध्ये १९५९ साली योकोहामा बंदराच्या शताब्दी महोत्सवानिमित्ताने सिल्क सेंटर उघडण्यात आले आहे. या इमारतीतील सिल्क म्युझियम बघितले. जपानमधील सिल्कचा उदय व त्याचा इतिहास सुंदर प्रकारे येथे मांडला होता. सिल्क कसे बनते ? याची माहिती, त्याचे प्रकार व सिल्कची उत्पादने येथे मांडली होती. कित्येक ठिकाणची जिवंत मॉडेल्स आकर्षक वाटली.

सिल्क सेंटरच्यापासून जवळ असलेल्या एका भव्य हॉलमध्ये चित्रांचे प्रदर्शन बघितले. या प्रदर्शनात अनेक देशांतील लहान मुलांनी काढलेली चित्रे व्यवस्थित मांडून ठेवली होती. माझी नजर भारतातील मुलांनी पाठविलेली चित्रे हुडकण्यात भिरभिरत होती. भारतातून आलेली ५-७ चित्रे तिथे मला आढळली. तेथूनच समुद्रकाठी असलेल्या यामाशिता पार्क मध्ये आलो.

साउथ पिअरच्या जवळून पूर्वेस समुद्राच्या काठी १७ एकर जमिनीवर पसरलेली ही बाग जपानमधील जलाशयासमोरील सर्वांत मोठी व सुंदर बाग आहे. समुद्रकाठाने जाताना डाव्या बाजूस योकोहामा पोर्टचे विहंगम दृश्य नजरेत भरते. कित्येक वेळा या बंदरात देशोदेशींच्या प्रचंड बोटी नांगरलेल्या असतात. बोटीच्या आतील भाग कसा असतो हे माहीत करून घेण्यासाठी 'हिकावामारू योकोहामा' नावाची बोट एका ठिकाणी काठावर कायमची नांगरून ठेवलेली आहे. याच ठिकाणी सुंदर बगीचा असून सर्व ऋतूंत येणारी फुलझाडे येथे लावलेली आहेत. बागेत एक तळे असून तळ्यात अनेक कारंजी उडत असून या कारंज्यांच्या मध्यभागी हातात जलकुंभ घेऊन उभ्या असलेल्या 'गार्डियन गॉड ऑफ वॉटर' या जलदेवतेचा पुतळा आहे. कायमच्या नांगरून ठेवलेल्या हिकावामारू योकोहामा बोटीवरील लाल निळ्या लाइटच्या पार्श्वभूमीवर हा शांत मुद्रेच्या जलदेवतेचा पुतळा आपणास एका सुंदरशा वातावरणात घेऊन जातो. सॅन डिओगो, कॅलिफोर्निया अमेरिका या पहिल्या मित्र शहरवासीयांकडून योकोहामाला भेट

मिळालेला हा पुतळा आहे. आजतागायत योकोहामाचे एकूण आठ शहरांशी मित्र शहर व दोन बंदरांशी मित्र-बंदर म्हणून नाते जोडले गेले आहे. २६ जून १९६५ मध्ये मुंबई शहराची योकोहामाशी मैत्री जोडली गेली आहे. याच पार्कमधून हिंडत असताना एका बाजूस निरव शांतता होती. त्याच ठिकाणी अनेक बाकांवर प्रियकर-प्रेयसी अगदी 'तुझ्या गळा माझ्या गळा' च्या स्टाइलमध्ये स्वतःला हरवून बसलेली आढळली. तेथून काढता पाय घेतला.

पार्कमधे हिंडत असताना नजतेत भरतो तो म्हणजे पार्कच्या समोरील ३५० फुटी उंचीचा भगवा पांढऱ्या रंगातील व आपल्याच दिमाखात उभा असलेला 'मरिन टॉवर'. या स्टील टॉवरच्या ३३० फूट उंचीवरील प्रेक्षकांच्या गॅलरीपर्यंत जाण्यासाठी दोन लिफ्ट्स आहेत. येथून बंदरांच्या भोवतालचे दृश्य सुंदर दिसते. या टॉवरचा लाइट-हाऊस म्हणून वापर केला असून टॉवरच्या माथ्यावरील लाइट ४० किलोमीटर अंतरावरून स्पष्ट दिसतो. याच टॉवरमध्ये दुकाने, रेस्टॉरंट्स्, या बरोबर मरीन सायन्स म्युझियम पण आहे.

मरीन-टॉवरसमोरून हाय-वेच्या खालून आम्ही 'हार्बर व्ह्यू पार्क'मध्ये आलो. समुद्रापासून ४० फूट उंच असलेल्या या पार्कमधून समोरील समुद्रातील विस्तीर्ण बंदराचे व हायवे वरील वहातुकीचे दृश्य उंचावरून फारच चांगले दिसत होते.

हार्बर व्ह्यू पार्कमध्ये जाताना वाटेत एका ठिकाणी एका खेळाचा एकट्याने करावयाचा सराव बघायला मिळाला. यामध्ये बऱ्यापैकी उतार असलेले मैदान असून त्याचे काही भाग पाडलेले होते. प्रत्येक भागामध्ये एका टोकाला एक यंत्र होते. ते जोराने चेंडू दुसऱ्या बाजूला फेकीत असे. दुसऱ्या बाजूला असलेल्या खेळाडूने बॅटने तो चेंडू मारावयाचा. मारलेला चेंडू उतारावरून घरंगळत परत त्या यंत्रापाशी येई व यंत्रामार्फत वरती चढविला जाऊन परत तो फेकला जाई. जपानी लोकांच्या आवडत्या सॉफ्ट बॉल खेळाच्या सरावासाठी ही खास सोय होती. या ग्राउंडच्या चहूबाजूने एक जाळी होती. शंभर येनमध्ये असे काही चेंडू मारायला मिळतात. अशी माहिती मला त्सुचीने दिली. येथूनच पुढे चालतच आम्ही 'मोतीमाची शॉपिंग सेंटर' व 'चायना टाऊन' मध्ये आलो.

चायना टाऊन हे चारी दिशेस पसरलेले असून प्रत्येक दिशेचे प्रवेशद्वार हे ठराविक चायनीज पद्धतीने सजविलेले होते. रंगीबेरंगी दिवे व निऑनसाइन्सच्या झगमगाटात चायना टाऊन न्हाहून निघालेले होते. अंदाजे अडीच हजार चिनी लोकांची वस्ती असलेली ही वसाहत जपानमधील एकुलती एक चिनी लोकांची मोठी वसाहत असून या ठिकाणी अनेक दुकाने, बार्स, चहापानाची दुकाने, कॅबॅरेट्स, सॉव्हिनॉर स्टोअर्स व कित्येक चिनी खाद्य पदार्थांची रेस्टारंट्स आहेत. रेस्टॉरंट्स्चे

उंची दरवाजे व रेस्टॉरंट्सच्या बाहेरील भिंतीवरील विविध आकारांतील चकाकणाऱ्या पितळी ड्रॅगनची भरीव चित्रे विशेष नजरेत भरत होती. चायनीज खाद्यपदार्थ चाखणाऱ्या परदेशी व जपानी नागरिकांची ये-जा चालू होती.

त्या दिवशी आम्ही मनमुराद भटकलो. इतक्या दिवस जोपासलेला माझा गिर्यारोहणाचा छंद मला त्या दिवशी फारच उपयुक्त ठरला. तसुचीमुची मात्र बऱ्यापैकी दमला होता. परंतु त्याचे पाय मात्र तक्रार करीत नव्हते. तो म्हणाला ' खरे सांगू का ! आजपर्यंत अनेक वेळा मी आपली मान खाली घालून, स्वतःच्याच मनातील विचारांशी खेळत योकोहामातून गेलो, परंतु आज मला आमचे योकोहामा कळले ! किती भव्य व दिव्य शहर आहे ते ! सुंदरता जोपासलेले व ठायीठायी सरसता आणून ठेवलेले आहे हे शहर ! ''

गाडीतून परत येत असताना आम्ही सहज ' योकोहामा गाइड ' वरून नजर फिरवली तेव्हा लक्षात आले की, या शहरातील अनेक चांगल्या गोष्टी अजून बघायच्या राहिल्या आहेत.

## राजधानी टोकियो

टोकियो हे जगातील सर्वांत मोठे शहर आहे. टोकियोचा उच्चार जपानी लोक ' तोक्यो ' असा करतात, परंतु जपानेतर मंडळी त्याचा टोकियो असा सुटसुटीत उल्लेख करतात. वरवर पाहू जाता टोकियोत गेल्यावर भांबावून जायला होते. पुराप्रमाणे रस्त्यावरून वहाणारा ट्रॅफिकचा लोंढा, उंच उंच इमारती, त्यातच जपानी भाषेमुळे होणारी पंचाईत. परंतु एवढे असले तरी जपानमधीलच नव्हे, तर जगातील इतर शहरांच्या मानाने टोकियो शहर हे त्यास भेट देणाऱ्या पाहुण्यांना जास्त काही तरी देते. व येथील रस्त्यावरून आनंदाने मुक्तपणे संचार करण्यास मदत करते. सध्या जगातील सर्वांत सुरक्षित शहर म्हणून टोकियोचा नावलौकिक आहे. अगदी रात्रीच्या गडद अंधारात रस्त्यावरून जात असताना कुठल्याच सावल्या तुम्हाला भिववू शकत नाही. रस्त्यावरून जाणाऱ्या स्त्री अगर मुलीवर कोणीही जबरदस्ती केलेली नाही, तर लुटालूटीचा येथे मागमूसही नाही. दुकानदारांबद्दल बोलाल तर नवख्या माणसाला येथे भरपूर लुबाडले आहे असे कधीही होत नाही. हां, काही ठिकाणी किमतीमध्ये थोडी घासाघीस मात्र जरूर होते. परंतु किमतीमध्ये अवास्तव तफावत मात्र नसते. टॅक्सी ड्रायव्हर, तुम्हाला या रस्त्यावरून त्या रस्त्यावर असे उगीचच फिरवले आहे हा प्रकार येथे केवळ अशक्य, तो तुम्ही दिलेल्या

ठिकाणी अगदी कमीतकमी अंतराने नेईल. तुम्हाला रस्त्यावर कुठेही मदत लागली तर कुणाही जपान्याला हटका, तो तुम्हाला योग्य मार्गदर्शन केल्याशिवाय पुढे जाणार नाही. माहीत नाही म्हणून सांगेल. परंतु चुकीची माहिती देऊन तो तुमचा 'मामा' कधीही करणार नाही. शिवाय टेलिफोनची बूथ्स् ठिकठिकाणी असतात तर अधूनमधून रस्त्यांवर उडत्या गरुडाचे चिन्ह असलेली टोपी घातलेली, निळे डगलेवाली गोरी जपानी मंडळी आपणास हसतमुखाने मदत करण्यास सदैव तत्पर असतात.

मार्गदर्शनासाठी 'टूर कॅम्पॅनिअन' सारखी इंग्रजी-फ्रेंच वगैरे भाषांतील साप्ताहिके आहेत. कित्येक टूरिस्ट कंपन्या आहेत. टेलिफोनवरून तोंडी अगर टेप केलेली माहिती मिळते आहे. रस्तोरस्ती विखुरलेले मार्गदर्शक आहेत, एवढेच नव्हे तर, तेथील प्रत्येक नागरिक हा सुद्धा एक मार्गदर्शकच आहे. जमीनीवरून व त्याच्या पोटातूनही धावणाऱ्या मोटारी, रेल्वे, बसेस इत्यादीमुळे एखाद्या इप्सित ठिकाणी जलद पोहोचणे शक्य होते. फसवणूक, भिती, लबाडी, लुटालूट वगैरेचा लवलेशही नसलेल्या या विराट शहरात जिथे टूरिस्ट मंडळीसुद्धा तुम्हाला नेऊ शकणार नाहीत अशा ठिकाणी किंवा इतर कित्येक अद्भुतरम्य ठिकाणी अगर कुठेही विमनस्क भटकंती करायला तुम्ही कधीही मुक्त असता. मनावर कुठलेच दडपण नसल्याने भ्रमंतीतील लज्जत खरंच वर्धिष्णु होऊन त्यातील आनंद सुद्धा सुखद होतो.

मी टोकियोला सात-आठ वेळा भेट दिली व बऱ्याचदा अकेलाच अगदी मनमुराद भटकलो. अगदी जेवढे म्हणून बघता येईल तेवढे बघितले. काही वेळा सकाळी सहाला होस्टेल सोडले व रात्री १२ / १ ला होस्टेलवर परतलो. डोळ्यात साठविता येईल तेवढे साठविले. मित्र तसेच आप्तेष्टांना पत्राने लिहिले. फोटो पाठविले व त्यांना पण माझ्या आनंद यात्रेत सहभागी करून घेतले. थकवा आलाच तर जवळील पार्क किंवा कारंजाच्या आडोशाला बसावे. भूक लागताच मॅकडोनाल्ड, केन्चुकी फ्राईड चिकन किंवा कुठल्याही रेस्टॉरंटमध्ये चरावे. तहान भूक भागवून ताजेतवाने होऊन पुढील पदयात्रेत नयनसुख घेत मार्गक्रमण करावे हा मुळी छंदच जडला होता. खांद्याला कॅमेरा, खिशात येन्स आणि माहितीपत्रके व मनात उत्साह त्यामुळे पाय आपोआप पुढे जायचे.

टोकियो, योकोहामा वगैरे शहरांतून हिंडताना वास्तुशिल्प शास्त्राचे-अत्याधुनिकच नव्हे, तर श्रीमंती दिमाख असलेले भरपूर नमुने पहावयास मिळतात. टोकियोचा अमुक एक भाग फार सुंदर आहे असे सांगणे केवळ अशक्य. कारण कुठेही तुम्ही भटका तुम्हाला सुंदर सुंदर उंच इमारती, कारंजी व बागा आढळतील. पुतळे व देवळे भेटतील. खुद्द टोकियो स्टेशनचा परिसर, इंम्पिरिअल पॅलेस, टोकियो टॉवर विभागात मी तीन वेळा हिंडलो असेन तर गिझामध्ये तीन चार वेळा तरी

भटकलो असेन. शिबुया, शिंजुकू, युएनो, मध्य टोकियो, आखिआबारा, वगैरे विभागातून दुतर्फा दिसणाऱ्या गोष्टी मनसोक्त न्याहाळल्या आहेत.

टोकियो स्टेशनवर उतरून पश्चिमेच्या बाजूने बाहेर पडताच डावीकडे प्रसिद्ध ' हातो बस सर्व्हिस ' आहे. येथून टोकियो व आसपासचा परिसर बघण्यासाठी बसेस सुटतात. रात्रीच्या खास टोकियो जीवनाच्या अवलोकनासाठी सुद्धा अनेक बस सर्व्हिसवाले पर्यटकांच्या सेवेस तत्पर असतात.

टोकियोच्या अलीकडील युराक्युचो स्टेशनमधून पश्चिमेच्या बाजूने बाहेर पडून देखण्या इमारती व प्रशस्त गुळगुळीत रस्त्यावरून सरळ पुढे चालत गेल्यावर दहा मिनिटांतच इम्पिरिअल पॅलेस लागते. जपानच्या शाही सम्राट कुटुंबियांचे हे राहण्याचे ठिकाण. आम जनतेच्या भेटीसाठी वर्षातून काही दिवस ते खुले असते. जपानी लोक आपल्या सम्राटाला मनापासून फार मानतात. सम्राट हे त्यांचे आदराचे एक स्थान आहे. त्यामुळे ज्या दिवशी पॅलेस उघडतात, त्या दिवशी जपानी लोक मोठ्या संख्येने राजा व त्याचे कुटुंबियांना भेटायला पॅलेसमध्ये जातात. नववर्षानिमित्त जनतेला शुभेच्छा देण्यासाठी दोन जानेवारीला इम्पिरिअल पॅलेसचे दरवाजे उघडले जातात. मी सुद्धा त्या दिवशी मुद्दाम तेथे गेलो होतो. पॅलेसभोवती खूपच प्रशस्त वाळू पसरलेले पटांगण होते. लोकांच्या झुंडीच्या झुंडी पॅलेसमध्ये जात होत्या. पांढऱ्या पार्श्वभूमीवर मध्यभागी भरीव लाल गोल हा जपानचा राष्ट्रीय ध्वज. प्रत्येकाच्या हातात या राष्ट्रीय ध्वजाचे कागदी झेंडे होते. पॅलेसकडे जाणाऱ्या रस्त्यावरच असे झेंडे ठराविक पोषाखातील कित्येक स्वयंसेवक मुले, मुली, स्त्रिया वगैरे जाणाऱ्या लोकांना फुकट देत होते. आत जाताना वाटेत एका ठिकाणी परदेशी लोकांच्या राष्ट्रीयत्वाची नोंद केली जात होती. भव्य दरवाजातून वळून आतमध्ये जाणारा रस्ता एका मोठ्या प्रांगणापाशी आला होता. तेथे मोठ्या संख्येने लोक जमले होते. लोकांच्या मागे बरीच प्रेस फोटोग्राफर मंडळी त्यांच्या गाडीच्या टपावर त्यांच्या आयुधासह उभी होती. पुढील समोरील लांब रुंद इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरीत एका ठिकाणी काचेच्या भिंती होत्या. तेथेच सम्राट व त्याचे शाही कुटुंबीय आतून बाहेर आले. त्यांनी हात उंच हलवून लोकांचे स्वागत केले. लोकांना पण राजाचे दर्शन होताच हवेत झेंडे फडकविले व आनंदाने काही घोषणा दिल्या. सुटात असलेले राजेसाहेब काही मोजकेच शब्द बोलले व नंतर आत गेले.

पॅलेसमधील दुतर्फा सुशोभित झाडांच्या रस्त्यावरून दुसऱ्या दरवाजाने आम्ही बाहेर पडलो. पॅलेसच्या भोवती पाणी सोडलेले असून त्यात राजहंस मंडळी विहार करीत होती. पॅलेसमधून बाहेर पडून टोकियोची बहुस्तरीय वहातूक व वास्तुशास्त्राच्या अनेक नवनवीन नमुन्याच्या आकर्षक इमारती न्याहाळत पुढे जात

असताना घड्याळातील तासकाटा जणू मिनिट काट्याप्रमाणेच सरकत होता. समोरील भुयारी रस्त्याने जाताना जमिनीखालील टोकियो नजरेत भरते. चक्क डबलडेकर असलेल्या या शहरातील जमिनीखालील टोकियो थंडीमध्ये ऊबदार असते. या ठिकाणी सुद्धा दुकाने, रेस्टॉरंट्स्, सुपर मार्केट्स्, मोठमोठे रस्ते, रेल्वे वगैरे सर्व काही जमिनीवरील टोकियो प्रमाणेच, फक्त खाली या ठिकाणी उंच इमारतींऐवजी उंची इमारती व रेस्टॉरंट्स् पहावयास मिळतात.

इंम्पिरिअल पॅलेस बघून गिंझाकडे जाताना वाटेत एका ठिकाणी 'निशिगिची हॉल' लागतो. या ठिकाणी टॉपच काय पण बरेचसे लेस असलेल्या डान्सरच्या रंगीत जाहिराती फ्रेम करून लावलेल्या होत्या. या हॉलमध्ये उच्च श्रवणसुख आणि रंगीत मनोहरी व बदलत्या प्रकाशामध्ये अनेक टॉपलेस नृत्यांगनांची नृत्ये चालतात. प्रत्येक नृत्याला एका सुंदर कथानकात गुंफलेले असते. विशेष म्हणजे फोटो घ्यायला बंदी असलेल्या या शोच्या तिकिटामध्ये विद्यार्थ्यांना पाचशे येनची सवलत असते.

'गिंझा' हे असेच पर्यटकांचे एक खास आकर्षण. सूर्यास्तानंतर गिंझा रंगीत दिव्यांच्या झगमगाटात चमचमत असते. जपानमधील हा सर्वांत देदिप्यमान विभाग असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. टोकियो स्टेशनच्या पूर्वेच्या बाजूने बाहेर पडून दाईमारू बिल्डिंगवरून सरळ पुढे गेल्यावर गिंझा विभागाकडे जाताना दुतर्फा एका पाठोपाठ एक उभ्या असलेल्या बिल्डिंग्ज नजर खिळवून ठेवतात. मात्सुमा, मित्सु कोशी, मात्सुझाकामा, मिकी मोतो, वॅको, सॅम-ई, सॉनी या अशाच काही सुंदर इमारती. एका इमारतीचे समोरच्या इमारतीत पडलेले प्रतिबिंब अगदी शांत जलाशयात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे दिसते. या भागात मी बराच भटकलो. विशेषतः सूर्यास्तानंतरच्या वातावरणात गिंझाला एक प्रकारची झिंग असते. हिगाझी गिंझा स्टेशनच्या जवळून जात असताना भारतीय पद्धतीप्रमाणे १९३४ मध्ये बांधलेले होन गान्जी टेम्पल दिसले. तेथून पुढे हारुमीदोरी मार्गाने जात असता, काबुकीझा थिएटर दिसले. जपानी लोकांना प्रिय असलेल्या व दहा दहा - बारा बारा तास चालणाऱ्या जगप्रसिद्ध काबुकी नाटकाचे प्रयोग याच थिएटरमध्ये होतात.


शिबाशी स्टेशनच्या दिशेने डाव्या बाजूने चालत असताना चक्क गव्हर्मेंट ऑफ इंडियाचे टूरिझम डिपार्टमेंट दिसले. आत गेलो व तेथील टूरिस्ट डिपार्टमेंटचे असिस्टंट डायरेक्टर श्री. दत्ता यांचेशी गप्पागोष्टी केल्या. मित्रांना देण्यासाठी भारताची काही माहिती पत्रके घेतली.

गिंझा येथील क्युक्योडो सारख्या प्रसिद्ध जपानी बाहुल्या वाशी (बाहुल्या बनविण्या साठी वापरात असलेला पारंपरिक कागद ) अनेक छोट्या, सुंदर आणि

रेखीव वस्तू विकणाऱ्या काही दुकानांना तर ३०० वर्षांपेक्षाही जास्त काळाचा इतिहास आहे.

दिवसाच्या सूर्यप्रकाशात काय किंवा रात्रीच्या झगमगाटात काय, उंची उंची वस्त्रात लपेटलेल्या व्यक्ती खास विलासी चैनीसाठी यांच भागात वावरताना दिसतात. अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, नाईट क्लब्ज यामध्ये धुंद संगीत, नृत्य, प्रणय व बादशाही विलासात गुंग होणारी बडीबडी मंडळी गिंझा येथे नजरेस पडतात. परंतु अशाच विभागातील रस्त्यावरून भटकत असताना एखाद्या लहानशा बोळातील रस्त्यावरील छोट्याश्या उघड्या दुकानाभोवतीसुद्धा अनेकांची गर्दी दिसून येते. कारण या महागड्या परिसरात सामान्यांना परवडणाऱ्या भावात खाद्य-पेये विकणारे हे छोटे बूथवाले पण आपला धंदा तेजीत करतात.

टोकियोतील अजून एक आकर्षण प्रवाशांना खुणावत असते व ते म्हणजे टोकियो टॉवर. हामामात्सु स्टेशनवर उतरून पश्चिमेच्या बाजूने चालत जात असताना समोरच उंचच्या उंच टोकियो टॉवर नजरेत भरतो. वाटेत झोजोजी टेंपल नावाचे एक सुंदर बुद्धमंदिर लागते. आतमध्ये बुद्धाची शांत मूर्ती असून मूर्तीच्या समोर चारी बाजूला खूप खालपर्यंत असलेली मोठमोठी सोनेरी रंगात चकाकणारी झुंबरे फारच मनमोहक होती. मूर्तीसमोरील संपूर्ण भागात पेटीऐवजी बांबू व



पांढरे कापड यांच्या सहाय्याने केलेल्या अंदाजे तीन मीटर रुंद व दीड मीटर उंचीच्या भागामध्ये लोक पैसे टाकीत होते. याच मंदिरा शेजारी योसुकुनी श्राईन होते. व त्याच्या मागील बाजूस गगनचुंबी भव्य पोलादाचा सांगाडा उर्फ टोकियो टॉवर उभा होता.

आशिया खंडातील सर्वांत उंच असलेल्या या टॉवरची उंची ३३३ मीटर आहे. या टॉवरच्या पायथ्याशी एक पाच मजली बिल्डिंग आहे. १५० मीटर उंचीवर मुख्य वेधशाळा असून, २५० मीटर उंचीवर विशेष प्रेक्षणीय अशी दुसरी वेधशाळा आहे. दोन्ही वेधशाळा जाड काचांनी बंदिस्त आहेत. दुसऱ्या वेधशाळेच्या वरती निरनिराळ्या उंचीवर सात टिव्ही केंद्रांच्या ट्रॅन्समिटिंग अँटेना आहेत व त्या सर्वांचे नियंत्रण-केंद्र खालील इमारतीच्या पाचव्या मजल्यावर आहे. रेडिओ प्रक्षेपणासाठी दोन एफ्. एम्. ट्रॅन्समिटिंग अँटेना आणि सरकारी ऑफिसेस, तसेच जॅपनीज नॅशनल रेल्वेच्या दळणवळणासाठी मायक्रो रिले केंद्र याच मनोऱ्यावर बसविलेले आहे.

२४ तास दळणवळणासाठी व प्रक्षेपणासाठी वापर होत असलेला हा टॉवर म्हणजे पर्यटकांचे मुख्य प्रेक्षणीय स्थान आहे. दोन वेगवेगळ्या उंचीवरील वेध-शाळांतून जगातील सर्वांत मोठ्या शहराचे विहंगम दृश्य फारच मस्त दिसते. स्वच्छ हवामानात फुजीसानचे दर्शनसुद्धा होते. दररोज कित्येक हजारो लोक या मनोऱ्याला भेट देऊन जातात.

खराब हवामानात सुद्धा जास्तीत जास्त स्पष्टपणे दृग्गोच्चर होणाऱ्या भगव्या व पांढऱ्या रंगांने रंगविलेला हा पोलादी मनोरा जून १९५७ ते डिसेंबर १९५८ या अवघ्या दीड वर्षांत बांधून पूर्ण केला आहे. इशेवान वादळाच्या वेळी दर सेकंदास ५२ मीटर वेगाच्या वाऱ्यामुळे हा टॉवर अगदी वरच्या टोकाला अंदाजे ८२ सें. मी. झुकला होता. परंतु सेकंदास ९० मीटर वेगाच्या वाऱ्याने तो ३·५ मीटर झुकला तरी पूर्णपणे सुरक्षित राहील याची खबरदारी त्यांच्या डिझाईनमध्ये घेतली गेली आहे. या टॉवरसाठी फक्त चार हजार टन पोलादाचा वापर करण्यात आला आहे. हा टॉवर जवळजवळ समुद्रसपाटीपर्यंत खोलवर जमिनीत गाढून गाडलेला भाग ५ सें. मी. व्यासाच्या २० पोलादी सळयांनी एकमेकास जोडले आहेत. त्यामुळे १९२३ साली झालेला सर्वांत मोठा म्हणजे ७·९ रिस्टर स्केलचा भूकंप देखील या टॉवरला धक्का पोहोचवू शकणार नाही. अशा प्रकारे खुद्द टोकियो शहरातील हा उंच टॉवर हे एक सर्वांत सुरक्षित स्थान आहे.

या टॉवरच्या तळातील इमारतीत पहिल्या मजल्यावर जपानमधील सर्वांत मोठे मत्स्यालय आहे. ७०० प्रकारात मोडणारे ८००० विविध आकाराचे व नानाविध रंगांचे मासे या मत्स्यालयात बघावयास मिळतात. शेपटी हलवत इकडून

तिकडे विहार करणारे मोहक रंगातील हे जलचर मन प्रसन्न करतात. दुसऱ्या मजल्यावर रेस्टॉरंट्स् बरोबर जपानमधील सर्व प्रकारची सॉव्हीनॉर कार्ड विकणारी दुकाने आहेत. तिसऱ्या मजल्यावरील वॅक्स म्युझियममध्ये जगातील प्रमुख व्यक्तीचे निरनिराळ्या प्रसंगांत हुबेहुब उंचीमध्ये उभे केलेले मेणाचे पुतळे प्रकाश व ध्वनी या योजनेमुळे जिवंतपणा आणतात. चौथ्या मजल्यावर अनेक शोरूम्स आहेत. आजचा जपान, अणुवीज उत्पादनाच्या सुविधा, खेळातील कॉम्प्युटर, अंतराळ-प्रयोगशाळा वगैरे शोरूम्स येथे आहेत. पांचव्या मजल्यावर खाजगी ऑफीसेस असून त्यावरती गच्चीवर चक्क प्ले-ग्राउंड आहे, या ठिकाणी लहान मुलांसाठी स्टेशन्स, सिग्नल वगैरेसहित झुक् झुक गाड्या आहेत. गच्चीवर असलेल्या रेस्टॉरंट-मध्ये अनेक प्रकारची खाद्यपेये होती. साध्या भाजलेल्या कणसाला तीनशे येन मोजावे लागले म्हणून माझ्याबरोबर असलेला बंगलोरचा नागेश ते कणीस कुरकुरत खात होता. पहिल्या वेधशाळेपर्यंत जिन्याने पायी वरती जाणाऱ्यांना आकर्षण म्हणून टोकियो टॉवरचे मुखपृष्ट असलेली एक वही बक्षीस म्हणून देण्यात येत होती.

दोन्ही वेधशाळांत दुकाने व रेस्टॉरंट असून तेथे दुर्बिणी ठेवलेल्या होत्या. दुर्बिणीत शंभर येनचे नाणे टाकले की फक्त तीन मिनिटे खूप दूरवरचे दृश्य दुर्बिणीतून अगदी स्पष्टपणे न्याहाळता येते. दिवसा स्पष्टपणे दिसणारे किंवा संध्याकाळच्या प्रकाशातील चमचमणारे टोकियो फारच मनोहारी दिसते. शिंजुकु भागातील उत्तुंग इमारतींचा पुंजका लक्ष वेधून घेतो. हाय-वेवरील ठिपक्या-सारख्या दिसणाऱ्या मोटारींच्या ताफ्याबरोबरच समुद्रावरून उडत जाणारी विमाने सुद्धा स्पष्ट दिसत होती. असंख्य आखीव रेखीव इमारतींमुळे टोकियोची श्रीमंती दिमाख व ऐट स्पष्टपणे नजरेत भरत होती.

टोकियो-टॉवरच्या दोन्ही वेधशाळांवरून काही फोटो घेतले. एकदा असाच फोटो घेण्यापूर्वी माझ्या लक्षात आले की, आपल्या कॅमेऱ्याचे झाकण कुठे तरी पडले आहे. परतण्यापूर्वी तळमजल्यावरील चौकशीच्या काउंटरवर सहज झाकणाबाबत सांगताच त्यांनी जमिनीखालील दुसऱ्या मजल्यावरील Lost & Found विभागात जाण्यास सांगितले. तिथे झाकणाची हकीकत सांगताच त्यांनी आजच्या मिळालेल्या वस्तूंचे ट्रे माझ्यासमोर ठेवले, तेव्हा माझ्या कॅमेऱ्याच्या लेन्सचे झाकण त्यात मला दिसले. ते त्यांनी कुठल्याही प्रकारची लिखापढी न करता माझ्या हातात ठेवले. रोज कित्येक हजारोंच्या संख्येने भेट देणाऱ्या या टॉवरवर कुठे तरी हरविलेली माझी लहानशी वस्तूसुद्धा कोणी तरी या विभागात नेऊन दिली व ती मला मिळाली ही एक आश्चर्य वाटण्यासारखीच घटना नव्हे काय ?

हा टॉवर संपूर्णपणे व्यवस्थित बघण्यासाठी कमीत कमी ८–१० तास तरी लागतात. आम्ही टॉवरचा निरोप घेतला तेव्हा खूपच अंधार पडला होता.

टोकियोत बघण्यासारखी तशी अजून अनेक ठिकाणे आहेत. वेळ, पैसा व आवड यांच्या गणितात जेवढी बसतात तेवढी मी बघितली, परंतु १५ एप्रिलला टोकियो-तील डिस्ने-लँडचे उद्‌घाटन होणार व माझ्या परतीचा दिवस १० एप्रिल होता. त्यामुळे फक्त एका आठवड्याने अजून एक प्रेक्षणीय स्थळ बघण्याचे हुकल्याने मनाला हुरहुर लागून राहिली होती.

## पार्ट्यांमधील सहभाग व उत्सवप्रिय जपानी

जपान हा खरे पाहू जाता सणांचाच देश आहे. येथील लोकांना उत्सवांचे फार वेड. मोठमोठ्या शहरी, गावी व खेडेगावी या प्रत्येक ठिकाणी स्वतःचे असे काही खास निराळे सण सुद्धा असतात. त्यांपैकी बहुतांशी सण हे पूर्व पारंपरिक पद्धतीने बऱ्याच काळपासून चालत आलेले आहेत, तर काही सणांची नव्याने सुद्धा भर पडली आहे. सर्व सण एकाच ठराविक ऋतूमध्ये न येता दर महिन्याला कमीत कमी एक-दोन सण तरी असतातच. त्यामुळे आपण कुठल्याही कालावधीत जपान-मध्ये असला तरी सण साजरा करण्याची पद्धत आपल्याला पहावयास मिळते. सणाचे वेळी पारंपरिक पोषाखामधील व एकाच पद्धतीने ठराविक लयीत एकत्रित-पणे नाचणारे तरुण-तरुणींचे थवे पहावयास मिळतात. या वेळी ही मंडळी देहभान हरपून प्रसंगाशी पूर्णपणे एकरूप झालेली दृष्टीस पडतात.

१४ नोव्हेंबरला अशाच कुठल्याशा एका सणानिमित्त कन्नाअिच्या अिसेझाकीमाला रस्त्यावरून जपानी लोकांची मिरवणूक चालली होती. मिरवणुकीत काही गट होते. प्रत्येक गट त्यांच्या निरनिराळ्या पोषाखात व्यवस्थित तालबद्ध नृत्य करीत शांतपणे पुढे जात होता, मागे वाद्ये होती. नाचताना पुरुष मंडळी अधून मधून कमरेत वाकून फक्त अंगठ्या जवळील बोट वर करून त्याची ठराविक लयबद्ध हालचाल करीत होती. तर हिरव्या रंगावर सुंदर नक्षीकाम असलेला खिमोनो परिधान केलेल्या जपानी युवती हातातील पंख्याची एकसारखी हालचाल करीत होत्या. सर्वांत मागे प्रौढ मंडळी सुद्धा होती

नववर्षाचे स्वागत ही मंडळी फारच उत्साहाने करतात. १ जानेवारीला सकाळी बहुतेक जण त्यांच्या विशिष्ट पोषाखात देवळात अगर श्राईनमध्ये जातात. नववर्षानिमित्त आमच्या फॅक्टरीला ओळीने पाच दिवस सुट्टी होती. आम्ही पण १ जानेवारीला दुपारी ठरल्याप्रमाणे एकत्र जमलो. आमचे ग्रुप को-ऑर्डिनेटर युकाता ड्रेसमध्ये तर त्यांच्या पत्नीने, ट्रॅन्सलेटर व तिची बहीण यांनी खिमोनो ड्रेस परिधान केला होता. पुरुषांचा व स्त्रियांचा ड्रेस वेगळा असतो. पुरुषांच्या ड्रेसला

युकाता तर स्त्रियांच्या ड्रेसला खिमोनो असे म्हणतात. आम्ही सर्वजण गाडीने जवळील साकुरागीचो स्टेशनवर उतरलो व तेथून पायीच जवळ असलेल्या डोंगरावर असलेल्या एका मंदिरात गेलो. मंदिरामध्ये अगदी आपल्या प्रमाणेच यज्ञ चालला होता. मध्ये होमकुंड होते. एका बाजूला काही जण पद्धतशीरपणे एका ठेक्यामध्ये ढोल वाजवीत होते. बेताल बडवीत नव्हते. यज्ञाच्या मागे स्त्री-पुरुष पारंपरिक खिमोनो व युकाता पोषाखात बसली होती. जवळच एक मोठी पेटी होती. त्यामध्ये लोक पैसे टाकीत होते. देवळाजवळच्या एका झाडाला लोक चिठ्ठ्या बांधतात. देवापाशी आपले जे मागणे असते ते हे लोक कागदावर लिहितात व तो कागद घडी करून या झाडाला बांधतात. झाडावर पानांपेक्षा या चिठ्ठ्याच जास्त लटकलेल्या होत्या. जपानसारख्या प्रगत राष्ट्रातील हा प्रकार बघून अचंबा वाटला. लहान लहान मुले-मुली खिमोनोमध्ये फार सुंदर दिसत होती. आपल्याकडे जत्रेत असतात तद्वतच या देवळाच्या वाटेवर दुतर्फा खेळण्यांची दुकाने होती. एका ठिकाणी अगदी वजनावर गोळ्यापण विकायला बसल्या होत्या.

या मंडळींना पार्टीचे सुद्धा फार आकर्षण. कुठलाही लहान अगर मोठा समारंभ असला की हमखास पार्टी ही पाहिजेच. पार्टीचा मुख्य उद्देश म्हणजे खूप खाणे, पिणे, नाचणे, गाणी म्हणणे व एकत्रित येऊन सर्वांबरोबर मजा करणे आणि आनंद लुटणे हाच असतो. विशेष समारंभप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनापण बोलाविण्यात येते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच समारंभाची माहिती देण्यात येते. नंतर मुख्य पाहुण्यांचे भाषण होई व त्यानंतर प्रथम खान पान कार्यक्रम उरकल्यावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येई. भारतातून जातानाच याची थोडी फार कल्पना होती म्हणून मी बरोबर विजार, काश्मिरी झब्बा व टोपी नेली होती. हा ड्रेस पार्टीकरता फारच उपयोगी पडला.

एक दिवस आम्ही विद्यार्थ्यांतर्फे सुद्धा होस्टेलच्या स्टाफला पार्टी देण्यात आली, त्यात अनेक चांगली गाणी म्हणण्यात आली. चांगल्या कार्यक्रमाना ' मो अिची दो ' म्हणजे वन्स मोअरच्या घोषणा होत असता मी माझ्या धाकट्या मुलावर गाणे रचले होते व ते गाणे "येणार तू, येणार तू. येणार तू रे येणार तू" या गाण्याच्या चालीवर बसविले होते. या गाण्यामध्ये मी काही जपानी शब्दपण गंमतशीर रीतीने समाविष्ट केले होते. त्या गाण्याचे ध्रुवपद होते. " रंगी ग तु सारंगी तू बबडू ग तू ग छबडू ग तू " माझ्या मेक्सिकन मित्रांना हे उडत्या चालीचे गाणे फार आवडले. त्यांनी ते माझ्याकडून इंग्रजीत लिहून घेतले होते व पुढच्या एका पार्टीमध्ये सादर करण्यासाठी आमच्याच होस्टेलच्या म्युझिक हॉलमध्ये या गाण्याचा प्रयत्न चालविला होता. माझ्या जवळील गाण्याचा कोटा संपत आला होता तेव्हा एकदा तर मी बुलेट स्पीचच्या नावाखाली चक्क लहानपणी मुखोद्गत

केलेली काही स्तोत्रे सुद्धा म्हणून दाखविली होती.

होस्टेलमार्फत आयोजित केलेल्या समारंभाच्या वेळी बाहेरील पाहुणे मंडळी सुद्धा बऱ्यापैकी येत असत. पार्टीमध्ये म्हाताऱ्या-कोताऱ्यांना सुद्धा मी नाचताना बघितले होते. कोणीही तेथे वेगळा असा बसलेला नसे. सर्व एकत्र येऊन नाच गाण्याची मजा लुटत होते. नाहीतर खूप वेळा मनात असते नाचावे म्हणून परंतु लोक काय म्हणतील ? आपले वय काय ? माझे स्टेटस काय ? वगैरे विचारामुळे मनावर जे दडपण येते तो प्रकार येथे नाही. सर्व मंडळी नाचगाण्यात अगदी मश्गुल असतात. होस्टेलमधील थायी, ग्रीक तसेच मेक्सिकन मंडळींनी त्यांचे पारंपरिक नाच फार सुंदर प्रकारे सादर केले होते. होस्टेलच्या सर्व ऑफिस स्टॉफने सुद्धा दोन प्रकारचे पोषाख करून, एकत्र येऊन एक नाच फारच सुंदर प्रकारे सादर केला होता. मेक्सिकन लोक पार्टीमध्ये पॅशन नावाचा खेळपण खेळतात. तो पण एक पार्टीमध्ये त्यांनी सादर केला व त्यामध्ये आम्हा सर्व बघ्यांना पण सामील करून घेतले होते. यामध्ये सर्वांनी मोठा फेर धरावयाचा व कोणीही एकाने एक हुकूम सोडायचा व त्याप्रमाणे सर्वांनी कृती करावयाची. हा खेळ तर खूपच रंगला व सर्व मंडळी त्यात आनंदाने सहभागी झाली होती. अशाच एका पार्टीत शेवटचा कार्यक्रम म्हणून प्रत्येकाला एका प्राण्याचे नाव कानात सांगितले जाई. व तुम्ही त्या प्राण्याच्या काही लकबी कृतीसकट सादर करावयाच्या व लोकांनी प्राण्याचे नाव ओळखेपर्यंत त्या प्राण्याच्या निरनिराळ्या कृती सादर करावयाच्या. प्रत्येकावर एकदा ही पाळी यावयाचीच. या खेळात सुद्धा लहान मोठा असा भेदभाव नव्हता. सर्वजण तल्लीन होत. एकंदरीत काय तर ही माणसे अशा खूपच निर्मळ व नि:संकोच वातावरणात आयुष्य उपभोगत असतात. एकमेकांचे सहवासात आनंद लुटणे हे या लोकांकडून शिकण्यासारखे आहे. अशा पार्टीच्या वेळी ते सर्व काही विसरून जातात. हे सर्व बघितले तेव्हा आपण आपले आयुष्य खूपच गंभीरपणे जगत असतो याची जाणीव झाली.



डिसेंबर महिन्यामध्ये सुकीयाकी पार्टी होती. त्या वेळी प्रत्येक टेबलावर एक गॅस शेगडी ठेवलेली असून त्यावरील कढईत सुकियाकी रटरटत असते. जपानी लोकांचा या सणाचा हा खास पदार्थ. सर्व पार्टीमध्ये बिअर तर अगदी पाण्यासारखी प्यायली जाते.

मी सहभागी झालेली माझी जपानमधली सर्वांत मोठी पार्टी म्हणजे 'नववर्ष शुभेच्छा पार्टी'. आम्हा होस्टेलवासीयांपैकी माझी व एका मेक्सिकन युवक-युवतीची या कार्यक्रमासाठी निवड केली गेली होती. ३१ डिसेंबरला योकोहामा येथील हॉटेल रिच या एका अतिशय अलिशान हॉटेलमध्ये रात्री 'न्यू इयर' चा कार्यक्रम चालू होता. व तेथूनच कार्यक्रमाचे योकोहोमा ब्रॉडकास्टिंग स्टेशनमार्फत प्रक्षेपण सुद्धा चालू होते. ठरल्याप्रमाणे आमच्या होस्टेलमधील आम्ही तिघेजण योकोहोमा ब्रॉडकास्टिंग स्टेशनच्या एका स्टाफबरोबर टॅक्सीने या हॉटेलमध्ये रात्री ११ वाजता पोहोचलो. एकदम पॉश हॉटेल. उंची झुंबरे, लाल बुंद जाड गालीचे व भव्य आरसे यांच्या योग्य मिलापाने हे हॉटेल आपले नाव सार्थ करीत होते. तेथील लिफ्टला सोनेरी रंगाचे सुंदर दार होते. आतमध्ये पण अनेक सुंदर नक्षीकाम केलेले भव्य आरसे त्या सुंदरतेमध्ये भर घालीत होते. आम्ही ५ व्या मजल्यावरील अशा प्रशस्त एका भल्या मोठ्या हॉलमध्ये आलो. टेबले व्यवस्थित मांडलेली होती. खास सुगंधित वस्त्रामध्ये लपेटलेली जपानमधली अतिशय श्रीमंत मंडळी तेथील अनेक टेबलांभोवती विराजमान झाली होती. नर्म हास्य विनोदाचे जोडीला टेबलावर तोंडी लावणें पण हजर होतें. आम्ही हॉलमध्ये प्रवेश केला तेव्हा स्टेजवर ऑर्केस्ट्राचा कर्णमधुर कार्यक्रम चालू होता. एका प्रशस्त टेबलाभोवती आमची व्यवस्था केली होती. आम्हा तिघांशिवाय तेथे एक ग्रीक नट व पोडषवर्णीय अमेरिकन गायिका यांना पण सहभागी करण्यात आले होते. आमच्या शेजारी ऑर्केस्ट्रातील मुख्य पाइप वादकाची सोय केलेली होती. ऑर्केस्ट्रानंतर एका गौरकाय सुंदर पाश्चात्य युवतीचे साभिनय पाश्चात्य गायन चालू होते. शाकुंतल वगैरे नाटकांतील वसंतसेना वगैरेची चित्रे काढतात त्याप्रमाणे त्या गायिकेने पोषाख केला होता. बरोबर १२ वाजता आमच्या मुलाखती सुरू झाल्या. सर्वत्र हॉलमध्ये रंगीत कागदाच्या सुरनळ्या उडत होत्या. टिव्ही व रेडिओवर लाइव्ह ब्रॉडकास्टिंग चालू होते. नवीन वर्षानिमित्त आपापल्या भाषेतून शुभेच्छा दिल्या गेल्या. निर-निराळ्या रंगातील प्रकाशाचे झोत आमच्या टेबलाभोवती पडत होते. टाळ्यांचा कडकडाट चालू होता. मुख्य कार्यक्रम झाला. नाच गाणी सुरू झाली. हॉलमधील अनेक मंडळी फारच सुंदर पाश्चात्य नृत्य करीत होती. या कार्यक्रमातील सहभागा-बद्दल आम्हाला बक्षीस देण्यात आले. जपानी लोकांना प्रेझेंट द्यायचा फार चांगला छंद आहे. ऑर्केस्ट्रॉतील मुख्य पाईपवादक माझे शेजारी येऊन बसला होता. आम्ही दोघांनी थोड्या गप्पा मारल्या. 'फार छान वाजवता हो आपण' हे वाक्य माझ्या अगदी ओठावर आले होते, परंतु ते बाहेर यायचे राहून गेले. योकोहामा ब्रॉड-कास्टिंग स्टेशनच्या स्टाफने रात्री ३ वाजता टॅक्सीने आम्हाला आमच्या होस्टेलवर सोडून स्मित वदनाने आमचा निरोप घेतला. आम्ही होस्टेलमध्ये प्रवेश करताच "नया साल आप सबको मुबारक हो" या मीच उच्चारलेल्या वाक्याने आमच्या

तिघांचे स्वागत झाले. रेडिओवरील आमचा कार्यक्रम मुद्दाम होस्टेलवासीयांना होस्टेलमधील लाऊड स्पीकरवरून ऐकविण्यात आला होता. होस्टेलवर आल्यावर तेथे हॉलमध्ये चालू असलेल्या पार्टीतपण मी सामील झालो. बोलता बोलता होस्टेलच्या स्टॉफमधील ऊने ओसान या माझ्या जपानी मित्राला ऑर्केस्ट्रॉतील पाइपवादकाशी झालेल्या गप्पा सांगितल्या व त्याला " तुम्ही फार छान वाजविता हो " हे वाक्य म्हणायचे राहून गेले हे त्याला सांगताच ऊने ओसान हसत म्हणाला की तो जपानचा सुप्रसिद्ध पाइकवादक आहे व त्याचा जाझ ऑर्केस्ट्रा जपानमध्ये अव्वल दर्जाचा म्हणून गणला जातो.

## बर्फाच्छादित पहाडावरी स्किंअिग

जानेवारी संपून फेब्रुवारी सुरू होत असतानाच जपानच्या अनेक डोंगर, दऱ्या, खोरी बर्फाने आच्छादली गेलेली असतात. अशा वेळी शेकोटीभोवती बसून ऊब घेण्यापेक्षा याच बर्फावर यथेच्छ घसरगुंडी करीत धामाधूम होऊन ऊब निर्माण करणे केव्हाही फायदेशीर. शिवाय खेळातून मिळणारा आनंद तो निराळाच. म्हणूनच या सुमारास आगगाड्या, बसेस, खाजगी मोटारी वगैरे वाहनांतून स्कीअिंगचे किट घेऊन अनेक कंपू बर्फाच्छादित पहाडाकडे स्कीअिंगसाठी जाताना दिसतात. पायातील बुटाला खाली असलेला तेवढ्याच रुंदीचा लांबलचक स्कीबोर्ड व हातातील दोन काठ्यांच्या ( स्कि स्टिक्स् ) सहाय्याने बर्फावरून घसरत खाली येणे म्हणजे स्कीअिंग.

होस्टेलमध्ये नोटीस लागली की, स्कीअिंगसाठी येऊ इच्छिणाऱ्यांनी पैसे भरून आपली नावे नोंदवावीत. काही दिवसांनी नाव नोंदणी संपली. आमच्यासारख्या नवशिक्यांसमोर अनेक प्रश्न होते व या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रत्येकास देणे केवळ अशक्य. यावर त्यांचा नेहेमीचा तोडगा. व तो म्हणजे मीटिंग. एका मोठ्या रूम-मध्ये स्कीअिंगला जाणाऱ्यांची मीटिंग बोलावण्यात आली. त्यामध्ये ओकानोसान या जपानी स्कीअिंगपटूने स्कीअिंग किटसहित माहिती दिली. स्की बूट कसे घालावे, कसे काढावे, पाय कसा वळवावा, दिशा कशी बदलावी, बर्फावर पडताना कसे पडावे व मग कसे उठावे, वेग कमी कसा करावा, थांबावे कसे वगैरेची प्रात्यक्षिका-सहित सुंदर माहिती दिली. त्यानंतर एक फिल्मसुद्धा दाखविण्यात आली. स्कीअिंगला नवीनच सुरुवात करणाऱ्यांना मार्गदर्शनपर ती फिल्म होती. त्यात स्कीअिंगचे अगदी सुरुवातीपासूनचे धडे होते. एकूण ७-८ व्यावसाईक स्कीअिंगपटूंच्या सहाय्याने घेतलेली फिल्म होती ती. फिल्ममध्ये योग्य वेळी संथगती दाखविली होती त्यामुळे

प्रत्येक कृतीतील बारकावे समजणे व नंतर अनुकरण करण्याच्या दृष्टीने लक्षात ठेवणे सहज शक्य झाले.

स्कीइंगचे निराळे असे वर्णन करण्यापेक्षा माझ्या डायरीची पानेच येथे देणे मला जास्त योग्य आणि श्रेयस्कर वाटते.

३ **फेब्रुवारी** – सर्व तयारी करून संध्याकाळी ७.३० वाजता निरनिराळ्या देशांतील आम्ही एकूण ९५ जण दोन मोठ्या चार्टर्ड बसने निघालो. बस अतिशय प्रशस्त व आरामशीर होती. खिडक्यांना रंगीत भव्य काचा. पुढे वरती फिक्कट निळसर काच. गाडीतील गुबगुबीत मस्त वेलवेटचे सीट, तीन टप्प्यांमध्ये तिरप्या अगर ताठ कुठल्याही स्थितीत आणता येत होते. गाडीतील स्पीकरवर मस्त इंग्लिश गाण्यांची धून चालू होती. गाडीत ऊबदारपणा राखण्यासाठी मशीन होते. परंतु खिडकीच्या काचेला हात लावताच एकदम थंडगारपणा जाणवला. बाहेरचे तपमान ३° से. च्या आसपास होते. बसगाड्या सुटल्या. गाडीने टोकियोच्या अलीकडूनच वळण घेतले व हाय-वे गाठला. हायवे-वरून भरधाव वेगाने बस सुटली होती. बोगदे येत होते, जात होते, खालून अनेक प्रकारचे ३/३, ४/४ ट्रॅक्स असलेले रस्ते सरळ अगर नागमोडी वळणाचे भेटत होते. प्रखर प्रकाशाचे दिवे येत होते व झर्रकन मागे जात होते. रस्त्याच्या बाजूचे भक्कम भरीव कठडे साथीला होते. ओव्हरटेक करणाऱ्या मोटारीपण काही कमी नव्हत्या.

आम्ही जात असलेल्या ठिकाणाचे नाव, हॉटेलचे नाव, हॉटेलचा व स्कीइंगा-च्या जागेचा नकाशा, तिन्ही दिवसांचे वेळापत्रक, प्रत्येकाच्या रूमचे नंबर, बुटाचे नंबर, हॉटेलमधील इतर सुविधा वगैरे सर्व माहितीची एक प्रत बसमध्ये आम्हाला देण्यात आली होती. अनेक तोंडी सूचनापण दिल्या होत्या, त्यामुळे काहीच काळजी नव्हती.माझ्या फॅक्टरीतील एक व होस्टेलमधील एक अशा दोन जपानी मित्रांच्या सहाय्याने मी स्कीइंसाठी पॅन्ट, जर्किन, टोपी, जाड पायमोजे, व हातमोजे जमविले होते. तर बुटासहित स्कीबोर्ड व स्की स्टिक्सस् त्या ठिकाणीच मिळणार होत्या.गाडीतील संगीत, आरामशीरपणा, ऊबदारपणा, व वेग यांमुळे डुलकी लागली. अधूनमधून जाग येत होती. वाटेत २-३ वेळा गाडी थांबली. थांब्याच्या ठिकाणी हॉटेल व इतर सुविधा असलेला परिसर सुद्धा पॉश होता. बहुतेक सर्व ठिकाणी सुंदर रंगीबेरंगी व नक्षीच्या टाइल्सचा वापर केलेला होता. बेसिन तसेच इतर चिनी मातीची भांडी जपानमध्ये बऱ्याच ठिकाणी TOTO या कंपनीचीच दिसतात. हॉटेलच्या बाहेरील बाजूस अनेक नळ व आरसे होते. नळाची तोटी कशीही, वरच्या दिशेला सुद्धा फिरविता येई. व बहुतेक जण नळ सोडल्यावर सरळ नळाची धार वरती तोंडात घेतात. त्यामुळे ग्लासला, तसेच हाताला पाण्याचा स्पर्श होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; पण एकंदरीत पाणी पिणारे जपानी फार थोडे. बिअर व

ओसाके हे मद्य प्रसिद्ध. तर त्यांचा येथे कुठेही फुकट व पाण्यासारखा मिळणारा ग्रीन टी ऊर्फ ओचा हे लोक फार पितात. प्रशस्त हॉटेलांच्या बाहेरील बाजूस काचेच्या घरातील लाल, पिवळ्या व निळ्या रंगातील टेलिफोन होते. अगदी बाहेरील बाजूस गाड्यांसाठी व बसेससाठी पटांगणात आखलेल्या पांढऱ्या खुणा ठळकपणे नजरेत भरत. पटांगणसुद्धा काळ्या व हिरव्या रंगाचे होते. सर्वत्र अति उंचावरून मर्क्युरी दिव्याचे प्रकाश झोत येत होते. प्रवास करणाऱ्यांना आकर्षित करणाऱ्या सर्व गोष्टी तेथे उपस्थित होत्या. विशेषत: हॉटेलमध्ये मिळणारे चमचमीत पदार्थ, हॉटेलच्या बाजूला सर्वत्र दिसणारी डिपार्टमेंटल स्टोअर्स येथे सुद्धा होती. रात्री ११ च्या पुढे बर्फाने सोबत करायला सुरुवात केली. दुतर्फा सर्व आसमंत बर्फाने आच्छादलेला होता. तीन थांबे घेतल्यानंतर रात्री एक वाजता बस मिनामोतो येथील गुम्माकेन या जपानचा मध्यभाग असलेल्या एका हॉटेलपाशी पोहोचली. गुम्माकेन हे जपानमधील स्कीइंगसाठीचे प्रसिद्ध ठिकाण आहे. येथे एक स्की स्कूल सुद्धा आहे. हॉटेल हे ठराविक जपानी पद्धतीचे inn होते. इन याचा अर्थ जपानी पद्धतीचे हॉटेल. या हॉटेलमध्ये सर्व सुखसोयी होत्या. ( वाचकांना पुढे पर्ल आयलंडची माहिती वाचताना अशा जपानी हॉटेलबाबत सविस्तर माहिती होईल.)

**४ फेब्रुवारी** : सकाळी लवकर उठलो. भरपूर व मस्त ब्रेकफास्ट केला. बसने जवळच असलेल्या स्कीइंग करावयाच्या ठिकाणी पोहोचलो. सर्वकडे बर्फच बर्फ. जमिनीवर रूळावरून जाणाऱ्या ट्रॉलीज, तसेच जमिनीपासून अंदाजे २५ फूट उंचीवरून जाणारे रोप-वेज तेथे होते. लिफ्टने डोंगरावर जायचे व वरून मग घसरत खाली यायचे. अनेक ठिकाणी असलेल्या लाऊडस्पीकरवरून मस्त सुरातील इंग्रजी गाणे ऐकू येत होते. एकूण ८ ते १० चौरस किलोमीटर एवढा स्कीइंगचा परिसर होता. चहूकडे रंगीबेरंगी कपड्यांतले जपानी वेगाने स्कीइंग करीत होते. अगदी जवळ जाऊन चेहरा दिसला व लिपस्टिक असेल तर मुलगी अन्यथा मुलगा एवढाच फरक ओळखण्यातला होता. सर्वत्र श्रीमंतीचे दर्शन होत होते. स्कीइंगच्या हद्दीबाहेर अनेक उंची गाड्या व बसेस उभ्या होत्या, तर एका बाजूला असलेल्या हॉटेलमध्येसुद्धा सर्व सुखसोयी होत्या. खाण्याची तर लयलूट असते. परंतु किंमती किंचित जास्त असत. जपानमध्ये सर्वत्र दिसणारे व्हिडीओ गेम्स येथे सुद्धा होते. यामध्ये शंभर येनचे नाणे टाकताच काही मिनिटे दोघांनी समोरील टेबलावरील व्हिडीओ गेम खेळायचा. मग त्यात युद्ध, शिकार, पाठलाग, वगैरे अनेक प्रकार असतात.

सुरुवातीला सर्व सांधे ढिले व्हावेत म्हणून आम्ही बर्फावर व्यायाम केला. अगदी पी. टी. तोपर्यंत बाजूला असलेल्या एका मोठ्या स्टोअर्समध्ये प्रत्येकाचे नाव व त्यापुढे त्याच्या बुटाचा नंबर, बूट व त्याखाली लांबलचक पायाच्या रुंदीएवढी फळी ऊर्फ स्कीबोर्ड आणि स्कीइंगच्या वेळी आधारासाठी, दिशा बदलता

यावी अगर तोल संभाळता यावा अशा अनेक कारणांसाठी उपयोगी पडावी म्हणून हातात धरावयाची काठी ऊर्फ स्की-स्टिक व्यवस्थित ठेवलेले होते. आम्ही बूट चढविले. बूट स्की-बोर्डवर ठेवायचा व मागे त्याला एक चाप होता. तो दाबला की, बूट स्की बोर्डवर घट्ट बसतो. आम्ही बर्फावर हळूहळू स्कीइंगची प्रॅक्टिस सुरू केली. अनेकदा पडत होतो, परंतु पडल्यावर उठायचे कसे याबद्दल आधीच कल्पना होती. त्यामुळे सुरुवातीला धडपडत स्कीइंग चालू होते. मुख्य म्हणजे बर्फावर पडले तरी विशेष लागत नव्हते. बर्फ हा पण काही प्रमाणात शॉक अॅब्सॉर्बर आहे. आकाशात सूर्य दिसत नव्हता. मंद बर्फवृष्टी होत होती. पांढराशुभ्र मऊ लुसलुशीत बर्फ संथपणे खाली पडताना बघून मस्त वाटत होते. स्कीइंग करताना पडल्यावर उताणे तसेच पडून 'आ' करताच तोंडात बर्फ पडत असे. मजा येत होती. कित्येकजण आपल्या छोकऱ्यांना पाठीवर घेऊन किंवा त्यांना सुद्धा स्की-ड्रेस चढवून त्यांच्या मापाचे स्की-बोर्ड वगैरेसहित स्कीइंग करीत होती. अगदी ५–७ वर्षांची मुले सुद्धा होती. तर ८–१० वर्षांपुढील मुले एकटीच जोरात स्कीइंग करीत होती. काही जण तर लांब प्लॅस्टिकच्या घमेल्यात बसून पुढे लहान मुलांना बसवून चक्क वेगाने बर्फाच्छादित डोंगरावरून खाली येत होती. अनेक मंडळी इकडे तिकडे जोरात जात होती तरी कोणाची टक्कर होत नव्हती, परंतु तोल संभाळता न आल्याने डोंगरावरून जमिनीला सर्वांग टेकत काही अंतर खाली येणारे २–४ वेळा दिसले. अशा वेळी पायातील स्की-बोर्ड काही वेळा आपोआप बाजूला फेकला जातो. परंतु असे महाभाग चक्क सर्व आयुधे परत गोळा करून पुनश्च स्कीइंग करीत खाली येत असत.



सुरुवातीला काही वेळा पडल्यानंतर आम्हा नवशिक्यांचा आत्मविश्वास वाढला. आमच्या स्कीइंग-क्षेत्राची त्रिज्या विस्तारली. आम्ही सर्व नवशिके सर्वत्र हळूहळू तर कधी थोड्याशा वेगाने घसरू लागलो. घसरताना कधी नुसते अधांतरी खाली बसावयाचे व घसरावयाचे हा पण एक प्रकार होता. वेगावर नियंत्रण ठेवता आले नाही तर स्वतःला चक्क एका बाजूला झोकून देणे हा थांबण्याचा आमचा एक हुकमी प्रकार होता. डोंगरावरून सुसाट वेगाने सरळ खाली

येणारे काही थोडे नव्हते. परंतु बरेच जण डोंगरावरून खाली येताना घाटाप्रमाणे वळणावळणाने त्याची मजा लुटत खाली येत. खाली येताच परत रोप-वेच्या रांगेत उभे राहात. दंडाला तिकिट अडकविलेले असे. तिकिट पंच करणारे पंच करीत व नंतर पुन्हा लिफ्टमध्ये बसून डोंगरमाथ्यावर रवाना. १७०० येन मध्ये ११ वेळा रोप-वेच्या ट्रॉली मध्ये बसता येते. आम्ही काही जणांत मिळून एक तिकिट खरेदी केले होते व आळीपाळीने डोंगरावरून खाली आलो होतो. त्या परिसरात अधून मधून रणगाड्याप्रमाणे परंतु अगदी लहान, एकाद-दुसरी यांत्रिक गाडी बर्फावरून हिंडत होती. पण त्या मुख्य मदतीसाठी अगर सामान वाहतुकीसाठी असत.

दुपारी १२ ला हॉटेलमध्ये जेवण घेतले. चांगली भूक लागली होती. चमचमीत पदार्थांनी जिभा तृप्त केल्या, परंतु मुद्दाम थोडेच जेवण घेतले. जेवताना खिडकीतून समोरील स्कीअिंगचे विहंगम दृश्य नजरेत भरत होते. जेवण करून काही वेळातच पुन्हा आमचे स्कीअिंग सुरू झाले. पडत होतो व उठत होतो, परत पडण्यासाठी. पडणारे मस्त मजेत पडत. बघायला पण मजा येई. अगदी पडणार याचे भविष्यसुद्धा थोडा वेळ आधी सांगता येई. पडला ऽऽ पडला ऽऽ पडला आम्ही अनेक जण (जपानीत) ओरडत असू. दुपारी ५ पर्यंत सर्वजण थकून परत स्कीअिंग-स्टोअरमधील सामान जागचे जागी ठेवून बसमधून हॉटेलकडे निघालो.

हॉटेलकडे परतताना दुतर्फा सर्वत्र बर्फाने आच्छादलेला परिसर नजरेत भरत होता. घराच्या छपरावर, छपरावरून लोंबकळणारे, घर ते बाजूचा खांब यांचे मध्ये लटकणारे बर्फ नजरेत भरत होते. वाटेतील एक स्कीअिंग-पूल सुद्धा बर्फमय झाला होता. घराभोवती सर्वत्र, घराच्या बाहेर उभ्या असलेल्या गाडीभोवतीच काय पण अगदी गाडीवर सुद्धा बर्फ होते. जेव्हा रस्त्यावर अगर विशेषत: वळणावर समोरासमोरून दोन बसगाड्या येत तेव्हा 'पहिले आप' या पद्धतीने दोन्ही ड्रायव्हर एकमेकांना मान देऊन पुढे जाण्याची विनंती करीत. अर्थात् हे चित्र आपल्या कडच्या चित्राचा अगदी विरुद्ध होते. मागून येणाऱ्याचा हॉर्न फाटला तरी बेहत्तर ! आपल्याकडील काही ट्रकवर तर मागे चक्क लिहिलेले असते ' हॉर्न बजाओ शौकसे लेकिन साईड मिलेगी अगले चौकसे.' त्यामुळे येथील 'पहिले आप' प्रकार मला आश्चर्यकारक वाटला. बस अगर मोटारींची चाके बर्फातून घसरू नयेत, म्हणून गाडीच्या चाकाभोवती साखळीचा पट्टा असे. हा पट्टा बाजूच्या स्प्रिंगच्या सहाय्याने चाकावर घट्ट बसविलेला असे. डोंगरावरील उंच उंच वृक्षराजींच्या बुंधा, शेंडा वगैरे सर्व भागात बर्फ साचून राहिले होते. वाटेत काही ठिकाणी बुलडोझर सारखे बर्फ उकरणारे यांत्रिक हात नजरेस पडत होते. रस्त्यावर काही ठिकाणी मजेशीर दिवे दिसले. उंच चकचकीत नक्षीदार खांबावर कंदीलाच्या आकाराप्रमाणे दिसत होते ते. बाहेरून वरून नारिंगी व खालून पांढरी नक्षीची काच आणि आतमध्ये मर्क्युरी

दिवा. प्रकाश जास्तीत जास्त खाली रस्त्यावर पडावा यासाठी केलेली ही श्रीमंती रुबाबातील सोय.

हॉटेलवर आलो. गरम गरम जेवण आमची वाट बघत होते. हॉटेलमध्ये येताच तेथील उबदारपणा जाणवला. बाहेरील थंडपणा काय किंवा खोलीतील उबदारपणा काय दोन्हीही सुखद होते. कपडे व कोल्डक्रीममुळे कशाचाच त्रास होत नव्हता. मस्तपैकी जेवण झाल्यावर परत बसेस निघाल्या फ्लॅडलाइटमध्ये स्कीअिंग करण्यासाठी. पौर्णिमेचा प्रकाश व फ्लॅड लाईट यामध्ये सुद्धा स्कीअिंग चालू असते. परंतु आमच्यापैकी बरेचजण हॉटेलच्या शेजारील बंदिस्त जिमखान्यावर बॅडमिंटन, टेबलटेनिस वगैरे खेळायला गेले. मी पण हा दुसरा भाग पसंत केला. हा जिमखानासुद्धा एकदम पॉश होता. अगदी ऑलिंपिक पद्धतींचा. काही जण टी. व्ही. बघत होते, तर काही बिअरचे घोट रिचवीत होते. मशगुल व्हायची प्रत्येकाची पद्धत वेगळी.

**५ फेब्रुवारी** :– सकाळी परत कालच्याप्रमाणे भरपेट न्याहारी केली. हॉटेलमधून बाहेर पडण्यापूर्वी सर्व सामान बांधून तयार ठेवले. बसने तासाभरात स्कीअिंगसाईटवर पोहोचलो. काल मंद बर्फ वृष्टी होती. आकाश ढगाळलेले होते तर आज लख्ख ऊन पडले होते. सर्वत्र बर्फ चमचमत होता. अति उन्हात बर्फ फारच शुभ्र दिसतो. परंतु डोळ्याला आल्हाददायक होते ते कालचे वातावरण. कारण ढगाळलेल्या आकाशामुळे बर्फ चमकत नाही. आज ऊन पडल्याने डोळ्याला फिक्कट अगर गडद चष्मे लावून अनेक जण स्कीअिंग करीत होते. काही ठिकाणी कडेला आपण वाळूत करतो, त्याप्रमाणे बर्फाचे किल्ले केले होते. तर काही शाळकरी मुलेमुली स्नोमॅन ऊर्फ बर्फमानव करण्यात गुंग होती. त्यातील काही जण गोल बर्फाच्या ढिगाऱ्यात दोन बाजूला काड्या खुपसून त्यावर बर्फ थापून या बर्फ मानवाचा हात बनवीत होती. कालच्याप्रमाणेच आज सुरुवातीला व्यायामानंतर स्कीकिट चढविला. आज आम्ही नवशिके नव्हतो. चक्क एक दिवसाचा अनुभव आमच्या पाठीशी होता. आत्मविश्वास खूपच वाढला होता. आज आम्हाला मस्तपैकी तोल सांभाळता येऊ लागला होता. स्कीअिंगचा वेग पण वाढला होता. ३–४ तास मनसोक्त स्कीअिंग करून आम्ही सर्वजण दुपारी १ चे दरम्यान बाजूच्या हॉटेलमध्ये परतलो. जगातील अत्युत्तम स्कीअिंगपैकी एक व श्रीमंत राष्ट्रातील हे ठिकाण असल्याने नाणी टाकून मिळणारे आणि थंड–गरम पेये हजर करणारी सर्व प्रकारची व्हेंडर मशीन्स येथे होती. आम्ही साइटवरील या हॉटेलात जेवण घेतले व गाडीत जाऊन बसलो. गाडीमध्ये मंद सुरात संगीत चालू होते. बसने सर्वजण मुख्य हॉटेलवर परतले. आमचे सामान बांधून तयारच होते. दुपारी दोनच्या सुमारास हॉटेल सोडले. आमच्या गाड्या निघाल्या परतीच्या प्रवासाला.

वाटेत अनेक ठिकाणी मुंग्यांची वारुळं दिसतात त्याप्रमाणे भुसभुशीत डोंगरांचे मातकट भाग दिसत होते अर्थात् साचलेला बर्फ पडताना खरवडल्यामुळे तसे झाले असावे. डोंगरउतरणीवरील झाडे बर्फानी आच्छादलेली होती. परंतु झाडावरील काही ठिकाणांचा बर्फ घसरल्याने त्या सरळ उंच झाडांचा तांबूस रंग अधून मधून डोकावत होता. मीं शांतपणे अगदी तृप्त नजरेने गाडीतील तिरप्या सीटवरून बाहेर बघत होतो. माझा शेजारी निद्रेच्या स्वाधीन झाला होता. परंतु त्यापूर्वी त्याने त्याचा वॉकमन मजकडे दिला होताच. त्यामुळे विशेष स्टिरिओ संगीत ऐकणे पण चालू होते. दुपारचे चार वाजले. पांढऱ्या शुभ्र बर्फाने आम्हाला सायोनारा केला होता. हिरवीगार शेतीवाडी सुरू झाली. रेसकोर्सवर किंवा फॅक्टरीचे बाहेर लॉन ठेवतात तसे लांबलचक लॉन्स अनेक ठिकाणी दृष्टीस पडत होती. शेतीवाडीच्या मागे पार्श्वभूमीवर डोंगराच्या २–३ रांगा दिसत होत्या. सर्वांत शेवटची रांग फक्त बर्फाच्छादित होती. विशेष म्हणजे अधून मधून वाटेत कडेला चक्क ट्रॅफिक पोलिसांचे पुतळे उभे केले होते.

साडेचार वाजले. सूर्य खाली चालला होता. बस हायवेवर वळली व तिने वेग घेतला. चार चार ट्रॅक्स असलेल्या रस्त्यावरून सुरुवातीला मधल्या ट्रॅकवरून वेगाने बस पळत होती. माझी खिडकी उजव्याच बाजूला असल्याने उजवीकडून ओव्हरटेक करणाऱ्या अनेक प्रकारच्या गाड्या दिसत होत्या. तीच सुंदर वळणे किंवा सरळसोट रस्ते, रस्त्याच्या कडेला तेच तांबूस गवत ! असेच गवत टोयोटा फॅक्टरीला भेट दिली त्या वेळच्या प्रवासात भेटले होते. ट्रेनपेक्षा हायवेवरील बसचा प्रवास मला जास्त आवडला. वाटेत अनेक ठिकाणी वरून क्रॉस होणाऱ्या रुंद रस्त्यांच्या कमानी, त्यावर मोठ्या हिरव्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या पांढऱ्या अक्षरांतील पाट्या, खूप लांबून सुद्धा वाचता येत होत्या. त्यावर गावाचे नाव, ८०० मीटरवर कुठले गाव आहे, फाटा आहे, बाहेर पडण्यासाठी रस्ता आहे, हॉटेल आहे. इत्यादीच्या खुणा त्या पाटीवर होत्या. दर अर्ध्या मिनिटाला हायवेवर रस्त्याच्या कडेला टेलिफोनची खूण असलेली पाटी दिसे व बाजूलाच टेलिफोन असे. जपानी माणूस कोठेही असला तरी या फोनच्या सहाय्याने तो जपानमध्ये कोणाशीही बोलू शकतो. प्रवासात बाजूला काही वेळा डोंगर भेटत असत. बऱ्याच डोंगरांवर जंगल होते. काही ठिकाणी जमिनीची धूप होऊ नये म्हणून डोंगराच्या कडेला व्यवस्थित बांधकाम पण केलेले असे. सर्वांत विशेष म्हणजे संपूर्ण प्रवासात ड्रायव्हरने एकदाही हॉर्नचा उपयोग केला नाही. काही अंतर गेल्यावर रस्ता रुंद होई तेथे ८/८ जकात नाकी असत. गाडीतून न उतरताच ड्रायव्हर खिडकीतून पैसे देत असे आणि काही सेकंदांतच त्वरित गाड्या पुढे जात असत. धूर सोडणारी अगर बंद पडलेली एकही गाडी वाटेत मला दिसली नाही. रस्त्यावर ट्रॅफिकच्या ठळक पांढऱ्या खुणा सर्वत्र होत्या. पाच वाजून गेले होते. आकाशामध्ये धूसर आच्छादनाला

सुरुवात झाली होती. सूर्य निस्तेज होऊन केव्हाच मावळला होता. विरुद्ध ट्रॅक-वरील वाहतूक दिसत होती. बहुतेकांच्या गाडीवर स्कीबोर्ड होते. वाटेत बोगदे लागत होते. बोगद्यात दुतर्फा प्रकाशासाठी काही अंतरावर एकफुटी सोडियमच्या ट्यूब्ज होत्या, तर हायवेवर सर्वत्र उंच मर्क्युरी फ्लडलाईट्स होते. अगदी पौर्णिमेला प्रकाश असावा ना तसा. वाहतूक संथावली कारण शहर आले होते. ESSO, Mobil, SHELL, CALTEX वगैरे पेट्रोल पंप लागले. तेथे बाजूला विकायला ठेवलेल्या वापरलेल्या गाड्या व त्यावर त्यांच्या किंमती लांबूनही दिसत होत्या. वाटेत कित्येक ठिकाणी शोभेची झाडे थंडीने मरू नयेत म्हणून १५ ते २० फूट उंचीच्या प्लॅस्टिक आवरणात गुंडाळली होती. काही ठिकाणी इमारतीचे बांधकाम चालू होते. पण संपूर्ण बांधकामाभोवती चारी बाजूला प्लॅस्टिकचे जाड आवरण होते. त्यामुळे धूळ किंवा धुस्कारा अजिबात उडत नव्हता. आपल्या कामाचा दुसऱ्याला उपसर्ग होऊ नये. म्हणून घेतलेली ही खास जबाबदारी.

वाटेत एका ठिकाणी पेट्रोलपंपाचे अलीकडे बस वळली. ड्रायव्हरने बसच्या सर्व खिडक्यांच्या काचा घट्ट बंद करण्याबाबत विनंती केली व खात्री करून घेतली: बस ऑटोमॅटिक वॉटर स्प्रे विभागात शिरली. आम्ही बसमध्येच होतो. गाडीवर दाबाखाली सर्व बाजूने पाणी मारले जाते. नंतर बस हळूहळू पुढे जात असताना दोन्ही बाजूंच्या फिरणाऱ्या मोठ्या ब्रशाने बस वरून व बाजूने पुसली जात होती. बस धुऊन स्वच्छ चकचकीत झाली. वाटेत एकदोनदा थांबून टोकियो हायवेवरून इसोगोचे दिशेने आम्ही निघालो. ट्रॅफिक फार जाम होता व तो हळूहळू पुढे सरकत होता. अंदाजे अर्ध्या तासाच्या या संथ गतीनंतर पुन्हा बसने वेग घेतला व रात्री आठला होस्टेल गाठले. अंग बऱ्यापैकी ठणकत होते. त्यामुळे रूमवर सामान टाकून तडक शॉवरकडे धाव घेतली. चक्क पाऊण एक तास गरम शॉवर खाली अंग मोकळे केले. अनेकदा फिल्ममध्ये अगर टीव्हीवर फक्त बघावयाचा श्रीमंतांचा हा खेळ अनुभवायला मिळाला म्हणून हायसे वाटत होते.

## मी पाहिलेले अपघात, अनुभवलेले भूकंप व हवामान यासंबंधी

जपानमधील वास्तवात मी अगदी जवळून पाहिलेले अपघात फक्त दोनच आहेत. या देशात मानवी जिवाला अती मौल्यवान वस्तूप्रमाणे जपले जाते. त्यासाठी सुरक्षिततेचे जे जे उपाय योजणे शक्य आहे ते ते सर्व उपाय कुठलीही किंमत देऊन येथे योजले जातात. एवढे करूनही अपघात झालाच तर तातडीने वैद्यकीय सेवा अगदी अपघाताच्या जागेवर काही क्षणातच उपलब्ध होते. मानवी जीविताच्या सुरक्षिततेची येथे फारच काळजी घेतली जाते. अपघातात सापडलेला तडफडत असताना उगीच आपलं कायद्याच्या कचाट्यात सापडायला नको म्हणून डोळ्यांवर

कातडं ओढण्याची गरज येथे नाही. व तशी आवश्यकता पण नसते. आजूबाजूच्या लोकांकडून तत्क्षणी वस्तुस्थिती जाणून घेतल्यावर त्यांचे काम संपते. उगीच त्यांना नंतर कोर्टात खेटे घालावे लागत नाहीत. रेल्वे सुरू झाल्यापासून या देशात रेल्वेचा एकही अपघात झाला नाही ही एकच गोष्ट तेथील मानवी जिवाच्या अत्युच्च कोटीतील जपणुकीची कल्पना देते.


अपघातासंबंधी माझ्याकडे जरी कुठलीही आकडेवारी नसली तरी अनेक ठिकाणी वावरताना अपघात होऊ नये यासाठी घेतली जात असलेली दक्षता मी बघितली आहे. नागरिकांनासुद्धा रहदारीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बाळकडूच दिलेले असते, त्यामुळे नियम मोडून रस्ता ओलांडणारे अगर सिग्नल सोडणारे येथे मला तरी दिसले नाहीत. चौकात लाल दिवा लागताच गाडी थांबविलीच जाते. मग भले तेथे पोलीस असो वा नसो, किंवा आडव्या रस्त्यावर अजिबात वाहतूक नसो, हिरवा सिग्नल मिळाल्यावरच गाडी सुरू होते.

फॅक्टरीतील काम संपवून मी ट्रेनने इसोगो स्टेशनवर उतरत असे. स्टेशन-पासून साधारणतः ४० मिनिटांच्या चालण्याच्या अंतरावर माझे होस्टेल होते, परत येताना कुठलीच घाई नसे. त्यामुळे कित्येकदा मी पायीच रमत गमत येत असे. त्यामुळे वाटेतील डिपार्टमेंटल स्टोअर्समधील सेल लागलेल्या व आपणास आवश्यक असणाऱ्या वस्तू विकत घेणे शक्य होई. घराकडे परतणारी जनता, हिंडणारी मुले भेटत. वाटेत लागणाऱ्या दुकानांत ठेवलेल्या वस्तू, अनेक जाहिराती व नेहेमीच्या वाटेवरील काही नवीन भर वगैरे आजूबाजूच्या गोष्टी जाता जाता न्याहाळणे मला आवडे. उघडे डोळे व कान माझ्या ज्ञानात बरीच भर घालीत असत. शिवाय चालण्यामुळे व्यायामाचे पुण्यही आपोआप पदरात पडते, म्हणून बऱ्याच वेळा स्टेशनवरून पायीच होस्टेलवर येत असे.

असाच एक दिवस परत येत असताना काही अंतरावरून करकचून ब्रेक दाबल्याचा आवाज आला. काही जण त्या स्थळी धावले. एका वृद्ध महिलेला टॅक्सीचा पुढून धक्का लागला होता. ती वृद्धा रस्त्यावर पडली होती. बाजूने जाणाऱ्या एका स्त्रीने पाणी आणून तशाच अवस्थेत तिच्या मानेखाली हात घालून ते तिला पाजले. दोन स्त्रिया तिला मदत करीत होत्या. टॅक्सीतील उताऱ्याने पण तिला मदत केली. कोणीही तिच्याभोवती कोंडाळे केले नाही. टॅक्सी ड्रायव्हरने टॅक्सीमधील वायरलेस फोनवरूनच लगेच अपघाताची खबर दिली. दोन मिनिटांतच ठराविक आवाज करीत पोलिसांच्या दोन गाड्या येऊन उभ्या राहिल्या. त्यातून काही पोलीस उतरले. प्रत्येकजण सर्कशीतल्याप्रमाणे झटपट आपापल्या कामाला लागले. एकाने त्या बाईला त्या स्थितीतच खाली व वरती ब्लँकेट घातले व थोडी विचारपूस केली. तोपर्यंत दुसऱ्या पोलिसाने रहदारी थोडी बाजूने वळविली. त्या-

साठी त्याने मोटारीतून आणलेले व जोकरच्या टोपीच्या आकाराप्रमाणे असलेले लाल मोठे प्लॅस्टिकचे शंकू ठराविक अंतरावर ठेवले व पुढे ' या मार्गाने जा ' असा बाण दर्शविणारा लाल घडीचा बोर्ड उघडून तेथे ठेवला. त्या ठिकाणी रहदारी नियंत्रणासाठी एक ट्रॅफिक पोलिस पण उभा राहिला. या पोलिसाच्या हातातील बॅटरीच्या दिव्यापुढे एक लांबलचक लाल पारदर्शक व दुसऱ्या बाजूने बंद असलेले नळकांडे होते. त्यामुळे हातात प्रकाशमय लाल मोठी काठी धरल्यासारखे दिसत होते. अपघातातील व्यक्तीची उत्सुकतेपोटी फाजील विचारपूस करण्यासाठी वेळ न दवडिता अपघात झालेल्या रस्त्यावरील त्या बाजूच्या रहदारीचे नियंत्रण हा पोलिस करीत होता. रहदारी थोडी बाजूने वळविली तेव्हा त्या बाजूने जाणाऱ्या गाड्या संथपणे व मधल्या अंदाजे २ ते ३ इंच उंचीच्या रस्ता दुभाजकावरून जात होत्या. प्रत्येक पोलिसाच्या कमरेला वायरलेस सेट अडकविलेला दिसत होता. एकाने त्या वृद्धेच्या भोवती पांढऱ्या खडूने खुणा केल्या. ब्रेकच्या खुणा ड्रायव्हरनेच दाखविल्या व अपघात कसा झाला ते तो एका पोलिसास सांगत होता. पोलिसांनी दोन मिनिटांतच टॅक्सी-ड्रायव्हरची हकीगत ऐकली. काही मुद्दे लिहून घेतले. त्याचे कार्ड बघितले. टॅक्सी-नंबर व ड्रायव्हरचे नाव लिहून घेतले. सोबत आलेल्या फोटोग्राफरने निर-निराळ्या कोनांतून व बाजूने त्या अपघाताचे काही फोटो घेतले. या अपघातात चूक पूर्णपणे त्या वृद्धेची होती. क्रॉसिंग नसताना ती रस्ता ओलांडत होती. मदत करणाऱ्या एका स्त्रीने त्या वृद्धेच्या कोटाच्या खिशातील पत्ता व फोननंबर असलेले तिचे नावाचे कार्ड काढून दिले. ती वृद्धा बऱ्यापैकी ठीक होती. तिला थोडी ठोकर बसली होती. पडलेल्या स्थितीतही ती सांगत होती की मला गाडी दिसली नाही. माझे थोडे चुकलेच. मी चुकून नादात गडबडीने रस्ता क्रॉस करायला गेले . . . वगैरे वगैरे. कुठेच लपवाछपवी नव्हती. बाजूने पायी जाणारे क्षणभर थांबून पुढे जात. मी मात्र एका बाजूला पुढील गोष्टी कशा घडतात हे बघत उभा होतो. थोड्याच वेळात आवाज करीत एक ॲम्ब्युलन्स अपघातस्थळी येऊन धडकली. आतून झटपट स्ट्रेचर बाहेर काढण्यात आला व पोलिसांच्या परवानगीने त्या वृद्धेला स्ट्रेचरवरून ॲम्ब्युलन्समध्ये ठेवले व ती ॲम्ब्युलन्स तिला घेऊन पण गेली. काही क्षणांतच ट्रॅफिक पूर्ववत करण्यात आला. रहदारी पूर्ववत सुरू झाली. अपघात झाल्यापासून हा सर्व कारभार ७–८ मिनिटांत अतिशय वेगाने उरकला.

दुसरा अपघात पण मामुली होता. नेहमीप्रमाणे सकाळी फॅक्टरीत जाण्या-साठी मी बसमध्ये बसलो व पहिल्याच वळणावरून वळून बस उजव्या चढाकडे निघाली होती. तेवढ्यात वरील बाजूकडून एक मेटॅडोर खूप वेगाने खाली येत होती. त्या ड्रायव्हरने जोरात ब्रेक दाबला परंतु तरीसुद्धा आपण चित्रपटात बघतो की ब्रेक दाबलेली गाडी एका बाजूला सरकते अगदी त्याप्रमाणेच या मेटॅडोरची मागील बाजू



ब्रेक दाबल्यामुळे बसचे बाजूला सरकली व आमच्या बसच्या उजव्या बाजूवर आदळली. मी बसमध्ये उजव्याच बाजूला बसलो होतो. मेटॅडोर जोरात खाली येत आहे हे दिसत होते. त्यामुळे टक्कर होणार हे स्पष्ट कळत होते. नंतर दोन्ही गाड्या थांबल्या. आमच्या बस-ड्रायव्हरने गाडीतून उतरण्यापूर्वी, मी नाइलाजास्तव आपला काही वेळ घेत आहे असे म्हणून आम्हा सर्व बस-प्रवाशांकडे जाहीर क्षमा मागितली. दोघांनी एकमेकांना गाडी बाजूला घ्यायला सांगितले. दोघांनी गाड्या बाजूला लावल्या. त्यानंतर त्यांनी एकमेकांच्या गाडीचे किती नुकसान झाले याची पाहणी केली. थोड्या वेळातच दोघांची बोलणी पण आटोपली. सर्वांत शेवटी त्यांनी एकमेकाला वाकून जपानी पद्धतीने स्मित-वदनाने नमस्कार केला व एकमेकांचा निरोप घेतला. वस्तुतः अशा प्रसंगी दोन्ही ड्रायव्हरांनी एकमेकांच्या कित्येक पिढ्यांचा उद्धार करून रस्ता कोणाचा, डोळे तपासणी वगैरेसारखे प्रश्न निकालात काढून वेळप्रसंगी दोन हात करणे अशा सारखे वीरप्रसंग घडवून आणण्याऐवजी त्यांच्या निरोपाचा असा हा मिळमिळीत प्रकार बघून मला काही तरी खटकले व या प्रसंगात कुठेतरी काहीतरी राहून गेले याची उगीचच जाणीव झाली. असो ! बापड्यांना नसेल कळत त्यातली गंमत ! एकंदरीत या प्रकरणामुळे आमच्या बसला एकूण पाच मिनिटे उशीर झाला होता. त्यानंतरच्या प्रत्येक स्टॉपवर बस थांबून प्रवासी आत येत असताना बस-ड्रायव्हर सतत बसला उशीर झाल्याबद्दल दिलगिरी जाहीर करीत होता. सर्वांत शेवटी इसोगो स्टेशनच्या स्टॉपवर बस थांबताच त्याच्या कोटाला असलेल्या माईकवरून त्याने बसला पाच मिनिटे उशीर झाल्या-बद्दल जाहीर माफी मागितली. वस्तुतः यामध्ये सर्वस्वी चूक जरी मेटॅडोरच्या ड्रायव्हरची असली तरीसुद्धा बसमधील प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल आमच्या बस ड्रायव्हरने क्षमायाचना केली होती.

मी प्रत्यक्ष बघितलेले हे दोनच अपघात. टी. व्ही. वर बातम्यांमध्ये मोटारीचे इतर दोन अपघात दाखविले होते. वस्तुतः ते दोन्ही अपघात पूर्वनियोजित असून त्यात आंतरराष्ट्रीय कटातील व्यक्ती व भाडोत्री मारेकरी सहभागी होते. पोलिस अशा गोष्टींचा पूर्णपणे नायनाट करण्यासाठी छडा लावतात. तरी सुद्धा गोष्टी कधीतरी घडतात. परंतु सामान्य जनतेला त्याचा अजिबात त्रास नसतो. अशी माहिती माझ्या एका जपानी मित्राने मला दिली होती.

भूकंपाबाबत बोलायचे झाले तर जपान हा बोलून चालून भूकंपासाठी प्रसिद्ध असलेला देश. एका वक्त्याने आम्हाला भाषणात सांगितले होते, " जपानची जमीन अस्थिर असली तरी जगप्रवास करून टोकिओच्या नारिता एअरपोर्टवर उतरत असताना मला जास्त सुरक्षितता वाटत होती. कारण जपानमधील सततचे भूकंप, वादळ वगैरेसारख्या नैसर्गिक कोपापेक्षा जगाच्या इतर देशांत आलेल्या अनैसर्गिक आपत्तींच्या आठवणी माझ्या मनात फार घर करून राहिलेल्या आहेत. म्हणून मला या हादरत्या जमिनीवर सुद्धा खूप हायसे व सुरक्षित वाटते. " फार बोलके उद्गार वाटले ते —— असुरक्षिततेतील सुरक्षितता !

युनिव्हर्सिटी ऑफ टोकियोच्या डॉ. सुझुकी हिडेओ या प्रोफेसरांनी त्यांच्या भाषणात सांगितले होते की, जपानमध्ये दरवर्षी भूकंपमापन यंत्रावर नोंदले जाणारे असे दहा हजार भूकंप होत असतात. म्हणजेच दररोज २० ते ३० भूकंप नोंदले जातात, तर दर २ ते ३ वर्षांनी एकदा तरी चांगलाच हादरवणारा भूकंप होतो. परंतु या ठिकाणच्या इमारतींच्या बांधकामामध्ये बदल व सुधारणा घडवून आणून भूकंपावर मात करण्यात या लोकांनी यश मिळविले आहे. येथील भिंती अर्थक्वेकप्रुफ आहेत. मी ज्या दिवशी प्रथम होस्टेलमध्ये प्रवेश केला त्याच दिवशी तेथील मार्गदर्शकाने मला सांगितले होते की, भूकंप झाला तरी घाबरून जाऊ नका. कारण येथील इमारती अर्थक्वेकप्रुफ आहेत. इमारतीच्या बांधकामानंतर बांधकाम-खात्यातील तज्ज्ञ मंडळी स्वत: खरोखरच प्रत्यक्ष बांधकामाच्या जागेवर जाऊन घराची संपूर्ण कसून तपासणी करतात. यात कुठेही हलगर्जीपणा केला जात नाही. इमारत राहाण्यास लायक आहे याची पूर्णपणे खात्री झाल्यावरच तशी परवानगी दिली जाते. या कामात कुठेही कुचराई अगर ऑफिसमध्येच बसून नुसते शेरे मारले जात नाहीत. विशेषत: भूकंपाच्या दृष्टीने घर पूर्णपणे सुरक्षित केले असल्याची खात्री पटविली जाते.

१९२३ साली योकोहामाला भूकंपाचा जबरदस्त तडाखा बसला होता. त्यात जवळ जवळ संपूर्ण योकोहामा शहर भुईसपाट झाले होते. इतिहास असे सांगतो की योकोहामाला दर ६० वर्षांनी मोठा भूकंप होतो व त्याप्रमाणे १९८३ या साली मोठ्या भूकंपाचे भाकित केले गेले होते. त्यामुळे लोक मनातून साशंक असले तरी या घरबांधणीतील सुधारणेमुळे निर्धास्त होते.

माझी खोली होस्टेलच्या तिसऱ्या मजल्यावर होती. त्यामुळे मला अनेक भूकंप बऱ्यापैकी जाणवायचे. तरी पण चांगलेच लक्षात रहावेत असे १० ते १२ वेळा तरी भूकंपाचे धक्के मी अनुभवलेले आहेत. काही वेळा एक आवाज होऊन धरणीकंप जाणवत असे, तर काही वेळा सतत सौम्य धक्के बसणे बराच वेळपर्यंत चालू असे. २-३ वेळा तर मी माझ्या खोलीत लिखाण करीत बसलो असता

लिहिणे अशक्य व्हावे इतक्या वेगाने टेबल व खुर्ची चांगलीच गदागदा हलत होती आणि टेबलावरील ग्लासमधील पाण्याच्या पातळीवरील बराच वेळ चालणारी आंदोलने स्पष्ट नजरेत भरत होती. अशावेळी मी काही वेळ थांबत असे व पूर्णपणे कंप थांबल्यावरच पुढे लिखाणास सुरुवात करीत असे. दोन वेळेला तर रात्री या भूकंपाने मला जाग आली होती. तर एकदा या भूकंपामुळे माझा पलंग बराच वेळ सौम्यपणे थरथरत होता व त्यामुळे रात्री झोपणे अशक्य झाले होते. काही लोकांना भूकंप होण्याआधी किंचित् काही वेळ आधी त्याच्या अतिसूक्ष्म संवेदना जाणवतात. याच वर्गात मी मोडतो.

फेब्रुवारी महिन्यात भूकंप वारंवार जाणवत होते. तसेच बहुतेक भूकंप संध्याकाळी अगर रात्री विशेष समजायचे. कारण त्या वेळी आम्ही खोलीत उंचावर निवांत असू तर दिवसा फॅक्टरीतील खालच्या मजल्यावर काम चालू असायचे व फॅक्टरीतील इतर मशीनमुळे सुद्धा भूकंपाची जाणीव व्हायची नाही. कुठलाही भूकंप साधारणतः कमीत कमी १०-१५ सेकंदांपासून ते ४-५ मिनिटांपर्यंत जाणवायचा. काही वेळा सौम्य धक्के सुद्धा वरच्या मजल्यावर स्वतःच्या अस्तित्वाची बऱ्यापैकी जाणीव करून देत. अशा वेळी मी माझ्या रूमच्या बाहेरील कॉरीडॉरमध्ये येताच मला वरच्या मजल्यावरील होस्टेलवासीयांमधील गोंगाट ऐकू यायचा तर खाली लॉबीमध्ये डोकावले असता तेथे कोणाला भूकंपाचा पत्ताही नसायचा. सर्व मंडळी टीव्ही बघण्यात एकदम गुंग असायची. परंतु २७ फेब्रुवारीचा दणदणीत भूकंप मात्र मी कधीच विसरू शकणार नाही.

२७ फेब्रुवारीला आम्ही सर्व लॉबीमध्ये टी. व्ही. बघत बसलो होतो. रात्रीचा साडेनऊचा सुमार होता. टी. व्ही. वर फारच मनोरंजक फिल्म चालू होती. माझ्या पुढेच बंगलोरचा माझा मित्र श्री. नागेश बसला होता. मला भूकंपाच्या संवेदना जाणवू लागल्या तेव्हा मी नागेशला म्हणालो की, तुला हादरल्यासारखे वाटते का ? तेव्हा तो म्हणाला, " छे बुवा ! तुझे आपले......" असे तो म्हणत असतानाच जोरजोरात भूकंपाला सुरुवात झाली. वरील ट्यूब्जचे हेलकावे सुरू झाले. समोर ठेवलेल्या कपाटावरील घंटा जोरजोराने हलू लागली. एका बाजूच्या शोकेसमधील शिरपेचातील तुरा चांगलाच हालत होता. खिडक्यांची काचेची पॅनेल्स गदागदा हलू लागली. तर डायनिंग हॉल व लॉबीचा मधील काचेचा बंद दरवाजा थडाथडा वाजू लागला. संपूर्ण इमारत चांगलीच हादरत होती. अंदाजे चार मिनिटे हा प्रकार सतत चालू होता. आम्हाला इमारतीबाबत खात्री होती तरीसुद्धा आमच्यापैकी काही जण खिडक्यांची काचेची पॅनेल्स उघडून बाहेरच असलेल्या लॉनवर जाऊ पहात होते. जपानमध्ये मी अनुभवलेला हा सर्वांत मोठा भूकंप होता. क्षणभर माझ्यासुद्धा मनात पाल चुकचुकली.

होस्टेलमध्ये लाऊडस्पीकरवरून अनाउन्समेंट होत होती. जपानी मंडळी आम्हा परदेशीयांना धीर देत होती. त्याच दिवशी काही नवीन मंडळी नुकतीच केनियाहून आली होती. ती फारच घाबरून गेली होती. काही जण धावत पळत होस्टेलच्या बाहेर चालली होती. चार मिनिटाने हा हादरा थांबला. लगबगीने वरच्या मजल्यावरील मंडळी घाबरून खाली लॉबीत येत होती. अशावेळी या सर्वांमधून निर्धास्तपणे जात 'घाबरू नका' म्हणून स्वत: जातीने सांगत जाऊन धीर देणारी जपान मंडळी दिसत होती. १९६७ चा कोयनेचा भूकंप मी पुण्यात अनुभवलेला आहे. परंतु त्यात इमारतीबाबत शंका होती. येथे तसे नव्हते. म्हणून मी निर्धास्त होतो. वरे भूकंपातही तग धरू शकतात याचे पूर्ण ज्ञान असल्याने मनात भीती नव्हती. माणसाला एखादी गोष्ट माहीत असली की, माणूस किती निर्धास्त असतो याचेच हे एक उदाहरण आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रातील भूकंपाची बातमी वाचली. फोटो बघितले. काही ठिकाणी खिडक्यांची तावदाने फुटली होती, तर घरातील सामान अंगावर पडून जखमी झाल्यामुळे काही जणांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले होते. २८ फेब्रुवारीच्या जपान-टाइम्समध्ये या भूकंपाबाबत पहिल्या पानावर मोठ्या टाइपामध्ये बातमी छापून आली होती. भूकंप-मापनाबाबत जपानमध्ये त्यांचे स्वत:चे असे जास्तीतजास्त सात हा आकडा असलेले स्केल असून या जपानी स्केल-वर टोकिओ – योकोहामा या विभागातील लोकांनी अनुभवलेल्या या भूकंपाची चार म्हणून नोंद केली गेली होती.

जॅपॅनीज नॅशनल रेल्वेच्या स्वयंचलित आगाऊ भूकंप-सूचना-व्यवस्थेमार्फत आपोआप व त्वरेने टोकायडो, तोहोकु आणि शिकानसेन म्हणजे बुलेट ट्रेन या तीन लाइनवरील विद्युतपुरवठा बंद केला गेला. व या गाड्या जिथल्या तिथे थांबल्या. भूकंपानंतर वरील रेल्वेलाइनची त्वरित तपासणी करण्यात आली होती. या सर्वांमुळे या गाड्या ३० ते ९० मिनिटांपर्यंत खोळंबून राहिल्या होत्या. टोकिओच्या आसपासच्या काही लाइनवरील गाड्यांनासुद्धा भूकंपामुळे थोडा वेळ थांबावे लागले होते.

टोकियोमधील सनसाईन सिटी प्रिन्स हॉटेल या १२० मीटर उंचीच्या ३८ मजली इमारतीतील अनेक परदेशी मंडळी कॉरीडॉरमध्ये धावली, कित्येक जणांची भीतीने चांगलीच गाळण उडाली होती, तर काहींनी हताश होऊन हॉटेलच्या चौकशीच्या काउंटरवर फोन केला होता. हॉटेलमधील जपानी मंडळींनी त्वरेने लिफ्ट आणि इतर सुखसोयींची तपासणी केली व सर्व गोष्टींच्या निर्विघ्नतेबाबत हॉटेलवासीयांची पूर्ण खात्री पटविली. १९८० साली उद्घाटन झालेल्या या हॉटेलने अनुभवलेला हा पहिलाच मोठा भूकंप.

टोकियो येथील हानेडा तसेच नारिता विमानतळावरील सर्व सुविधांच्या सुरक्षिततेची तपासणी करण्याकरिता तेथील वाहतूक काही काळ स्थगित ठेवण्यात आली होती.

अशाप्रकारे बिनधोक व पक्के बांधकाम, स्वयंचलित यंत्रणा, त्वरेने कुठल्याही आलेल्या परिस्थितीस तोंड देण्यास सज्ज असलेली जनता अशा गोष्टीमुळे सर्व प्रकारची हानी टाळली गेल्याचे हे एक जिवंत उदाहरण होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी फॅक्टरीत काम सुरू होण्यापूर्वीसुद्धा भूकंपावर चर्चा झाली. परंतु विशेश उत्सुकतेने त्या विषयावर बोलणारा फक्त मीच होतो. इतरांनी एक बातमी व खरोखरच एक मोठा भूकंप होता एवढेच मान्य केले होते. पण त्यांत एक दोघांशिवाय इतरांनी विशेष काही नाही, नित्याचेच आहे, अशी चर्चा केली होती.

इतर नैसर्गिक आपत्तींबाबत बोलावयाचे झाले तर जपानमध्ये आजही जागृतावस्थेतील साठ ज्वालामुखी आहेत. त्यांतून सतत धूर बाहेर येत असतो. फूजीसान या ३७७६ मीटर उंचीच्या पर्वतातील ज्वालामुखी निद्रितावस्थेतील आहे. या देशात एकूण ३०० च्या वर उष्ण झरे असून त्यामुळे शेतीला उपयुक्त ठरणाऱ्या जमीनीचे प्रमाण घटले आहे.

टेलिव्हिजनवर हवामानासंबंधीचे बातमीपत्र व खरे ठरणारे भाकित अधूनमधून दररोज दिले जाते. थंडीचा मोसम होता व रात्री हवेतील तपमान खूपच खाली येते म्हणून मी प्लॅस्टिकच्या पिशवीला दोन चार छिद्रे पाडून त्यात विकत आणलेली फळे ठेवून ही पिशवी रात्रीच्या वेळी रूमच्या बाहेर गॅलरीत ठेवीत असे. एक नैसर्गिक रेफ्रिजरेटर. एक दिवस पहाटे मी नेहमीप्रमाणे गॅलरीत ठेवलेली फळे घेण्यासाठी होस्टेलमधील माझ्या रूमचे काचेचे पॅनेल सरकविले तर बाहेर चक्क बर्फ पडत होता. संपूर्ण बाहेरील परिसर बर्फमय झाला होता. सोसाट्याचा वारा पण सुटला होता. त्यामुळे खाली येणारे बर्फाचे कण आडव्या दिशेने वाहात होते. होस्टेलच्या परिसरातील बर्फवृष्टीचा या वर्षीचा तो पहिलाच दिवस होता.

मी नेहेमीच्या वेळेला सकाळी बसस्टॉपवर जायला निघालो. रस्त्यावरील मोटारींच्या चाकांच्या खुणेवरून जपून पावले टाकीत बसस्टॉपपर्यंत पोहोचलो. बर्फवृष्टी चालूच होती. अधूनमधून वर धरलेली छत्री झटकायची व कपडेपण. बसस्टॉपवर उभे असताना पाय तर मिनिटागणिक उचलावा लागत होता. नाहीतर बाजूला बर्फ साठायला सुरुवात. समोरच असलेल्या इमारतीच्या पुढील मैदानावर उभ्या असलेल्या मोटारींच्या मागील भागावर साचणाऱ्या बर्फाचे ढपले पाच पाच मिनिटांगणिक खाली पडायचे. त्या दिवशी आमची बस नेहेमीपेक्षा दहा मिनिटे

उशीरा आली. बसच्या वेळेत एका मिनिटापेक्षा जास्त तफावत असण्याची ही माझ्या येथील अनुभवातील पहिलीच वेळ. बसच्या चाकाला साखळ्या होत्या त्यामुळे ती बर्फातून घसरत नव्हती. बस पुढे जात असताना बर्फाने झाकला गेलेला आसमंत दोन्ही बाजूला नजरेत भरत होता. माझी नेहेमीची गाडी चुकली. पुढच्या मिळालेल्या गाडीत तोबा गर्दी होती. गाडीतून जातानासुद्धा झाडे, घरे, स्मशानभूमी, तलाव, टेनिसकोर्ट इत्यादी दुतर्फा दिसणाऱ्या चहूबाजूच्या परिसरात बर्फच बर्फ दिसून येत होते. गाडीतून उतरल्यावर फॅक्टरीपर्यंत जाताना चांगलेच हाल होत होते. वरून बर्फवृष्टी तर खाली फूटपाथवर बर्फाचा चिखल. दोघे-तिघे घसरतानासुद्धा बघितले. पण कोणी पडले नाही. जोराचे वारे सुटले होते. खाली येणारा बर्फ वाऱ्याने भरकटत होता. फॅक्टरीपर्यंत पोहोचलो. तेव्हा १५ मिनिटे उशीर झाला होता. मला वाटले फॅक्टरीत बरेच लोक आज उशीरा येतील. पण बघतो तर काय ? काम अगदी नेहमीप्रमाणे चालू होते. मीच काय तो उशीरा आलो होतो. न राहावून दुपारी जेवणाच्या वेळी माझ्या जपानी दोस्तांपाशी विचारणा करताच तो म्हणाला की जेव्हा बर्फ पडते त्या वेळी आम्ही घरातून नेहेमीपेक्षा लवकर बाहेर पडतो. त्यामुळे फॅक्टरीत किमान नेहेमीच्या वेळेला तरी पोहोचतो. काम चालू होते तेव्हा अधूनमधून कोणीतरी बाहेरील बर्फाचा रिपोर्ट देत असत. दुपारी तीनपर्यंतच्या बर्फवृष्टीनंतर पाऊस सुरू झाला व त्यामुळे तर अगदी कळस झाला. कारण पाऊस फारच तिरपा होता व त्यात खाली फूटपाथवर बर्फ ! त्यामुळे बर्फाचा राडा झाला होता. तसेच बर्फ झटकला की जातो. पण पाऊस मात्र ओलाचिंब करून सोडतो. त्यात गार वारे. दुपारच्या चहाच्या सुट्टीच्या वेळेत मी काचेच्या खिडकीतून बाहेर बघितले. धवल प्रदेश नजरेत भरला. पाऊस कोसळत होता. समोरूनच गेलेल्या रेल्वेचे रूळ सोडून बाकी सर्व प्रदेश बर्फमय होता. डोक्यावर बर्फ धारण करणाऱ्या गाड्या, रुळावरून ये–जा करीत होत्या. फॅक्टरी सुटल्यावर जपून पावले टाकीत मंडळी घराकडे परतत होती.

जानेवारीच्या, विशेषत: शेवटच्या आठवड्यात थंडी फारच होती. बाहेर पडताना शरीरावर भरपूर कपड्यांचे ओझे असायचे.

फेब्रुवारीच्या सुमारास सैबेरियाकडून थंड व बोचरे वारे जपानवरून वहात. एकदातर रात्री आठ वाजता फॅक्टरीतून घरी परतत असताना वाटेत फार जोराचे गार वारे सुटले होते. इतके की मेंदूला झिणझिण्या येत होत्या व ओकारी आल्यासारखे वाटत होते. प्रत्येक श्वासाबरोबर भरपूर पांढरा धूर बाहेर पडताना स्पष्ट दिसत होता.



थंडीमुळे रस्त्यातील झाडे मरू नयेत म्हणून कित्येक ठिकाणी त्यावर मोठे प्लॅस्टिकचे आवरण घातलेले दिसले. पक्षी मात्र कोठेही नजरेस पडले नाहीत.

भाषणात डॉ. सुझुकी हिडेओ यांनी विनोदाने असे सांगितले होते की, होक्कायडो या विभागात इतकी बर्फवृष्टी होते की, काही ठिकाणी पाटी लावायची पाळी येते की रस्त्यावरून वहाने जपून चालवा, खाली दुमजली वर आहे.

योकोहामाचे कमीत कमी तपमान फेब्रुवारीच्या सुमारास अंदाजे ४° से. असते. परंतु एकेवर्षी ते– ८.२° से. पर्यंत पोहोचले होते अशी नोंद आहे. फेब्रुवारीनंतर थंडी कमी झाली तरी एप्रिलपर्यंत तपमान २०° से. चे आतच असते. त्यामुळे मी अनुभवलेला नोव्हेंबर ते एप्रिल हा कालावधी थंडीचाच मोसम होता. एप्रिलनंतर साकुराचे आगमन झाले, हवा उबदार होऊ लागली व जपानमधील वसंताच्या आगमनाची चाहूल लागली.

पावसामुळे आणि बर्फवृष्टीनंतर हळूहळू वितळणाऱ्या बर्फामुळे येथील नद्या सर्वकाळ जलमय असतात. भाषणात आम्हाला असेही सांगितले होते की, जून महिना हा जपानमध्ये पावसाचा महिना असून प्रवासी लोक हा महिना टाळतात. जूननंतर म्हणजे जुलै-ऑगस्ट मध्ये पॅसिफिक महासागरावरून येणाऱ्या उष्ण

वाऱ्यामुळे येथील तपमान काहीवेळ ४०° से. पर्यंत जाते.

अशाप्रकारे वर्षभरात अती थंडीपासून ते अती ऊष्णापर्यंत सर्व प्रकारचे अनुभव या प्रदेशातील लोकांना येत असतात.

## तोत्सुका शहराचे आमंत्रण :

योकोहामातील सर्वांत मोठे क्षेत्रफळ असलेल्या वॉर्डचे नाव आहे तोत्सुका. वस्तुत: जपानी लोक ज्याला वॉर्ड म्हणतात ती मोठमोठी गावेच आहेत. रेल्वेने जाताना सातत्याने घरे सोबत करीत असतात, त्यामुळे एक गाव संपले व दुसरे सुरू झाले हा प्रकारच येथे नाही. म्हणून सोईच्या दृष्टीने त्यांना गाव म्हणण्याऐवजी वॉर्ड म्हटले जाते एवढेच. आम्ही रहात असलेले इसोगो हे सुद्धा योकोहामातील एक वॉर्डच आहे. तोत्सुका हे जपानमधील एक ऐतिहासिक प्रसिद्ध ठिकाण असून १२ व्या व १३ व्या शतकामध्ये तोत्सुका हा एक महत्त्वाचा जिल्हा होता. इतिहासकालातील क्योतो ते तोक्यो हा राजमार्ग तोत्सुकामधूनच गेला होता.

तोत्सुका नगर आणि इन्टरनॅशनल रिलेशन्स डिव्हिजन ऑफ दि सिटी या दोघांमार्फत योकोहामा नागरिक आणि काही परदेशी मंडळी यांच्याकरिता तोत्सुका शहराच्या संयुक्त भेटीचा कार्यक्रम रविवारी १३ मार्चला आयोजित करण्यात आला होता. या भेटीचे मला निमंत्रण आले होते.

इसोगोहून तोत्सुका गावी जायला दोन मार्ग होते. दोन्ही मार्गांमध्ये एकदा गाडी बदलावी लागत होती. दररोज मला फॅक्टरीतून घेऊन येणारी गाडी पकडून इसोगोहून ओ-फूना या गावी जाऊन तेथे गाडी बदलून तोत्सुकाला जाणे असा प्रवास मी पसंत केला. कारण या मार्गाच्या दुतर्फाचा भाग पूर्वी मी कधीच न्याहाळला नव्हता. इसोगो स्टेशनवरून 'ओ-फुना'ची गाडी पकडली. आजूबाजूचा नवीन परिसर बघायला बरे वाटत होते. वाटेत एका ठिकाणी तर पुण्याच्या पर्वतीप्रमाणेच टेकडी होती. त्यावर सुंदर घरे होती. पुढे काही वेळाने एका इमारतीच्या गच्चीवर मोटारींचा पार्किंग विभाग दिसत होता. मोटार गच्चीवर अगर रस्त्यावर नेण्यासाठी इमारतीभोवती घाटासारखा मार्ग होता. आश्चर्य वाटले. ओ-फूना या ठिकाणी उतरून योकोहामाकडे जाणारी गाडी पकडली. गाडी सुरू झाली व दुसरेच स्टेशन होते तोत्सुका.

आमच्या होस्टेलमधून येथे येणारा मी एकटाच होतो. तोत्सुका स्टेशनवर उतरलो. पावसाची रिमझिम चालू होती. निमंत्रणपत्रिकेसोबत दिलेल्या नकाशाप्रमाणे कुठेही न विचारता बरोबर तोत्सुकाच्या सेंटर हॉलमध्ये पोहोचलो. थोड्या वेळातच आम्ही एकूण पन्नास जण तेथे जमलो. अमेरिका, न्यूझिलंड, भारत, ब्राझिल, अर्जेंटिना, पेरू, सिंगापूर, पाकिस्तान, फिलीपाईन्स येथील परदेशीयांबरोबरच अनेक

स्थानिक जपानी मंडळीसुद्धा या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाली होती. सुरुवातीला आम्हाला काही माहितीपत्रके देण्यात आली.

ठरलेल्या वेळी आम्ही सर्वजण तोत्सुकाच्या भेटीसाठी एका बसने निघालो. सुरुवातीला १२३४ साली बांधलेल्या 'शो बोदाई-जी टेम्पल' मध्ये गेलो. तेथे बुद्धाच्या दोन सुंदर मूर्ती लक्ष वेधून घेत होत्या. मंदिरातील मुख्य धर्मोपदेशकाने त्या मंदिराचा इतिहास सांगितला. तेथून बसने 'होन्को-जी टेम्पल'कडे निघालो. जाताना वाटेत दुतर्फा दिसणाऱ्या तोत्सुकांची ओळख करून दिली जात होती. क्योतो ते तोक्यो या राजरस्त्यावरील ओळीने लावलेले पाईन वृक्ष नजरेत भरत होते. नागाओ फोर्ट हा १६ व्या शतकातील गाजलेला किल्ला दिसला. अमेरिकेच्या नाविकदलाचा रेडिओ ट्रॅन्समिटिंग स्टेशनचा भला मोठा परिसर लागला. तेथे अनेक प्रकारच्या अँन्टेनाज् दिसत होत्या. तोत्सुकाभोवती अनेक गार्डन्स व टेम्पल्स आहेत. 'जोसेन-जी टेम्पल 'च्या मागे एक गुंफा असून त्यामध्ये बुद्धाची कोरीव प्रतिमा आहे. पुरातन काळी धर्मोपदेशकांना प्रशिक्षण देण्यासाठी या वास्तूचा उपयोग होत होता. वाटेत इतरही अनेक ऐतिहासिक ठिकाणे लागली. तासाभराने 'होन्को-जी टेम्पल' या मंदिरात पोहोचलो.

तोत्सुकामधील होन्को-जी टेम्पल हे एक महत्त्वाचे मंदिर आहे. येथील ८७ वर्षांच्या धर्मोपदेशकाने आम्हा सर्वांचे मंदिरात स्वागत केले. त्यांच्या वृद्ध व संथ जपानी वाणीमध्ये त्यांनी मंदिराची माहिती दिली. या मंदिराला सुद्धा प्राचीन इतिहास आहे. मंदिराची मुख्य कमान ही नुकतीच म्हणजे २०० वर्षांपूर्वी बांधण्यात आली असून मंदिराचा मुख्य गाभारा ११५ वर्षापूर्वीचा आहे. मंदिराच्या दर्शनी भागात फार सुंदर कोरीव काम केले आहे. व त्यामध्ये बुद्ध आणि निचिरेन यांची जीवनगाथा कोरली आहे.

होन्को जी मंदिराच्या आवारात 'मोचीत्सुकी' म्हणजे तांदळाचा केक करणे हा कार्यक्रम पार पाडला. यात तांदळाचा लगदा एका मोठ्या लाकडी खलामध्ये लाकडाच्या मोठ्या हातोडीने कुटला जातो. प्रत्येकाने या हातोडीने खलामधील लगद्यावर घाव घालायचा. घाव घालताना जपानी मंडळी टाळी वाजवून मिचित्सुकी असे काहीसे म्हणत होती. यात आम्ही जास्त संख्येने भाग घ्यावा यासाठी तत्पर जपानी मंडळी आम्हास प्रोत्साहन देत होती. अनेक पाहुण्यांनी यात आनंदाने भाग घेतला. यानंतर तेथेच साके या जपानी लोकांच्या आवडत्या मद्याच्या बंद लाकडी पिपाचे एका अमेरिकनाचे हस्ते समारंभपूर्वक उद्घाटन करण्यात आले. हे पिप उघडल्यावर उद्घाटन करणाऱ्याने एका जपानी महिलेबरोबर हातात हात घालून लहानशा लाकडी वाडग्यातील साके दोघांनी एका घोटात संपवायची असते. तो पण कार्यक्रम झाला. प्रत्येकाला एका लहानशा चौकोनी लाकडी वाडग्यातून



साके देण्यात आली. साके प्राशन करण्यापूर्वी या वाडग्याच्या काठावर मिठाची कणी लावण्यात येत होती. शेवटी हा वाडगा पावित्र्याचे प्रतिक म्हणून त्या मंदिरामार्फत प्रत्येकाला भेट देण्यात आला.

दुपारी मंदिराच्या मागील मोठ्या हॉलमध्ये तोत्सुकाच्या होशी महिला-मंडळाने बनविलेल्या मिष्टान्न भोजनाचा कार्यक्रम होता. जेवणामध्ये अनेक चविष्ट पदार्थ होते. ' श्योजीन-योरी ' हा जपानी मंदिरातील विशिष्ट प्रसादसुद्धा दुपारच्या या मिष्टान्न जेवणामध्ये समाविष्ट होता. एका तासापेक्षाही जास्त वेळ, खेळीमेळीत चाललेल्या या भोजन-कार्यक्रमामुळे पाहुणे मंडळी चांगलीच तृप्त झाली होती.

दुपारच्या जेवणानंतर याच ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. एका बाजूला जपानी पुष्परचनेचा नमुना सादर करण्यात आला. दोन जपानी युवती दोन वेगवेगळ्या पुष्परचना करीत होत्या. तर त्या वेळी दुसऱ्या बाजूला तोत्सुकाच्या काही संगीतप्रेमी लोकांतर्फे पारंपरिक वाद्यवृंदाचा कार्यक्रम चालू होता. यात कोटो, शामिसेन आणि शाक्युहाची ही वाद्ये होती. आमच्या

पैकी काहींनी ही वाद्ये वाजविण्याचा प्रयत्न केला. एका बाजूला सहजपणे पुष्परचना सुंदर आकार घेत होती तर दुसऱ्या बाजूला संगीताचे सूर छेडले जात होते. एकंदरीत ते वातावरण खूपच भारले गेले होते. दिवसभराच्या कार्यक्रमातील रंगत सातत्याने वाढतच होती. यानंतर जपानी टी-सेरिमनी ऊर्फ चहाचा कार्यक्रम झाला. नुसता आपला 'घेतला कप व लावला ओठाला' हा प्रकार नव्हता. त्या-मध्ये सुद्धा एक जपानी आदब ओतलेली होती. या कार्यक्रमाला यजमान म्हणून एक जपानी कारखानदार आले होते. एका बाजूला चहा तयार करणाऱ्या त्या जपानी महिलेच्या हालचाली अगदी यंत्रबद्ध, रोबोटप्रमाणे होत होत्या. आम्हा पाहुण्यांना विशिष्ट पद्धतीने चहा पेश करण्यात आला. टी-सेरिमनीनंतर आमच्या दिवसाच्या कार्यक्रमाचा तिसरा अंक सुरू झाला.

हॉटेलचे बाहेर आम्हा सर्वजणांचा एक ग्रुप फोटोचा कार्यक्रम पार पडला. नंतर हॉलमध्ये एकत्र आलो. आम्हा प्रत्येकाला एक प्रश्नमंजुषा देण्यात आली. एकंदरीत आजचा कार्यक्रम कसा वाटला, आपल्या प्रतिक्रिया व सूचना वगैरे त्यात नमूद करावयाच्या होत्या. त्यानंतर 'आजच्या कार्यक्रमावर माझे विचार' यावर प्रत्येकाने आपले मत व्यक्त केले. प्रत्येकाने स्वतःची ओळख करून दिली व या कार्यक्रमासंबंधीचे विचार मांडले.

या शेवटच्या कार्यक्रमाच्या वेळी काही विशेष गोष्टींची माहिती झाली. एक स्त्री तिच्या मुलीबरोबर या सहलीत सहभागी झाली होती. तिची आई व्हिएटनामी व वडील फ्रेंचमन होते, तर नवरा जपानी होता. आणि कामानिमित्ताने तो कधी स्वित्झर्लंड तर कधी जर्मनीमध्ये असतो. त्यामुळे मुलीचे शिक्षण कधी इंग्रजीतून तर कधी जर्मन भाषेतून झाले व सध्या ही मुलगी गेले पाच वर्षे जपान-मध्ये जपानीतून शिक्षण घेत आहे. आईला जपानी भाषा विशेष येत नाही. या स्त्रीची मुंबईत राहाणारी एक भारतीय मैत्रीण आहे. या स्त्रीने मला भारतीय पक्वान्ने फारच आवडतात हे आवर्जून सांगितले.

दुसरी एक १३ वर्षांची मुलगी एकटीच या कार्यक्रमाला आली होती. तिची आई जपानी व वडील जर्मन होते. ती फ्रेंच, जर्मन, जपानी व इंग्रजी या चारही भाषा उत्कृष्टपणे बोलत होती.

मिस् अडवानी ही एक सिंधी भाषी २० वर्षांची मुलगी पण या कार्यक्रमात होती. भारताच्या फाळणीनंतर तिचे वडील कराचीहून मुंबईला आले, त्यांनी तेथे विवाह केला व त्यानंतर गेली २५ वर्षे तिचे आई-वडील जपानमध्येच वास्तव्य करून आहेत. तिचा जन्मपण जपानमधलाच परंतु तिला सुद्धा दर तीन वर्षांनी परदेशी लोकांची जपानमध्ये नोंदणी होते. त्या नोंदणीकार्डाचे नूतनीकरण करावे लागते.

ग्रंथालय ठाणे
५३४

कार्यक्रमाच्या वेळी एका अमेरिकन गृहस्थाने मला चक्क मराठीत विचारले 'तुम्हाला मराठी येते का?' मी पार उडालो. एका अमेरिकनाच्या तोंडी मराठी भाषा व ते पण जपानमध्ये. पुढे चर्चेच्या ओघात त्याने सांगितले की, तो पूर्वी दोन वर्षे भारतात पालघरला पीस कोअर तर्फे राहिला होता. सध्या जपानमध्ये वास्तव्य करून आहे व पुन्हा एकदा भारतात येणार आहे.

न्यूझिलंड वकिलातीतील एक जण ओळीने दोन वर्षे पूर्णवेळ जपानी भाषा शिकण्यासाठी जपानमध्ये वास्तव्य करून होता व त्यानंतर त्याची वकिलातीतील सर्व्हिस सुरू होणार होती.

एका अमेरिकन स्त्रीने भाषणाचे वेळी सांगितले 'जगात मला कुठेही न भेटलेली अशी निरागस, आदर-सत्कार करणारी, नम्र, अतिशय सचोटीने वागणारी व सहवासाने प्रेम निर्माण करणारी माणसे मी फक्त याच देशात बघितली व आता तीन वर्षांच्या सहवासानंतर लवकरच मी त्यांना सोडून माझ्या देशात परतणार आहे. या लोकांशी होणाऱ्या वियोगामुळे मला फार दु:ख होत आहे.' तिचे हेलावून सोडणारे शब्द हृदयाला भिडत होते. तिच्यासकट अनेकांच्या डोळ्यांत पाणी तरारले होते.

एकंदरीत हा मेळावा, अपेक्षेपेक्षा खूपच यशस्वी झाला होता. बसमध्ये परदेशी प्रवाशांबरोबर जपानी नागरिकांची बसण्याची व्यवस्था होती त्यामुळे तोत्सुकाच्या ऐतिहासिक माहितीबरोबरच जपानी संस्कृतीची पण जाता जाता माहिती घेणे सुकर झाले. माझ्या शेजारी एन्. ई. सी. कंपनीतील नाकोयोमा नावाचा एक जपानी इंजिनिअर बसला होता. तो अनेक देश हिंडला होता. त्याला इंग्रजी सुद्धा चांगले बोलता येत होते. गप्पांच्या ओघात तो म्हणाला की परदेशी लोकांशी व्यवहार करताना जपानी लोक फार लाजाळू आहेत असे परदेशी लोकांचेच नव्हे तर खुद्द जपानी लोकांचे सुद्धा हेच मत आहे. परंतु याचे त्याने सांगितलेले प्रमुख कारण म्हणणे सर्वसामान्य जपानींना इंग्रजी भाषा न येण्यामुळे ते बोलणे टाळतात, दुसऱ्याला महत्त्व देतात व स्वत: पळ काढतात. त्यामुळे ते जास्त लाजाळू वाटतात.

जगाच्या निरनिराळ्या ठिकाणांहून त्या कार्यक्रमाला जमलेलो आम्ही त्या दिवशी एकत्र आलो व एका आनंदीयात्रेत सहभागी झालो. एकत्र गप्पागोष्टी केल्या व पुन्हा आपापल्या दिशेने दूर गेलो. पुन्हा भेटू किंवा नाही हे काळच जाणे. परंतु सुंदर रीतीने आखणी केलेल्या त्या दिवसाच्या कार्यक्रमातील सततच्या आनंदी वातावरणामुळे आमचा तो दिवस एका उत्सवाप्रमाणेच साजरा झाला होता.

## मला भेटलेल्या गमती-जमती :

आत्तापर्यंतच्या वाचनात आश्चर्य वाटावे अशा हकिगती आढळल्या असतीलच परंतु काही गमती-जमतींचा निराळा असा उल्लेख करावासा वाटतो.



१४ फेब्रुवारीचा तो दिवस होता. फॅक्टरीत गेल्यावर थोड्याच वेळात दिवसाच्या नेहमीच्या कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वी फॅक्टरीतील एका मुलीने मला 'पॉप आय-ऑलिव्ह' या 'मेड इन यु. एस. ए.' च्या एका सुंदर चॉकलेटचे बॉक्स भेट म्हणून दिले. सोबत एक चिठ्ठी पण दिली. चिठ्ठीत विशेष खास असा मजकूर नव्हता. तिला भारताबाबत व हिंदू धर्माबाबतची उत्सुकता होती. पुनर्जन्माबाबतचे तिचे विचार तिने त्यात मांडले होते. बस्स इतकेच ! दुपारी जेवणाच्या वेळी सुगीमोतो या माझ्या बरोबर जेवण घेणाऱ्या मित्राने सांगितले की आज 'व्हॅलेंटाईन डे' आहे. या दिवशी मुली आपल्याला आवडलेल्या व्यक्तीला चॉकलेट देतात. त्या व्यक्तीला पण ती मुलगी आवडली असेल व त्याला तिच्याशी दाट मैत्री ठेवणे पसंत असेल तर तो पण बरोबर पुढच्या महिन्याच्या त्याच तारखेला तिला चॉकलेट देतो व अशाप्रकारे हा खास मैत्रीचा गुप्त संदेश तिच्यापर्यंत पोहोचून चक्र पूर्ण होते. त्याचे रूपांतर पुढे मैत्री–कम–प्रेमात होते. अशा प्रकारे मैत्रीच्या पेरणीचा तो दिवस असतो. मल वाटले सुगीमोतो माझी फिरकी घेतोय. म्हणून मी तिकडे दुर्लक्षच केले व विसरूनही गेलो. त्या दिवशी रात्री मी होस्टेलच्या लॉबीमध्ये टी. व्ही. बघत जेवण घेत होतो. स्वीट डीश ऐवजी टेबलावर बाजूस त्या चॉकलेट बॉक्समधील चॉकलेट होते. होस्टेलमधील माझा जपानी मित्र फाकुदा माझ्याकडे येत होता व टेबलावरील चॉकलेट बघून तो हसत हसत म्हणाला, 'कुठल्या मुलीने दिले ?' व 'व्हॅलेंटाईन डे' ला चॉकलेट दिले याचा अर्थ "आय लव्ह यू .. वगैरे वगैरे" असा होतो असे त्याने मला सांगतले. पुढे त्याने सुगिमोतोपेक्षाही त्या दिवसाच्या गंमतशीर हकिगती सांगितल्या. मनातील प्रेम मुलींतर्फे प्रथम प्रगट होणे व महिन्याभराच्या विचारानंतर त्याला येणारा प्रतिसाद हा प्रकारच मला गंमतशीर वाटला. त्यामुळे प्रेमाच्या देवाण-घेवाणीतील सुरुवातीचा होकार अथवा नकार एका दर्जेदार पद्धतीने साकार होतो हे विशेष जाणवले.

टोकियो केन्द्यु सेंटर (टी.के.सी.) या योकोहामा केन्द्यु सेंटर (वाय.के.सी.) शीच संबंधित असलेल्या होस्टेलमध्ये जाण्याचा दोनतीन वेळा योग आला. तेव्हा तेथील व्हिडीओ लायब्ररी बघितली. व्हिडीओ लायब्ररीचा वापर करण्यासाठी तेथे एक हॉल आहे. या हॉलचे एकूण बारा लहान लहान भाग पाडलेले आहेत. या प्रत्येक भागात एक टेबल व त्या समोर एक खुर्ची होती. टेबलावर एक टी .व्ही. सेट व व्हिडीओ लायब्ररीचा वापर कसा करावयाचा याची थोडक्यात माहिती होती. लायब्ररीतील व्हिडीओ फिल्मची नावे, एकूण त्या फिल्मचा कालावधी, फिल्मची भाषा व त्या फिल्मचा कोड नंबर याचे पुस्तक पण टेबलावर होते. टेबलावरील बटणां-मार्फत हा कोड नंबर दाबताच काही वेळातच आपोआप समोरील टेबलावरील टीव्ही वर ती फिल्म सुरू होते. टेबलासमोरील खुर्चीवर पाठीमागे डोके टेकताच खुर्चीच्या डोके ठेवायच्या भागातील दडलेल्या स्पीकरमधून फिल्ममधील आवाज ऐकू येतो. याच बिल्डिगच्या तळघरात असलेल्या व्हिडीओ लायब्ररीतील चार रोबोटमार्फत लायब्ररीचे कार्य आपोआप चालविले जाते. आपण निवड केलेली फिल्म आपोआप रॅकमधून काढून रेकॉर्डरमध्ये ठेवून योग्यवेळी ती सुरू करणे; फिल्म मधेच बंद केली अगर फिल्मचा शेवट आला तर पुन्हा गुंडाळून रेकॉर्डमधून काढून पूर्ववत रॅकवर ठेवणे वगैरे कामे या रोबोटमार्फतच केली जातात. एकावेळी बारा निरनिराळ्या फिल्म्स या वेगवेगळ्या भागांतील टीव्ही वर बघता येतात. जपानी, इंग्रजी, डच, हिंदी, फ्रेंच, जर्मन वगैरे आंतरराष्ट्रीय भाषांतून डब केलेल्या काही फिल्म्समुद्धा या लायब्ररीत होत्या.

फॅक्टरीत जाताना सकाळी सात वाजून सात मिनिटांची गाडी असोगोहून निघून तीन मिनिटांतच पुढील नेगीशी या स्टेशनवर येत असे, तेव्हा उजव्याच बाजूला रुळावरून संथ गतीने जाणारी एक डबल डेकर रेल्वे आम्हाला दररोज दिसत असे. विजेचे इंजिन नसलेल्या या गाडीला एकूण एकवीस डबे होते. गाडीचा प्रत्येक डबा म्हणजे लोखंडी पुलासारखा सांगाडा असून त्यात वरती चार व खाली चार अशा एकूण आठ नव्या करकरीत, जपानमधून निर्यात करावयाच्या मोटारी असत. ही गाडी संथ गतीने योकोहामा बंदराकडे चाललेली असायची. दररोज नियमित ठराविक वेळी व ठराविक ठिकाणी दिसणाऱ्या या मोटारींवर कुठलेच आच्छादन नसायचे. त्यामुळे विविध रंगांच्या या चकचकीत मोहक मोटारी लक्ष वेधून घेत असत.

मिताकाशी या टोकियो जवळील विभागात मला एका मित्राच्या घरी जावयाचे होते. मित्राचा पत्ता माझ्याजवळ होता. परंतु त्याचे घर हुडकावयाचे होते. मी मिताकाशी स्टेशनवर उतरलो व स्टेशनच्या बाहेरच असलेल्या पोलिस-चौकीत गेलो. तेथील पोलिस-अधिकाऱ्याने नेहमीच्या ठराविक जपानी पद्धतीने

स्मित वदनाने वाकून स्वागत केले. तेथे मित्राचा पत्ता सांगताच त्यांनी या वॉर्ड-मधील लहान लहान भागांचे सविस्तर नकाशांचे पुस्तक काढले व अतिशय बारीक सारीक खुणांसकट मुद्देसूद पत्ता सांगितला. त्यानंतर वाटेत कोणालाही तो पत्ता विचारायची गरज पडली नाही. मी थेट मित्राच्या घरापाशी पोहोचलो. जो प्रश्न घेऊन चौकीत गेलो होतो, त्याचे थोड्याच वेळात योग्य उत्तर घेऊनच मी बाहेर आलो. पोलिसखात्याकडून सहकार्याची अपेक्षा ठेवणे व त्याची परिपूर्ती होणे ही गोष्ट मला समाधान देऊन गेली.

माझ्या रूममधील खुर्चीतून बाहेरील रस्त्यावरून दृश्य स्पष्ट दिसायचे. सुरुवातीच्या दिवसांत कित्येकदा संध्याकाळी मी रूममध्ये अभ्यासाला बसायचो त्या वेळी एक फेरीवाला आपल्या मेटॅडोरसारख्या गाडीमधून जात असे. त्याची गाडी रस्त्यावरील काही ठिकाणीच फक्त थांबत असे व त्यामधून तो आसपासच्या ग्राहकांना व विशेषत: गृहिणींना दररोज लागणाऱ्या सामानाची विक्री करीत असे. गाडीच्या मागील भागातच त्याचे दुकान असे. तोच ड्रायव्हर व तोच दुकानदार – वन मॅन शो. त्याचा मालही सुपर मार्केटपेक्षा स्वस्त मिळे. रस्त्यावरून जाताना त्याच्या गाडीमध्ये लावलेल्या कॅसेटवरून त्याचे अस्तित्व जाणवे. गाडीवरील लाऊडस्पीकरमधून आसमंतात पसरणारे अतिशय सुंदर व मंद आवाजात लावलेले वाद्यसंगीत मला फार आवडे. दोन वेळा तो रस्त्यावरून जाताना दिसताच रूम बंद करून, खाली येऊन त्याला गाठण्याचा मी प्रयत्न केला, परंतु दोन्ही वेळा ते निष्फळ ठरले. एक दिवस बाहेरून होस्टेलकडे परतत असता, अचानक वाटेत एका ठिकाणी त्याची गाडी उभी असलेली मला दिसली. लाऊडस्पीकरमधून बाहेर पडणारे वाद्यसंगीत आसमंतात मधुरता पसरवीत होते. मी त्याच्या गाडीजवळ जाऊन उभा राहिलो. मी आपला त्याच्याकडून प्रथम उगीचच ब्रेड घेतला व तो ब्रेड देत असताना त्या संगीताबद्दल विचारणा केली. माझी त्या संगीताबद्दलची उत्सुकता बघून तो गाडीच्या मागील भागातून उतरला व गाडीच्या पुढील भागातील स्टिअरिंग व्हील शेजारच्या रेकॉर्डरमधील कॅसेट काढून मला भेट देऊ लागला. तेव्हा मी त्याला सांगितले की, मी ही कॅसेट माझ्या दुसऱ्या कॅसेटवर टेप करून तुला लगेच देईन. परंतु त्याने त्यास नकार दिला व म्हणाला, "नाही ! नाही ! ही कॅसेट माझ्याकडून तुम्हाला भेट म्हणून देत आहे व कृपया तुम्ही ती स्वीकारावी. माझ्याकडे याच संगीताच्या अजून एक दोन कॅसेट्स् आहेत." वस्तुत: ना ओळख ना पाळख. परंतु त्या विक्रेत्याने फारच आग्रहाने देऊ केलेली कॅसेट सुरुवातीचा माझा नकार मागे घेऊन मला घेणे भाग पडले. 'निदान मोकळ्या कॅसेटचे तरी तू पैसे घेच.' या माझ्या विनंतीचा त्याने फारच नाइलाजास्तव स्वीकार केला. मी त्या कॅसेटबद्दल दिलेल्या हजार येनपैकी फक्त दोनशे येन ठेवून बाकीचे पैसे त्याने माझ्यामागे धावत येऊन मला परत दिले.

सर्व डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा रोल दरवाज्या-जवळच ठेवलेला असतो. त्याला किंमत पडत नाही. काड्यापेटचा हे तर जाहिरातीचे एक साधन असून कित्येक स्टेशनांच्या बाहेर, हॉटेलमध्ये, फॅक्टरीत, दुकानात अशा अनेक ठिकाणी त्या विनामूल्य मिळतात. एअरमेल पेपर, पाकिटे, पेपर पॅड व जाहिरात करता येतील अशा अनेक वस्तू हॉटेल व लॉजमधून काउंटरवर मोफत दिल्या जातात

आपल्याकडे काही जैन लोक ज्याप्रमाणे तोंडात हवेतील जंतू जाऊन हिंसा होऊ नये म्हणून तोंडावर मास्क लावतात, तद्वत् जपानी लोक सर्दी झाली तर नाक व तोंड झाकणारे मास्क लावतात. यामुळे आपल्या सर्दीचा दुसऱ्याला उपसर्ग होत नाही. तसेच या मास्कच्या आतून औषध शिपडलेले असल्याने सर्दी लवकर बरी होण्यास मदत होते. परंतु असे मास्क लावून सुटाबुटातील हिंडणारी जपानी मंडळी बघितली की, काहीसे गंमतशीर वाटायचे. माझा फॅक्टरीतील मित्र ओवरा म्हणायचा की हे " kiss me not " मास्क आहे.

जपानी स्त्री किमोनोमध्ये जास्तच सुंदर दिसते. परंतु या स्त्रियांच्या काही किमोनोचा तळाचा घेर फारच कमी असतो. जेमतेम पावलास पाऊल चिकटेल एवढाच. त्यामुळे किमोनो घालून भरभर चालताना त्या फार मजेशीर दिसतात.

जपानी लोकांत एक मजेशीर खेळ खेळला जातो. ज्या वेळी तीन लोकांमधून ओळीने एक-दोन-तीन असे क्रमांक ठरवायचे असतात, त्या वेळी ते हा खेळ खेळतात. या खेळात फक्त उजव्या हाताचा वापर करतात. हाताची मूठ हे दगडाचे प्रतीक म्हणून समजले जाते. तर हाताचा उघडा पंजा कागद आणि फक्त आंगठ्या-जवळील दोन उघडी बोटे म्हणजे कात्री असे समजतात. कात्री व कागद यांत कात्री श्रेष्ठ. कारण कात्रीने कागद कापला जातो. कागद व दगड यांत कागद श्रेष्ठ. कारण कागदाने दगड झाकला जातो. तर कात्री व दगड यांत कात्रीने दगड कापला जाऊ शकत नाही म्हणून दगड श्रेष्ठ. प्रथम कोणीही दोन व्यक्तींनी जां-केन-पॉ असे म्हणून वरीलपैकी हाताच्या पंजाच्या सहाय्याने कुठली तरी एक खूण करावयाची व जो जिंकेल त्याने उरलेल्याशी खेळावयाचे व अशा प्रकारे पुन्हापुन्हा हा खेळ खेळून त्यांच्यामध्ये ओळीने क्रमांक लावले जातात.

या गमती-जमतींची यादी तशी बरीच मोठी आहे. खास बैठकीतल्या सुद्धा अनेक आहेत परंतु वानगी दाखल म्हणून वर काही नमूद केल्या आहेत.

## जपानी माणसे – एक अवलोकन –

'प्रतिकूल परिस्थितीतील प्रगतिशील प्रतिभावंतांचा प्रदेश' म्हणजे जपान. 'पॅसिफिक महासागरातील बेटांचा एक चिमुकला समूह,' हे झाले या प्रदेशाचे

भौगोलिक वर्णन. परंतु याच बेटांवर वस्ती करून आहे याच जगातील एक सजीव आश्चर्य – ' जपानी माणूस. ' इतिहासात याचा वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख आढळतो – कधी युद्धामध्ये तर कधी उद्योगधंद्यामध्ये. यामुळे त्याने सर्व बाजूने इतर देशवासी-यांचे लक्ष वेधून घेतले, नव्हे इतरांनी आश्चर्याने तोंडात बोटे घालावी इतकी नवलाई या जपान्यांनी घडवून आणली. कोणीही भोगले नाही एवढे दुःख, एवढी हानी त्याच्या वाट्याला आली. ती त्यांनी सहन केली. पचविली. परंतु तो पिचला नाही. पुन्हा एकदिलाने एकसंघ उभा राहिला, सर्वांच्या पुढे धावत सुटला तो हा इवल्याश्या डोळ्यांचा जपानी व त्याच धरतीवर स्वकष्टाने राखेतून रत्ने निर्माण करू लागला.


जपानी भूमीवर परिस्थिती तर किती प्रतिकूल. फक्त एक लक्ष पंचेचाळीस हजार आठशे आठ चौरस मैल क्षेत्रफळ असलेला आणि चार मोठी व तीन हजार नऊशे अठरा लहान लहान बेटांच्या समूहाने बनलेला हा देश. ह्यापैकी ८० टक्के जमिनीवर पर्वत ठाण मांडून बसलेला. उरलेल्या भागावर शेती व वस्ती; परंतु तो भाग सुद्धा सतत भूकंपाने खदखदणारा. थंडीमध्ये रशियाच्या सैबेरियातून थंडगार वाऱ्याने येथे अगदी कडाक्याची थंडी पडते; बर्फ पडते. तर उन्हाळ्यात समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यामुळे निर्माण होणारा उकाडा जीव हैराण करून सोडतो. पावसाळा जेमतेम एक महिना, अशा प्रकारे सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीशी येथील लोकांना सतत झगडावे लागते. यामुळेच त्याला तक्रार न करता परिस्थितीशी टक्कर देणे अंगवळणी पडले आहे.

माणसातील माणुसकी, प्रामाणिकपणा, विनयशीलता, सहकार्य, हसतमुख-पणा, शिस्त, देशप्रेम वगैरे सद्‌गुणांचे अनुभव जपानमध्ये पुरेपूर येतात. मला याबाबत आलेल्या प्रचितीचे वर्णन आपणास आतापर्यंतच्या वाचनात आढळले असेलच. जपानी माणसाचे एकंदरीत स्वभावदर्शन घडविणारे असेच काही प्रसंग ओघात आले नाहीत ते येथे निराळे नमूद केले आहेत.

' पार्ट्यांमधील सहभाग व उत्सवप्रिय जपानी ' या मथळ्याखाली पार्ट्या व समारंभाचे वेळी स्वत:चा मीपणा विसरून निव्वळ आनंद लुटणे व ' दुसऱ्याला आनंद दिल्याने स्वत:चा आनंद वाढतो. ' यावर श्रद्धा ठेवणारे जपानी आपण बघितले. विविध देशांच्या माणसांतील चांगले गुण आत्मसात करून घेऊन ते जोपासल्यामुळे आज पूर्व व पश्चिम देशांमधील सुंदर मिश्रण जपानमध्ये बघावयास मिळते. म्हणूनच आज या देशात पैसा व माणुसकी दोन्ही आढळतात.

भूगोलाचे जपानी प्रोफेसर भाषणाच्या ओघात सांगून गेले की, जपानी माणसाला कायम संकटाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तो आहे तो क्षण एक-मेकांच्या सहवासात आनंदाने घालवितो, कारण पुढे काय वाढून ठेवले आहे व त्यात

कोणाकोणाचे बळी जाणार आहेत हे माहीत नाही व त्यामुळेच का होईना जपानी माणूस हा पृथ्वीवरच्या इतर कोणत्याही माणसापेक्षा जास्त एंजॉय करतो.



डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये, रस्त्यावर, बागेत, रेल्वेमध्ये, तसेच अनेक सार्वजनिक ठिकाणी, आपल्या आरडाओरडा करणाऱ्या मुलांना त्यांच्या माता हळू आवाजात बोलण्याबाबत सूचना देताना मी काही वेळा बघितले आहे.



जपानमध्ये टेलिफोन सर्वत्र असल्याने जपानी माणूस कोणाकडेही जावयाचे असेल तर आधी फोन करून अपॉइंटमेंट घेऊन अगर पूर्व सूचना देऊनच जातो वा येतो. मात्सुकुरा कुटुंबियांकडे मी गेलो होतो, त्या वेळची गोष्ट. आम्ही गप्पा-गोष्टी करीत होतो. तेवढ्यात फोनची घंटा खणखणली. मिसेस मात्सुकुरांनी फोन घेतला. फोन त्यांच्याच शेजारच्या घरात राहाणाऱ्या कुटुंबातील सहा वर्षांच्या मुलीचा होता. तिने मात्सुकुरांच्या सात वर्षांच्या हिरोको या मोठ्या मुलीशी खेळायला येऊ का म्हणून फोन केला होता ! अशाप्रकारे लहानपणापासूनच सुसंस्कृतपणाचे मुलांवर संस्कार केले जातात.

जपानमधील सामाजिक जीवन या विषयावर भाषण देताना जपानी वक्त्याने सांगितले होते की, लहान मुलांना घडविण्यामध्ये शिक्षकांचा फार मोठा वाटा असतो, त्यामुळे शिक्षकांची निवड ही फार तावून सुलाखून केली जाते. शिक्षक हा समाजातील एक फार महत्त्वाचा घटक मानला जातो व समाजातसुद्धा त्याला खरोखरीच गुरुस्थानी मानले जाते. जपानी कॅमेरा, कार, टी. व्ही. व व्हिडिओनंतर अमेरिकनांना अचंबा वाटला तो म्हणजे जपानमधील शिक्षणपद्धतीचा. येथे अगदी मॉंटेसरीपासून शिक्षणातील सततची खरी शर्यत सुरू होते. परीक्षेचे खरे अडथळे पार करीत ही शर्यत कॉलेजमधील प्रवेश व एकंदरीत करियर ठरविण्यात महत्त्वाची ठरते. इंजिनिअर्सना खरे प्रशिक्षण हे कंपनीमध्ये कामास सुरुवात करायला लागल्यानंतरच मिळते. नैतिक शिक्षण पण शाळेतच मिळते. प्रामाणिकपणा, नम्रता, आदरातिथ्य, सचोटी व एकसंघ राष्ट्रीयत्वाची भावना शाळेतच सुरुवातीच्या काही वर्षांत रुजविली जाते. जपान सरकार त्यांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या दहा टक्के भाग शिक्षणावर खर्च करते. कित्येकजण कॉलेजमध्ये प्रवेश

करण्यापूर्वी अंदाजे चार वर्षांची गॅप घेतात व नंतर पुन्हा खडतर शिक्षणासाठी म्हणजे कॉलेजच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतात. असे अनेक विद्यार्थी मला कामगार म्हणून JVC मध्ये भेटले.

जपानमधील माझ्या स्कॉलरशिपचा कालावधी पाच महिन्यांचा होता. परंतु मुंबई येथील जपानी वकिलातीने त्यांच्या अडचणीमुळे मला फक्त तीन महिन्यांचाच व्हिसा दिला होता. त्यामुळे व्हिसाची मुदत वाढवून घेणे भाग होते. माझे ग्रुप-को-ऑर्डिनेटर कवाओी यांना ही हकीगत सांगताच त्यांनी योकोहामाच्या परदेशी-नागरिक-नोंदणी ऑफिसशी संपर्क साधला. कुठल्या दिवशी कोणत्या ऑफिसरला भेटायचे ते ठरले. ठरल्याप्रमाणे आम्ही दोघे त्या ऑफिसमध्ये पोहोचलो व सांगितलेल्या ऑफिसरला भेटलो. त्यांनी आमच्याजवळील एकपानी छापील भरलेल्या अर्जावरून नजर फिरविली व फक्त एकच प्रश्न विचारला, "व्हिसाची मुदत दोन महिने वाढविण्याऐवजी तीन महिने वाढविली तर चालेल का ? ते आम्हाला सोयीचे पडले." अर्थात् माझी काहीच हरकत नव्हती. त्या ऑफिसमध्ये प्रवेश केल्यापासून बरोबर ९ व्या मिनिटाला आम्ही त्या ऑफिसच्या बाहेर पडलो.

बाहेर पडून परत येत असता माझ्याच वयाच्या मनमोकळ्या कवाओीं-बरोबर गप्पा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात मी कवाओींना विचारले की, अमेरिकेने जपानवर अणुबॉंब टाकला तरी सध्या जपानमध्ये एवढी अमेरिकेची क्रेझ का ? त्यावर त्यांनी फार सुंदर व पटणारे असे उत्तर दिले. ते म्हणाले, "हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉंब टाकल्यानंतर जपानला अमेरिकेपुढे विनाअट शरण जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हते व शरणागतीनंतर अमेरिकेने जपानला कसे वागवावे याबद्दल त्यांना कुठलेही तारतम्य बाळगण्याचे कारण पण नव्हते. इतिहासावरून नजर फिरविताच असे लक्षात येते की, जगाच्या पाठीवर असे अनेक देश आहेत की, ते युद्धात पराभूत झाल्यानंतर अंकित राष्ट्रांच्या गुलामगिरीत खिचपत पडलेले होते व आहेत, आणि तेथील लोकांना फारच पशुतुल्य वागणूक दिली जाते. परंतु अमेरिकेने आमच्याबाबत उदार धोरण ठेवले. आम्हाला गुलामा-सारखे न वागविता विकास पावायला संधी दिली. त्यांनी या आम्हाला दिलेल्या दिलदार वागणुकीमुळेच आम्ही सर्व दिशेने एवढी प्रगती करू शकलो, आणि ही कृतज्ञतेची भावनाच आमच्यामध्ये अमेरिकेची क्रेझ निर्माण करून गेली. अर्थात् अणुबॉंब-संहारामुळे आम्हाला आमच्या अनेक बांधवांना मुकावे लागले, तर उरले-ल्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. यामुळे काही जणांचे मनात मात्र अजूनही राग खदखदत आहे. परंतु असे फार अत्यल्प. कारण पराभवानंतर अमेरिकेने केलेले अनंत उपकारसुद्धा पुढील पिढीला आवर्जून सांगितले जातात." शत्रूने केलेल्या उपकाराची जाणीव ठेवून शत्रुत्व विसरणे ही काही साधी गोष्ट

नाही. पण ती सुद्धा या जनतेने करून दाखविली.

सुरुवातीला जपानी भाषा शिकल्यानंतर त्यांची लिपी शिकण्याचा मोह मला अनिवार झाला होता. फॅक्टरीतून रूमवर आल्यावर मी काही वेळा जपानी भाषेचा अभ्यास करीत असे. हिरागाना व काताकाना या दोन लिप्या अवगत केल्या होत्या. व कांजी या त्यांच्या तिसऱ्या व बहुप्रचलित लिपीकडे वळलो. माझ्या उत्साहाबद्दल आमचे होस्टेलमधील शिक्षकांनी कांजी लिपी शिकणाऱ्यांसाठी असलेल्या एका सुंदर पुस्तकाचे नाव सांगितले. कन्नाओी येथील माझ्या आवडत्या युरिदो बुक स्टॉलमध्ये गेलो व त्या पुस्तकाचा शोध घेतला. परंतु ते पुस्तक तेथे नव्हते. बुक स्टॉलच्या मालकाने इतर काही पुस्तकांची दुकाने, प्रकाशकाचे ऑफिस, दुकान, गुदाम वगैरे वगैरे अनेक ठिकाणी फोन करून हे पुस्तक कोठे विकत मिळेल याची माहिती काढली. त्यांनी त्या एका पुस्तकासाठी तब्बल ३० ते ३५ मिनिटे खर्च केली. ६ ते ७ फोन केले व शेवटी ते पुस्तक मिळणाऱ्या टोकियोजवळील ठिकाणाचे नाव, तेथे कसे जायचे, त्यांची कामाची वेळ, मालकाचे नाव वगैरे इत्यंभूत माहिती दिली आणि मी केव्हा जाणार हे विचारून पुन्हा त्यांचे ऑफिस-मध्ये फोन केला व मी येण्याचा दिनांक व वेळ सांगितली. नियोजित दिवशी मी तेथे गेलो तेव्हा पुस्तक तर तयार होतेच परंतु माझ्या कांजी लिपी शिकण्याच्या उत्साहाबद्दल मालकाने मला एक लहानशी किचेन भेट म्हणून दिली तर थंडी-पावसातून खूप लांबून आलेल्या मला नम्रपणे स्वत: गरमगरम कॉफी आणून दिली. एका पुस्तकासाठी बुकस्टॉलचा मालक व एका मोठ्या पब्लिशिंग कंपनीचा मालक यांनी माझ्यासाठी घेतलेला त्रास व दिलेली वागणूक या बद्दलचा माझा अनुभव खरोखरीच या लोकांबाबतचा आदर नक्कीच वर्धिष्णू करणारा होता.

सुट्टीच्या दिवशी एकदा असेच कन्नाओीच्या प्रसिद्ध भिसेझाकीमाला रस्त्या-वरून जात होतो. एका दुकानातून बाहेर पडताना बाहेर दोघे-तिघेजण मराठीत बोलताना ऐकू आले, आश्चर्य वाटले. उत्सुकतेने त्यांचेजवळ गेलो. विचारपूस केली. ती एका भारतीय जहाजावरील क्रू-मंडळी चक्क पुणे व डोंबिवलीची होती. त्यांनी आग्रहाने मला जहाज बघायला नेले. जहाजावरून बाहेर नजर टाकली तेव्हा बाजूला एका जहाजामध्ये भराभर सामान भरणारी जपानी मंडळी दिसली तेव्हा पुण्याच्या मित्राने सांगितले. ' गेले दोन दिवस मी बघतोय, ही जपानी मंडळी अगदी घड्याळाच्या ठोक्याबरोवर कामाला सुरुवात करतात व न थांबता, न दमता, अविरत व अगदी व्यवस्थित काम करतात आणि त्यामुळे आपल्यापेक्षाही जवळजवळ दुप्पट काम ते निम्म्या वेळातच करतात. जपान्यांची तुलना बऱ्याचदा मुंग्यांच्या वस्तीशी केली जाते की ज्या ठिकाणी प्रत्येक जण आपले काम उत्तम प्रकारे करण्यात गुंतलेला असतो.

जपानी ही एक अशी गंमतीशीर जमात आहे की, तिच्या हातात तलवार द्या, तोफ द्या अगर टूल द्या, ते सफाईने व तितक्याच निष्ठेने चालविणे हे त्यांना माहीत आहे. जीव ओतून निष्ठेने एखाद्या कामाला वाहून घेणे, नव्हे तर त्यात वाहून जाणे हे त्यांच्या रक्तातच आहे. इतिहास सांगतो की पूर्वी त्यांनी स्वतःला युद्धात झोकून दिले होते तर तितक्याच निष्ठेने ते आता शांतीला चिकटले आहेत. पूर्वीची भेदभावाची जागा सद्भाव व सहकार्याने घेतलेली आहे. तर गर्व आणि प्रतिष्ठा जाऊन तेथे नम्रता दिसू लागली आहे. कुठलीही गोष्ट एकदा करावयाची ठरविली की ती टोकाचीच केली जाते. मग प्रेमाने हृदय ओतून केलेल्या कामात सुंदरता न येईलच तर नवल ! जपानच्या या नव्या दृष्टीने आशियामध्ये स्थैर्याचे युग अवतरत आहे.

तोत्सुकाच्या भेटीच्या वेळी एका चाळीशी ओलांडलेल्या अमेरिकन स्त्रीला फारच गहिवरून आले होते. ती तीन वर्षे जपानमध्ये राहून स्वतःच्या देशात परतणार होती म्हणून तिला वाईट वाटत होते. तिच्याशी सहलीच्या वेळी गप्पा मारताना ती म्हणाली, " मी इतक्या वर्षे माणुसकी असलेल्या माणसाच्या शोधात होते. परंतु मला तो सापडत नव्हता. पैशाच्या नशेत चूर असलेल्या स्वदेशातील लोकांमधील प्रकर्षाने जाणवणारा भकासपणाच मला जास्त बोचत होता. मी जपानमध्ये आले आणि मला माणसे व माणुसकी दोन्ही येथे गवसले. मी चांगल्या माणसांची दुनिया बघितल्याचा मला फार आनंद झाला. येथील तीन वर्षांच्या सहवासामुळे माझ्या आनंदाला प्रेमाची फोडणी दिली गेली. यामुळे त्यांच्यापासून लवकरच होणारा विरह मला असह्य होतोय. "

एका मोठ्या असोसिएशनचे मुख्य जपानी गृहस्थ माझ्या भारतीय मित्राचे दोस्त होते. माझ्या मित्राचा खुशालीचा निरोप पोहोचता करण्यासाठी मी या जपानी गृहस्थाला ऑफिसमध्ये फोन केला. त्यांनी मला थेट जेवणाचे आमंत्रण दिले. त्यांचे ऑफिसमध्ये पोहोचलो. जेवणाच्या वेळी ते फारच मोकळेपणाने गप्पा मारीत होते. मित्राच्या घरातील खुशालीबाबत ते फारच उत्सुकतेने विचारीत व ऐकत होते. त्यांच्या आग्रहामुळे त्या दिवशी मला थोडे जास्तच जेवणे भाग पडले. वस्तुतः ती माझी व त्यांची पहिलीच भेट होती. परंतु त्यांच्या प्रसन्न हास्य फेकीत मनमोकळ्या बोलण्याने एकाद्याला वाटावे की, हेच दोघे फार जुने दोस्त आहेत. अर्थात् आम्ही सुद्धा नंतर कायमचे दोस्त बनलो.

एक दिवस रात्री ९ च्या सुमारास आमच्याच होस्टेमधील कॅंटीनमध्ये गेलो होतो तेव्हा तेथे होस्टेलचे जनरल मॅनेजर व येथील कॅंटीनमध्ये भांडी साफ करण्याचे काम करणारा मुलगा असे दोघे, टेबलाभोवती बसून मजेत गप्पागोष्टी करीत अगदी हसत-खिदळत बिअर पीत होते.

आपण जसे बोलताना, हं ! असं का ! बरं ! वगैरे सारखे उद्‌गार काढतो, तद्वतच जपानी माणसे सोरे ऽ दे, ए ऽ तोने, ने ऽ वगैरे सारखे उद्‌गार काढतात.

रांग लावणे हे या लोकांचे फारच अंगवळणी पडले आहे. गाडी यायच्या आधी प्लॅटफॉर्मवरील खुणेपाशी गर्दीच्या वेळी रांग लावून उभे राहातात. 'जिथे गर्दी तिथे रांग' हे तर या लोकांचे ब्रीदच दिसतेय. कारण गाडीतून उतरून प्रशस्त जिन्याने खाली जाताना बहुतेक वेळा गर्दी असे. अशा वेळी सुद्धा लगेच ते रांगेने पुढे सरकत.

रस्त्यातील कुठल्याही जपानी माणसाला तुम्ही जवळच्या एखाद्या ठिकाणचा पत्ता विचारला तर तुम्ही त्या पत्त्यापर्यंत पोहोचणे हे त्याचे नैतिक कर्तव्य ठरावे अशा पद्धतीने तुम्हाला प्रतिसाद मिळतो. त्यासाठी ते तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतील, तुमच्याबरोबर येतील, अगर वेळप्रसंगी स्वतःच्या गाडीने योग्य ठिकाणी पोहोचवतील. अगदी फारच क्वचित् प्रसंगी, ती व्यक्ती तेथे नवीन अगर खूपच गडबडीत असेल तर, माहिती नाही म्हणून उत्तर मिळते. परंतु शक्यतो अशा वेळी सुद्धा जवळच्या दुसऱ्या जपानी माणसाचे सहाय्य घेऊन तुम्हाला योग्य मार्गदर्शन उपलब्ध केले जाते.

जपानी लोकांना वस्तू भेट देणे हा एक चांगला शौक आहे. कधीही तुम्हाला कोणी घरी अगर ऑफिसमध्ये काही कामासाठी बोलावले तर ते हमखास तुम्हाला कुठली तरी वस्तू भेटीदाखल देतील. भेट दिलेल्या वस्तूमुळे आठवण राहाते, ही एक चांगली कल्पना याच्या मुळाशी आहे. आपणही जर त्यांना एखादी वस्तू भेट दिली तर ते त्याचा प्रेमाने स्वीकार करतात. माझ्या पुण्यातील मित्राने मला याची पूर्वकल्पना दिली होती. त्यामुळे जपानला जातानाच मी खूप वस्तू भेटीदाखल म्हणून घेऊन गेलो होतो.

टोकियोतील गिंझामधील 'यामाहा' हॉलमध्ये 'गांधी' या सिनेमाचे दोन पास 'असाही शिंबुन' या वर्तमानपत्रामार्फत मला आले होते. माझा जपानी मित्र त्सुचीमोचीसह सात मार्चला संध्याकाळी ६ ला मी हा सिनेमा बघितला. इंग्रजी भाषेतील या सिनेमात पट्यावर चित्राच्या उजव्या बाजूला उभी जपानी अक्षरे येत होती. त्सुचीवर हा सिनेमा फारच परिणाम करून गेला. तर एक जपानी यामाहा हॉलमधून बाहेर पडताना खूपच भारावून गेला होता. त्याच्या सोबत त्याची पत्नी व वडील पण होते. मी व त्सुचीमोची गिंझा चौकातून जात होतो. तेवढ्यात या जपानी गृहस्थाने मला विचारले 'इंडियन का ?' मी हो म्हणताच त्याने 'O ! Indian ! ! Great Indian ! ! ! You people are really great.' म्हणून चक्क मला मिठी मारली. त्याच्या डोळ्यांतील भारतीयांबद्दलचा आदर मलाच नव्हे, तर त्याची पत्नी व वडील तसेच माझ्या बाजूला असलेल्या त्सुचीला

सुद्धा विशेषत्वाने जाणवत होता.

जगातील सर्वांत सुरक्षित देश म्हणजे जपान. या देशात शक्यतो चोरी होत नाही व झालीच तर तिचा अतिशय त्वरेने तपास केला जातो. तुम्ही अगदी मौल्यवान वस्तू जरी विसरला तरी त्याला कोणी हात लावत नाहीत, की रात्री १२ च्या सुमारास जरी रस्त्यावरून तुम्ही एकटे जात असला तरी तुम्हाला कोणी लुटत नाही, ही येथील ख्याती आहे. याबाबत दोन गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात. एकदा फॅक्टरीतील माझ्या लॉकरच्यावर एक अतिशय मौल्यवान पेन दहा दिवस पडून होते पण कोणीही त्याला हात लावला नाही, किंवा हे पेन कोणाचे आहे म्हणून कोणी कोणाला विचारायला पण गेलो नाही. दहा दिवसांनंतर ज्याचे ते होते तो घेऊन गेला. घरून फॅक्टरीत आल्यावर लॉकरमध्ये आपले कपडे काढून ठेवून फॅक्टरीचा ड्रेस चढविल्यानंतर येथील बहुतेक जण लॉकरला कुलपाची सोय असली तरी कुलूप न लावता लॉकरचे दार नुसते तसेच लोटून जात. कुठल्याही दुकानात प्रवेश करण्यापूर्वी छत्र्या, रेनकोट वगैरे कित्येक गोष्टी ग्राहक बाहेरच ठेवतात. कोणीही नेत नाहीत. समाजावरील एका ठाम विश्वासाचेच ते एक प्रतीक होय. दुसरी गोष्ट म्हणजे, मी एकदा रात्रीच्या शेवटच्या बसने अिसोगो स्टेशनहून होस्टेलवर परत येत होतो. होस्टेलजवळील स्टॉपवर मी बसमधून उतरलो तेव्हा त्याच बसमध्ये एक १५-१६ वर्षांची मुलगी स्किअिंग किटसह चढली. बस स्टॉपवर तिचे आईवडील हात हलवून तिला निरोप देत होते. ती मुलगी रात्री साडे-अकराच्या सुमारास ट्रेनने २-४ तासांचा प्रवास करून स्कीअिंग करतात त्या ठिकाणी जाणार होती. आपल्या एकट्या तरुण कन्येला रात्रीच्या वेळी निरोप देताना त्या मातापित्यांच्या चेहऱ्यावर भीतीची अजिबात छाया नव्हती, एवढा निर्धास्तपणा येथील समाजात आहे.

हा अतिशय प्रामाणिक लोकांचा देश आहे. येथील लोकांचा प्रामाणिकपणा, दुसऱ्याना मान देणे, स्वच्छता, टापटीप, शिस्त, नीटनेटकेपणा याचा आपणास कित्येकदा अनुभव येतो. निसर्गाच्या असुरक्षित वातावरणात येथील लोकांनी आपल्या कष्टाने व वागण्याने पृथ्वीवरचा हा अतिशय सुरक्षित प्रदेश बनविला आहे. प्रत्येक स्टेशन आल्यावर रेल्वेत व प्रत्येक स्टॉप आल्यावर बसमध्ये अनुक्रमे त्या स्टेशनचे आणि स्टॉपचे नाव सांगतात व नंतर लगेच म्हणतात," कृपया आपल्या वस्तू विसरू नका. त्या बरोबर आहेत याची खात्री करा." कारण असे की, विसरलेल्या वस्तू इतर लोक प्लॅटफॉर्मवरील Lost & Found या ऑफिसमध्ये आणून देतात व या ऑफिसचे काम निष्कारण वाढते. खरोखरीच हे ऐकून व असे अनुभव घेत असताना 'मी कलियुगात नाही' असेच वाटले. प्रामाणिकपणे चोख काम, कुठेही कामात कुचराई अगर ढिलाई नाही व दिलेले काम संपवूनच घरी जाणे हे या

जपानी लोकांचे वैशिष्ट्य आहे. कामात कुठेही टेन्शन नसते तर बहुतेक सर्व ठिकाणी कामे खेळीमेळीच्या वातावरणात होताना दिसतात.

परदेशी नागरिकांना जपानी लोक मान देतात. त्यातच मुळात जपानी लोक विनम्र व सेवाभावी वृत्तीचे. यावरून लक्षात येते की, या देशामध्ये परदेशी लोकांना खूपच आदराची व चांगली वागणूक मिळते. दुसऱ्यांच्या अंगच्या गुणांचे येथे कौतुक होते व कौतुक आहे.

येथील बहुतेक सर्व स्त्रिया बॉबकट, शोल्डरकट, अगर इतर सुंदर केशरचना केलेल्या आढळतात. थंडीमुळे तांबूस झालेली गोरी कांती, लुकलुकणारे इवलेसे फटीसारखे डोळे, मार्दवी हास्य व कायम दिलखुलास हसताना तोंडापुढे हात परंतु जेव्हा चेहऱ्यावर काहीही भाव नसतात त्या वेळी निसर्गतःच करुण वाटावा असा चेहरा. बाहेर वावरताना पुरुषांची वेशभूषा सुद्धा अगदी पाश्चात्त्य पद्धतीची म्हणजे सूटबूट, टाय अशीच असते. सर्व तरुण-तरुणींत अमेरिकेबद्दल कमालीची क्रेझ.

येथे सर्वत्र स्वच्छता असताना सुद्धा टॅक्सी ड्रायव्हर काय किंवा पोलिस काय, हातात पांढरे मोजे घालून वावरताना दिसतात. आश्चर्य वाटले. सर्वसामान्य जपानी प्रकृतीबाबत दक्षता बाळगतो. नियमित व्यायाम व बऱ्याच जणांचे खाण्या-पिण्यातील पाश्चात्त्यांचे अनुकरण लक्षात येते. कमी कॅलरीची बिअर आणि खाण्या-मध्ये मिठाचे व साखरेचे प्रमाण कमी राखण्याची खबरदारी ही मंडळी घेतात. आज जपानी स्त्रीचे सरासरी आयुर्मान ६८ ते ८० वर्षे आहे, तर पुरुषांचे ६४ ते ७४ वर्षे आहे. येथे दारूबाज मंडळी पण आहेत. गाडीतून परत येताना आठवड्यातून एक-दोन वेळातरी अशी मंडळी नजरेस पडतात. अगदी तर्र, प्यालेले असतात. जपानीत बडबडत असतात. हातवारे करतात. हसतात, खाणाखुणा करतात पण कोणाला इजा करीत नाहीत. सुटाबुटातील गोरापान प्यालेला जपानी बघायला कसेसेच वाटते. ओसाके ही त्यांची आवडती दारू. एकंदरीत आश्चर्य वाटते अशा लोकांकडे बघून.

एकदा असेच गाडीने प्रवास करीत असता दोन व्यक्तींना बघून मला काही तरी खटकले व आपण त्यांच्यामध्ये काहीतरी वेगळे बघत असल्याचे जाणवले. थोड्याच वेळात त्यांचा वेगळेपणा लक्षात आला. त्या दोघांनाही टक्कल होते. जपानी लोकांनी डोळ्यांत मार खाल्लाय. पण त्यांची कसर त्यांनी भरघोस केसाने भरून काढलीय. त्यांच्यामध्ये वावरताना, त्यांचे इवलेसे डोळे सतत बघताना, आपलेच डोळे आपल्याला काही वेळा वटवटीत वाटायला लागतात.

येथे एकंदरीत सेक्सबाबतच्या भावना बऱ्याच मुक्त आहेत. विशेष आश्चर्य म्हणजे, पुस्तकाच्या दुकानातील किंवा सुपर मार्केटमधील मासिकांच्या विभागातील सेक्सी मासिके अगर पुस्तके शाळकरी मुले-मुली निर्धास्तपणे चाळत असतात. तर

काही ठिकाणी टॉपलेस शोजना विद्यार्थ्यांना तिकिटात सवलत असते. आश्चर्य वाटले. अन्नाप्रमाणेच सेक्स हीपण एक शरीराची गरज आहे, त्यात पाप काहीही नाही असे माझ्या अनेक जपानी दोस्तांचे मत व त्यामुळे त्यात सदाचार, नीती वगैरेसारखे प्रश्नच उद्भवत नाहीत व त्यात लाजायचे पण कारण नाही. तसेच बऱ्याच जणांना तो फार गहन प्रश्न आहे असेही वाटत नाही.

युद्धातील विजयानंतरसुद्धा भयाची तसेच सूडाची टांगती तलवार विजेत्यावर सतत वावरत असते. म्हणूनच जग हे युद्धात विजय मिळवून जिंकले जात नाही तर प्रेमाने हृदये काबीज करूनच त्यात अजिक्यपद प्राप्त होते. यावरच विश्वास ठेवून सबंध देशाने त्याप्रमाणे संपूर्ण आदरणीय वागणूक आचरणे हे या पृथ्वीवरचे एक नवलच आहे. जात पात हा भेदभाव येथे नाही. मानवधर्माचे खरेखुरे दर्शन जपानमध्ये घडते.

जपानी माणूस कसा आहे याचा विचार आपण येथे केला. अर्थात् तो असा कसा बनला ? हा खरोखरच समाजकार्य करणाऱ्यासाठी चांगला व संशोधनाचा विषय आहे. परंतु एवढे मात्र नक्की की त्याची सावली जरी आपल्या भारत देशावर पडली तरी खरोखरच ही भूमी पुन्हा एकदा सुख शांती नांदणारी सुवर्णभूमी होईल.

## सटर – फटर :

## टी.व्ही. संबंधी

रात्रीचे काही तास सोडले तर येथे टी. व्ही. चे कार्यक्रम साधारणतः कायम चालूच असतात. टोकियो, योकोहामा व त्याच्या आसपासच्या भागात चॅनेल दोन हा केवळ टेलिव्हिजनसाठी वापरात असून त्याचे कार्यक्रम खास वायरिंग करण्यात आलेल्या हॉटेल्स व अपार्टमेंट्स् मधील टी. व्ही. वर दिसू शकतात. हे कार्यक्रम विशेषत्वाने इंग्रजी माध्यमातून असून त्यांत दिवसातून ३–४ वेळा हवामानासंबंधी, एकदा विमानांच्या येणाऱ्या वेळा, तसेच प्रवासासंबंधीच्या माहितीचे बातमीपत्र असते. स्पोर्टस्, इंग्रजी गाजलेले सिनेमा व कित्येक चांगल्या टी. व्ही. सिरीज यांचा सुद्धा या कार्यक्रमात समावेश असतो.

ब्रॉडकास्ट होणाऱ्या इतर टी. व्ही. चॅनेलवरील कार्यक्रम कधी कधी दोन्ही भाषांतून म्हणजे इंग्रजी आणि जपानीतून प्रक्षेपित होत असतात. त्यांपैकी आपणास पाहिजे त्या भाषेची निवड करता येते. याबाबतची सविस्तर माहिती वर्तमानपत्रातून व 'टूर कम्पॅनियन' या साप्ताहिकामध्ये येत असते. हे कार्यक्रम चांगले असत. कार्यक्रमपत्रिकेवरून नजर फिरविताच काही कार्यक्रम बघावेसे वाटतात व

आपोआपच आपण टी.व्ही. ला खिळून बसतो. यात आठवडयातून ३-४ वेळा गाजलेले इंग्रजी सिनेमा असतात, तर दररोज टी. व्ही. सिरीज चालूच असतात. मी तेथे होतो त्यावेळी वंडर वुमन नावाची मजेशीर टी. व्ही. सेरीज सुरू होती. मुलांसाठी, मध्यमवयीन मंडळींसाठी, गृहिणींसाठी असे खास कार्यक्रम निरनिराळया चॅनेलवर सतत चालू असतात. उद्योगधंद्याबाबतची माहिती, फ्लॅश टी. व्ही. प्रोग्रॅम, खेळांचे सामने, हवामानासंबंधीची भाकिते, वगैरे सारखे कार्यक्रमपण प्रक्षेपित होत असतात. दररोज रात्री ११ ते ११-३० जागतिक बातम्या इंग्रजीतून सांगण्यात येतात. यात जास्तीत जास्त बातम्यांतील चित्रित केलेला भाग दाखविण्याकडे कल असतो.

आम्हा हॉस्टेलवासियांमधील टी. व्ही. वरील अतिशय आवडता कार्यक्रम म्हणजे रेसलिंग. टी. व्ही. स्क्रीनवर हा खेळ बघतानासुद्धा प्रेक्षकांचे रक्त सळसळत असे. अंगावर काटा आणणारे हे सामने काही काही वेळा तर बघवत नसत. या खेळात आंतरराष्ट्रीय खेळाडू भाग घेत. दोन विरुद्ध दोन किंवा तीन विरुद्ध तीन खेळाडू असे पण हे सामने चालत. कित्येक वेळा या सामन्यांतून पराकोटीची अमानुषता दिसत असे. दुसऱ्या खेळाडूला नामोहरम करण्यासाठी कित्येकदा नियमभंग केला जाई. त्यामुळे अनेक वेळा हे सामने अनिर्णायक अवस्थेत संपलेलेच पाहावयास मिळत. प्रतिस्पर्धी खेळाडूंकडून भरपूर मार खाऊन हे पठ्ठे कसे काय पूर्ववत खेळतात हे एक नवलच आहे. मला तर या खेळाचे भलतेच आश्चर्य वाटते. या खेळात परदेशी खेळाडू नियमभंग विशेष करीत. जंबिया लपवीत असत व तो पंचाला दिसला नाही तरी टी. व्ही. स्क्रीनवर दिसत असे. काही वेळा हे खेळाडू तोंडात काही द्राव लपवीत व हरताना तो द्राव दुसऱ्या खेळाडूच्या डोळयांत थुंकत. हे दोन्ही प्रकार प्रत्यक्ष टी. व्ही. वर बघितले आहेत. एखादा खेळाडू हरत असला तर त्याचे मित्र चक्क प्रेक्षकांतून उठून रिंगणात जाऊन प्रतिस्पर्धी खेळाडूवर प्रहार करीत. त्या वेळी एकच गोंधळ होई. एकाच खेळाडूवर प्रतिपक्षाच्या दोघातिघांनी प्रहार करणे, प्रतिपक्षाच्या खेळाडूला उचलून आखाड्याबाहेर फेकून देणे, हे तर सर्वसामान्यपणे नियमभंगाचे प्रकार होते. परंतु एकदा एका खेळाडूने दुसऱ्या खेळाडूच्या कपाळाचे कातडे फाडल्यामुळे रक्त वाहू लागलेले पाहून लॉबीतील एकाला भोवळ आली होती. या खेळातही विशेष गोष्ट म्हणजे ज्या वेळी या खेळात जपानी खेळाडू भाग घेत तेव्हा ते जास्तीत जास्त नियमाला धरून खेळताना दिसत. यामध्ये टायगर मास्क व अजून एक अतिशय शांतपणे खेळणारा एक जपानी ख्रिश्चन खेळाडू हे टी. व्ही. प्रेक्षकांचे फार आवडते व बहुतेक वेळा विजयी होणारे खेळाडू होते. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे महिलांचे पण असे सामने भरत व ते अगदी पुरुषांसारख्या पद्धतीने चालत. कराटे, ज्यूडो वगैरे प्रकार तर या खेळात वापरले जात, शिवाय उचलून आपटणे, दुसऱ्या खेळाडूंना स्वतःच्या

गुडघ्यावर उताणे ठेवून त्याच्या पाठीला दणका देणे, रिंगणाच्या बाहेर फेकणे, बाहेर फेकल्यावरसुद्धा टेबल व खुर्चीवर आपटाआपटी, खुर्चीने मारामारी करणे, वगैरे प्रकार या खेळात कित्येकदा बघायला मिळत. एकदा तर या खेळात एका मुलींच्या गटाला विजयी दिले म्हणून दुसऱ्या युरोपियन गटातील एका मुलीने चक्क पुरुष पंचालाच उचलून फेकले व नंतर त्याला लाथ हाणली. हे सर्व बघून आश्चर्य वाटले. समाजामध्ये वावरताना पूर्णत्वाने दिसणारी सहिष्णुता, नम्रता, सहकार्य, माणुसकी व अशा देशात टी. व्ही. वर दाखविले जाणारे असे हे अमानुष खेळ हे मला तर एक न सुटलेले कोडे आहे. परंतु या मानाने सुमो कुस्ती बघताना खेळातील जपानीकरण जाणवत असे.

सुमो कुस्तीच्या खेळात एक साधारणतः ६ ते ७ मीटर व्यासाचे रिंगण असते. या रिंगणाच्या मध्यभागापासून समान अंतरावर अंदाजे दीड-दोन मीटर लांबीची रेषा असे. या दोन समान रेषांतील अंतर अंदाजे एक मीटर असावे. दोन्ही सुमो कुस्तीगीर या रेषेच्या पलीकडील बाजूस असतात. या दोन कुस्तीगीरांपासून समान अंतरावर रिंगणात एका बाजूला युकाता सारखा वेष परिधान केलेला व डोक्यावर एक विशिष्ट प्रकारची टोपी असलेला आणि हातात पंखा घेतलेला पंच असे. सुरुवातीला हे दोन्ही कुस्तीगीर तीनदा जमिनीला मुठी टेकून ओणवे बसून एकमेकाला सलामी देत. प्रत्येक सलामीनंतर ते रिंगणाबाहेर मिठासारखा काहीसा पदार्थ उधळत. यामागे एकमेकांबद्दलचा दुस्वास झटकून टाकणे ही भूमिका असते. तीन सलामीनंतर पंचाने खूण करताच हे दोन्ही पहिलवान एकमेकांस भिडत असत. दोघांची पोटे थुलथुलीत व चांगलीच सुटलेली असत. पोटावर साधारणतः वीतभर जाडीचा जाडजूड पट्टा असे. प्रतिस्पर्धी कुस्तीगीराला रिंगणाच्या बाहेर घालविले अगर रिंगणातच पालथे किंवा उताणे पाडले की, कुस्ती निकाली होई. अशा कुस्त्या खूपच झटपट संपत. कुस्ती संपल्यावर पंख्यावर सर्टिफिकेट ठेवून पंच विजयी कुस्तीगीराला ते देत असत. व विजयी कुस्तीगीरसुद्धा जपानी पद्धतीने दोन तीनदा वाकून मान लवून नम्रपणे या सर्टिफिकेटाचा स्वीकार करीत असे. एकंदरीत सुमो कुस्तीगीर पंचाला खूपच मान देताना दिसतात.

सॉफ्टबॉल, केंदो, कराटे, ज्युडो वगैरे खेळांच्या स्पर्धा टीव्हीवर दाखविल्या जात. तर भाषेची गरजसुद्धा पडणार नाही, असे खूपच विनोदी कार्यक्रमसुद्धा काही वेळा टी. व्ही. वर बघायला मिळत असत. मात्सुदा या षोडशवर्षीय जपानमधील प्रसिद्ध गायिकेच्या जपानी गाण्याचे कार्यक्रम टी. व्ही. वर फारच लोकप्रिय होते. जपानी लोकांच्या गळ्यातील तर ती ताईत होती. आम्हा होस्टेलवासीयांना सुद्धा मात्सुदाची गाणी फार आवडत. आम्ही काही जणांनी तिचे एक प्रसिद्ध जपानी गाणे एका पार्टीमध्ये सादर केले होते.

अनेक प्रकारचे कार्यक्रम बघताना आपण टी. व्ही. समोर बराच वेळ बसलो आहोत हे लक्षात येते. प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या टी. व्ही. सिग्नलची ताकद पुरेशी असल्याने टी. व्ही. स्क्रीनवर दिसणारे रंगीत चित्र अतिशय स्पष्ट दिसत असे व टी. व्ही. बघणे खरोखरच आनंददायी ठरे.

टीव्ही बघण्याच्या बाबतीत तसेच खरेदी करण्याच्या बाबतीत जपानी आघाडी-वर आहेत त्यांचा नंबर अमेरिकेच्याही वर लागतो. जपानमध्ये ९८% टक्के घरात रंगीत टी. व्ही. सेट आहेत. तर अमेरिकेत हेच प्रमाण ८९% आहे. ३१% जपानी माणसे एक वेळ कार, फ्रीज, टेलिफोन व अगदी वर्तमानपत्रावरही पाणी सोडतील. परंतु त्यांना टी. व्ही. हवाच. जपानमध्ये टी. व्ही म्हणताच NHK हे नाव प्रथम येते. NHK ही जगातील सर्वांत मोठी, सर्वांत श्रीमंत व मोठ्या प्रमाणावर पब्लिक ब्रॉडकास्टिंगचे जाळे असलेली एक खाजगी संस्था आहे. ३ कोटी ४० हजार जपानी दरवर्षी नियमाने जवळजवळ ४१ डॉलर एवढी रक्कम फी म्हणून NHK ला देतात. जरी ही फी ऐच्छिक असली तरी कोणीही नाकारीत नाहीत. कार्यक्रमा-तील गुणवत्ता ही प्रमुख गोष्ट NHK ने टिकवून धरली आहे. एकंदरीत जपान्यांना घडविण्यात टी. व्ही ने जगातील इतर कुठल्याही देशापेक्षा फारच महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

थिएटरमध्ये सिनेमा बघायला मी कधी गेलो नाही. कारण, एक म्हणजे वेळ व दुसरे म्हणजे तिकिटाचे दर. येथे तिकिटाचे दर खूप असत. आणि तिसरे म्हणजे प्रसिद्ध सिनेमा टी. व्ही. वर पण बघायला मिळत असत. मी येथे होतो तेव्हा ET नावाचा इंग्रजी सिनेमा टोकियोत फारच गाजला होता. हा सिनेमा ज्या थिएटरला लागला होता, त्याच्या बाहेर तिकिट-रिझर्व्हेशनसाठी लागलेल्या जपानी लोकांच्या भल्या मोठ्या रांगा मी बघितल्या आहेत. मात्र सिनेमा हाऊसफुल्ल झाल्या-नंतर सुद्धा 'पांच का दस' वगैरे म्हणत समाजसेवा करणाऱ्यांची येथे गैरहजेरी होती.

## फोटोग्राफी :

परदेशातील वास्तव्यात कॅमेरा ही एक आवश्यक वस्तू बनली आहे. तेथील निरनिराळ्या प्रसंगांच्या स्मृतींना भविष्यकाळात उजळा देण्यासाठी फार सहाय्य-भूत होणारा कॅमेरा ही वस्तू बहुतेक पर्यटकांच्या खांद्यावर लोंबत असते. मित्र व आप्तेष्टांना पत्राने वस्तुस्थिती जाणून घेण्यास मदत करण्यात फोटो हे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे.

रंगीत फोटोच्या प्रिंटला येथे २५ येन द्यावे लागतात. परंतु ब्लॅक अॅन्ड व्हाईट फोटोच्या प्रिंटसाठी २५० येन किंवा त्यापेक्षाही जास्त येन मोजावे लागतात.

कारण, एक म्हणजे त्यासाठी मुद्दाम सोल्यूशन तयार करावे लागते व त्याचा वापर झाल्यावर ते फेकून द्यावे लागते. आणि दुसरे म्हणजे हे काम मुद्दाम माणूस नेमून करावे लागते. अर्थात् काम होते हेच विशेष म्हणावयाची पाळी येते. सर्वत्र सर्रास रंगीत फोटोच काढले जातात. त्यामुळेच त्याचे डेव्हलपिंग व प्रिंटिंग खूपच स्वस्त आहे. बहुतेकांना परदेशातील वास्तव्य संपवून परतण्याच्या वेळी फोटो नगावर मोजण्याऐवजी वजनावर मोजण्याची पाळी येते.

जपानला पोहोचल्यानंतर दोन आठवड्यांतच मी एकटा टोकियोजवळील शिजुकु या भागात गेलो होतो. काही वेळा योगायोग फार दांडगे असतात. शिजुकु येथील ' योदोबाशी कॅमेरा ' या प्रसिद्ध दुकानामध्ये कॅमेरा खरेदी करण्यासाठी गेलो होतो. तेथे चक्क बंगलोर येथील एका फोटोग्राफरची गाठ पडली. त्यामुळे त्याच्या मार्गदर्शनाखाली कॅमेरा, फ्लॅश व फोटोग्राफीचे इतर साहित्य मी खरेदी केले.

आज जपानहून परतून अनेक दिवस लोटले असले, तरी जेव्हा तेथील फोटोंचे अल्बम मी चाळतो, तेव्हा पुनश्च त्या प्रसंगांत गेल्याचा भास होतो. खरोखरच फोटोग्राफ्स् हे स्मृतीवर सुखद फुंकर घालून प्रस्तुत क्षण आनंदी बनविणारे एक हुकमी साधन आहे.

**मित्रांसंबंधी** :

आमचे होस्टेल म्हणजे खरोखरच मिनी युनो होते. येथे विविध देशांतील मंडळी खूपच गुण्यागोविंदाने नांदत होती. एकंदरीत होस्टेलमधील वातावरण स्नेहपूर्ण व सहकार्याचे होते. अर्थात् असे वातावरण टिकविण्यात जपानी मंडळी वाकबगार होती. निरनिराळ्या भाषा बोलणारी नाना देशांतील आम्ही मंडळी एकमेकांच्या सहवास व सहकार्याने तेथील वास्तव्य आनंदमय करीत होतो. पाटर्या, संमेलने, ट्रिप्स वगैरे प्रसंगांमुळे त्या आनंदात वरचेवर भरच पडत होती व मैत्री पक्की होत होती. मध्य आशियात दोन वर्षे घालविलेला मुंबईचा गोष्टीवेल्हाळ मंजू नाईक, तर बंगलोरचा गडबड्या व बडबड्या रवी या भारतीय मंडळींखेरीज बांगलादेशचा करीम, फिलिपाइन्सचा रॅने, सिंगापूरचा ऑंग, हाँगकाँगचा ली व चॅंग ॲिंडोनेशियाचे डॉ. अिसनादी, एनवर्ड, हुस्नी व अनेक मेक्सिकन, जपानी व चिनी मंडळी ही आमच्या पंधरवड्याच्या बैठकीतील मंडळी होती. कित्येक वेळा यांतील काहीजणांबरोबर मी आसपास भ्रमंती पण केली होती.

इंडोनेशियन दोस्त एनवर्डच्या रूमवर १७ डिसेंबरला माझा वाढदिवस साजरा करण्यात आला. इंडोनेशियन पद्धतीने भेटीगाठी झाल्या. छोटासा संगीत जलसा पण झाला. त्यानंतर इंडोनेशियन मिठाई वाटण्यात आली. होस्टेलतर्फे

पण वाढदिवसाचे सोनेरी किनार असलेले एक खास कार्ड देण्यात आले. त्यावर अनेक देशांतील मित्रांच्या सह्या होत्या.

असाच एक दिवस इंडोनेशियाच्या ऑटोमोबाईल इंजिनियर हुस्नी बरोबर गप्पा मारताना रामायण व महाभारताचा विषय निघाला. रामायणातील राम, सीता, लक्ष्मण, जटायू, रावण तसेच महाभारतातील पांडव-कौरव वगैरे सर्वांबद्दल त्याला बरीच माहिती होती. पूर्वीच्या काळातील चातुर्वर्णाबद्दलही त्याचे ज्ञान चांगले होते. परंतु त्याने शेवटी मला आश्चर्यकारक धक्का दिला. तो म्हणाला, "रामायण व महाभारत हे आमच्या देशात म्हणजे इंडोनेशियात घडले आहे. इंडोनेशियात अयोध्या आहे, लंका आहे ..."

माझे काही मेक्सिकन मित्र पंडित रविशंकरचे फॅन होते. परत येण्यापूर्वी मी सोबत नेलेली रविशंकरची सितारवादनाची एक कॅसेट माझ्या या मेक्सिकन दोस्ताला भेट दिली. रोमन कॅस्टिलोला या माझ्या मेक्सिकन मित्राला मी लिहिलेले व कार्यक्रमात सादर केलेले माझ्या धाकट्या मुलावरचे गाणे इंग्रजीत लिहून घेतले होते. स्कीइंगच्या वेळी एकदा मी त्याला मागून येऊन धडकणार होतो, परंतु त्या आधीच मी स्वतःला बाजूला लोटून देऊन हा धक्का टाळला, मी काही अंतरावर त्याच्या मागे पडलो होतो. पडल्यावर मी कानोसा घेतला तर हा पठ्ठा ते मी लिहून दिलेले गाणे गुणगुणण्यात मश्गुल होता.

जपानी भाषेचा कोर्स संपल्यावर आमच्यातील काही जण दुसऱ्या गावी निराळ्या होस्टेलमध्ये राहायला गेले. त्यामुळे इतके दिवस जमलेला आमचा गप्पा-विनोदाने रंगणारा मैत्रीचा सुंदर संच मोडला. विरह हा फार दुःखद असतो याची प्रचिती आली. दोन तीन दिवसांच्या फरकाने बरेच जण जात होते. होस्टेलच्या लॉबीत बॅगा घेऊन अनेक जण तयार होते. दारात टॅक्सी उभी राहायची व होस्टेलच्या स्टाफपैकी, अगर ज्या कंपनीत ट्रेनिंग घेणार तेथील स्टाफपैकी कोणी तरी बरोबर असे व तो आमच्या मित्रांतील एकेकाला घेऊन जात असे. वातावरण तसे थोडे गंभीरच होते. दीड महिन्याचा काळ एकत्र घालविल्यावर आमची फारकत होत होती. परत भेट होणार होती की नाही हे सांगणे अशक्य. त्यानंतरही आम्ही पत्राने काही काळ संपर्क साधत होतो.

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात काही चिनी मंडळी चीनला परत जाणार होती. तेव्हा त्यांच्यातर्फे होस्टेलच्या स्टाफला पार्टी होती. या वेळी माझ्या शेजारच्या व समोरच्या रूममधील चिनी दोस्ताने मला रूममधून आग्रहाने बोलावूनच काय, पण अगदी पकडून नेले व या पार्टीत सामील व्हायला भाग पाडले. खास चिनी खाद्य-पेये हे या पार्टीचे वैशिष्ट्य होते. होस्टेलच्या जनरल मॅनेजरना तर या चिनी मंडळींच्यातील प्रत्येकाने आग्रहाने फारच पाजली होती व

बिचारे मिडेखातर पीत होते. शेवटी अगदी कामातून गेले तेव्हा एका जपानी स्टाफने त्यांना होस्टेलमधील वरच्या मजल्यावरील एका रूममध्ये सक्तीने विश्रांती-साठी नेले.

होस्टेलमधे मी राहात असलेल्या मजल्यावर जानेवारीत दहा-बारा चिनी मंडळी आली होती. माझी व त्यांची बरीच गट्टी जमली होती. सुरुवातीला भाषेची अडचण असायची. परंतु नंतर आम्ही एकमेकांशी मोडक्या-तोडक्या जपानीतून बोलत असू. कटिंग करावयाच्या सामानाचा सेट त्यांच्याकडे होता. एक दिवस सकाळी चक्क त्यांनी आमच्या मजल्यावरील प्रशस्त टॉयलेटमध्ये खुर्ची टाकली व एकमेकांची हजामत केली. मी आंघोळीला चाललो होतो. परंतु जाण्यापूर्वी थोडेसे भादरून जा, या माझ्या शेजाऱ्याचे म्हणणे मी मान्य केले व डोके त्याच्या ताब्यात दिले, परंतु तत्पूर्वी मी धावत रूममध्ये गेलो व माझा कॅमेरा घेऊन आलो. माझ्या दुसऱ्या एका चिनी मित्राच्या हातात तो दिला व हा प्रसंग कायमचा संग्रही ठेवला. असे एक ना दोन प्रसंग !

अशा प्रकारे आम्ही एकमेकांच्या सहवासाने होस्टेललाइफ पुन्हा एकदा एन्जॉय केले व खरोखरीच आंतरराष्ट्रीय स्नेहाचा अनुभव घेतला.

**पत्रव्यवहार**

पत्र हे एक असे माध्यम आहे की, जे परदेशातही एकलेपणावर सुखावह फुंकर घालते व न कळत का होईना दिवस खूपच सुखात जातो. बहुतेक मंडळी जेव्हा फार खुशीत दिसतात, तेव्हा त्यांना पत्र आले आहे किंवा ते घरातील मंडळीशी फोनवर बोलले आहेत हे नक्की समजावे. आम्हा सर्वांचीच ही गत होती. मग " आईची झोपडी प्यारी " म्हणा किंवा " प्रियेची अगर भार्येची सावली न्यारी " म्हणा.

सुरुवातीच्या एक-दोन आठवड्यांतच फॉरिनचा झगमगाट अगर लखलखाट वगैरेंचा भर ओसरला, की प्रत्येकाला आठवण होते घरची. आयुष्याच्या जोडी-दाराचीच नव्हे तर इतर आप्तेष्ट मित्रमंडळींची पत्रे मिळतात तेव्हा सुद्धा बरे वाटते. परदेश-गमनानंतर पत्र लिहिणे हा एक सुंदर छंद चागल्या प्रकारे जोपासला जातो. काही वेळा पत्राबरोबर अनेक फोटो पाठविले जातात. भेटवस्तू पाठविताना महागात पडते. परंतु म्हणतात ना, प्रेमाला किंमतीचे काय ?

बऱ्याच जणांचा पत्राचा वार ठरून गेलेला असतो. त्या दिवशी पत्र मिळाले नाही तर जिवाची घालमेल होते. परंतु वार नसताना सुद्धा पत्र आले तर मात्र खूपच आनंद होतो. येथे आलेल्यांपैकी अनेकजण हळवे झालेले मी बघितले आहेत.

अशा वेळी त्यांना शेरोशायरी सुचत असते अगर होत असते. काही काही वेळा त्यांना विरह फारच जाणवतो. अतिशय सुंदर जेवणात मीठ नसावे तशी येथे आल्यावर त्यांची अवस्था झालेली असते. एकंदरीत जीवनात जोडीदार मिळाल्यावर पुरुष काय किंवा स्त्री काय, कोठेही एकटे दूर गेले की, अपूर्णांकच असतात, याची खात्री पटते. माझ्या एका दोस्ताने आपल्या पत्रात लिहिले होते, ' एकट्याच्या परदेशवारीच्या वेळी वाटते की, ईश्वर फार डॅबीस आहे. तो एक गोष्ट देतो व तितक्याच दुसऱ्या चांगल्या गोष्टीचे अगर त्याहूनही वरचढ गोष्टीचे मोल आपल्याकडून घेतो. तारणच असते म्हणाना ते !' परंतु या सर्व पार्श्वभूमीवर काही बॅचलर मात्र अगदी मजेत जगत असतात. खूपच ऍश करीत असतात, परंतु संसारी माणूस मात्र लगेच वेगळा कळून येतो व अशा वेळी न कळत का होईना त्याच्या लेखणीतून पत्रावर अक्षरे उमटतात. ' ... but now your love – though feeling, which is something I have, when I am alone here. '

## योगायोग व टेलिपथी

कित्येक वेळा मी बाहेरून होस्टेलमध्ये येण्यापूर्वी काही क्षण आपल्याला पत्र आले असेल याची जाणीव होई. विशेषतः होस्टेलच्या काउंटरमधील कप्प्यात पत्र असते तेव्हा का कोणास ठाऊक, त्याची प्रकर्षाने जाणीव होई. काही वेळा मी तसे सोबत असलेल्या मित्राला बोलून दाखवीत असे व पत्र त्याला दाखविताच ' HA ! ' ' Really ! ' वगैरे म्हटलेल्या त्याच्या उद्गारानंतर असा प्रसंग विरून जाई.

शिंजुकु येथील योदोबाशी कॅमेरा दुकानात कॅमेरा-खरेदीला गेलो व तेथील गर्दीत नेमका माझ्याशेजारी बंगलोरचा फोटोग्राफर भेटावा हा झाला योगायोग, किंवा चक्क पुण्याच्या माझ्याच ऑफिसमध्ये काम करणाऱ्या माझ्या खास दोस्ताचा सख्खा भाऊ, की जो जेमतेम तीन-चार दिवस जपानमध्ये होता तो कन्नाओीच्या अिसेझाकीमाला रस्त्यावर हिंडताना मला भेटावा, हासुद्धा एकयोगायोगच म्हणावा लागेल. परंतु अशा अनेक घटना घडतात की, एखाद्या गोष्टीबाबत तुम्ही विचार करीत असताना अगर ती कृतीत उतरविल्यानंतर तुम्हाला एक कोडे पडावे, इतक्या आश्चर्यकारक रीतीने त्याच घटना अगर गोष्टीबद्दलचा मजकूर पत्राने, फोनने अगर इतर रूपाने तुमच्यासमोर कमीत कमी वेळात हजर होतो, अशाच घटना आपल्याला या जगातील अदृश्य संदेशलहरींची जाणीव करून देतात व पडलेल्या कोड्याची गूढता अधिकच वाढवितात आणि नकळत या विश्वातील अज्ञात शक्तीवर तुमची दृढ श्रद्धा बसते. माझ्याही बाबतीत अशा कित्येक घटना घडल्या व प्रत्येक वेळी त्या अनुभवताना मला कमालीचे आश्चर्य वाटत होते. हा टेलिपथीचाच एक प्रकार होता.

अनेक वेळा पत्रातून आपण एखादी गोष्ट मागावी व ती त्याच वेळेला आपल्याकडे येण्यासाठी पोस्टाच्या पेटीत पडावी अशी उदाहरणे अनेक घडतात. मलासुद्धा याचा अनुभव आला आहे.

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयातील माझे व पत्नीचे एक पत्र क्रॉस झाले होते व त्यात टेलिपथीचा फार सुंदर अनुभव होता. माझ्या व पत्नीच्या पत्रातील मजकुरात अजिबात फरक नव्हता. तो प्रसंग असा : एक दिवस मी रूमवर सहज फोटो चाळताना मला माझ्या धाकटया मुलाचा फोटो दिसला. फोटो फारच सुंदर आला होता व एकदम माझ्या मनात विचार आला की, त्याला कडेवर उचलून घ्यावे व तसे मी पत्रात पण नमूद केले होते. तर क्रॉस झालेल्या पत्रात पत्नीने पण नमूद केले होते की धाकटा मुलगा एक दिवस एकदम झोपेतून उठला व म्हणाला "आई ! बाबा आले का गं ? बाबा नक्की आलेत ! अगं आत्ता बाबांनी मला कडेवर उचलून घेतले होते !' हे त्याचे उद्‌गार माझ्या पत्नीने नमूद केले होते. मनाचे संदेश खरोखरीच जातात एवढे मात्र खरे.

डिसेंबरच्या तिसऱ्या आठवडयाच्या पत्रात पत्नीने मला शिवणाचे हातमशीन घेण्याबद्दल पत्रात लिहिले होते; तर तिचे हे पत्र माझ्या हातात पडण्यापूर्वी मी पोस्टाने पाठविलेल्या या हातमशीनचा भारताकडे प्रवास सुरू झाला होता. अर्थात् या मशीनबाबत पूर्वी कधीही आमच्या दोघांत चर्चा झाली नव्हती.

माझ्या भारतातील परतीच्या तिकिटाचा दिवस, वेळ वगैरे सर्व पक्के झाल्यावर मी रूमवर आलो व ही बातमी पत्नीला पोहोचविण्यासाठी, तत्परतेने पत्र लिहायला घेतले. पत्रातील चार ओळी लिहून पण झाल्या. तेवढ्यात माझा मित्र बंगलोरचा नागेश माझ्याकडे आला व टी. व्ही. वरील सुंदर कार्यक्रम बघण्यासाठी आग्रह करू लागला. तेव्हा मी त्याला पत्र लिहून येतो म्हणालो. कारण पत्र पोहोचायला आठ दिवस लागतात. तसेच टी. व्ही. बघायला एकदा सुरुवात झाली की, मग वेळेचे भान राहात नाही, वगैरे सांगितले, तरी पण त्याने मला आग्रहाने खाली लॉबीत नेले. लॉबीत टी. व्ही. समोर बसल्यावर सुद्धा मी नागेशला म्हणालो, "पत्नीला जेवढ्या लवकर ही बातमी कळेल तेवढे तिला बरे वाटेल व एवढे म्हणे- पर्यंतच लॉबीतील स्पीकरवरून माझ्या नावाची अनाउन्समेंट झाली. मला पत्नीचा भारतातून फोन होता. वस्तुत: या फोनबाबत आधी पत्रामार्फत आमची चर्चा पण झाली नव्हती व अचानक केलेल्या या फोनवर तिने पहिला प्रश्न विचारला तो म्हणजे परतीच्या तिकिटाबाबतचा. फोन ठेवल्यावर नागेशने मला " बघ. टेलिपथी कशी आहे ? " यावर दहा मिनिटे लेक्चर दिले. अशा गोष्टी म्हणजे निव्वळ योगा- योग नव्हे, तर मनाचे संदेश अदृश्य व अजूनही आपणास गूढ असलेल्या लहरींमार्फत जात असावेत याचाच पुरावा. संसारातील असंख्य वस्तूंपैकी एखाद्या वस्तूचा आपण

विचार करावा व नेमका त्याच वस्तूबाबतचा मजकूर आपल्या आयुष्यातील जोडीदाराकडून पत्रात वाचायला मिळावा याला काय म्हणावे ? अशा गोष्टी अनुभवताना खरोखरीच आश्चर्याचे धक्के बसतात. या करिताच आम्ही दोघांनी एकमेकाला लिहिलेली पत्रे जपून ठेवली आहेत. टेलिपथीचा अभ्यास करणाऱ्यांना पुरावा म्हणून त्याचा नक्कीच उपयोग होईल.

## क्योटो, नारा, नागोया शहरी, पर्ल आयलंडवर आणि मात्सुशिता व टोयोटाच्या उद्योगनगरात –

स्कॉलरशिपमधील खास आकर्षण म्हणजे बुलेट ट्रेनने क्योटो, नारा, नागोया या शहरी प्रयाण, तेथील प्रमुख स्थळांचे दर्शन, पर्ल आयलंडवर फेरफटका व टोयोटा, मात्सुशिता वगैरे सारख्या जपानमधील व जगामधील अग्रगण्य कारखान्यांना भेटी या होत. जपानी भाषेची परीक्षा संपल्यावर त्वरित ही ट्रिप आयोजिलेली होती. सुरुवातीलाच याची कल्पना दिली गेली होती. त्यामुळे प्रत्येकजण आतुरतेने या दिवसाची वाट पहात होता. प्रत्यक्ष ट्रीपच्या कालावधीत प्रत्येक दिवशी रूमवर परतल्यावर मी त्या दिवसाचा दिनविशेष लिहीत होतो, तर काहीवेळा न राहावून गाडीतच आसपासचा निसर्ग, जवळील कागदावर शब्दांकित करण्याचा प्रयत्न करीत होतो. आपल्या बरोबरच आपल्या इष्टमित्रांना या ट्रिपची मजा लुटता यावी म्हणून झोपण्यापूर्वी लिहिलेला हा सर्व दिनविशेष जसाच्या तसा पत्रासोबत घरी पाठविला. येथे मिळणाऱ्या सॉव्हिनियर्समधील व भेटी दिलेल्या ठिकाणांच्या छायाचित्रांची कात्रणे पण या पत्रासोबत पाठविली. प्रत्येक कात्रणाच्या मागे नंबर दिला होता व लिखाणात जेथे याचा उल्लेख येई, तेथेपण बाजूला हाच नंबर लिहिला होता. त्यामुळे भेटीचे ठिकाण प्रत्यक्ष नजरेसमोरच असल्याने ट्रिपची मजा, मजकूर वाचत असतानाच विशेष लुटता येई. अनेकांनी पुनः पुन्हा या पत्राचा आस्वाद घेतला. हे पत्र येथे खाली जसेच्या तसे देत आहे.

**२० डिसेंबर** : सकाळी होस्टेलमधून वाय–१८ ग्रुपचे आम्ही सर्वजण निघालो. प्रथम बसने इसोगो स्टेशन. तेथून ट्रेनने 'हिगाशी कानागावा' या गावी पोहोचलो. तेथून दुसऱ्या ट्रेनने 'शिन योकोहामा' या गावी आलो. सकाळचे आठ वाजले होते. या दुसऱ्या खेपेला आम्हाला अर्धा तास उभा राहूनच प्रवास करावा लागला, कारण वेळ सकाळची होती आणि ऑफिसला जाणाऱ्यांची ट्रेनमध्ये तोबा गर्दी होती. परंतु दरवाजे बंद होतात व नंतरच ट्रेन चालू होते. त्यामुळे अपघात होत नाहीत. या दुसऱ्या स्टेशनवरून बुलेट ट्रेनने आम्ही क्योटोला जाणार होतो. एका दिवसाला नव्वद बुलेट ट्रेन्स, या स्टेशनवरून पुढे जातात. बुलेट ट्रेन ही जगातील नंबर एकची फास्ट ट्रेन असून, तिचा वेग ताशी २५० किलोमीटरपर्यंत

असतो. आमची गाडी ऊर्फ बुलेट ट्रेन ८-३५ ची होती. या गाडीत सर्व जागा राखीव असतात. शिन योकोहामाच्या प्लॅटफॉर्मवरील एका काचेच्या भिंती असलेल्या रूममध्ये आम्ही बसलो होतो. काही बुलेट ट्रेन्स लिमिटेड असतात. त्या फक्त काही स्टेशनेच घेतात. अशा ३-४ बुलेट ट्रेन्स आम्ही थांबलेल्या स्टेशनवरून न थांबता पुढे गेल्या. प्लॅटफॉर्म अक्षरश: हादरत होता. ठरलेल्या वेळी आमची गाडी आली. प्लॅटफॉर्मवरच तसेच गाडीच्या पार्श्वभूमीवर आम्ही फोटो काढले. गाडीत प्रवेश केला. गाडी मस्तच होती. गाडीला एकूण सोळा डबे होते. एका डब्यात अंदाजे २०० माणसे. एका रांगेत एका बाजूला तीन आणि दुसऱ्या बाजूला दोन म्हणजे एकूण पाच माणसे बसण्याची सोय. व मधून जाण्यायेण्यासाठी गालीचा अंथरलेला रस्ता. बरोबर ८-३५ ला गाडी हलली. त्वरित गाडीने वेग घेतला. एक एक स्टेशन झपाट्याने मागे टाकीत गाडी पुढे चालली होती. एक गाव संपून दुसरे लागले, हा प्रकारच नाही. कारण साथीला सतत सलग घरे. अगदी सुंदर घरे होती. रेखीव रस्ते व त्यावरून सुसाट वेगाने धावणाऱ्या हर प्रकारच्या गाड्या - लहान, मोठ्या, रंगीत, पांढऱ्या शुभ्र, एकाच ट्रकमध्ये खाली तीन व वरती तीन अशा नवीन गाड्या घेऊन जाणारे ट्रक्स अधूनमधून दृष्टीस पडत. पूल भराभर मागे जात होते. क्षितिजाच्या अलीकडे अतूट नात्याची साक्ष देणारे डोंगर होते कधी ३-४ फर्लांगांवर, तर कधी अगदी रेल्वेच्या बाजूने साथ देणारे. डोंगरावर कधी तांबूस, उंच व सुरूसारखी झाडे होती, तर कधी हिरवेगार, पण थंडीने त्यावर पांढरे सावट आल्याने हिरवटपणा कमी झालेले वृक्ष होते. जपान या देशात एकूण क्षेत्रफळापैकी जवळ जवळ ८० टक्के जागा पर्वताने व्यापली आहे. उरलेल्या २० टक्के जागेत लोक राहतात. त्यामुळे जपानमध्ये जागा फार महाग आहेत. राहाण्यासाठी लोकांना येथे खूपच रक्कम मोजावी लागते. एकूणच जागा कमी म्हणून अन्नधान्य पिकवायलासुद्धा जागा फारच मर्यादित, म्हणून अन्नधान्याची आयात करावी लागते. त्यामुळे ते पण महाग. असो ! तर अशा सुंदर निसर्ग-रम्य मनोहर वातावरणातून आमची बुलेट ट्रेन पुढे धावत होती. वाटेत मस्त निळेभोर पाणी दिसणाऱ्या नद्या भेटल्या. अक्षरश: निसर्ग आम्ही डोळे भरभरून बघत होतो. डोळ्याने पीत होतो. मध्येच बोगदा यायचा व तेवढ्यात जायचा. रस्त्यांचे नयनमनोहर जाळे वरून - खालून व्यवस्थित दिसत होते. गाडीमध्ये कर्मचारी म्हणून तरुण मुलीच कामे करतात. कित्येक जपानी हॉटेलमध्ये सुद्धा शक्यतो शाळकरी किंवा कॉलेजच्या मुली कामे करताना दिसतात. तेवढीच फी बाहेर पडते व अनुभव मिळतो तो निराळाच. गाडीतील एका खिडकी-जवळील जागा मला मिळाली होती. जवळ जवळ चार फूट रुंदीच्या व अंदाजे अडीच फूट उंचीच्या काचेने बंदिस्त असलेल्या खिडकीची खालची बाजू खुर्चीत बसून छातीच्या अंतरावर होती. गाडीतून जातानाच जपानी लोकांना देवासमान

असणाऱ्या माउंट फुजीचे दर्शन झाले. गाडीत, तसेच गाडीतून बाहेरचे काही फोटो काढले. गाडीमध्ये सुंदर पडद्यामागे बेसीन होते. त्याचे तिन्ही बाजूस आरसे होते. गार व गरम पाणी. कोपऱ्यात कागदी ग्लास. विविध पुष्परचनेसहित असलेली फुलदाणी व इतरही अनेक गोष्टी तेथे होत्या. गाडी ठरल्याप्रमाणे दुपारी बारा वाजून बारा मिनिटांनी क्योटोला आली.

**क्योटो मुक्कामी** : इ. स. ७९४ ते १८६८ म्हणजे तब्बल दहा शतकांपेक्षाही जास्त काळ क्योटो ही जपानची राजधानी होती. त्यामुळे गतकालीन जपानचे वैभव, येथील संस्कृती, वगैरेचे व एकंदरीत जपानी इतिहासाचे ठळक दर्शन क्योटो-मध्ये घडते. एकूण २०० शिंटो श्राईन्स व १५०० बुद्ध मंदिरे व सम्राटांची दोन प्रसिद्ध निवासस्थाने क्योटोमध्ये आहेत. युरोप-अमेरिकेत ज्याप्रमाणे स्ट्रीट व त्याला आडवे असणारे अॅव्हेन्यूंनी रस्त्याचे जाळे बनलेले असते त्याप्रमाणेच स्ट्रीट व अॅव्हेन्यूंनी बनलेल्या रस्त्यांचे जाळे सुमारे अकराशे वर्षांपूर्वी सुद्धा क्योटोत होते. शहरात सुमारे साठ उद्याने असून प्रत्येक उद्यान स्वतःच्या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. वर्षभराचे कॅलेंडर जपानमधील विविध सणांनी अगदी भरलेले असते. या दिवशी संपूर्ण जपानभर उत्साहाचे वारे वहाते. गतकालाचे वैभव पुन्हा एकवार रस्त्यावर शिस्तबद्ध रीतीने वाजत गाजत जाते. मग पूर्वीची ही राजधानी सुद्धा त्याला अपवाद नसते.

क्योटो स्टेशनपासून चालत दोन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या 'क्योटो दाईनी टॉवर हॉटेल' हे नाव असलेल्या हॉटेलमध्ये आम्ही सर्वजण आलो. तेथे बॅगा वगैरे ठेवल्या. जेवण घेतले व लगेच एका टॅक्सीत तीन किंवा चार असा आमचा ताफा निघाला. येथील टॅक्सीसुद्धा पॉश असतात. टॅक्सी म्हणून बहुतेक सुंदर निसान किंवा टोयोटा वगैरेसारख्या कंपनीच्या गाड्या होत्या. प्रथम आम्ही टॅक्सीने 'क्योटो युझेन कल्चरल हॉल' मध्ये गेलो. ड्रायव्हरच्या शेजारील सीट-वरून जपानी ड्रायव्हिंग तसेच जपानी रस्ते व त्यावरील वहातूक व्यवस्थित दृग्गोचर होत होती. अगदी पाण्याच्या लाटेवरून जावे ना तसे वाटत होते. या कल्चरल हॉल-मध्ये विशेष काम चालते. जपानी स्त्रियांना अतिशय प्रिय असणाऱ्या 'खिमोनो' या त्यांच्या ड्रेसवर बारीक नक्षीकाम करणे, त्यात रंग भरणे, ते धुणे, वाळविणे वगैरे अनेक कामे येथे चालतात. खिमोनो वरील सुरुवातीचे बारीक, नक्षीकाम लोक हातांनी कसे करतात ते येथे बघितले. त्याआधी या सेंटरची माहिती देणारा चित्र-पट दाखविण्यात आला. नंतर प्रत्यक्ष ते काम बघितले. खूपच सुंदर होते. तेथेच एका ठिकाणी निरनिराळ्या प्रकारच्या मोठ्या नाण्यांवर आपणास हवी ती इंग्लिश अक्षरे कोरून मिळतात. तेथूनच पुढे टॅक्सीने तीन वाजता क्योटोतील प्रसिद्ध 'निजो कॅसल' या सतराव्या शतकाच्या सुरुवातीच्या म्हणजे सामुराई काळातील,

बांधलेल्या संपूर्ण लाकडी व खास वुड कागदाच्या सहाय्याने तयार केलेच्या त्यांच्या श्योगुन ऊर्फ सेनापतीच्या राजवाड्यात आलो. आतमध्ये सर्वत्र मंद उजेड होता. लाकडी भिंतींवर सुंदर नक्षीकाम केले होते. येथे फोटो घ्यायला मनाई होती. दोन फूट बाय दोन फूटच्या चौकोनात काढलेली छतावरील चित्रे सुद्धा रेखीव होती. भिंतींवर विशेषकरून प्राणी, झाडे, फुले वगैरेंची चित्रे व नक्षी होती. येथून आम्ही टॅक्सीने 'किन्कांकुजी टेंपल' या क्योटोतील प्रसिद्ध ठिकाणी आलो. किनकांकुजी याचा अर्थ सोनेरी मंदिर. चौदाव्या शतकाच्या अखेरीस योशिमित्सु या श्योगुनाने या ठिकाणी एक महाल उभारला. तसेच हे सोन्याने मढविलेले दुमजली मंदिर व त्या भोवतालचे तळे बांधले. श्योगुनाच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यावर त्याने आपले निवृत्त जीवन याच परिसरात घालविले. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या इच्छेनुसार या निवासाचे झेन मंदिरात रूपांतर करण्यात आले. सन १९५५ पर्यंत हे सोनेरी मंदिर आपले मूळचे अस्तित्व टिकवून होते. त्यानंतर त्याची डागडुजी करण्यात आली. श्योगुनाचे हे पूर्वीचे निवास बाहेरून व आतून खऱ्या सोन्याने मढविलेले आहे. सध्या तेथे मात्र खऱ्या सोन्याचा अंश म्हणे कमी झाला आहे. या निवासाभोवती पाणी आहे. लोकांना हे निवास आतून बघता येत नाही. लांबून म्हणजे तळ्याच्या काठावरूनच बघता येते. या इमारतीत म्हणे शिल्पशास्त्राचे विविध प्रसिद्ध नमुने आहेत. या सोनेरी देवळाच्या भोवतीच्या शांत व स्तब्ध तळ्यात या इमारतीची पडलेली प्रतिमा फारच सुंदर दिसते. म्हणून या तळ्याला 'क्योकोची' म्हणजे 'आरसे-तळे' या सार्थ नावाने संबोधतात. या मंदिराच्या उत्तर बाजूला विहार करताना सुंदर सुंदर वृक्षांना साथ देणाऱ्या झरे, धबधबे व तळ्यांनी हा परिसर नयनमनोहर केला आहे. हा संपूर्ण परिसरच एक सुंदर बगिचा आहे. बगिचाच्या थोडेसे वैरील बाजूस शेकताई म्हणजे टी-हाऊस आहे. राजे मंडळी या ठिकाणी चहापान करीत असत. या सुंदर वास्तूच्या सान्निध्यात आम्ही फोटो काढले. तेथून थेट टॅक्सीने हॉटेलवर परतलो. रस्त्याच्या दुतर्फा वाटेतील खूप सुंदर उंची व उंच इमारती नजर वेधून घेत होत्या. क्योटो ही जपानची पूर्वीची राजधानी. त्यामुळे जुने वैभव अजूनही दिमाखात उभे आहे. जपान्यांनी ते जतन केले आहे.

रूमवर पोहोचलो तेव्हा संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. ठरल्याप्रमाणे माझा पुण्याचा दोस्त श्री. हरी दामले माझी हॉटेलच्या प्रशस्त हॉलमध्ये वाट पाहात होता. त्याच्याबरोबर क्योटोत फेरफटका मारला. एका भारतीय रेस्टॉरंट-मध्ये खाना घेतला. बऱ्याच दिवसांनी आपला हा खाना बरा वाटला. तेथून बसने तडक हॉटेलवर परतलो.



हॉटेलमधील माझी रूम पाचव्या मजल्यावर होती. रूमच्या सहा फूट बाय पाच फूट काचेच्या खिडकीतून समोरील क्योटो स्टेशन त्यासमोरील प्रख्यात क्योटो टॉवर हॉटेल व त्यावरील टॉवर दिसत होता. रूममध्ये सर्व सुविधा होत्या. सुंदर टेबल, खुर्ची, पलंग, २४ चॅनेलचा कलर टी. व्ही., छोटीशी पण आटोपशीर अॅटॅच्ड बाथरूम, त्यात स्नानासाठी टब व शॉवरची सोय, टेलिफोन वगैरे सर्व काही. रूम-मध्ये भिंतींवर मोठे आरसे, तर जमिनीवर दोन इंची जाडीचा सबंध खोलीभर पसरलेला गालीचा. रूमच्या बाहेर निळ्या पट्ट्यांचा सुंदर गालीचा. रात्रीचा पाऊण वाजला होता. डायरी लिहिताना मला समोरील झगमगणारा क्योटो टॉवर त्याच्या शिखरावरील उघडझाप करणारे लाल दिवे, क्योटो स्टेशन व रस्त्यावरील मंद झालेली वाहातूक दिसत होती, तर खिडकीच्या बंदिस्त काचेतच, मागील आवाज बंद केलेल्या पण रूममध्ये चालू असलेल्या टी. व्ही. ची प्रतिमा स्पष्ट दिसत होती. त्यामुळे पत्र लिहिणे व अधून मधून टी. व्ही. बघणे चालू होते. रूम एकदम साउंड प्रुफ असल्याने बाहेरील कुठलाच आवाज आतमध्ये ऐकू येत नव्हता.

## मात्सुशिताच्या उद्योगनगरात –

**२१ डिसेंबर :** सकाळीच हॉटेलमधून मस्तपैकी नाष्टा करून निघालो.

टॅक्सीने शिचीजो स्टेशनवर आलो. तेथून ट्रेनने एक तास प्रवास करून निशी-सान्सो या गावी पोहोचलो. स्टेशनपासून चालायला सुरुवात करताच नॅशनल, पॅनॉसॉनिक वगैरे नावानी प्रसिद्ध असलेल्या मात्सुशिता इलेक्ट्रीक इंडस्ट्रीअल कंपनीच्या सुंदर सुंदर इमारती लागत होत्या. हे मात्सुशिता नगरच होते. मोठ-मोठया इमारती व त्या समोरील प्रशस्त बागा यामधून आम्ही पायीच त्यांच्या सेंट्रल रिसर्च लॅबोरेटरीच्या शेजारील एक्झिबिशन हॉलमध्ये प्रवेश केला. डोळे दिपून गेले. जपानच्या आर्थिक उलाढालीमध्ये मात्सुशिता इलेक्ट्रिक कंपनीचा सिंहाचा वाटा आहे. जागतिक बाजारपेठेत ऑटो आणि कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक हे जपानचे दोन धंदे आधारस्तंभ. कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक हे शब्द उच्चारताच डोळयां-समोर पहिले नाव येते ते म्हणजे मात्सुशिता. ३३ देशात मात्सुशिताच्या एकूण ७२ कंपन्या असून एक लाख चव्वेचाळीस हजार माणसे या कंपनीत कामाला आहेत. ५७ हजारापेक्षाही जास्त पेटंटचे हक्क असणारी व जनतेची सेवा हे ब्रीद वाक्य धारण करणारी ही कंपनी एकूण चौदा हजार निरनिराळया प्रकारच्या वस्तूंची निर्मिती करीत असून त्या नॅशनल, पॅनॉसॉनिक, टेक्निक्स व क्वासार या चार प्रसिद्ध नावांनी १३० पेक्षाही जास्त देशांच्या बाजारात प्रख्यात आहेत.

जवळजवळ सर्व इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्मिती ही कंपनी करते. कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्समधील जगातील सर्वांत लहान दीड इंची टी व्ही स्क्रीन पासून ते १७० इंची सिनेमा पडद्याएवढया सेटची निर्मिती या कंपनीमार्फत केली जाते. ट्रॅन्झिस्टर, रेडिओ, हेडफोन्स, कार रेडिओ, ट्रॅन्स रिसिव्हर्स, व्हिडीओ टेपरेकॉर्डर्स, व्हिडिओ कॅमेरा, व्हिडीओ मधील इतर उपकरणे, इलेक्ट्रॉनिक ऑर्गन, इत्यादींचे उत्पादन पण ही कंपनी करते. आवाजाच्या दुनियेतील हे तर सम्राट, ' हाय फाय ' म्हणजे हाय फाईडॅलिटी या शब्दांची खरी प्रचिती यांच्या हाय फाय उपकरणांमार्फत येते. हाय फाय कॉम्पोनंटस्, टर्नटेबल, टेपडेक, अॅम्प्लिफायर्स, टयूनर्स व स्पीकर्स सिस्टिम हे त्यांपैकी काही होत. मोठमोठया यंत्रांना व उपकरणाला लागणारे लहान लहान सुटे भाग ही कंपनी स्वतःच करते. त्यामुळे एकंदरीत मालाचा दर्जा उच्च राखला जातो इंडस्ट्रिअल इक्विपमेंट मधील वेल्डिंग मशीन्स, हायव्होल्टेज ट्रॅन्सफॉर्मर्स, सर्किट ब्रेकर्स, वैद्यकीय क्षेत्रातील उपकरणे, फ्रिज, एलेव्हेटर्स, प्रदूषण मोजणारी व रोखणारी उपकरणे, आणि अनेक प्रकारची अॅटोमॅटिक मशिन्सची निर्मिती ही कंपनी करते. पेपर कॉपिअर्स, कॅश रजिस्टर्स, कॅलक्युलेटर्स, मायक्रोप्रोसेसर, कॉम्प्युटरपासून ते अगदी लहान स्टेपलर, पेन्सील शार्पनर ही बिझनेस मशिन्स सुद्धा या कंपनीतर्फे बनविली जातात. कम्युनिकेशन विभाग हा तर त्यांचा हुकमाचा विभाग. ब्रॉडकॉस्टिंग सिस्टिम पासून ते मिटीरिऑलॉजिकल ऑब्झर्वेशन सिस्टीममधील हरप्रकारच्या उपकरणांचे हे निर्माते आहेत. शिक्षणाच्या

क्षेत्रातील हरप्रकारची सहाय्यक उपकरणे बनवून यांनी त्यांचा गृहपाठ केव्हाच केला आहे. या कंपनीतर्फेच सर्व मशीनमध्ये शक्तीचा पुरवठा करणाऱ्या विविध आकाराच्या व प्रकाराच्या बॅटऱ्या बनविल्या जातात. यात औद्योगिक कारणासाठी वापरण्यात येणाऱ्या हेवीवेट बॅटऱ्यांपासून ते सोलरबॅटरीज व कॅमेरा, घड्याळे वगैरेसाठी लागणाऱ्या लहान पॉवर सेलचा पण समावेश आहे.

औद्योगिक तसेच घरगुती वापरातील अनेक प्रकारच्या ए सी – डी सी मोटारी, दिवे, तसेच होम अल्पायन्सेस व स्वैंपाकघरात मग्न असणाऱ्या गृहिणीं-साठी उपयुक्त ठरणारी सर्व प्रकारची किचन वेअर्स, ही कंपनी बनविते. त्यात मायक्रावेव्ह ओव्हन, टोस्टर, ब्लेंडर्स, वॉटर हिटर, डिश वॉशर्स, वॉशिंग मशिन्स, फ्रीज, ड्रायर्स, व्हॅक्यूम क्लिनर्स, वॉटर कूलर्स वगैरे वगैरे अनेक वस्तूंचा समावेश होतो. कॉम्प्युटर ट्रॅफीक कंट्रोल्ड सिस्टीम, रेडीएशन डिटेक्शन सिस्टिम, टनेल सिस्टिम, हॅम कंट्रोल्ड सिस्टिम, डिपार्टमेंटल स्टोअर मधील लेसर स्कॅनरच्या गिऱ्हाईकांच्या सामानाची नोंद घेऊन बिल करणारी यंत्रणा, मोबाईल टेलिफोन सिस्टिम, पब्लिक अॅड्रेस सिस्टिम, कारखान्यात वेल्डिंग करणारी रोबोट सिस्टिम, लाईटिंग सिस्टिम वगैरे सारखी सिस्टिम प्रॉडक्ट्स, बरोबरच कॉम्प्युटर कंट्रोल्ड, एअर कंडीशनर, हेअर सेटर, सायकली, घड्याळेसुद्धा यांच्या निर्मितीच्या यादीतून वगळली गेली नाहीत.

त्यांचा एक्झिबिशन हॉल म्हणजे दुसरी स्वप्नगरीच होती. येथील प्रत्येक गोष्ट ही अत्युकृष्ट होती. आम्ही सर्व लोक येथे भारावून गेलो होतो. येथे प्रवेश करताच समोरील बोलणाऱ्या रोबोटने आमचे स्वागत केले. या रोबोटला टी. व्ही. कॅमेऱ्याचे डोळे आहेत व एकूण नऊ प्रकारचे इलेक्ट्रॉनिक मेंदू आहेत. यामार्फत तुमच्या शरीराचे तपमान मोजण्यापासून ते तुमच्या मुठीतील ताकद अजमावण्या-पर्यंतचे सर्व ज्ञान या रोबोटला होते. ते दर्शविले पण जाते. चार्लस् मात्सुशिता, या तेथील फॉरेन रिलेशन डिपार्टमेंटल मधील मॅनेजरने आम्हा सर्वांचे स्वागत केले. प्रथम चहापान झाले. तद्नंतर या कंपनीचा कारभार कसा चालतो. देशोदेशीचे या कंपनीचे व्यवहार कसे चालतात यावर तीस मिनिटाची एक फिल्म दाखविण्यात आली.

त्यानंतर तेथील एका गाईडने एक्झिबिशन हॉलमधील काही खास वस्तू दाखविल्या. त्यांची इंग्रजीतून सविस्तर माहिती सांगितली. तेथील एका पाठोपाठ एक वस्तू बघून डोळे दिपून जात होते. सर्व वस्तूंचे जिवंत प्रात्यक्षिक दिले जात होते.

साऊंड अॅम्प्लिफायरसाठी एक निराळी खोलीच आहे. त्यात आम्हाला बसवून अत्युकृष्ट साऊंड काय असतो याची दहा मिनिटे चुणूक दाखविली. निर-

निराळ्या वाद्यांचे आवाज प्रत्यक्ष ऐकावेत तसे येत होते. त्यानंतर आधुनिक घर कसे असेल याचा नमुना या एक्झिबिशन हॉलमध्ये ठेवला होता. घरामध्ये प्रवेश केल्यापासून ते घरातील प्रत्येक घटना इलेक्ट्रॉनिक्सच्या सहाय्याने कशा आपोआप घडवून आणल्या जात होत्या त्याचे प्रत्यंतर येथे घडले. पाहुण्यांचे स्वागत, दार आपोआप उघडणे, पाहुणे आत आल्यावर दार आपोआपच बंद होणे, घरात थोडा जरी गॅस सुटला असला तरी एग्झॉस्ट फॅन सुरू करून गॅस बाहेर जाईल याची खबरदारी, घरात आग लागली असता आग विझविण्याचा प्रयत्न व न जमल्यास आपोआप अग्निशामक दलास फोन, घरात घडणाऱ्या अनेक घटनांची नोंद, स्वयंपाकासाठी सोलर एनर्जीवरील कुकर किंवा मायक्रोवेव्ह ओव्हन, वगैरे, वगैरे. सर्व गोष्टी याच हॉलमध्ये बघितल्या. शेवटी या कंपनीतर्फे ' फुरोशिकी ' या नावाने प्रसिद्ध असलेल्या सुंदर चित्रांचे जपानी सिल्कचे कापड भेट म्हणून प्रत्येकास देण्यात आले. या कापडाचा जपानी लोक अजूनही अनेक प्रकारे वापर करतात.

आपल्या कामगारांची, त्यांच्या कुटुंबियांच्या स्वास्थ्याची ही कंपनी फारच काळजीपूर्वक जपणूक करते. त्यासाठी अद्ययावत् व्यायामशाळा, खेळाची मैदाने, करमणूक-केंद्रे वगैरेंची कमतरता या मात्सुशिता नगरात अजिबात नाही. मात्सुशितांचा निरोप घेऊन टॅक्सीने आम्ही स्टेशनवर पोहोचलो. ट्रेनने शिचीजो या गावी आलो. तेथून तडक टॅक्सीने सुप्रसिद्ध हिआन जिंग या श्राईनपाशी आलो. या श्राईन समोरील प्रशस्त रेस्टॉरंटमध्ये जेवण उरकले. श्राईनमध्ये प्रवेश केला. बहुतांशी जपानी लोकांचा बौद्ध धर्म, म्हणून क्योटो या त्यांच्या जुन्या राजधानीत अजूनही अंदाजे १५०० देवळे व २०० श्राईन्स आहेत. देवळात बुद्धाची मूर्ती असते तर श्राईनमध्ये मध्यभागी एक गोल आरसा अगर चकचकीत धातूचा – आरशाप्रमाणे भासणारा – गोल असतो. ती सूर्याची प्रतिकृती होय. यावरूनच हे जपानी लोक सूर्याला फार मानतात हे लक्षात येते. जपानच्या राष्ट्रीय ध्वजावर-सुद्धा पांढऱ्या पार्श्वभूमीवर मध्यभागी सूर्याचा लाल गोल आहे. प्रशस्त अशा श्राईन्समध्ये जपानी पद्धतीचे खूप पॅव्हिलियन्स आहेत.

उतरत्या व आतल्या बाजूला वळलेल्या छपरांची, ही पॅव्हिलियन्स एक मजली, दुमजली तर काही ठिकाणी तीन चार मजली आहेत. दोन वर्षांपूर्वीच या श्राईनचे नूतनीकरण झाले. त्यामुळे सर्वत्र गडद व शेंदरी रंग दिसत होता. छपरां-वरील जाड, ठळक, दाट हिरव्या रंगातील जाड प्लॅस्टिकची कौले अगदी उठून दिसत होती. या श्राईनच्या मागे प्रशस्त, शांत व सुंदर बाग होती. या बागेत लाल रंगाच्या अनेक छटा असलेल्या पानांची उंच झाडे होती. शांत तळे होते. तळ्यात अनेक प्रकारचे फारच मनोहर रंग असणारे मासे आणि एकाच माशावर अनेक रंगांच्या छटा असणारे ते जलचर इकडून तिकडे विहार करीत होते. शांत

तळ्यात पडलेल्या, काठावरच्या इमारतीची स्पष्ट दिसणारी परंतु वाऱ्याच्या झुळकेने दोलायमान होणारी प्रतिमा तेथील शांत वातावरणाची जाणीव करून देत होती. दाट हिरवीगार झाडी असलेल्या उंच डोंगराच्या कुशीत हे श्राईन नयन-मनोहर, नीरव शांत, शीतल असे वाटत होते. मनाला एका सुखद आल्हाद-दायक वातावरणात घेऊन जात होते.

आम्ही त्या परिसरात अनेक फोटो काढले, तेथील पोस्टकार्डच्या आकाराची सॉव्हिनियर्स घेतली. दुपारचे चार वाजून गेले होते. तेथून टॅक्सीने क्योटोच्या सर्वांत जुन्या अशा ' कियोमिझु-देरा ' टेम्पलपाशी आलो. या देवळाच्या सुरुवातीलाच आपल्याकडील तुळजापूर, पंढरपूर वगैरे देवस्थानाचे बाहेर असतात तशी दुकाने होती. त्यांचे ताईत, प्रसाद, फोटो तसेच येथील आठवणी म्हणून खेळणी, की-चेन वगैरे वस्तू या लहानशा दुकानांमध्ये आटोपशीर पद्धतीने लावलेल्या होत्या. फरक एवढाच की, आपल्याकडील दुकाने अधिक येथील श्रीमंती या समीकरणाचा विचार केला तर या दुकानांची कल्पना येईल. थोड्याशा चक्राकार चढावरून दुकानांच्या मधून पायी प्रवास करीत दोन मिनिटांतच आम्ही या देवळापाशी आलो. बाराशे वर्षापूर्वीचे हे देऊळ, नव्हे आपल्याकडील हृषिकेश – हरिद्वारप्रमाणे अनेक छोट्या देवळांचा समूह आहे. मध्येच एखादे मोठे देऊळ असे. येथे पण त्यांचा, आपल्याकडील तिरुपतीच्या देवस्थानाप्रमाणे पैसे टाकल्यास खूप पैसे देणारा देव आहे. व्यापारात, तसेच नोकरीत बरकत होते म्हणून येथे भरपूर पैसे देवापुढे टाकणारे अनेक भक्तगण येतात. वृद्ध जपानी पण भाविकतेने येतात विनम्रपणे नमून प्रथम दोनदा टाळी वाजवून तसाच हात जुळवून नमस्कार करतात.

येथील निसर्गातील निर्झराचे पवित्र पाणी तीर्थाप्रमाणे सर्वजण लांब दांड्याच्या फुलपात्राने पितात. या देवळाच्या मागे खूप उंच डोंगर व त्यावर हिरवीगार झाडी आहे. तरुण मुले मुली निसर्गाच्या कुशीतील या वनश्रीत विहार करतात. उन्हाळ्या-पावसाळ्यात हिरवटपणा तर थंडीत जपान्यांच्या गालावरील लालीला अनेकपटीने मागे टाकणारी लाली व त्याच लालीतील अनेक छटा येथील गर्दझाडीतील पानांवर दिसून येतात. आता कुठे थंडीला सुरुवात झालीय. काही झाडे तांबूस होऊन बसलीत. काही त्या प्रयत्नात आहेत, तर काही अजून खोळं-बलेली आहेत. या डोंगरावरून क्योटो शहराचे विहंगम दृश्य नजरेस पडते. सर्वांत स्पष्ट उठून दिसतो तो म्हणजे क्योटोचा टॉवर.

आम्ही सर्वजण जाडजूड कपड्यांमध्ये लपेटलेलो होतो तरी थंडी चांगलीच जाणवत होती. संध्याकाळचे ५ वाजून गेले होते. सूर्यास्त होऊन धुक्याचे आच्छादन क्योटोवर पडत होते. आम्ही परत सतरा जणांत पाच टॅक्सी करून हॉटेलवर

परतत होतो. येथे टॅक्सीचा सुरुवातीचा दर ४२० येन असतो. तो प्रत्येक स्टेजला ८० येनने वदलतो. हॉटेलवर पोहोचलो तेव्हा टॅक्सी भाडे ३६० येन झाले होते. हॉटेलमध्ये आले की, उबदारपणा लगेच जाणवतो. जपानमध्ये सर्वत्र सरकणारी दारे आहेत. बाहेर अगर आत उघडणारी दारे म्हणजे फक्त काही घरांच्या बाहेरच्या दरवाजांचीच. प्रशस्त पाय-पुसण्यावर पाय ठेवताच समोरील काचेची भिंत दुभंगून बाजूला होऊन जादुनगरीप्रमाणे आपण आतमध्ये प्रवेश करतो. परत तसेच दुसरे दार – काचेचे, सरकणारे. मुद्दाम दुसरे दार – कारण आतील उबदारपणाला अजून एक जादा वेष्टन.

आत येताच संथपणे बंद होणारे दार – कॉफी कलरचे, दहा बाय सहा फूट काचेची शेड असलेले. आम्ही उतरलेलो क्योटो दायी-नी टॉवर हॉटेल हे येथील एक उंची हॉटेल. त्याच्या तळातील प्रशस्त जागेत एका बाजूला त्यांचे उघडे काउंटर असलेले दुकान होते. काउंटर बाहेरच्याच उभ्या फिरत्या स्टँडवर पोस्ट-कार्ड आकाराची अनेक सॉव्हिनियर्स होती. त्यांतील कुठले निवडावे व कुठले ठेवावे हेच कळत नव्हते. सर्वच सुंदर होती. प्रत्येकी ६० येन असलेल्या या कार्डात तेथील उतरलेल्या मंडळींना दहा टक्के सूट मिळते. रूमवर आलो. सामान टाकले. रूम-मध्ये परत आलो तेव्हा रूम स्वच्छ केलेली दिसली. नवीन ड्रेस, अगदी मऊ मऊ वुलनची ब्लँकेट्स् ऑफ व्हाईट कलरची ही ब्लँकेट्स् इतकी मऊ होती की, मेंढीला
1 सुद्धा ती मऊ लागली असती. प्रशस्त साडेसहा फूट बाय साडे चार फुटाचा पलंग व त्यावर उडी मारून बसले असता परत अलगद वरती आणणाऱ्या गाद्या. आंघोळ वगैरे उरकून मी एकटाच पायी बाहेर पडलो.

एक बऱ्यापैकी लांब टेबल असलेल्या व त्या समोर अनेक स्टूल्स ठेवलेल्या अशा त्या लहानशा ताडपत्रीच्या छपराखालील रेस्टॉरंटमध्ये जेवण आटोपले. स्वस्त पडले. तेथून थेट कूच केले क्योटो टॉवरकडे. टोकियो टॉवर व नागोया टी. व्ही. टॉवर या दोघांच्या नंतर उंचीच्या दृष्टीने जपानमध्ये तिसरा नंबर लागतो या क्योटो टॉवरचा. जमिनीवरील नऊ मजली क्योटो टॉवर हॉटेलच्या छताच्यावर ३२८ फूट उंच असलेला व दीपामधील उंच ज्योतीच्या आकाराप्रमाणे दिसणारा हा टॉवर क्योटोमधील प्रेक्षकांचे कोठूनही लक्ष वेधून घेतो. या टॉवरवर प्रेक्षकांच्या दोन गॅलऱ्या आहेत. सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत खुल्या असणाऱ्या या टॉवरवरील सर्वांत वरच्या प्रेक्षकगॅलरीतून परिसरातील सात किलोमीटर त्रिज्ये-पेक्षाही जास्त अंतरापर्यंतचा प्रदेश दृष्टीच्या टप्प्यात येतो. एक हजार टन वजन असलेला हा टॉवर एकूण बावीस ट्यूब्यूलर स्टील सेक्शन्स एकमेकांस वेल्डिंग करून उभा केला आहे. दर सेकंदास नव्वद मीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याच्या झोतात व जपानने आजतागायत अनुभवलेल्या जास्तीत जास्त ताकदीच्या भूकंपामध्येही

ह्या टॉवर सुरक्षित असेल.

एकूण जमिनीखाली तीन व जमिनीवर नऊ मजली क्योटो टॉवर हॉटेलची इमारत आहे. इमारतीच्या छताचे वरील तिसऱ्या मजल्यावर पणतीच्या आकाराची स्कायरूम आहे. प्रथम अकरा मजले एक लिफ्ट व नंतर त्यावरील नव्वद मीटर दुसरी लिफ्ट करून मी सर्वांत वरील प्रेक्षक-गॅलरीत पोहोचलो. अंदाजे नऊ मीटर व्यास असलेली ही गॅलरी सर्व बाजूने जाड काचेने बंदिस्त होती. या गॅलरीत दर दोन फुटांवर भली मोठी दुर्बिण पक्की केलेली होती. या दुर्बीणीत शंभर येन टाकले की तीन मिनिटांपर्यंत या दुर्बिणीतून बघता येते. अगदी दोन किलो-मीटरवरील मोटारीची नंबर प्लेटपण वाचता येते. दिव्याच्या झगमगाटातील क्योटो चमचमत होते. याच प्रेक्षक गॅलरीच्या खाली एक जिना उतरला असता अनेक प्रकारचे खेळ ठेवलेले होते. शंभर येन टाका व तीन मिनिटे खेळा. मी तेथून सरळ लिफ्टने खालील पहिल्या प्रेक्षकांच्या गॅलरीत म्हणजे स्कायरूममध्ये आलो. तेथील काचेने बंद असलेल्या गॅलरीतून फेरफटका मारला. येथे प्रशस्त स्नॅक्सबार आहे. तेथून जिन्याने खालच्या मजल्यावर आलो.

या मजल्यावर सर्वत्र लहान मुलांसाठी हुबेहूब आकाराची, हलणारी आणि कापडी तसेच कापूस, लोकर व इतर पदार्थमिश्रित प्राण्यांची गुबगुबीत रंगीत खेळणी होती. त्यात ससा, अस्वल, माकड वगैरे अनेक प्राणी होते. गळ टाकून मासेमारी करणारे ससेभाऊ होते, तर गळाला लागलेला जड मासाच ससेभाऊंना पाण्यात घेऊन जाताना दिसत होता. आसपास उड्या मारणारी व हसणारी लहान मुले बघून मला पण माझ्या मुलांची आठवण झाली. त्यांच्यासाठी येथील काही सॉव्हिनियर्स कार्डे घेतली. लिफ्टने खाली येऊन क्योटो टॉवर हॉटेल-मधून बाहेर पडलो. तेथून जवळ असलेल्या एक थिएटरमधे जपानी सिनेमा बघि-तला. निसर्गाचे फार सुंदर चित्रण केलेला हा सिनेमा बघून तडक माझ्या हॉटेल-मधील खोलीवर परतलो. या हॉटेलमधील पोषाखात एका छबी काढली. डायरी-लिखाण आटोपले. उद्या येथून मुक्काम हलणार होता म्हणून आवराआवर केली तेव्हा घड्याळात रात्रीचा एक वाजला होता.

**क्योटो ते नारा**

२२ **डिसेंबर** : सकाळी न्याहारी करून आठला हॉटेल सोडले. बाहेर पावसाचा मंद शिडकावा अंगावर येत होता हॉटेलच्या शेजारीच असलेल्या क्योटो स्टेशनवर आलो. आमच्या ट्रेनने क्योटो सोडले तेव्हा नवीन इमारती, अधिक जुने पुराणे राजधानीचे वैभव, नजरेत पडत होते. एकमेकाला दाटीवाटीने बिलगून उभी अस-लेली सुरुवातीची दुमजली घरे संपल्यावर सुरु झाल्या नवीन इमारती आणि रेखीव आटोपशीर दुमजली घरे. नवी घरे सिंथेटिक टाइल्स व सोलर पॅनेल्समुळे नजरेत

भरत होती. त्यात बाहेरील बाजूला होत्या लटकत्या मिनी बागा ऊर्फ कुंड्या. घरांच्या खिडक्या सुंदर होत्या. त्यांचे सरकते दरवाजे व त्याला पिटुकली बाल्कनी अगर बाल्कनीचा आभास निर्माण करणारी फक्त ग्रील उर्फ बाल्कनीचा कमरे-इतक्या उंचीचा कठडा. घरांच्या मागील बाजूस होत्या मोठमोठ्या शब्दांच्या निऑन साईन्स असलेल्या इमारती आणि आधुनिकतेचा शाप समजल्या जाणाऱ्या व वातावरण दूषित करणाऱ्या चिमण्या. त्यांतून धक्काबुक्कीने बाहेर येणारे धुराचे लोट नजरेत पडत होते. जुन्या क्योटोचे अरुंद रस्ते संपवून भरपूर रुंदी असलेले रस्ते सुरु झाले. गाडीने वेग घेतला. नवीन दुमजली घरांची जाडसर प्लॅस्टिकची, गडद्द निळ्या, तपकिरी, हिरव्या वगैरे रंगाची कौले ठराविक तिरप्या जपानी पद्धतीच्या घरांच्या शिरी राहून दिमाख दाखवीत होती व इमारतीच्या शोभेत भरच घालत होती. काही कंपन्यांच्या इमारती लक्ष वेधून घेत होत्या. तर काही इमारतींच्या एकूण जागेपेक्षा जास्तच जागा व्यापणाऱ्या तिरप्या आखीव कार-पार्किंगच्या जागा, त्यावर नीटस लावलेल्या टोयोटा, निस्सान, सुझुकी, डॅटसन वगैरे कंपन्यांच्या आकर्षक रंगाच्या रेखीव आकराच्या गाड्या नजरेत भरत होत्या. आमची गाडी अंदाजे १५० मैल वेगाने पुढे धावत होती. प्रत्येकजण जणू काही रिसेप्शनलाच चाललाय अशी वेशभूषा, रस्त्यावरून जाणारी जपानी जनता पण हळूहळू कमी होऊन नंतर फक्त सुसाट वेगाने धावणाऱ्या गाड्याच व त्यानंतरच्या शेतीवाडीच्या दर्शनास सुरुवात झाली. जपानमध्ये सर्वांत श्रीमंत लोकांत शेतकऱ्यांचा भरणा अधिक. जमीन हीच त्यांची खरी दौलत. त्यांची शेती, त्यातील त्याचे डौलदार श्रीमंती घर व बाहेरील बाजूस श्रीमंतीची ऐट दाखविणारी त्याची कार. शेतीवाडीच्या मागील बाजूस पार्श्वभूमीसाठीच की काय विखुरलेले, कमी अधिक उंचीचे, बांबूच्या तसेच तांबूस लालसर उंच सुरूच्याप्रमाणे असलेल्या झाडांनी माखलेले डोंगर. मधेच काही वेळ आम्हाला साथ देणारे रस्ते एकदम कुठेतरी डोंगराच्या पलिकडे गडप्प होत. अशाप्रकारे, कधी घरे, कधी डोंगर, तर कधी स्वागतालाच उभी करावी, त्याप्रमाणे भासणारी व भेटणारी रस्त्याच्या रंगीत पुलाची कमान. अशा पुलांच्या कमानी खालून जाताना गाडीचा भरधाव वेग, विशेष जाणवे. आपल्याप्रमाणेच बाजूला भेटणारे इलेक्ट्रिकचे खांब व त्यावरील ताणलेल्या तारा नजरेतून सुटत नाहीत. कधी नदी, कधी निर्झर तर कधी शांतपणे वाहाणारे अगर शांतपणे खाली येणारे पाणी काही काळ साथ देऊन जात, मनात प्रसन्नता निर्माण करीत. गाडीमध्ये बुलेटट्रेनप्रमाणेच गुबगुबीत, वेलवेटने आच्छा-दलेले सीट होते. खिडक्यांना सुंदर पडदे, दोन खिडक्यांच्यामध्ये आटोपशीर फुलदाणी व त्यातील प्लॅस्टिकची फुले. दोन खुर्च्यांच्या पुढे दोन खुर्च्या अशी एका बाजूला रांग होती तर या दोन खुर्च्या चक्क संपूर्ण १८०° मध्ये वळवून एकमेकांसमोर तोंडे करून चौघांना गप्पा मारता येत असे. काही वेळाने घरावरची सोलर पॅनेल्स् दिसू

लागली. शहर आल्याची जाणीव झाली. सकाळचे नऊ वाजून दहा मिनिटे झाली होती. स्टेशन होते नारा.

**नारा** : नारा हे जपानमधील प्रवाश्यांचे भेटीचे एक प्रसिद्ध शहर आहे. पुरातन काली येथे राजधानी होती. हजारो वर्षांपूर्वी बांधलेली अनेक श्राईन्स व देवळे आजही येथे पाहावयास मिळतात. नारा स्टेशनवर उतरल्यावर स्टेशनवरच अनेक लॉकर्स आहेत. २०० किंवा ३०० येन टाकले की लॉकरला लोंबत असलेली किल्ली कुलपाला लागते. याकडे लक्ष देण्यासाठी कोणाही व्यक्तीची आवश्यकता नसते. आम्ही अशा लॉकर्समध्ये सामान ठेवले व टॅक्सीने नारापार्ककडे निघालो. नारापार्कच्या सुरुवातीलाच डिअरपार्क म्हणजे हरणांचे उद्यान आहे. १२०० एकरांतील हिरव्यागार कुरणातील या उद्यानात हरणे व सांबर मुक्तपणे वावरत असतात. प्रशस्त व दीर्घ हिरवळ आणि उंच पाईन ट्रीजमधून आम्ही पुढे निघालो. येथे बागडणाऱ्या हरणांनी व विनशिंगाच्या सांबरांनी आमचे स्वागत केले. न बिचकता ही हरणे व सांबार प्रवाशांशी लगेच मैत्रीच्या भावनेने वागतात. प्रवासी-पण त्यांना जवळच विकत मिळणारा छोटचा भाकरीसारखा पदार्थ भरवितात. या हरणांच्या उद्यानातून सरळ पुढे चालत गेल्यावर टोडाजी टेम्पल येते. ही जगातील लाकडाची सर्वांत मोठी इमारत आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ दोन्ही बाजूला लाकडाचे सहा मीटर उंचीचे व भीतीदायक हावभाव करणारे द्वारपाल आहेत. मंदिरात प्रवेश केल्यावर समोर बुद्धाची उंच व शांत ब्राँझची बैठी मूर्ती कमलदलात ध्यानमग्न अवस्थेत विराजमान होती.

या मूर्तीची उंची १६ २१ मीटर म्हणजे अंदाजे ५३ फूट होती. जपानमधील ही सर्वांत उंच बुद्धाची ब्राँझची मूर्ती. यास ' दाईबुत्सु ' किंवा ' ग्रेट बुद्धा ' या नावाने संबोधले जाते. धार्मिक शिल्पकृतीतील हे एक आश्चर्यच म्हटले पाहिजे. मूर्तीचे जुने ब्राँझ खूपच काळे पडले होते. या मूर्तीच्या दोन्ही बाजूला त्याचे सहाय्यक ऊर्फ शक पूर्ण पितळी रंगात, बसलेल्या अवस्थेत होते. या मूर्तीच्या आजूबाजूला मंदिराच्या वरील छपराला आधार देणारे भलेमोठे व अंदाजे ३ मीटर व्यासाचे लाकडी उंच खांब होते. त्यांपैकी एका खांबाला खाली एक लहान चौकोनी आकाराचे आरपार भोक होते. यातून गेले असता सर्व पापे नाहीशी होतात असा समज आहे. दोन जपानी लोक यातून जाताना बघितले. त्यांची ती जीवघेणी धडपड व कसेबसे बाहेर काढण्याचे प्रकार चालू होते. मंदिराच्या बाहेर आलो. आपल्याप्रमाणेच या मंदिराच्या बाहेर लोक तीर्थ घेतात. फरक एवढाच की, तीर्थ म्हणून सरळ झऱ्याचे पाणी एका पन्हाळीतून तेथे आणलेले असते व पन्हाळचाला खाली भोक असते. त्यातून पडणारे पाणी म्हणजेच तीर्थ. या देवळाच्या बाहेरील बागेत फेरफटका मारला. येथे एक प्रचंड मोठी घंटा आहे. त्या शेजारी कोफुकुजी टेंपल आहे. नारा-

मधील सात मोठ्या उद्यानांतील एक उद्यान येथे आहे. बागेतील रुंद रस्त्यावर गव्हाळी रंगाचे कंकर पसरले होते. तर सर्वत्र ख्रिसमस-ट्री-प्रमाणे असणारे सेडर ट्रीज होते. बागेमध्ये प्रसिद्ध जपानी पद्धतीचा पाच मजली सुंदर पॅगोडा आहे. येथून सरळ स्टेशन गाठले. लॉकरमधील सामान ताब्यात घेतले. तेथून गाडी पकडली आणि आता वेध लागले होते 'तोबा' चे. तोबा येथे एक फारच लहानसे बेट असून ते 'मिकिमोतो पर्ल आयलन्ड' या नावाने जगप्रसिद्ध आहे.

**मिकिमोतो पर्ल आयलन्ड – तोबा** : गाडीने दुपारी १२ ला नारा सोडले तेव्हा मस्त गुलाबी थंडी होती. प्रत्येक श्वासाबरोबर सिगारेटसारखा धूर बाहेर पडत होता. चार डब्यांचीच गाडी होती; परंतु आतील सर्व व्यवस्था बुलेट ट्रेन-प्रमाणेच. शहर गेले व निसर्ग जवळ आला. काश्मीरच्या खोऱ्यासारखा प्रदेश सुरू झाला. भर दुपारी सूर्य आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याचा अतिशय केविलवाणा प्रयत्न करीत होता. तर दरीतून वर येणारे धुक्याचे लोटच्या लोट सूर्यदर्शनच काय, परंतु सूर्यस्थानाचा सुद्धा पत्ता लागू देत नव्हते. या सर्वाला साक्षी होते शांत निर्झर. किती शांत तर अगदी काठावरच्या ख्रिसमस ट्री प्रमाणे असणाऱ्या वृक्षांची शांत प्रतिमा पाण्यात दिसत होती.

काही वेळा डोंगरांच्या दोन रांगा स्पष्ट नजरेत भरत होत्या. चहाच्या मळ्याप्रमाणे डोंगराच्या उतरणीवर सुद्धा शेतीचा केलेला प्रयत्न स्पष्ट दिसत होता. गाडीचा वेग ताशी १५० मैलांच्या पुढे असावा. कानात त्यामुळे एक प्रकारचा बद्दपणा येत होता. त्यावरून वेगाची जाणीव झाली. मधेच जपान्यांचे फार्म्स लागायचे. या फार्म्सचे वैशिष्ट्य म्हणजे यातील काही भागात चक्क निसेनहट-प्रमाणे लांबच लांब व मोठ्या अर्धगोलाकृती हट्स होत्या. चंदेरी प्लॅस्टिकने आच्छादलेल्या या हट्सना आतून लोखंडी सांगाडा होता. या हट्सचे तापमान विशिष्ट राखले जाते. आतमध्ये भाजीपाला, फुले इत्यादींची लागवड केलेली असे. प्राणी, पक्षी व वाईट हवामानामुळे पिकाची खराबी होऊ नये म्हणून ही खबरदारी.

काही काळ रेल्वेच्या दुतर्फा फक्त डोंगरच होते. पण डोंगर थोडा मागे जाताच रेल्वेला समांतर असलेले लांबलचक रस्ते व त्या नंतर पुन्हा डोंगर सुरू व्हायच्या आतच जपान्यांनी त्यांचे तेथे टाकलेले घरटे दिसत होते. डोंगरावर उंचच्या उंच सुरूसारखी झाडे होती. डोंगर व या सरळसोट बुंध्याच्या झाडांच्या मधून आकाशाचे लपाछपीचे दर्शन घडत होते. निसर्ग येथे खूपच विखुरलेला होता. मधेच गाडीच्या बऱ्याच खालच्या अंतरावरून गेलेले काळेभोर व त्यावरील पांढऱ्या आणि पिवळ्या ट्रॅफिकच्या खुणा असलेले रस्ते, बोगदे, पूल किंवा संथ वाहणारी नदी भेटत असत. परंतु वृक्ष मात्र सतत साथीला होते. सगळीकडे हीच हिरवट रंगाची झाडे. थंडीमुळे त्यांनी तांबूस छटा धारण केलेली जाणवत होती. तांबूस

हिरवट गर्द झाडांनी डोंगराला पांघरले होते व त्याला वरून धुक्याने लपेटले होते.

बाहेर हा निसर्ग तर गाडीमध्ये डार्क नेव्ही ब्ल्यू रंगाच्या स्कर्ट पर्यंतच्या उंचीच्या वनपीस ल्यालेल्या सर्व्हंट्स ऊर्फ वेट्रेसेस होत्या. त्यांच्या या ड्रेसवर पिवळा बेल्ट व डोळ्यावर नर्सप्रमाणे असणारी छोटीशी टोपी शोभा देत होती. हसत-मुखाने काम करणाऱ्या या बहुतांशी विद्यार्थिनी असतात. गाडी तोबाला पोहोचली तेव्हा फारच दाट धुके होते. दुपारचे दीड वाजून गेले होते. सर्व बाजूंनी बंदिस्त अशा पुलाने मिकीमोतो पर्ल आयलंड मुख्य भूभागाला जोडलेले होते. प्रथम या आयलंडवरील एका हॉटेलमध्ये खाणे – पिणे उरकले व नंतर तेथे भ्रमंती सुरू केली.

मोती ज्या ऑयस्टरमधून बाहेर काढतात ते ऑयस्टर येथील परिसरात जोपासले जातात. योग्य प्रकारे वाढ झाल्यावर त्यांच्या पोटातील मोती बाहेर काढतात. हे मोती बघितले. तेथील प्रदर्शन बघितले. मोती बाहेर कसे काढतात याची दहा मिनिटांची फिल्म पण बघितली. मोती विक्रीस ठेवलेला विभाग बघितला. सामान्य माणसाला परवडणाऱ्या किंमतीपासून ते बाचून फिट आणणाऱ्या किमती पर्यंतचे सर्व मोती न्याहाळले. बाजूला असलेल्या जास्त किंमतीमुळेच ते मोती मला निराळे भासायचे, बाकी किंमतीतला हा फरक एवढा का हे आमच्या-पैकी अनेकांना तरी न सुटलेले कोडे होते. दर अर्ध्या तासाला समुद्रात उड्या टाकणाऱ्या जपानी स्त्रिया बघितल्या. पाण्यात खोलवर बुडी मारून त्या ऑयस्टर पकडून आणीत होत्या व पाण्यावर तरंगणाऱ्या लाकडी बास्केटमध्ये टाकीत होत्या. त्यांचा दहा मिनिटे चालणारा प्रयोग बघितला.

दुपारचे चार वाजून गेले होते. धुक्याने लपेटलेले ते शांत आयलंड काही निराळेच दिसत होते. कोकिची मिकिमोतो या गृहस्थाचा पुतळा या ठिकाणी उभारलेला आहे. या गृहस्थाने हे आयलंड सुधारण्यासाठी खूपच परिश्रम घेतले होते, आपले सर्व आयुष्य त्यासाठी वेचले होते. आम्ही आमची या आयलंडवरील भ्रमंती संपवली व सुरू झाला आमच्या सहलीचा तिसरा अंक. पर्ल आयलंडपासून फर्लांगभर अंतरावर असलेल्या 'हॉटेल किनकाईरो' या नावाच्या जपानी पद्ध-तीच्या हॉटेलमध्ये पोहोचलो. आजचा उरलेला दिवस संपूर्ण जपानी पद्धतीने घालवायचा होता म्हणून या खास जपानी उंची हॉटेलात प्रस्थान.

**जपानी पद्धतीचे हॉटेल** : जपानी पद्धतीच्या हॉटेलना 'र्‍योकन्' किंवा 'जॅपनीज इन्' असे म्हणतात. जॅपनीज इन् मध्ये प्रवेश करता तेव्हा तुम्ही खरोखरच दुसऱ्या जगात प्रवेश करता. प्रवेशद्वारानंतरच्या देवडीचे बांधकामही काही निराळेच असते. येथे आतमध्ये काही अंतरावर एक कट्टा असतो. त्यावर

वसून तुम्ही तुमची पादत्राणे काढायची व तेथे ठेवलेल्या सपाता घालायच्या. अशा सपातावर बहुतेक करून त्या हॉटेलचे नाव असते. हॉटेलमधील कर्मचारी तुमची पादत्राणे योग्य ठिकाणी ठेवून देतात. तुम्ही त्याची काळजी करू नका. जेव्हा तुम्हाला बाहेर जायचे असेल तेव्हा ती तुम्हाला हजर केली जातात.

तुम्ही जेव्हा तुमच्या रूममध्ये शिरता तेव्हा आतमधील तातामीवर पाय ठेवण्यापूर्वी पायातील सपाता बाहेर काढून ठेवाव्यात. पायमोजे किंवा अनवाणी पायाने तातामीवर हिंडण्यास परवानगी असते.

जुन्या पद्धतीच्या अिनमध्ये रूम मुख्य कॉरिडॉरपासून साध्या कुलूपरहित कागदी सरकत्या दरवाजाने वेगळी केलेली असते, परंतु आधुनिक अिनमधील खोल्यांचे दरवाजे आतमध्ये उघडणारे व कुलूपासहित असतात. रूममध्ये खुर्च्या नसतील तर समजावे की, ही खरोखरीच जपानी पद्धतीची रूम आहे. अिनमधील कर्मचारी तक्के आणून देतात. रूममध्ये गाद्या नसतात. ज्या वेळी तुम्हाला झोपावयाचे असते त्या वेळी शेजारील खोलीमधून गाद्या, उशा, चादरी वगैरे आणून दिली जातात व खोलीत खालीच घातली जातात. पाश्चात्त्य पद्धतीच्या हॉटेलमध्ये ज्याप्रमाणे सिंगल बेड, डबल बेड वगैरे शब्दप्रयोग वापरले जातात तसे या अिनमध्ये नसते. जितकी मंडळी एका रूममध्ये उतरलेली आहेत तेवढ्या गाद्या शेजारी शेजारी घातल्या जातात.

अशा प्रकारच्या जपानी हॉटेलमध्ये तुम्हाला स्नानासाठी एकांत मिळत नाही परंतु जेवणासाठी मात्र तो मिळू शकतो. न्याहारी व रात्रीचे जेवण तुमच्या रूममधील कमी उंचीच्या टेबलावर दिले जाते. कित्येकदा हा मेनू सुद्धा ठराविकच असतो. व त्याचे बील हॉटेल-बिलामध्ये समाविष्ट असते. जर हॉटेलमधील कर्मचाऱ्यांची कमतरता नसेल तर तुमच्या सोयीप्रमाणे तुमच्या रूममध्ये टेबलाच्या बाजूला एखादी, स्त्री-कर्मचारी असते. चहा घेताना, दुसऱ्यांदा भात वाढताना, ओसाके (तांदुळापासून बनविलेली प्रसिद्ध जपानी दारू) ओतताना किंवा इतर प्रत्येक वेळी ती तुमच्या सेवेस बाजूला हजर असते.


अशा हॉटेलमध्ये वैयक्तिक अधिक सेवासुद्धा दिली जाते. जसे की तुम्ही प्रत्येक वेळी बाहेरून आला की, तुमचे बाहेरील कपडे काढून बाजूला वॉर्डरोबमध्ये हँगरला ठेवणे. युकाता किंवा खिमोनो अंगावर चढविणे वगैरे. त्या युकातावरच तुम्ही हॉटेलच्या लॉबीत अगर बागेत केव्हाही हिंडू शकता.

**जपानी हॉटेलमधील स्नान** : जपानी पद्धतीचे बाथ-टब पाश्चिमात्य पद्धतीपेक्षा वेगळे आहेत. आधुनिक अिनमध्ये रूमला लागूनच संडास, बाथरूम असते. परंतु जुन्या पद्धतीच्या अिनमध्ये ही सोय कॉमन म्हणजे सार्वजनिक बाथरूममध्ये असते. अनेक मंडळी एकाच वेळी स्नान करताना किंवा पाण्यात पहुडलेली दिसतात.

सार्वजनिक बाथरूममध्ये प्रवेश केल्यावर प्रवेशद्वाराच्या पार्टिशनच्या मागील खोलीत शेल्फ असते. शेल्फामध्ये वेताचे अगर प्लॅस्टिकचे टब असतात. बाजूला लहान टॉवेलच्या वड्या ठेवलेल्या असतात, तुम्ही तुमचे सर्व कपडे (व लज्जा नावाची चीज) काढून या टबमध्ये ठेवायचे आणि पाहिजे असल्यास एक लहान टॉवेलची घडी घ्यावयाची. या खोलीला लागूनच आतील बाजूस एक मोठा हॉल असतो. हॉलच्या अंदाजे अर्ध्या भागात एक तळे असते – अंदाजे दोन फूट उंचीचे. एक किंवा अनेक तोटयांतून या तळयात गरम पाणी पडत असते. उरलेल्या अर्ध्या भागात गार व गरम पाण्याचे नळ, हाताने अंगावर पाणी शिंपडता येणारे शॉवर्स, लहान स्टूल्स, टब, पाणी अंगावर घेण्यासाठी लहान भांडी इत्यादी असतात. पाण्याची अजिबात कमतरता नसते.

या तळयात प्रवेश करण्यापूर्वी तुमच्या शरीराचा बहुतेक सर्व भाग अगर जास्तीत जास्त मळलेला भाग धुवावा अशी अपेक्षा असते. यासाठीच हॉलमधील तळयाच्या बाजूला स्नानाची व्यवस्था असते.

जॅपॅनीज बाथ – टब ऊर्फ ही गरम पाण्याची तळी मुख्यत्वे आंघोळीसाठी असतात. तुमच्या थकलेल्या स्नायू व शिरांना विसावा मिळावा हाच हेतू या मागे असतो. दिवसभराचा मानसिक ताण व शारीरिक थकवा नाहीसा करण्यासाठी या जपानी पद्धतीच्या बाथ-टबची योजना असते.



जपानी लोकांना या तळयातील गरम पाणी आवडते. या पाण्याचे तपमान कमी जास्त करता येते. उबदारपणा साधारणतः हाडापर्यंत पोहोचल्यावर किंवा काही काळ या तळयात घालविल्यावर तुम्ही परत बाहेर येऊन बाहेरील तोटी अगर हॅंड शॉवर्स आणि साबणाच्या सहाय्याने स्वच्छ आंघोळ करावी व पुन्हा दुसऱ्यांदा विश्रांतीसाठी तळयातील पाण्यात प्रवेश करावा. ही जपानी पद्धत आहे. तर काही जण सुरुवातीलाच स्वच्छ साबणाने आंघोळ करून नंतरच या तळयात शिरतात. या तळयात एका बाजूकडून पाणी पडत असते तर तळयातील पाणी दुसऱ्या बाजूकडून काही उंचीवरून बाहेर जात असते. बरीच मंडळी या गरम पाण्यातील

तळ्यात आपल्याच नादात आणि स्वतःच्या विश्वात रममाण झालेली असतात अगर हरवलेली दिसतात. प्रत्येकाचे जग निराळे असते. काही जण तळ्याच्या कठड्यावर टॉवेलच्या घडीवर डोके ठेवून व मानेपर्यंतचा देह पाण्यात विसावून समाधी लावून असतात. येथे एकमेकांत गप्पा मारणारी मंडळी दिसत नाहीत. बाजूला स्टुलावर साबण लावताना लज्जा रक्षणासाठी दोन बाय एक फुटाचा टॉवेलचा तुकडा सुद्धा डोक्यावर ठेवलेला दिसे.

स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र पब्लिक बाथरूम असतात व दोघांसाठी कॉमन पब्लिक बाथरूमसुद्धा असतात. परंतु त्यामध्ये विशेषतः वृद्ध मंडळींचाच भरणा अधिक असतो असे तेथील हॉटेल कर्मचाऱ्याने आमच्यातील काही उत्सुक मंडळींना सांगितले होते. परंतु अशा पब्लिक कॉमन बाथरूममध्ये तरुण-तरुणी शृंगार करताना टी. व्ही. स्क्रीनवर बघितले होते.

जपानी लोक संध्याकाळी कामावरून आल्यावर आंघोळ करणे विशेष पसंत करतात. हॉटेलमधील रूममध्ये आल्यावर आम्ही खिमोनो परिधान केला. जपानी पद्धतीने स्नान केले. बाथरूममधील सर्व हॉल गरम पाण्याच्या वाफेने चांगलाच धूसर झाला होता. स्नान उरकल्यावर आम्ही सर्वजण युकाता घालून जपानींच्या खास पद्धतीने तयार केलेल्या डायनिंग हॉलमध्ये आलो. त्यांच्या पद्धतीने म्हणजेच साधारणतः वज्रासनाप्रमाणे बसलो. प्रत्येकाच्यापुढे बसके परंतु लांब रुंद चौरंग असून त्यावर मोठी आयताकृती थाळी होती. थाळीतील पदार्थ मोजले. एकूण पस्तीस भरले. तळलेला, खारवलेला, भाजलेला, कच्चा, वाफावलेला साकाना (म्हणजे मासा). तेंपुरा ही येथील खास भजी. सुशी, सुकियाकी शोजीन – न्योरी तसेच शिपल्यातील पण काही प्राणी, निरनिराळ्या भाज्या आणि विविध प्रकारचे सूप पानात होते. बाजूला ओसाके, बिअर वगैरे इतरही अनेक पदार्थ होते, की ज्यांची नावेही त्याच क्षणी आम्ही विसरलो होतो. शेवटी नावात काय आहे म्हणा, असे शेक्सपिअरने लिहिले आहेच.

प्रत्यक्ष जेवताना पदार्थ गरम मिळावेत म्हणून प्रत्येकाच्या चौरंगाच्या बाजूला लहानशा शेगड्या सुद्धा होत्या, सेवेला दोन मध्यमवयीन जपानी स्त्रिया खास त्यांच्या वेषातील. सर्व पदार्थ परत परत चाखावे असे. दीड तास चाललेले आमचे जेवण शेवटी संपले व आमचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम नेहेमीच्या ढंगात सुरू झाला. याच हॉलमध्ये बाजूला स्टिरीओ दिमतीला होता. भरपूर गाणी, नाच सर्व काही मनसोक्त झाले. विशेष म्हणजे अशा वेळी आमचे को–ऑर्डिनेटर श्री. कवाई हे वेगळे नसतात. ते आमच्यापैकीच एक असतात व त्याच पद्धतीने सर्व कार्यक्रमांत भाग घेतात.

कार्यक्रम संपला. आम्ही आमच्या रूमवर परतलो. १७ जणांत आम्ही चार रूम्स घेतल्या होत्या. रूमवरच्या बाल्कनीतील टेबल-खुर्चीचा मी ताबा घेतला. माझी लिखाणाची नशा पूर्ण करण्यास सुरुवात केली. जपानी पद्धतीच्या गाद्या व त्यांवर सुंदर चादरी होत्या. पांघरायला रजया होत्या. काही दोस्त मंडळी गादीवर अंग टाकताच निद्राधीन झाली होती, तर काही जण रूममधील टी. व्ही. वरील कार्यक्रम बघण्यात गुंतली होती. या टी. व्ही.च्या बाजूला असलेल्या बॉक्समध्ये शंभर येनचे नाणे टाकले की दोन तास टी. व्ही वर 'खास' कार्यक्रम बघता येतो. त्याचाही काही मंडळी आस्वाद घेत होती. बाजूच्या रूममध्ये कॅसेटवर गाणी लावून चाललेला धिंगाणा ऐकू येत होता. रात्रीचे १२ वाजायला आले होते. दिवस संपत होता. लिखाण संपवून शेजारील रूममधील पार्टी गप्पागोष्टी नाच वगैरेत सामील झालो.

रात्री दीडपर्यंत कार्यक्रम झाल्यावर प्रत्येक जण पांगले. नंतर कवाई माझ्या रूममध्ये आले व मला म्हणाले 'होस्टेलमधून मला फोन आला होता. टी. व्ही. आणि रेडिओ ब्रॉड कास्टिंगसाठी ३१ डिसेंबरला रात्री ११ च्या सुमारास HAPPY NEW YEAR चा कार्यक्रम सादर केला जातो. त्यात तुझी व एका मेक्सिकनची निवड झाली आहे. ब्राडकास्टिंग स्टेशनची गाडी तुला होस्टेलमधून घेऊन जाईल व २ च्या सुमारास परत आणून सोडेल. तर तुझी संमती आहे का?' मला आश्चर्य वाटले. अर्थात् त्यांना मी होकार कळविला.

**तोबा सोडले –**

२३ **डिसेंबर** – सकाळी कॉमन पब्लिक बाथ व सुंदरसा ब्रेकफास्ट उरकून आम्ही हॉटेल सोडले. आज बाहेर अगदी स्वच्छ ऊन पडले होते. कालच्या हवामानात व आजच्या हवामानात अगदी जमीन–अस्मानाचा फरक होता. सकाळचे नऊ वाजून चाळीस मिनिटे झाली. गाडीने तोबा सोडले. स्वच्छ ऊन, फिक्कट निळे आकाश आणि गडद्द निळा व शांत समुद्र. एक एक लाट काठावरच्या भिंतीवर पोहोचती होत होती. धुक्याचा लवलेशही नव्हता. आजची सकाळच नव्हे तर संपूर्ण दिवस सूर्याचा होता.

काल आम्हाला तोबाला पोहोचती करणारी तीच ही गाडी, चार डब्यांची. त्यांपैकी दोन डबे डबल डेकर ( व्हिस्टाकार ) होते. गाडीच्या बाहेरील रंग गडद्द शेंदरी व खिडकीच्या चार इंच वरपासून ते खिडकीच्या चार इंच खालपर्यंत गडद्द निळा रंग. प्रत्येक डब्यात एका रांगेत चार सीट, अशा एकूण सोळा रांगा. दोन दोन सीटच्या मधून दोन फुटी पायवाट – खुर्चीच्या हाताच्या पुढील एका बाजूस अॅश ट्रे, तसेच खुर्चीच्या उजव्या बाजूतून बाहेर येणारे लिखाणासाठीचे पॅड. स्टेशन आले की, डब्यातील छपरात दडलेल्या लाऊडस्पीकरवरून आलेल्या स्टेशनाचे

नाव सांगण्यात येई. आपल्याकडे असे स्टेशन आले की चाऽय, चाऽय ओरडत प्लॅटफॉर्मवरून मुले हिंडतात तद्वत् येथे सबंध प्रवासभर अधूनमधून गाडीतून कॅन्टिन-मधील सेवा करणाऱ्या मुली कोऽही, बिऽरू, ओसाके, दोऽझो ( कॉफी, बिअर, ओसाके प्लीज् ) असे मंद व मंजुळ आवाजात म्हणत स्मित वदनाने पुढे सरकत असतात. काही वेळा हातात थर्मास, ट्रे असतो. तर काही वेळा चक्क ढकलगाडी. बाहेर शांत समुद्र साथ देतच होता. त्यात तितक्याच शांतपणे उभ्या असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या होड्या. बीच असा नव्हताच.

रेल्वे-लाइनपासून थोड्या अंतरावर भिंत व पलीकडे सगळा सागर– पॅसिफिक समुद्र. दुसऱ्या बाजूला उंच झाडाच्या सावल्या. त्याच्या तळाशी, जमिनीवर स्पष्ट दिसत होत्या. शांत, स्वच्छ व ओसाड प्लॅटफॉर्म येत होते व जात होते. एखादे मोठे स्टेशन आले की निसर्गाची ताटातूट होत असे. स्टेशनाबाहेर अनेक मोटारी व सायकली सुद्धा व्यवस्थित पार्क केलेल्या दिसत होत्या. वाटेत काही जपानी चाळी भेटल्या. त्यांचे बाल्कनीत व्यवस्थित कपडे वाळत घातले होते तर बाल्कनीचे कठड्या-वर मोठमोठे प्लॅस्टिकचे चाप लावून जाडजूड रजया वाळत टाकलेल्या होत्या. कित्येक ठिकाणी रस्त्याच्या बाजूला गडद पांढऱ्या रंगाचे चार इंची जाडीचे पोलादी पट्ट्यांचे आडवे कठडे होते. एखादी मोटार रस्त्यावरून खाली जात असेल तर या कठड्यांमुळे त्यास प्रतिबंध व्हावा व अपघात टळावा यासाठी ही खबरदारी.

शेतामध्ये मोठमोठे मुळे तिरप्या लाकडी पट्ट्यांवर माशांप्रमाणे वाळत ठेवलेले होते. काही ठिकाणी डोंगरावरून आपल्याप्रमाणेच हाय टेन्शनच्या लाइन्स गेलेल्या होत्या. भरपूर पाण्याच्या नद्या भेटत होत्या. त्यावरील बाकदार रंगीत कमानी व त्या कमानींचे प्रचंड आकार नजरेत भरत होते. भरपूर रुंदी असलेल्या या नद्यांतून आपल्या गोव्याच्या झुआरी नदीतून वहातूक होते तशी वहातूक चालू होती. तर काही ठिकाणी नदी इतकी नाहीशी झाली होती की, चक्क नदीच्या पात्रातील निम्म्यापेक्षा अधिक जागा ठणठणीत कोरडी होती आणि तेथील वाळू बुलडोझरच्या सहाय्याने काढली जात होती.

रस्ते अनेक आकार घेऊन साथ सोडत नव्हते. नागमोडी, सरळ, समांतर, कधी नव्वद अंशाच्या कोनातून दूर जाणारे तर कधी चक्क तीस अंशातून जवळ येऊन सलगी करणारे. प्रवासात समुद्राची काही काळ सुरुवातीची संगत संपल्यावर बराच वेळ दुतर्फा तर काही वेळेला एका बाजूला बरीच सपाट जमीन होती. अर्थात् त्यावर घरे, कारखाने किंवा शेती होतीच. घरावरील रंगीत अ‍ॅन्टेना, पोहण्याचे तलाव, शाळा, त्या भोवतालचे ग्राउंड व त्यावर गडद ड्रेसमध्ये व्यायाम करणारे भावी जपानी आधारस्तंभ. कित्येक ठिकाणी तीन – तीन धुराडी एकत्र करून त्यातून धूर बाहेर ओकणारे कारखाने. एका ठिकाणी तर गाड्यांचा प्रचंड मोठा

ढीग — स्क्रॅप — दृष्टीस पडला. काही गाड्यांचा रंगसुद्धा नव्यासारखा होता. पण त्या चक्क मोडीत काढल्या होत्या. रस्त्यांच्या वळणावरील दोन ते तीन फूट व्यासाचे मोठमोठे पॉलिश्ड मेटलचे बहिर्गोल लावलेले दिसले. समोरील वळणावरून किंवा मागून येणारे वाहन दिसावे म्हणून ही खास व्यवस्था. लाल व पांढऱ्या रंगाच्या टॉवरवरील अनेक मायक्रोवेव्ह डिस्क्स सुद्धा शहराच्या गर्दीत सहभागी होते. पुलाखालील आधाराच्या खांबाच्या मधील मोकळ्या जागेचा कार-पार्किंग-साठी उपयोग केला होता.

दिवस वर येत होता तसतसा जाणाऱ्या प्लॅटफॉर्मवर हालचाल व्हायला व वाढायला सुरुवात होत होती. आमची गाडी सुपर एक्सप्रेस होती. त्यामुळे फक्त काहीच स्टेशने घेत होती. अगदी कडक ऊन पडले होते, पण शहरावरील आकाश मात्र प्रदूषणामुळे धूरमय झाले होते. तर लांब डोंगरावरील आकाश मात्र बऱ्या-पैकी निळा रंग राखून होते. हळूहळू शहर आले. स्कूटरेटवरून डिलिव्हरीला जाणारे पोस्टमन दिसले. शांतपणे, तसेच लगबगीने जाणारे जपानी दिसले, हळूहळू वेग कमी होऊन गाडी शेवटी प्लॅटफॉर्मला भेटली व थांबली. नागोया आले होते. या गाडीचा हा शेवटचा स्टॉप. सकाळचे सव्वा अकरा वाजले होते.

**टोयोटा नगरात** : आमच्या टेक्निकल स्कॉलरशिप ॲथॉरिटीच्या उंच सीट असलेल्या बसने बरोबर अकरा वाजून पंचवीस मिनिटांनी टोयोटा फॅक्टरीला भेट देण्यासाठी म्हणून रस्ता धरला. मधल्या दहा मिनिटांचे कालावधीत को-ऑर्डिनेटर कवाई यांनी प्रत्येकासाठी लंचटिफिन घेतले. लाकडाच्या पसरट बॉक्समधे मस्त टिफिन मिळते. आता बऱ्यापैकी चॉपस्टिक ऊर्फ हाशी म्हणजे काड्याने जेवता येत होते. बसमध्ये वेळही भरपूर होता. त्यामुळे आरामात टिफिन लंच उरकणे चालू होते. नागोया स्टेशनपासून टोयोटा ही फॅक्टरी एका तासाच्या अंतरावर म्हणजे ऐंशी किलोमीटरवर होती.

नागोया शहर एक अतिशय आधुनिकतेने नटलेले, श्रीमंती थाटाचे शहर होते. अगदी डावीकडे व अगदी उजवीकडे प्रशस्त फूटपाथ होते. रस्त्यावरील वाहतूक वाढून काही वेळाने कमी झाली. आम्ही नागोया–टोकियो या सुपर एक्सप्रेस हायवेवर आलो होतो. प्रशस्त मोठमोठे रस्ते अगदी इंग्लिश पिक्चरमध्ये बघतो तसे. योगायोगाने ड्रायव्हरच्या मागेच माझी सीट होती. त्यामुळे समोरील, तसेच बाजूचे दृश्य व्यवस्थित दिसत होते. रस्त्यावर एकूण आठ ट्रॅक्स होते. चार जायचे व चार विरुद्ध बाजूचे. दोन्हीच्या मध्यभागी अंदाजे तीन फूट रुंदीच्या पट्ट्यात कंपाउंडला असतात तशी झाडे होती. अगदी लहान पानांची. रस्त्याच्या पलीकडे तांबूससर गवत होते.

या हायवेवरील ट्रॅकवर फक्त २५० सी. सी च्या पुढचे मशीन असलेल्या गाड्यांना परवानगी होती. त्यामुळे मोटारसायकली दिसल्या नाहीत. फक्त मोटारी, ट्रक. वाहतुकीसाठी मागे मोठमोठ्या चंदेरी रंगाच्या चौकोनी बॉडी असलेल्या गाड्या. उजवीकडचा ट्रॅक अगदी वेगाने जाणाऱ्या गाड्यांसाठी. आमची बस त्यावरूनच अंदाजे ताशी सव्वाशे मैल वेगाने धावत होती. पुढे एका ट्रॅकवरून दुसऱ्या ट्रॅकवर सहजतेने जाणाऱ्या गाड्या स्पष्ट दिसत होत्या. मधेच जकात-नाके येई. प्रवासी बसला चौदा किलो मीटरला चारशे येन टॅक्स होता. जकात वसूल करून परत गाड्या वेग घेत.

काही वेळाने एक नगर आले. त्याचे नाव होते टोयोटा नगर. खरोखरच या नगराला ' टोयोटा नगर ' असे म्हणतात. कारण या नगरातील एकूण लोक-संख्येपैकी बरेचसे लोक या टोयोटा फॅक्टरीत नोकरीला आहेत. म्हणूनच १९५९ साली कोरोमो हे जुने नाव बदलून या नगराचे ' टोयोटा सिटी ' हे नूतन नामकरण करण्यात आले. गावातील निम्मा अधिक भाग या फॅक्टरीने व्यापलेला आहे. अतिशय सुंदर, शांत व निर्मनुष्य अशा ठिकाणी आम्ही प्रवेश केला व कळले की, आम्ही टोयोटा फॅक्टरीच्या जवळ आलो आहोत. जगातील नंबर एकची गाड्या बनविणारी ही कंपनी. जपानमध्ये सुद्धा या गाडीवर लोक प्रेम करतात इतकी ही प्रसिद्ध. ' टोयोटा '– नाव सुद्धा श्रीमंती व ऐश दर्शविणारे बनले आहे.

## टोयोटा फॅक्टरीत :

' ज्या वस्तूची गरज आहे ती गरजेच्या प्रमाणात उच्च दर्जा ठेवून उत्पादित केली पाहिजे. ' असे सांगणारे किचिरो टोयोडा हे या १९३७ साली स्थापन झालेल्या जगविख्यात टोयोटा कंपनीचे संस्थापक आहेत. सात हजार एकरांपेक्षाही जास्त जमिनीवर पसरलेल्या या टोयोटा नगरातील टोयोडा ऑटोमोबाइल्स फॅक्टरीत छपन्न हजार जपानी कामगार काम करतात. मोटारी, वॅगन, व्हॅन्स, ट्रक्स, बसेस यांचे मुख्यत्वे उत्पादन करणाऱ्या या कंपनीत नोव्हेंबर १९८० मध्ये दोन कोटीवी मोटार रजिस्टर्ड झाली.

टोयोटाच्या एक्झिबिशन हॉलमध्ये आम्ही प्रवेश केला. येथे एका नवी दिल्लीच्या गृहस्थाची गाठ पडली. आम्हा दोघांनाही बरे वाटले. पाच मिनिटे बोललो. परदेशामध्ये आपल्या देशातील माणूस भेटला म्हणजे स्वतःच्या कुटुंबातील व्यक्ती भेटल्याचा आनंद होतो. टोयोटाचा एक्झिबिशन हॉल म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गच होय. येथे मोटारींची अनेक मॉडेल्स मांडलेली होती. अगदी साध्या कार-पासून ते जेम्स बॉण्ड साठी तयार केलेल्या खास कारपर्यंत. काही गाड्यांचे उभे आडवे छेद करून त्या गाड्यांचे निरनिराळे भाग दाखविलेले होते. या मॉडेल्सच्या मागे अनेक टी. व्ही. स्क्रीनवर त्या गाड्यांचे टेस्टिंग निरनिराळ्या प्रकारे कसे

करतात ते दाखविले जात होते. या टेस्टिंगच्या व्हिडीओ फिल्म्स सतत सुरूच होत्या.

सर्व मॉडेल्स बघून व त्याचे सान्निध्यात फोटो काढून आम्हाला दुपारी दीड वाजता एका सुसज्ज व लहानशा थिएटरमध्ये नेण्यात आले. तेथे पस्तीस मिनिटांची एक फिल्म दाखविण्यात आली. जपानचा थोडक्यात इतिहास, टोयोटा फॅक्टरीचे जनक टोयोडा यांची माहिती, मोटार कशी जन्म घेते, त्याची असेंब्ली कशी करतात, त्यावर पुढे निरनिराळ्या प्रक्रिया कशा केल्या जातात, विविध कडक चाचण्या कशा घेतल्या जातात, जसे की उच्च तपमान, कमीत कमी तपमान. मुसळधार पाऊस, ब्रेकची चाचणी, निरनिराळ्या प्रकारच्या रस्त्यावरील चाचण्या, खूप उतार-चढ असलेला रस्ता, खडबडीत, तिरप्या, तसेच खास तयार केलेल्या रस्त्यांवरील माणूसरहित गाडीच्या सहाय्याने घेतली जाणारी चाचणी त्या फिल्म-मध्ये दाखविण्यात आली होती.

कागदावरील डिझाईन पूर्ण झाल्यावर या गाडीचे मॉडेल बनविले जाते. या मॉडेलवर प्रचंड वाऱ्याचा झोत सोडला जातो व गाडीच्या निरनिराळ्या भागांवर होणारी प्रतिक्रिया कॉम्प्युटरच्या सहाय्याने नोंदली जाते आणि त्यातूनच नंतर योग्य अशा आकाराची कार कशी बनविता येईल याचे कॉम्प्युटरच्या सहाय्यानेच उत्तर मिळते. नंतर या त्रिमिती कारचा आराखडा कसा काढला जातो वगैरे या फिल्म-मध्ये सुंदर प्रकारे दाखविले होते. फिल्म बघून झाल्यावर आम्ही टोयोटा कंपनीच्या बसमध्ये बसलो.

बसमध्ये समोर उभी राहून टोयोटा कंपनीची गाईड आम्हाला माहिती देत होती. बसने जात असतानाच दुतर्फा लागणाऱ्या टोयोटाच्या फॅक्टरीची माहिती देत होती. या फॅक्टरीच्या हद्दीत प्रचंड मोठे रुंद रस्ते व दोन्ही बाजूला तितकेच प्रशस्त प्लँट्स् होते- फक्त टोयोटा कारचे. दहा मिनिटांतच आम्ही ' कामीगो ' या नऊ नंबरच्या प्लँटपाशी आलो. आता आम्हाला फोटोला बंदी होती. त्यामुळे कॅमेरा व इतर सामान बसमध्येच ठेवले. हा नऊ नंबरचा कामीगो प्लँट इतर प्लँटप्रमाणेच भला मोठा व प्रशस्त होता. नऊ हजार स्क्वेअर मीटर एवढ्या जागेवर असलेल्या या प्लँटमध्ये ८० टक्के ऑटोमेशन झालेले होते. त्यामुळे सुरुवातीला फक्त काम करणारी मशीन्सच दिसत होती. भेट देणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी अडीच फूट रुंदीचा बंदिस्त व कमरेपर्यंत कठडा असलेला ट्रॅक जमिनीपासून अंदाजे दहा फुटावर होता. याच ट्रॅकवर वाटेत ठिकठिकाणी असलेल्या एका बॉक्सच्या सॉकेटमध्ये माईकचा प्लग खुपसून दुतर्फा चाललेल्या कामाची माहिती ती गाईड आम्हाला देत होती. वर टांगलेल्या लाउडस्पीकरवरून ती व्यवस्थित ऐकू येत होती.

मोटारीचे संपूर्ण इंजिन या ठिकाणी तयार होते. आम्ही गेलो त्या वेळी तेथे 21 R व 22 R-E या इंजिनांचे उत्पादन चालू होते. कास्टिंगपासून ते इंजिन संपूर्ण तयार होण्याचा कालावधी एकूण २० तासांचा असतो. या प्लँटच्या सुरुवातीच्या भागात एकसुद्धा कामगार नव्हता, तर जसजशी इंजिन असेंब्ली जवळ येऊ लागली तसतशी कामगारांची उपस्थिती दिसू लागली. लहान लहान भाग इंजिनाला बसविले जात होते. मोठ्या रुंद बेल्टवर इंजिन असते. संथ गतीने हा बेल्ट पुढे सरकत असतो आणि कामगार त्याला इलेक्ट्रिक ड्रीलसारख्या साधनाने स्क्रू बसविण्यापासून इतर अनेक कामे करीत असतात. ही ड्रील मशीन्स स्प्रिंगच्या सहाय्याने वरती लटकत असतात. कारखान्यात अधूनमधून मोठे मोठे बोर्ड दिसत. त्यावर तीन रंगांचे नंबर दिसत. फॅक्टरीत पक्के केलेले काम करणारे एखादे मोठे इंजिनच बंद असेल तर त्या इंजिनाच्या नंबराच्या पांढऱ्या प्लेटखालील दिवा लागतो. जर या इंजिनाचे कटिंग टूल बदलायचे असेल तर लाल दिवा लागतो आणि क्वालिटी चेकची गरज असेल तर त्या नंबराचा पिवळी दिवा लागतो. या कारखान्यामध्ये आतील वाहतुकीसाठी बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या वापरल्या जातात. कारचे संपूर्ण इंजिन कसे बनते ते बघितले.

टोयोटा नगरीत असे एकूण दहा प्लँट्स् असून यामध्ये एकूण छप्पन्न हजार जपानी कामगार काम करतात. तर इतर १९ देशांमध्येही टोयोटाची असेंब्ली चालते. फक्त जपानमध्येच या कंपनीची दोन टेक्निकल सेंटर्स आहेत. ३२० डीलर्स व चार हजार सर्व्हिस शॉप्स असणाऱ्या या कंपनीच्या मोटारींचा खुद्द जपानमध्ये जबरदस्त खप आहे. टोयोटाचे सर्वांत मोठे गिऱ्हाईक असणारे देश म्हणजे अमेरिका व त्यानंतर नंबर लागतो सौदी अरेबिया व कॅनडाचा.

कामीगो प्लँटमधून आम्ही या प्लँटच्या दुसऱ्या टोकापाशी प्रतीक्षा करणाऱ्या त्यांच्या बसमध्ये बसलो. बसमध्ये परत सुहास्य वदनाने गाईडची कॉमेंट्री चालू होती. दुतर्फा टोयोटाचे निरनिराळे ट्रॅक्स व प्लँट्स दिसत होते. एका ठिकाणी स्टोरेज-यार्डमध्ये शिपिंगची वाट बघत असलेल्या अंदाजे वीस हजारपेक्षाही जास्त मोटारी बघितल्या. रेसकोर्सपेक्षाही प्रचंड जागेत या सर्व मोटारी उभ्या होत्या. आमची बस या यार्डच्या बऱ्याच वरून व दुरून चालली होती. तरी हे विहंगम दृश्य नजरेत भरून गेले. आता आम्ही चाललो होतो 'थाकाओका प्लँट' कडे. दुपारचे तीन वाजले होते. मागणी वाढेल त्या प्रमाणात येथील उत्पादन वाढविले जाते. आम्ही भेट दिली त्याच्या फक्त आदल्या दिवशीच्या पॅसेंजर कारचे उत्पादन होते – तीन हजार, तर एकूण ऑटोमोबाईल्सचे उत्पादन होते तेरा हजार.

थाकाओका प्लँटमध्ये लहान आकाराची संपूर्ण पॅसेंजर कार तयार होते. एका बाजूने कारची बॉडी व दुसऱ्या बाजूने इंजिन असे एकत्र येतात व असेंब्लीस

सुरुवात होते आणि दोघांचे मीलन झाल्यापासून पाच तासांतच ती कार विक्रीच्या दृष्टीने योग्य होऊन बाहेर पडते. या पाच तासांत इंजिन गाडीत बसविणे, स्टिअरिंग व्हिल, तसेच लहान मोठे आतील व बाहेरील भाग जोडणे, त्यावर स्टॅम्प मारणे वगैरे कामे होतात. यानंतर प्रत्येक गाडीवर निरनिराळ्या चाचण्या घेतल्या जात होत्या. गाडीचा वेग ताशी १२० मैलांपर्यंत नेऊन गाडीची कंपने (व्हायब्रेशन्स) इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या सहाय्याने मोजली जात होती.

गाडीची चाचणी चालू असताना गाडीचे व्हायब्रेशन, स्पीड, टाइम वगैरे चाचणीतील गोष्टींचे रेकॉर्ड एका मोठ्या पॅनेलवर आम्हाला दिसत होते. त्यानंतर चक्क गाडी एका काचेच्या टनेलमध्ये जाते. त्या ठिकाणी एकूण सोळाशे लिटर, पाणी तीन सेकंदांत गाडीवर जोरात मारले जाते. या वेळी कामगार, ड्रायव्हर गाडीतच असतो. यानंतर ती गाडी टनेलमधून बाहेर आल्यावर लीकेज म्हणजे पाणी गाडीमध्ये पाझरले आहे का, याची बारकाईने तपासणी होते. पाणी मारले जाताना वायपरची पण चाचणी घेतली जाते. गाडी बाहेर आल्यावर इतरही काही चाचण्या होतात व नंतर पुढे ती ड्राइंग म्हणजे सुकविण्यासाठी पुढील टनेलमध्ये जाते. त्यानंतर गाडीच्या सर्व चाकांची चाचणी होत असताना दिसले.

कामीगो प्लँटप्रमाणेच येथे सुद्धा जमिनीपासून दहा फुटांवरील कठडे असलेल्या ट्रॅकवरून आम्ही जात होतो. त्यामुळे खाली चालणारे काम अगदी व्यवस्थित दिसत होते. मोटारीच्या दोन्ही बाजूंच्या चाकाच्या खाली चाकाच्या दुप्पट रुंदीचा बेल्ट होता, तो संथ गतीने पुढे सरकत होता. त्यामुळे मोटारसुद्धा हळूहळू पुढे सरकत होती. त्याचमुळे त्या मोटारीला बसवत असलेल्या भागांमध्ये कामगाराला रेंगाळून चालत नाही. तो यंत्रवत् काम करीत असतो. कामगाराच्या बाजूला त्याच्या हाताला येईल एवढ्या अंतरावरून एक दोरी गेलेली असते. जर एखाद्या कामगाराला काही शंका आली व असेंब्ली, तसेच ही कार विक्रीस काढण्याबाबत काही तांत्रिक दृष्टीने अडचण असेल तर कुठलाही कामगार ही दोरी ओढतो व कारखान्यातील सर्व काम थांबते; हा मोटारींचा ताफा घेऊन पुढे सरकणारा बेल्ट सुद्धा.

या संपूर्ण प्लँटमध्ये चालणारे बारीक सारीक काम आम्हाला अगदी दहा फुटांवरून बघायला मिळाले. कामीगो प्लँटमध्ये पुढे जात असताना गाईडला मी एक प्रश्न केला, "कुठल्या गोष्टींमुळे टोयोटा ही कार जगात आज सर्वश्रेष्ठ गणली जाते ? व या कंपनीतील कामगाराला, ते श्रेय कशामुळे प्राप्त झाले आहे असे वाटते ?" तेव्हा गाईडने मला स्मित वदनाने या प्रश्नाचे उत्तर सर्वांत शेवटी देण्याचे आश्वासन दिले. थाकाओका प्लँटचे शेवटी आम्ही पोहोचलो. गाईडने माझ्या प्रश्नाचे उत्तर येथे असल्याचे सांगितले. त्या ठिकाणी होती एक सूचनापेटी.

कोणीही कामगार बाजूला ठेवलेल्या अर्जावर त्याला कामाच्या दृष्टीने योग्य वाटेल ती सूचना या पेटीत टाकू शकतो. आठवड्यातून एकापेक्षा जास्त वेळा या सूचना मीटिंगमध्ये चर्चिल्या जातात. काही वेळा प्रत्यक्ष त्या कामगाराला सुद्धा स्पष्टीकरणासाठी सहभागी केले जाते. सूचना योग्य वाटली तर त्या कामगाराची नुसती पाठ थोपटली न जाता त्यास योग्य ते बक्षीस दिले जाते. मग ही सूचना कारखान्यात लावायच्या कुठल्याशा घोषणेबद्दल असो अगर असेंब्लीच्या वेळी एखाद्या स्क्रूमागे वॉशर बसवायचा असो. विशेष गोष्ट म्हणजे आतापर्यंत अशा सूचनांपैकी एकूण ९४ टक्के सूचना अमलात आणलेल्या आहेत. स्वतः त्या गाईडने तिच्या गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत एकूण २६ सूचना केल्याचे व सर्वच्या सर्व अमलात आणल्याचे अभिमानाने सांगितले. अशा प्रकारे प्रत्यक्ष काम होत असतानाच कामाचा दर्जा सुधारत जातो हे या कंपनीने अनुभवलेले विचार आहेत.

रिसर्च अँड डेव्हलपमेंट हा तर या कंपनीचा आत्मा आहे. मोटारीसाठी वापरलेल्या धातूच्या सुद्धा रासायनिक चाचण्या घेतल्या जातात. सुरक्षितता, कमीत कमी प्रदूषण, इंधनातील बचत, सुंदर रंग, रूप, आकार, विश्वासार्हता, गाडीमधील सुखसोई, तसेच गाडीच्या ड्रायव्हरला तोंड द्याव्या लागणाऱ्या एकूण एक परिस्थितीचा पूर्णतः विचार या ठिकाणी केला जातो. आणि या सर्वांसाठी लागणारे "कामगाराचे आपलेपणांचे सहकाऱ्याचे हात" ही फार महत्त्वाची गोष्ट या कंपनीने ध्यानात घेतली आहे.

'चांगले विचार आणि उत्तम माल' हे या कंपनीचे ध्येयवाक्य आहे, चांगले कामगार व चांगल्या सुविधा यामुळे अर्थातच चांगले उत्पादन पदरात पडते हे या कंपनीने स्वानुभवाने सांगितलेले सत्य आहे.

या ठिकाणी कामाच्या जास्तीत जास्त चांगल्या वातावरणात अत्याधुनिक हत्यारे व उपकरणाच्या सहाय्याने येथील कामगार हा त्यावरील पूर्ण जबाबदारी ओळखून काम करीत असतो. गाडीच्या मालकांच्या संपूर्ण दृष्टिकोनातून कामगाराकडून गाडी तयार केली जाते. आपल्यापुढील काम हे पूर्णत्वाने निर्दोष व्हावे या दृष्टीने कामगार कामामध्ये तनमन अर्पून काम करतात. त्यात ते पूर्णपणे समरस झालेले असतात. कामातील किंचितशी उणीवदेखील ते वरिष्ठांच्या नजरेस आणून देतात. कामगारांच्या अत्युच्च कल्याणातून उत्कृष्ट उत्पादन हातात पडते. या श्रद्धेतून या कंपनीने कामगारांना सुखाबाबतच्या सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याची व त्याच्या कुटुंबियांच्या सर्व गरजा पुरविल्यामुळे आज शांत व प्रसन्न चित्ताने कामगार आपलेपणाने कामात लक्ष घालीत आहेत. मालक व कामगार हे नाते एकमेकांच्या सुखदुःखाचा विचार करणाऱ्या एका कुटुंबाच्या नात्यात बदलले आहे. कामगारांसाठी घरे, हॉस्पिटल, शाळा, कॉलेजेस, खेळाची

केंद्रे, सण, उत्सव, सहली, करमणुकीचे कार्यक्रम, परदेश दौरे वगैरे सर्व गोष्टी अमलात आणल्या आहेत. कामगाराच्या चेहऱ्यावरील हास्य टिकवून धरण्यात ही कंपनी यशस्वी झाल्याने चांगल्या उत्पादनाचा वारसा चालवीत आहे.

टोयोटा कंपनीचे हेड ऑफिस व निरनिराळे प्लॅट्स्, हे कॉम्प्युटर, टेलिफोन, रेल्वे व मोठमोठे रस्ते यांनी जोडलेले आहेत. त्यामुळे सूचना, माहिती व मालाची देवाण-घेवाण सुलभ व जलद होते. टोयोटा नगर व आसपासच्या विभागातील टोयोटा सेंटर्समधील सुट्या भागांची ने-आण सुद्धा जलद होण्यासाठी व्यवस्था केलेली आहे. अशा प्रकारे रिसर्च अँड डेव्हलपमेंट, उत्तम प्लॅनिंग, सुट्या भागांचे भरपूर उत्पादन, पुरवठा, वाहतुकीचे सुंदर जाळे व यामागील चांगले मानवी हात या गोष्टींमुळेच थोड्याशा कालावधीतच टोयोटा या कंपनीने जगात अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे.

दुपारचे चार वाजले होते. आम्ही बसमध्ये बसलो. बसमध्ये टोयोटा कंपनी-तर्फे भेट दिलेली वस्तू आमची वाट पहात होती. टोयोटा नगरीच्या गुळगुळीत प्रशस्त रस्त्यांवरून आमची बस धावू लागली. तेथील कामगारांची घरे, त्यांच्या मुलांच्या शाळा, हॉस्पिटले वगैरे मागे पडत होते. येथील कामगारांची मुले सुद्धा पुढे बहुतेक याच कारखान्यात काम करतात. ऑगस्ट १९३७ साली स्थापन झालेल्या या कारखान्याने केवढे मोठे अवाढव्य रूप धारण केले होते ते दिसत होते. बस-बदलून आम्ही आमच्या पूर्वीच्या बसमध्ये बसलो. गाईडला निरोप दिला. सायोनारा ! सायोऽनारा ! दोन्हीकडून आवाज आले. बस भरधाव वेगाने अंतर कापू लागली. कारण अंदाजे ८० किलो मीटर अंतरावरील नागोया या ठिकाणी आम्हाला पाच वाजून चोवीस मिनिटांनी बुलेट ट्रेन पकडायची होती.

सूर्य डावीकडील बाजूने खाली चालला होता. अतिसुंदर गुळगुळीत, तुकतुकीत आणि पांढरे व विटकरी पट्टे असलेल्या रस्त्यावरून गाडी सुसाट वेगाने सुटली होती. जे जे भावत होते, ते जवळील कागदावर मी टिपत होतो. जकातनाक्यापाशी गाड्या क्षणभर थांबून परत वेग घेत. गाडीचा वेग ताशी शंभर मैलांच्यावर होता. ड्रायव्हर मस्तपैकी मजेत गाडी चालवीत होता. काहीही तकतक नव्हती. रस्ते सुंदर, गाडी अतिसुंदर, गाडीमध्ये इंग्लिश गाण्यांची कॅसेट ड्रायव्हरने लावली होती. गाडीच्या छतामधील लाउडस्पीकरमधून ती सर्वांना व्यवस्थित ऐकू येत होती. ८ ट्रॅकवरून ६ ट्रॅक व ६ ट्रॅक वरून ४ ट्रॅकचे रस्ते आले. वाहतूक दिसता दिसता वाढली. तिचे गर्दीत रूपांतर होऊ लागले होते. सूर्यकिरणे अस्तंगत होत होती. नागोया जवळ आले होते. तेथे एका पेट्रोलपंपावर मोठ्या अक्षरांत लिहिले होते, ‘TOYOTA MY CAR CENTRE’ किती एकदम जवळचे नाव वाटते नाही ? जाहिरातीचा एक उत्कृष्ट नमुना. स्वच्छ लखलखीत तळपता दिवस आला. मनात

कायमचा ठसा नोंदवून गेला. एक कायमची स्मरणीय नोंद करून राहिला. पृथ्वीवरील तांत्रिक आश्चर्य बघितल्याचे समाधान आमच्या चेहऱ्यावर होते.

संधिप्रकाश सुरू झाला. परंतु आपल्याकडे आकाशात लालिमा, रक्तिमा वगैरे रंगांची उधळण दिसते तसे काही नागोयावर नव्हते. आकाश चक्क फिक्कट राखी रंगाचे होते. तर समोर लांब आम्हांला त्याच रंगाचे काही ढगपण दिसले. बहुधा हा सर्व प्रदूषणाचा परिणाम असावा. रंगीत दिव्यांचा लखलखाट सुरू झाला. लाल, हिरवे, पिवळे, उघडझाप करणारे, वरून खाली आणि खालून वर पळणारे, अनेक प्रकारच्या व आकाराच्या भव्य निऑन साईन्स्. त्यात ख्रिसमस जवळ आलेला, त्यामुळे सर्वकडे झिरमिरीत पट्टयांच्या माळा असलेल्या पताका दुकानाबाहेर दिसत होत्या. दुकानाबाहेरच रंगीत केकचे डबे व त्या डब्यांच्या बाजूला अतिशय नीटस अगर हॉटेलच्या ड्रेसमध्ये उभा राहिलेला आणि ' इराश्याय–मासे ' ( म्हणजे सुस्वागतम् ) असे ओरडणारे दुकानातील कामगार दिसत होते. शिल्पशास्त्राच्या अनेक नमुन्यांच्या उंच उंच इमारती नजरेत भरत होत्या. ४ वाजून ४५ मिनिटे झाली होती. नागोया रेल्वेस्टेशन अजून ५ किलोमीटर अंतरावर होते. ट्रॅफिक जाम झाला होता. म्हणून आमचे को-ऑर्डिनेटर श्री. कवाई यांनी ड्रायव्हरला बस जवळच्या सब–वे पाशी घ्यायला सांगितले.

सब–वे पासून दर दोन मिनिटाला ट्रेन असते. हे सब–वे नावाप्रमाणे जमिनीखालून गेलेले असतात. सब–वे ट्रेनला जपानीत ' चिकातेत्सु ' असे म्हणतात. प्लॅटफॉर्मवर पोहोचताच ट्रेन आली आणि ५ वाजून ४ मिनिटांनी आम्ही नागोया स्टेशनवर आलो. बुलेट ट्रेन – की ज्याला जपानीत ' शिकानसेन ' असे म्हणतात – सुटायला २० मिनिटे अवकाश होता. गाडीत खाण्यासाठी खरेदी केली. थोडया वेळातच स्टेशनचा काही भाग बघितला. अति भव्य स्टेशन. सगळीकडे स्वच्छता. रंगीत फरश्या, भिंती सुद्धा सुंदर टाइल्स्ने मढलेल्या. अशा सार्वजनिक ठिकाणी या देशाची श्रीमंती विशेष जाणवते. संपूर्ण सोईने, अगदी नको इतक्या सोईने सुसज्ज स्टेशन होते.

५ वाजून २२ मिनिटांनी गाडी आली व ठरलेल्या ठिकाणी उभी राहिली. गाडीच्या डब्यात प्रवेश करावयाचे दरवाजे बरोबर प्लॅटफार्मवरील खुणेसमोर होते. गाडीत बसलो. ५ वाजून २४ मिनिटांनी गाडी सुटली. या गाडीला एकूण १६ डबे व प्रत्येक डब्यात १०० सीट्स्. या गाडीतील सीटचा टेकावयाचा मागील भाग मागून पुढे ढकलला की सीटचे तोंड विरुद्ध दिशेला होई. बाहेर फक्त मर्क्युरी लॅम्प दिसू लागले. सुंदर नगरी मागे पडली. धडाधड प्लॅटफॉर्म हादरवून गाडी पुढे चालली होती. वाटेतील काही स्टेशनावर गाडी जेमतेम एखाद मिनिट थांबून नंतर वेग घेई. गाडीच्या श्योकुदो म्हणजे कॅन्टीनमध्ये एक मोठे स्पिडॉमीटर म्हणजे गतिदर्शक

होते. बराच वेळ मी ते न्याहाळीत होतो. या स्पिडॉमीटरवरील आकडे ताशी किलोमीटरमधील होते. गाडीचा वेग ताशी १५० किलोमीटर असे तोपर्यंत गाडी अगदी सुरळीत जात असे. १७५ ला हेलकावे जाणवत असत. वेग १९० च्या वर जाताना कानात दडे बसायला सुरुवात होत असे व कानात पाणी गेल्यावर कसे होते तसे होत होते. वेग ताशी २०० किलोमीटरच्या पुढे जाई त्या वेळी गाडीची कंपने थोडी जाणवू लागली. गाडी बराच काळ ताशी २०५ किलोमीटर वेगाने धावत होती. तर काही काळ वेग २२० पण जात होता.

मोती पसरल्याप्रमाणे दिसणारी शहरे – चमचमणारे जमिनीवरील तारेच ते – अती दूरचे दिवेसुद्धा भराभर मागे पडत होते. दिव्यांमध्ये एकूण मर्क्युरी लॅम्पचा भरणा अधिक. आमच्या सहलीचा तिसरा अंक संपत होता. गाडीमध्येही आमचे सवंगडी मस्त रंगले होते. गाणी, गप्पा, खाणे, पिणे सर्वच रेलचेल होती. डब्यातील जपानी कधी शांतपणे तर कधी हसून आमच्याकडे बघत होते. पहिल्या वर्गाच्या डब्याला ' ग्रीन कार ' असे म्हणतात. ग्रीन कारमध्ये एका कोपऱ्यात भरपूर मासिके होती. जणू काही मासिकांची लायब्ररीच होती ती. दोन डब्यांच्या मधले दरवाजे कायम बंद असत व या दरवाज्याजवळच्या साधारणतः पाय पुसण्यासारख्या जागेवर पाय ठेवताच मधला दरवाजा आपोआप उघडत असे.

७ वाजून ५४ मिनिटांनी गाडी शिनयोकोहामाला आली. गाडीतून बाहेर पडलो व प्लॅटफॉर्मवरून चालू लागेपर्यंत आम्हाला आणणारी ही बुलेट ट्रेन दृष्टी-आड पण झाली होती. शिन योकोहामाहून जमिनीवरील साधी ट्रेन – की ज्याला जपानीत ' देनशा ' असे म्हणतात – घेतली. सव्वा आठला इसोगो स्टेशनवर पोहोचलो. तेथून टॅक्सीने होस्टेलवर आलो. आयुष्यातील एका अविस्मरणीय व अपेक्षेप्रमाणे आनंददायी ठरलेल्या सहलीची समाप्ती झाली होती. व्यवस्थित आखलेली, वेळेमध्ये चपखल बसविलेली ही ट्रीप मी अनुभवली होती. उद्या आता आमच्या ग्रूपचा एकत्र राहावयाचा शेवटचा दिवस. मग सर्व पांगणार होते. मी व माझा थायी दोस्त सुरासाक एवढे आम्ही दोघेच फक्त या होस्टेलमध्ये राहाणार होतो. कारण ज्या कारखान्यात आम्हाला ट्रेनिंग घ्यावयाचे होते ते कारखाने येथून जवळच होते.

या सहलीचा आनंद माझ्याबरोबरच वाचणाऱ्यालासुद्धा मिळावा म्हणून, शिवाय हेच पत्र पुढे मला सुद्धा वाचताना नक्कीच या सहलीच्या पुनःप्रत्ययाचा आनंद देईल म्हणून लेखनाचा हा सर्व खटाटोप.

म. ठि. ग्रंथ संग्रहालय ठाणे
५३४
अ. क्र. २६४८२
३।१०।८९
मुख्य शाखा (स्थळ प्रत)

# जपानी कारखान्यातील अनुभव

## हितगुज :


जपान देशाने आज जगातील अग्रगण्य राष्ट्रांमध्ये मानाचे स्थान पटकाविले आहे, ते प्रामुख्याने त्याच्या उद्योगधंद्यामध्ये मारलेल्या मुसंडी-मुळेच ! ऑटो व कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक हे त्याचे दोन भक्कम आधारस्तंभ. त्या पैकी कंझ्युमर इलेक्टॉनिक मध्ये मात्सुशिता, हिताची, आकाई, सानयो, शार्प, सॉनी, तोशिबा, एन्. इ. सी. वगैरे ज्या अनेक सुप्रसिद्ध कंपन्या आहेत त्यांपैकी 'व्हिक्टर कंपनी ऑफ जपान लिमिटेड' हे नाव असलेली व JVC या तीन अक्षरांनी जगभर सुपरिचित असलेली एक कंपनी आहे. जपानमधील JVC या कारखान्यामध्ये व्हिडीओ कॅसेट रेकॉर्डरवर ट्रेनिंग घेण्यासाठी माझी निवड झाली होती.

JVC या फॅक्टरीत मी जे काही टेक्निकल ट्रेनिंग घेतले, त्याविषयी एक स्वतंत्र व निराळे पुस्तक लिहिले आहे. परंतु प्रत्यक्ष ट्रेनिंगच्या काळा-मध्ये फॅक्टरीत वावरताना पंचेंद्रियांना जे काही ज्ञान प्राप्त झाले, ज्या गोष्टी आवडल्या, भावल्या व प्रकर्षाने जाणवल्या व ज्यांच्या नोंदी आपल्या मराठी वाचकांपर्यंत पोहोचविणे मला अगत्याचे वाटले ते ते सर्व काही या ठिकाणी नमूद केले आहे. यात प्रत्यक्ष टेक्निकल गोष्टींचा ऊहापोह केलेला नसून जपानी माणूस कारखान्यात वावरताना तो माणूस, कारखान्यातील यंत्र, त्या माणसाचे त्या यंत्राशी संबंध, कारखान्यातील माणसांचे एकमेकांशी संबध वगैरे गोष्टींची चर्चा केली आहे. यामुळे जगातील उत्पादनाच्या दृष्टीने अत्युत्कृष्ट

बनलेल्या ठिकाणी जाऊन तेथील जास्तीत जास्त माहिती आणून त्यांचे चांगले काय व ते कसे चांगले झाले याची जेवढी म्हणून देता येईल तेवढी, मला आकलन झालेली माहिती आपणापुढे ठेवण्याचा हा एक प्रयत्न आहे.

विषयाला हात घालताना मी प्रथम JVC या फॅक्टरीची ओळख करून दिली आहे. या फॅक्टरीत दिवसाची सुरुवात कशी होते ? वैयक्तिक व सांघिक शिस्त कशी पाळली जाते ? वक्तशीरपणा व सहकार्य कसे असते ? व कामगार कारखान्यातील स्वच्छतेबाबत तसेच उत्पादनाच्या गुणवत्तेबाबत कसा दक्ष राहातो ? याची नोंद घेतली आहे. JVC कारखान्यातील कामगारांच्या वैयक्तिक कामासंबंधीच्या अवलोकनाबरोबरच त्या कामगाराचे इतरांशी संबंध कसे असतात, तो त्यांच्या बरोबर कसे काम करतो, याची दखल घेतली आहे. कारखान्यातील मालकवर्ग, तज्ञ मंडळी यांच्याही कामाच्या नोंदी आपणास आढळतील. कामासंबंधीच्या चर्चेच्या वेळी रोबोटचे सहकार्य घेऊन उत्पादन वाढीस कशी मदत केली जाते त्याची कल्पना येईल.

फॅक्टरीत बऱ्याचदा ओव्हरटाइम तर केला जातोच, परंतु कामानंतरही कामगार पार्ट्यांचा कसा आस्वाद घेतो याची माहिती वाचनात येईल. थोडेसे पुढे जाऊन मी असेही म्हणेन की, बहुतेक जपानी कामगाराला दोन कुटुंबांचे सुख लाभते. एक असते त्याचे स्वत:चे, पत्नी व मुलांबाळांचे कुटुंब, तर दुसरे असते फॅक्टरीचे–कौटुंबिक सुख. फॅक्टरी हे कामाचे व नुसते पैसा मिळविण्याचे ठिकाण न मानता ते सुरुवातीपासूनच स्वत:चे घर आहे व त्यातील घटकांचे एकमेकांशी संबंध हे



घरातील संबंधाप्रमाणे असतात. घराला जपानी भाषेत 'उची' असे म्हणतात व कारखान्यातील संबंधाच्या उल्लेखात अनेक जपानी लोकांच्या तोंडून, तसेच तेथे बघितलेल्या काही फिल्म्समध्ये 'उची रिलेशन' हाच शब्दप्रयोग मी अनेकदा ऐकला आहे.

जपानमधील निरनिराळ्या कारखान्यांतील उत्पादन हे निरनिराळे असले तरी कामगार व व्यवस्थापक यांच्या कामाची पद्धत ही सर्वत्र जवळपास सारखीच असते. उदाहरणादाखल नमूद केलेल्या JVC कंपनीतील कामाच्या पद्धतीवरून जपानमधील कारखान्यांतील कामाच्या पद्धतीची माहिती मिळते.

एकंदरीत या पुस्तकाच्या वाचनामुळे मराठी वाचकाला प्रसिद्ध जपानी फॅक्टरीमध्ये काम कसे चालते याची बरीचशी माहिती मिळेल अशी आशा आहे.

**फॅक्टरीशी तोंडओळख :**

'व्हिक्टर कंपनी ऑफ जपान' लिमिटेड' हे नाव धारण करणारी व JVC या तीन अक्षरांच्या समूहाने परिचित असलेली जगातील ही एक प्रसिद्ध कंपनी. १९२७ साली स्थापन झालेल्या या कंपनीचे उत्पादन मुख्यत्वे ऑडिओ व व्हिडिओ संबंधीच्या वस्तूंशी निगडित आहे. मात्सुशिता इलेक्ट्रिक इंडस्ट्रिअल कंपनी या जपानमधील सुप्रसिद्ध कंपनीचे आर्थिक पाठबळ लाभलेल्या JVC या कंपनीच्या आज जगात अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, जर्मनी, सिंगापूर वगैरे – अनेक ठिकाणी शाखा आहेत.

JVC चे जपानमध्येच 'अिवाइ' या ठिकाणी रंगीत टी. व्ही. चे तर योकोहामा या ठिकाणी व्हिडिओ टेपरेकॉर्डर, व्हिडिओ कॅमेरा, व्हिडिओ टेप्स, कॉम्पॅक्ट व्हिडिओ सिस्टिम वगैरेसारख्या व्हिडिओ संबंधीच्या वस्तूंचे उत्पादन होते. खुद्द जपानमध्ये दरमहा दोन लक्ष पन्नास हजार व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचे उत्पादन करणाऱ्या या कंपनीत १९८२ च्या सुरुवातीस ९७ हजार स्क्वेअर मीटर एवढ्या क्षेत्रफळावरील जागेत एकूण पाच हजार लोक कामास होते. त्यांपैकी एकट्या योकोहामामध्ये ८० हजार स्क्वेअर मीटर क्षेत्रफळावर ३८०० लोक होते. पश्चिम जर्मनी येथील बर्लिनमध्ये, इंग्लंडमध्ये न्यूहावन येथे, तर जपानमध्ये अिसेझाकी व योकोसुका येथे या कंपनीतर्फे व्हिडिओ टेप रेकॉर्डरचे उत्पादन चालते. परंतु या कंपनीचा व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचे उत्पादन करणारा योकोहामाचा प्लँट हा एकाच ठिकाणी सर्व सुविधा असणारा व्हिडिओचा जगातील सर्वांत मोठा प्लँट समजला जातो. व्हिडिओच्या उपकरणांची निर्मिती करणारे JVC चे जपानमध्ये एकूण सात व परदेशात तीन प्लँट्स आहेत.

OEM ( ओरिजिनल इंजिनिअरिंग मॅन्युफॅक्चरर ) च्या नियमानुसार टेलिफंकन, साबा, नोर्डो, ग्रेटझ्, टी. एफ्. आर्. थॉर्न, थॉमसन, आर. सी. ए.,

डेक्का व्हिडिओ, फर्गसन, इ. एम्. आय्., वगैरे अनेक व्हिडिओ रेकॉर्डरचे उत्पादन याच कंपनीतर्फे केले जाते. फक्त रेकॉर्डरवर त्या त्या कंपनीचे नाव लावले जाते.

माझे टेक्निकल ट्रेनिंग हे JVC मधील व्हिडिओ-प्रॉडक्टस्-विभागाशी संलग्न होते. JVC च्या प्रत्येक उत्पादन-विभागाप्रमाणेच व्हिडिओ-प्रॉडक्टस्-विभागाचा स्वतःचा स्वतंत्र असा रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट-विभाग आहे. या विभागाचे कार्य हे प्रॉडक्टस् ( उत्पादन ), प्लॅनिंग ( योजना ) व डिझाइन ( आराखडा ) या विभागांच्या सहकार्याने चालते. हिताची, शार्प, मित्सुबिशी व मात्सुशिता या कंपन्यांनी JVC ने संशोधिलेली व्हिडिओ टेपरेकॉर्डरची VHS पद्धत अनुसरली आहे.

इलेक्ट्रॉनिक आणि मेकॅनिकल कॉम्पोनंट ( घटकभाग ) साठी, विशेषतः इन्टिग्रेटेड सर्किट्स् व प्रिंटेड सर्किट बोर्डस्साठी CAD ( कॉम्प्युटर एडेड डिझाइन ) चे योकोहामा प्लँटमध्ये विशेष सहकार्य घेतले जाते. मोटार्स, चासीस, व्हिडिओ हेड वगैरे सारखे व्हिडिओ प्रॉडक्ट्समधील गुंतागुंतीचे घटक-भाग हे या विभागातील इंजिनिअरनीच विकसित केले आहेत. व्हिडिओ सिस्टिमचे एकंदरीत वजन कमी करणे आणि या सिस्टिमसाठी लागणाऱ्या विद्युत्शक्तीचा व्यय कमीत कमी करण्यासाठी सातत्याने संशोधन होत असते. १९८२ साली त्यांनी संशोधिलेल्या GZ-S3 या व्हिडिओ कॅमेऱ्याचे वजन अवघे सव्वा किलो असून त्यासाठी साडेपाच वॅट विद्युत्शक्ती लागते.

प्रॉडक्शन ( उत्पादन ), टेस्टिंग (चाचणी), पॅकेजिंग (सीलबंद करणे), शिपिंग आणि सर्व्हिस ( विक्रीनंतरची सेवा ) या गोष्टी पद्धतशीररीत्या या कंपनीतर्फे हाताळल्या जातात. योग्य ठिकाणी रोबोटचे सहकार्य घेऊन उत्पादनाचे योग्य उद्दिष्ट, उच्च दर्जा राखून टिकविले जाते. कमीत कमी किंमतीपासून ते अगदी सुपर-सॉफेस्टिकेटेड लक्झरी मॉडेलपर्यंत सर्व प्रकारच्या व्हिडिओ सिस्टिमचे उत्पादन या कंपनीतर्फे होते.

शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रम समृद्ध करण्याच्या दृष्टीने, तसेच 'आयुष्यातील सुख देणारी प्रत्येक वस्तू ही प्रयत्नांची पराकाष्ठा करून निर्माण करणे' अशा प्रकारचे ब्रीदवाक्य धारण करणाऱ्या या कंपनीच्या व्हिडिओ-प्रॉडक्ट्स्-डिव्हिजन-मार्फत जगातील प्रमुख शहरांमध्ये व्हिडिओ इन्फॉर्मेशन सेन्टर्स उभारण्यात आली आहेत. याच डिव्हिजनमार्फत अधूनमधून व्हिडिओ फेस्टिव्हल्स भरविली जातात.

उच्च प्रतीचा दर्जा व विश्वास या प्रसिद्धीमुळे आजतागायत जगभर लाखो ग्राहक आकर्षित करणाऱ्या या कंपनीने १९८४ साली खुद्द जपानमध्येच सहा हजार महापद्म येनची विक्री केली.

१९८१ साली जपानमध्ये जी पाहणी करण्यात आली, त्यामध्ये किंमतीच्या संदर्भात विकल्या गेलेल्या पहिल्या दहा वस्तूंमध्ये व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचा नंबर प्रथम लागतो, तर रंगीत टेलिव्हिजन, स्टिरिओ कॉम्पोनंट्स् ( घटकभाग ), फ्रीज, एअर कंडिशनर, मायक्रोवेव्ह ओव्हन, वॉशर, रेडिओ, स्टिरिओ इत्यादींचे नंबर ओळीने नंतर लागतात. जपानी गृहिणीने आपल्या घरात लहान कार पाठोपाठ व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर ( व्ही. सी. आर. ) ला प्राधान्य दिले आहे असे १९८२ च्या शॉपिंग मासिकात नमूद केले आहे. २० ते ३० वर्षे वय असणाऱ्या गटाने याच बाजूने कौल दिला आहे. अशा प्रकारे गेल्या काही वर्षांत व्हिडिओ-लाटच जगभर उसळली असून त्या दृष्टीने अनेक कंपन्यांनी त्याच्या उत्पादनात विलक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. एकूण येनमधील विक्रीच्या संदर्भात दरवर्षी पहिल्या शंभर जपानी इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांची नावे जाहीर होतात. १९८४–८५ या दोन्ही वर्षी JVC कंपनीचा नंबर या यादीत अकरावा होता व विक्रीची रक्कम $६ \times १०^{११}$ येन एवढी होती. JVC ही जपानमधील व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरची निर्मिती करणारी एक कंपनी आहे. आपण तिची ओळख करून घेतली. आता जरा या कंपनीच्या आतमध्ये डोकावू.

## फॅक्टरीचा सुरुवातीचा काळ :

JVC कंपनीच्या योकोहामा येथील प्लँटच्या व्हिडिओ-प्रॉडक्ट्स्-डिव्हिजन-मध्ये मला व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरवर प्रशिक्षण मिळणार होते. प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वी एक दिवस स्कॉलरशिप ॲथॉरिटीचे एक अधिकारी श्री. वादा यांच्याबरोबर मला या फॅक्टरीत जावयाचे होते.

ठरल्याप्रमाणे मी व वादा टॅक्सीने होस्टेलपासून इसोगो रेल्वे स्टेशनवर आलो. एकच प्लॅटफॉर्म असलेल्या या स्टेशनच्या टोकियोच्या दिशेने जाणाऱ्या केहिन – तोहोकु लाइनची गाडी आम्हाला पकडावयाची होती. स्टेशनवर येताच काही मिनिटांतच जास्त आवाज न करता अलगद हळुवारपणे निळ्या रंगाची ही गाडी प्लॅटफॉर्मच्या बाजूला स्थिरावली. काचेची दारे डब्यांच्या भिंतीत शिरली मी व वादा डब्यात शिरलो. काही सेकंदांतच भिंतीतील दारे पुन्हा एकवार बंद झाली. गाडीने गती घेतली. इसोगो स्टेशन सोडल्यापासून अंदाजे दोन – दोन मिनिटांच्या अंतरावर नेगीशी, यामाते, इशीकावाचो, कन्नाई, साकुरागीचो, योकोहामा, हिगाशीकानागावा, व शिंकोयासु ही स्टेशने लागली. प्रत्येक स्टेशनवर हळुवारपणे येताच तीच दारांची हालचाल, प्रवाशांची शिस्तबद्ध आत – बाहेर ये – जा चालू असे. शिंकोयासु या स्टेशनवर आम्ही दोघे उतरलो. उतरताच समोर नजर गेली. अनेक इमारतींच्या समूहापैकी, अनेक मजली दोन इमारतींच्या वरील बाजूस लाल रंगाच्या पार्श्वभूमीवर इंग्रजीत पांढऱ्या रंगात Victor JVC ही भव्य

अक्षरे लिहिली होती. या अक्षरांच्या बाजूला ग्रामोफोनमध्ये डोकावणारा कुत्रा या कंपनीच्या चिन्हाची ओळख करून देत होता. एका कोपऱ्यातील इमारतीवर सुद्धा जपानी लिपीत याच कंपनीच्या स्टिरिओ, व्हिडिओ व टी व्ही ची जाहिरात लक्ष वेधून घेत होती.

स्टेशनवरून बाहेर पडून वाटेतील भरधाव वेगाने वाहतूक चालणाऱ्या हायवेवरील पादचाऱ्यांसाठी असलेला पूल ओलांडल्यावर दोन मिनिटांतच आम्ही JVC च्या या योकोहामा प्लँटमध्ये प्रवेश केला. सुरुवातीला दारावरील औपचारिक आदरातिथ्य व चौकशीनंतर आम्ही या प्लँटच्या व्हिडिओ-प्रॉडक्ट्स्-विभागात आलो. थोड्याच वेळात कंपनीच्या निळ्या पोषाखातील दोघेजण आमच्याजवळ आले. आम्ही चौघेजण बाजूच्याच एका प्रशस्त मीटिंग हॉलमध्ये गेलो. सुरुवातीला व्हिजिट कार्डांची देवाण घेवाण झाली. जपानमध्ये स्वत:चे कार्ड असणे आवश्यक असते ही माहिती मला जपानला येण्यापूर्वी मिळाल्याने मी पण माझे कार्ड छापून घेऊन गेलो होतो. जेव्हा जेव्हा जपानी माणूस कुठल्या अनोळखी माणसास भेटतो तेव्हा तो खिशातून स्वत:चे कार्ड काढून स्वत:ची ओळख करून देतो. उभ्या उभ्या कार्डांच्या देवाण घेवाणीनंतर आम्ही टेबलाच्या समोरासमोरील बाजूस बसून थोडे मोकळेपणाने बोलू लागलो. एकमेकांची जास्त ओळख करून घेऊ लागलो. एकाचे नाव होते वाकासा. पंचविशीतील हा तरुण माझा या कंपनीतील दुवा होता. तर दुसरे चाळिशी ओलांडलेले शांत, हसऱ्या चेहऱ्याचे गृहस्थ होते होंदा. पर्सोनेल डिपार्टमेंटचे प्रमुख होते ते. दोघा यांना इंग्रजी भाषा बोलता येत असल्याने आम्हा चौघांच्या बोलण्यात कुठेच अडसर आला नाही.

कोणत्याही खाणाखुणा न करता कंपनीच्या निळ्या पोषाखातील एका युवतीने कॉफीचा ट्रे आणून टेबलावर ठेवला. कॉफीपान सुरू झाले. व्ही. सी. आर. वर ट्रेनिंग घेण्यामागील हेतू, त्याचा पुढील आयुष्यात कसा उपयोग करणार, या ट्रेनिंगमधून तुमच्या अपेक्षा काय वगैरे ट्रेनिंगच्या संबंधातील प्रश्नांची उत्तरे त्यांनी माझ्याकडून जाणून घेतली. सुरुवातीच्या या मुख्य मुद्द्यांवरून मग त्यांनी माझी वैयक्तिक माहिती जाणून घेतली. आपणहून स्वत:च्या कुटुंबियांची माहिती पण दिली. त्यांच्या कंपनीच्या रीतीभाती, एकूण येथील कामाचा प्रकार व त्यातील वैशिष्टये सांगितली. शेवटी मला काही अडचणी आहेत का, असल्यास मदत करण्यासाठी तयारी दर्शविली. नंतर वाकासाने बरोबर आणलेली कंपनीची काही छापील माहिती मला वाचायला दिली. पुढील काही महिन्यांच्या JVC मधील माझ्या ट्रेनिंगच्या वेळापत्रकाची एक प्रत मला दिली. त्यावरील माझ्या सूचना मागितल्या, तसेच जाता जाता व्ही. सी. आर. वरील काही माहिती पण तो मला देऊन गेला. प्रशिक्षणातील पहिला गृहपाठच होता तो. एका आठवड्यानंतर माझे

या कंपनीत, या ठिकाणी ट्रेनिंग सुरू होणार होते. या सुरुवातीच्या भेटीनंतर मी व वादा यांनी होंदा व वाकासाचा निरोप घेतला.

आठवड्याच्या दीर्घ सुट्टीनंतर सांगितल्याप्रमाणे मी सकाळी दहाला फॅक्टरीत हजर झालो. होंदाची गाठ घेतली. या गृहस्थाचा शांत हसरा चेहरा मला फार आवडायचा. काही काही लोकांचे चेहरे खरोखरच इतके चांगले असतात की ते बघितल्यावर दिवसाची सुरुवात चांगली झाल्याची खात्री पटते. होंदा त्यांपैकी एक होते. त्यांनी पुढील कार्यवाहीसाठी वाकासाला सूचना दिल्या. आजचा माझा फॅक्टरीतील पहिला दिवस. प्रथम आम्ही दोघे स्टोअरमध्ये गेलो. माझ्या मापाची व्हिक्टर कंपनीचे लेबल असलेले निळे जर्किन व निळी पँट दिली. कंपनीचे निळे जर्किन व निळी पँट घातल्यावर येथील परकेपणा लोपल्याची मला जाणीव झाली. वाकासा म्हणाला, "विलास! आता तू JVC कुटुंबाचा एक मेंबर झालास. चल! तुला कार्ड पंचिंग दाखवितो." सकाळी कामगार फॅक्टरीत प्रवेश केल्यावर कंपनीचा पोषाख करण्यापूर्वी जे काम करतात ते म्हणजे स्वतःच्या नावाचे कार्ड पंच करणे. ते त्यांनी दाखविले. त्याची माहिती करून दिली व माझ्या नावाचे कार्ड तेथे ठेवले. कार्ड पंच केल्यावर तेथून पुढे आम्ही कामगारांच्या लॉकर्सकडे वळलो.

कामाला सुरुवात करण्यापूर्वी स्वतःचे कपडे, चीजवस्तू ठेवण्यासाठी, तसेच फॅक्टरीतून बाहेर परतण्यापूर्वी कंपनीचा पोषाख ठेवण्यासाठी या लॉकरचा उपयोग होतो. तेथील एका लॉकरची किल्ली त्याने मला दिली. तेथूनच आम्ही कॅन्टिनकडे वळलो. कँटिनमधील पद्धती त्याने मला अभिनयासकट समजावून सांगितली. अशा प्रकारे सुरुवातीला मला फॅक्टरीतील वैयक्तिक गरजेसंबंधीच्या वस्तूंची ओळख करून दिली. परत आम्ही पर्सोनेल-डिपार्टमेंटमध्ये आलो. वाकासाने मला स्टेशनरी दिली. दर आठवड्याचा रिपोर्ट कसा लिहावयाचा याची माहिती दिली. एव्हाना दुपारचा एक वाजून गेला होता. होंदा म्हणाले, "तुझ्या आगमनानिमित्त आज आपण खास जेवण घेऊ." असे म्हणून आम्ही तिघे बाहेर पडलो. जवळच्याच एका आलिशान हॉटेलमध्ये आरामात खाना उरकला. खाताना गप्पा होत होत्या. मी व ते दोघे एकमेकांना अधिक समजावून घेत होतो. जेवण आटोपले. ठरल्याप्रमाणे वाकासा मला कंपनीच्या विक्री-विभागाकडे घेऊन गेला. आतापर्यंत मला फॅक्टरीतील कारभाराविषयी माहिती मिळाली होती. आता कंपनीविषयीची अधिक तोंड-ओळख होणार होती.

विक्री-विभागातील रॉय कॅनेल या गृहस्थांशी गाठ घालून वाकासा निघून गेला. कॅनेल हा एक्स्पोर्ट-डिव्हिजन (निर्यात-विभाग) मधील एक सेल्स प्रमोटर अधिकारी ऑस्ट्रेलियन पिता व जपानी मातेचा तीस वर्षांचा ब्रह्मचारी मुलगा.


अस्खलित जपानी व इंग्रजी बोलत होता. खुशालचेंडू व मस्त गप्पीष्ट होता. JVC च्या स्थापनेपासूनचा इतिहास त्याने मला कथन केला शेजारील हॉलमध्ये टी व्ही समोर त्याने मला बसण्याची विनंती केली व टेप लावून तो निघून गेला. JVC च्या निरनिराळ्या ठिकाणी चालणाऱ्या कामाची ती व्हिडिओ फिल्म होती. यात मला ज्या ठिकाणी प्रशिक्षण घ्यावयाचे होते त्या योकोहामा-विभागातील कामाचा पण समावेश होता. फिल्म संपली व कॅनेलने हॉलमध्ये प्रवेश केला. तो मला त्याच्या रूममध्ये घेऊन गेला. कॅनेलने सिगारेट शिलगावली. आमच्या गप्पा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात तो मला फॅक्टरीची जास्त ओळख करून देत गेला. बाजूलाच माझ्यासाठी काढून ठेवलेली व्हि. सी. आर. ची काही तांत्रिक छापील माहिती त्याने मला दिली. वाकासाने रूममध्ये प्रवेश केला व खुर्चीत बसता बसता मला, माझा आजचा दिवस संपल्याचे सांगितले. गप्पा सरल्या. मी व वाकासाने कॅनेलचा निरोप घेतला. मी लॉजकडे वळलो. फॅक्टरीचा पोषाख उतरवून बाहेर पडलो. कंपनीतील पहिला दिवस संपला होता. परंतु कंपनीची बरीच माहिती देऊन तो मावळला होता.

फॅक्टरीची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ५ अशी होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ७-४५ लाच मी फॅक्टरीत हजर होतो. कंपनीचा निळा पोषाख चढवून. पर्सोनेल डिपार्टमेंटमध्ये वाकासाकडे गेलो. थोड्याच वेळात आम्ही दोघे एका हॉलमध्ये गेलो. तेथे अनेक महिला व पुरुष कामगार कंपनीच्या पोषाखात गटा-गटाने शिस्तीत उभे होते. वाकासा व मी एका गटात उभे राहिलो.

थोड्याच वेळात लाउडस्पीकरवर संगीत सुरू झाले व व्यायाम सुरू झाला. शाळेत असतानाच्या पी. टी. च्या तासाची आठवण झाली. तसाच कवायतीचा प्रकार होता तो. व्यायाम संपला व कंपनीचे काही ओळींचे गाणे सुरू झाले. सर्व जण स्तब्ध होते. गाणे संपले व प्रत्येक गटात हालचाल सुरू झाली. त्यांच्या तुलनेने मोठ्या डोळ्याच्या परदेशी असलेल्या माझ्या अस्तित्वाने माझ्या गटातील इतरांचे औत्सुक्य ताणले गेले होते. त्यांच्या कुतूहलाची मला जाणीव झाली. प्रत्येक लहान लहान गटाचे म्होरके पुढे येऊन आपल्या गटाशी विचार-विनिमय करीत होते. माझ्या गटासमोरील म्होरक्याशेजारी उभे राहून वाकासाने मला पुढे बोलाविले. मला स्वत:बद्दल जपानीतून माहिती सांगण्यास सांगितले. अचानक झालेल्या या हल्ल्याने मी सुरुवातील क्षणभर गांगरलो! परंतु क्षणार्धात सावरून ८–१० वाक्यात स्वत:ची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला. सर्वांनी नंतर मोठ्यांनी टाळ्या वाजवून माझे स्वागत केले. अशा प्रकारे आता एव्हाना मी JVC तील एका गटापैकी एक झालो होतो.

या गटातील सर्व जणांचा माझा अधून मधून संबंध येत होता. ते सर्व होंदांच्या पर्सोनेल डिपार्टमेंटलमधील ॲडमिनिस्ट्रेटिव्ह विभागातील कर्मचारी होते. अतांत्रिक बाबतीत जेव्हा मला काही मदत लागत असे तेव्हा वाकासामार्फत मी त्यांच्याशी संपर्क साधीत असे. त्या दिवशी वाकासाने JVC तसेच V. C. R. बद्दल काही माहिती वाचावयास दिली. ती वाचण्यासाठी दोन तास अवधी दिला. त्यानंतर पुन्हा व्हिडिओ-संबंधीच्या एकंदरीत JVC च्या योकोहामा प्लँट-मधील तांत्रिक कामाबाबतची व्हिडिओ फिल्म दाखविली. तद्नंतर वाकासाने स्वतःच्या पर्सनल डिपार्टमेंटची माहिती करून दिली. प्रत्येकाची वैयक्तिक ओळख झाल्यावर आम्ही दोघांनी जेवणाच्या सुट्टीत कँटिनमधील जेवणाचा आस्वाद घेतला. दुपारी आम्ही असेंब्ली-विभागात गेलो. व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर अगदी पहिल्या पायरीपासून, म्हणजेच चासिसवर मेकॅनिकल घटकभाग उभारावयास सुरुवात केल्यापासून ते सर्वांत शेवटी व्ही. सी. आर. पॅकिंग होऊन कसा बाहेर पडतो इथपर्यंत प्रत्येक पायरी मी त्या त्या कामगाराच्या मागे उभा राहून न्याहाळली. अशा प्रकारे दुसऱ्या दिवसाचा बराचसा वेळ कसा संपला ते कळले पण नाही.

दुपारी चहापानाच्या सुट्टीनंतर मला त्याने कंपनीचा अगदी नवीन पोर्टेबल व्हिडिओ कॅमेरा दिला. तो समजावून दिला व सांगितले की, अर्धातास तू कुठेही शूटिंग करून ये. मीच घेतलेली व्हिडिओ फिल्म नंतर याच डिपार्टमेंटमधील काही जणांबरोबर टी. व्ही. स्क्रीनवर कॉफी घेता घेता बघितली. दुसरा दिवस संपला. एव्हाना मला कंपनीच्या इतिहासापासून ते प्रत्यक्ष तेथे चालणाऱ्या कामा-बाबतची फिल्म आणि माहिती पत्रकाद्वारे तसेच नजरेखालून घातलेल्या प्रत्यक्ष कामाच्या वस्तुस्थितीवरून खूपच माहिती झाली होती.



JVC कंपनीची अधिकाधिक ओळख करून घेणे चालू होते. पुढील दिवशी सुरुवातीला या कंपनीतील ॲटोमॅटिक मॅन्युफॅक्चरिंग व नंतर क्वालिटी-कंट्रोल-विभाग बघितला. संथगतीने फिरणाऱ्या बेल्टवर एक पाट ठेवलेला असून त्यावरती व्हि. सी. आर्. ची एक चासीस असते. प्रत्येक ठिकाणी साधारणतः एक मिनिटाचे आत त्या चासीसवर प्लेट्स्, वॉशर, रिंग, रिळ, मोटारी वगैरे निरनिराळे घटकभाग, बाजूच्या ट्रेमधून मशीनमार्फत अलगद उचलून बसविले जातात. काही वेळा चासीस उलटी करून त्यास ग्रीस लावणे, तेथे ड्रीलने भोक पाडणे इत्यादी सर्व कामे रोबोट मशीनमार्फत आपोआप होतात. एका ट्रेमधील घटकभाग संपले की, आपोआप दुसरा ट्रे पुढे येतो. सर्व कामे मशीनमार्फत बिनचूक पद्धतशीर अगदी व्यवस्थित व त्वरित होत असताना बघितली. या ॲटोमॅटिक असेंब्ली-विभागात फार मागणी असलेल्या इकॉनॉमिकल व कमी सॉफेस्टिकेटेड सेट्सची संपूर्ण मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल असेंब्ली रोबोटमार्फत केली जाई. मला ज्या व्हि. सी. आर्. मॉडेलवर पुढे प्रशिक्षण घ्यावयाचे होते त्या मॉडेलचे मॅन्युअल मला वाकासाने दिले.

दुपारी याच व्हिडिओ-प्रॉडक्शन-विभागाच्या रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट विभागामध्ये गेलो. तेथील एक वृद्ध गृहस्थ शिराशी व त्यांच्या सेक्रेटरीशी ओळख करून देऊन वाकासा निघून गेला. व्हि. सी. आर्. चे कार्य कसे चालते हे व्हि. सी. आर्. काही मॉडेलसहित फार सुंदर रीतीने त्या गृहस्थांनी मला समजावून दिले. प्रत्येक वेळी ते उठून समोरील शेल्फातून स्वतः ते मशीन उचलून आमच्या समोरील टेबलावर ठेवीत. त्या मॉडेल्सना स्वतः केवल जोडून त्याची पूर्णपणे प्रात्यक्षिकासहित सर्वांगाने तांत्रिक माहिती देत. मध्ये कधी तरी आम्ही दोघांनी चहापान उरकले. बोलता बोलता ते सांगून गेले की, याच्या शेजारच्या खोलीत VHS पद्धतीच्या व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचा जन्म झाला. त्या जन्माच्या हकिगतीबद्दल व त्यास जन्म देणाऱ्या व्यक्तीबद्दल माझी उत्सुकता बघून बाजूला इतक्या वेळ बसून राहिलेल्या त्यांच्या सेक्रेटरीने मला एक रिपोर्ट आणून दिला व ते दोघे बाहेर पडले. हा रिपोर्ट वाचून पूर्ण होताच मला गहिवरून आले. कारण ज्या गृहस्थाने आपली उभी हयात खर्च करून ज्या ठिकाणी व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचा शोध लावला त्याच गृहस्थाशी गेले तीन तास, त्याच ठिकाणी व त्यांचेकडूनच मी व्हि. सी. आर्. समजावून घेत होतो.

मी दिवाणखान्यातून बाहेर पडलो. समोर शिराशी येऊन केव्हा उभे राहिले ते मला समजले नाही. समोर नजर जाताच आपसूक मी उभा राहिलो. पुन्हा व्हि. सी. आर्. च्या काही उरलेल्या तांत्रिक बाबींकडे ते वळले. त्या त्यांनी मला नीट समजावून दिल्या. आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. तो दिवस संपला. सुवर्ण-अक्षरांनी लिहावा असा तो दिवस होता. पहिले तीन दिवस संपले होते. JVC कंपनी आणि व्हि. सी. आर्. या दोन्ही बाबत बरीचशी माहिती माझे जमेस होती.

पुढील दिवशी वाकासा मला एका व्हिडिओ-विभागामध्ये घेऊन गेला. तेथील व्हि. सी. आर्. प्रॉडक्शन-प्लँटचे मुख्य हिनो व त्यांचा तरूण २५ वर्षांचा सहकारी तंत्रज्ञ सातो या दोघांची ओळख करून देऊन तो निघून गेला. सुरुवातीला सातोने मला पुन्हा एकवार रोबोटमार्फत चालणाऱ्या असेंब्ली-लाइनवर नेले. प्रत्येक ठिकाणी व्यवस्थित माहिती दिली. व्हि. सी. आर्. वरील माझ्या तांत्रिक ज्ञानाच्या गरजेची भूकही तो अधून मधून शमवीत होता. त्या दिवशी व्हि. सी. आर्. असेंब्लीनंतर आम्ही त्याच योकोहोमा प्लँटमधील JVC ची व्हिडिओ कॅमेरा असेंब्ली लाइन बघावयास गेलो. येथे एकूण चार लाइन्स होत्या. प्रत्येक लाइनवर अंदाजे ४० ते ४५ कामगार मुली व काही मुले होती. कॅमेरा टयूब, लेन्स व नंतर त्यात एक, एक सर्किटबोर्ड जोडला जात होता. प्रत्येक खेपेस चाचण्या घेतल्या जात. प्रत्येक लाइनचे शेवटी व्हिडिओ कॅमेरा पूर्णपणे असेंब्ली होऊन बाहेर पडत होता. प्रत्येक कामगार करीत असलेल्या कामाबद्दल तांत्रिक दृष्टिकोनातून सातो मला माहिती पुरवीत होता. दिवस संपला. यापुढे येथील प्रशिक्षणाच्या काळात मला तांत्रिक, तसेच अतांत्रिक माहिती पुरविण्यासाठी अनुक्रमे सातो व वाकासा हजर होते. दुसऱ्या दिवसापासून माझे तांत्रिक शिक्षण सुरू होणार होते. एखाद्या प्रशिक्षणार्थीला हाताळावयाची जपानी लोकांची पद्धत, त्या मागील प्लॅनिंग, त्याची कार्यवाही इत्यादी सर्व वाचकांना समजावे म्हणून माझ्या सुरुवातीच्या काही दिवसांचा कार्यक्रम इतक्या बारीक सारीक माहितीसह येथे दिला.

जगाला विविध प्रकारच्या आश्चर्यजनक व्हिडिओ सिस्टिम्स पुरविणाऱ्या, तसेच मानवी बुद्धिमत्ता, नैपुण्य आणि यांत्रिक कौशल्य यांची योग्य सांगड घालणाऱ्या या JVC च्या छत्राखाली माझे प्रशिक्षण सुरू झाले होते. आयुष्यातील एक स्वप्न साकार होत होते.

पुढील दिवशी सातो मला व्हि. सी. आर्. उत्पादन-विभागातील एका लाइनवर घेऊन गेला. तेथील मुख्यांशी माझी ओळख करून दिली. त्यानंतरच्या ओळीने एक अगर दोन आठवडे सलग मी व्हि. सी. आर्. च्या मेकॅनिकल असेंब्ली-सेक्शन, वायरिंग असेंब्ली-सेक्शन, फायनल अॅडजस्टमेंट अॅन्ड अलाइनमेंट सेक्शन यांवर काम केले. प्रत्येक खेपेस त्या त्या सेक्शनचा प्रमुख मला त्या लाइनवर घडत असलेल्या प्रत्येक कामाची इत्यंभूत माहिती करून देत असे. नंतर प्रत्येक कामगारासमवेत हे काम करण्याची मला संधी मिळत असे. प्रत्येक कामगाराकडून उत्तम प्रकारचे सहकार्य मिळत असे. प्रत्येक कामगार हा माझा शिक्षक होता.

प्रत्येक लाइनवर व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरची विविध मॉडेल्स आकार घेत होती. काही आठवड्यांनंतर मला स्वतंत्र एक सेट व त्याच्या टेस्टिंगसाठी लागणारी सर्व साधने उपलब्ध करून देण्यात आली. याच्या साहाय्याने काही दिवस मी

रेकॉर्डरची सांगोपांग माहिती करून घेतली. सर्वांत शेवटी व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचे फॉल्ट फाइंडिग अॅन्ड डिटेक्शन म्हणजेच दोष-शोधन व निर्मूलन या विभागात कामाचा अनुभव घेतला.

प्रत्येक सेक्शनमध्ये कामास सुरुवात करण्यापूर्वी प्रथम माझी ओळख करून दिली जाई. नंतर प्रत्यक्ष प्रत्येक कामगारावरोबर काम करताना माझ्या जपानी मित्र–मैत्रिणींत भर पडत होती. जेव्हा त्या सेक्शनचे ट्रेनिंग संपवून मी पुढील सेक्शनला जात असे त्या वेळी आधीच्या सेक्शनतर्फे कंपनीच्या कामाच्या वेळेनंतर खाजगी कुठल्या तरी हॉटेलमध्ये पार्टी होत असे. पार्टी संपे त्या वेळी या सेक्शनमध्ये या दोस्तांसमवेत यापुढे काम करायला मिळणार नाही याची जाणीव होई व मन भरून येई. काही जीव लावून गेलेल्या दोस्तांचे डोळे पाणावलेले मी बघितले आहेत. जपानी हा सुद्धा माणूसच आहे व तो सुद्धा खूप हळवा आहे याची प्रचिती येई.

या कारखान्यातील प्रशिक्षणाच्या काळात मी व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरवरील तांत्रिक बाबी तर आत्मसात करून घेतल्याच परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे असे जपानी कारागीर आणि त्यांचे कौशल्य जवळून बघितले, अनुभवले. जपानी विनयशीलपणा, त्यांच्या चालीरीती, त्यांचे सहकार्य, कामातील तन्मयता, कामाला वाहून घेण्याची, नव्हे ! तर कामात वाहून जाण्याची ओढ बघितली. कामावरोबरच कारखान्यावद्दलचे प्रेम व जिव्हाळा अनुभवला. कामातील सहजता व खेळीमेळीचे वातावरण तर माझ्या मनात एक कायमचा ठसा उमटवून गेले.

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे येथे तांत्रिक बाबींमध्ये न शिरता कारखान्यातील इतर अतांत्रिक बाबींची आपण माहिती करून घेणार आहोत.

## दिवसाची सुरुवात

सकाळी ८ ला फॅक्टरी सुरू होण्यापूर्वी बहुतेक कामगार साधारणतः १० ते १५ मिनिटे आधी फॅक्टरीमध्ये प्रवेश करतात. प्रवेश करताच प्रथम स्वतःचे कार्ड पंच करून ते पुढील आपल्या ठरलेल्या कप्प्यात ठेवून स्वतःच्या लॉकरकडे जात. वस्तुतः लॉकरच्या वाटेवरच ही कार्ड पंचिंगची व्यवस्था होती. लॉकरकडे गेल्यावर अंगावरील कपडे उतरवून कंपनीचे निळे जर्किन व निळी पॅंट हा पोषाख चढविला जाई. स्त्री व पुरुष कामगारांसाठी लॉकर्स वेगवेगळ्या ठिकाणी असत. जर्किनवर डाव्या बाजूला खिशाचे वर VICTOR या अक्षरांची पट्टी कंपनीचा दिमाख मिरवीत असते. तर त्याचेच खाली अडकविलेल्या पट्टीवर त्या व्यक्तीचे नाव व त्याचा कंपनीतील हुद्दा, जपानी लिपीत लिहिलेला असे.

सकाळी ८ च्या आधी लॉकर्स असलेल्या ठिकाणी अनेक कामगार येत असत. अशा वेळी ' ओहाय्यो ' किंवा ' ओहाय्यो गोझाइमास ' ( म्हणजे सुप्रभात, गुड-

मॉर्निंग ) असे आपल्या मित्रांना म्हणत कामगारांचे कपडे बदलणे चालू असे. कपडे बदलून झाल्यावर कामगार लॉकरचे दार नुसते लोटून जात. लॉकरला कुलूप लावणारे कामगार मी बघितले नाहीत. कारण चोरी हा प्रकार येथे नाही. याबाबत मी ऐकले होते पण प्रत्यक्ष बघण्याचा योग आला. कंपनीचा पोषाख चढविल्यावर काही कामगार आपल्या कामाच्या जागेजवळ जमत. बरेचसे बरोबर आणलेल्या वर्तमानपत्रात डोके खुपशीत. अशावेळी सिगारेटचा धूर निघत असे तर बऱ्याच महिला-कामगार आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबर गप्पा मारण्यात मश्गुल असत. काहीजण चक्क कपडे बदलताच व्हेंडर मशीनकडे धाव घेत व कॉफीपान वगैरे उरकत असत.



फॅक्टरीत ठिकठिकाणी भिंतीमध्ये लाउडस्पीकर होते. अगदी बाथरूममध्ये सुद्धा. आठला दोन मिनिटे कमी असताना लाउडस्पीकरवर नेहमीच्या मधुर संगीताचा टोल पडे. सर्वजण त्यांच्या नेहमीच्या कामाच्या ठिकाणाजवळ जमा होत. बरोबर आठला स्पीकरवरून व्यायामाचे संगीत सुरू होई. त्या संगीतावर पाच मिनिटे व्यायाम होई. पी. टी. प्रमाणे असलेल्या या व्यायामाच्या प्रकारात मुख्यत्वे खांदे, मान, मनगट, पाठ, कंबर या अवयवांवर भर असे.

व्यायामाचे संगीत बंद झाल्यावर अंदाजे एक मिनिट स्पीकरवर व्हिक्टर कंपनीची प्रार्थना सुरू होई. कंपनीतील सर्व कामगारांना सूचना द्यावयाच्या असतील तर त्या कंपनीच्या या गाण्यानंतर स्पीकरवरून दिल्या जातात. यानंतर प्रत्येक गटासमोर उभा असलेला त्या गटाचा प्रमुख हा आपल्या गटातील कामगारांना त्या दिवसाच्या कामाबाबतचे स्वरूप समजावून देत असे. काही सूचना पण देत असे. या वेळी कोणाही कामगाराचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाते. त्याबाबत इतर कामगारसुद्धा आपले विचार या वेळी स्पष्टपणे मांडतात. काही काही वेळा आदल्यादिवशी कामात आलेल्या अडचणींबाबतही मते मांडली

जातात. गटप्रमुखाच्या नेतृत्वाखाली त्याबाबत उलटसुलट चर्चा होते. एक दोनदा तर काही कामगारांनी चक्क गटप्रमुखास धारेवर धरलेले मी बघितले होते. परंतु त्यामध्ये वैयक्तिक आकस नसून कंपनीचे हित व कामाच्या दृष्टिकोनातूनच ही सर्व मते मांडली जात. त्या दिवशी ज्या कामगारांचा वाढदिवस असे त्यांचे या वेळात गटप्रमुखामार्फत अभिनंदन केले जाऊन कंपनीमार्फत भेट दिली जाते. या चर्चेनंतर अगर चर्चा चालू असतानाच बरोबर आठ वाजून दहा मिनिटांनी खट्ऽखट्ऽ आवाज करीत फॅक्टरीतील कामाचा बेल्ट सुरू होई.

आठवड्यातून एक दिवस कंपनीच्या सर्वांत वरच्या भल्या मोठ्या प्रचंड हॉलमध्ये सर्वजण जमा होत. नेहमीप्रमाणे स्पीकरवरून ऐकू येणाऱ्या व्यायामाच्या संगीतावर व्यायाम होई. व्हिक्टर कंपनीची प्रार्थना होई. या वेळी कंपनीची प्रार्थना नेहमीप्रमाणे एक कडव्याची नसून संपूर्ण चार कडव्यांची असे. स्पीकरवरून सर्वांना द्यावयाच्या सूचना दिल्या जात. नंतर त्या कंपनीचा त्या प्लँटचा प्रमुख कंपनीच्याच पोषाखात पुढे प्लॅटफॉर्मवर उभा राहून सर्वांना सूचना देत असे व त्यानंतर प्रत्येक-जण आपापल्या मजल्यावर जाऊन काम सुरू करीत असे. एव्हांना कामाचा बेल्ट सुरू झालेला असे.

## कामाच्या वेळा व मधल्या सुट्टीत

फॅक्टरीची वेळ सकाळी ८ ते दुपारी ५ अशी असते. कामाचा आठवडा सोमवार ते शुक्रवार असे तर शनिवार आणि रविवार हे दोन दिवस सुट्टीचे असत. सकाळी १० व दुपारी ३ वाजता प्रत्येकी दहा मिनिटांची सुट्टी असे. १२.१० ते १२.५० ही जेवणाची सुट्टी असे. कॅन्टिनमधील गर्दी टाळण्यासाठी कंपनीच्या निम्म्या लोकांची जेवणाची वेळ ११.५० ते १२.३० अशी असे. प्रत्येक गटाला आलटून पालटून एका आठवड्याला ११.५० तर पुढील आठवड्याला १२.१० अशी दुपारच्या जेवणाची सुट्टी मिळे. एकाच वेळी अंदाजे हजार माणसे मावतील एवढे प्रशस्त लांबरुंद जेवणाचे कॅन्टिन होते. सुट्टीच्यावेळी कामाचा बेल्ट लगेच थांबे. प्रत्येक सुट्टी संपण्यापूर्वी एक मिनिट स्पीकरवरून ऐकू येणारे संगीत सुट्टी संपत आल्याची जाणीव करून देत असे व बरोबर एक मिनिटानंतर संगीताचा टोल पडे आणि कामाचा बेल्ट खडखडू लागे. सकाळची १० मिनिटांची सुट्टी व जेवण यांच्यामध्ये तसेच जेवणाची सुट्टी ते दुपारची १० मिनिटाची सुट्टी याच्या मधल्या वेळेला दोन मिनिटे कामाचा बेल्ट बंद होतो व स्पीकरवरून व्यायामाचे मधुर संगीत सुरू होते. परंतु या वेळी हा व्यायाम ऐच्छिक असतो. तरी सुद्धा बरेच जण स्वतःच्या कामाच्या खुर्चीच्या मागील मोकळ्या जागेत उभे राहून व्यायामाचे प्रकार करीत असतात.

सकाळच्या व दुपारच्या दहा मिनिटांच्या सुट्टीत बरेच जण कामाच्या जवळ असलेल्या हॉलमध्ये व्हेंडर मशीन्सकडे धाव घेऊन तेथे रांग लावतात. बहुतेक ठिकाणी दोन व्हेंडर मशीन्स असत. एक मशीन कॉफीसारख्या गरम पेयाचे असे तर दुसरे कोकाकोला, आइस्क्रीम सारख्या शीत वस्तूचे असे. मशीनवर त्या त्या वस्तूसमोर दर्शविलेले नाणे टाकताच एक कागदी कप मशीनमधून खाली येई. कॉफीमध्ये साखर दूध हवे असल्यास ती ती बटणे दाबायची. कप भरल्यावर मशीनवरील लाल लाईट बंद होई. मशीनसमोरील रांग भराभर पुढे सरके. काही जण या वेळी शांतपणे हॉलमधील टेबलाभोवतालच्या खुर्चीवर बसून सिगारेटचा धूर सोडीत असत. काही मित्रमंडळी सुख-दुःखाच्या गप्पा मारीत. खिडकीतून बाहेरील रस्त्यावरील वाहतूक बघत. तर काही चक्क कामाच्या खुर्चीवरूनही न उठता समोरील रेकॉर्डवरच दोन हाताची घडी करून त्यावर डोके ठेवून एक डुलकी सुद्धा काढत.

जेवणाची ४० मिनिटांची सुट्टी तशी मोठी असे. या वेळेत कामगार कॅन्टिन-कडे लगबगीने जात. कॅन्टिनमध्ये प्रवेश करतानाच आजच्या पदार्थांच्या डिशेस व त्यांच्या किंमती शोकेसमध्ये मांडलेल्या असत. त्यावर जाता जाता कटाक्ष टाकून मंडळी पुढे जात. कॅन्टिनच्या एका बाजूस प्रत्येक पदार्थ देण्याची सोय असे. एकाच पदार्थासाठी एकापेक्षा जास्त काउंटर असत. कूपन देऊन हे पदार्थ घ्यावयाचे. काउंटरजवळच जेवणाच्या स्वच्छ थाळ्या, चमचे ठेवलेले असत. एका बाजूला कूपनच्या विक्रीची सोय असे. एकाच वेळी निरनिराळ्या किंमतीच्या कूपनची वाटेल तेवढी पुस्तके विकत घेता येत असत. एकदम १०-१५ हजार येनची कूपन्स घेतली म्हणजे बरेच दिवस त्यासाठी निराळा वेळ खर्च करावा लागत नसे. एका बाजूला ब्रेड, बिस्किटे वगैरे सारख्या पदार्थांची विक्री चाले. तर दुसऱ्या कोपऱ्यात अनेक व्हेंडर्स मशीन्स असत. जेवण सर्वत्र काटचाच्या सहाय्याने घेण्यामुळे हात धुण्याची जागा वगैरे प्रकार येथे नसला तरी एका बाजूला दोन वॉशबेशिन्स दिसत होती.

कॅन्टिनकडे जाण्याच्या वाटेवर काही पत्रके तिरप्या शेल्फावर ठेवलेली असत. त्यांत जपानमधील तसेच परदेशांमधील सहलीची माहितीपत्रके असत. कधी कधी विकावयाची घरे, नवीन फ्लॅट्स्, घरातील सामान, वगैरेंची पण माहितीपत्रके असत. अशा काही कंपन्या जाहिरात म्हणून कोऱ्या कागदाच्या लहान डायऱ्यांचे गठ्ठेपण वाटेवरील बाजूच्या टेबलावर ठेवीत असत.

जेवणाच्या प्रशस्त हॉलमध्ये एका बाजूला एक मोठा टी. व्ही. ठेवलेला असे. त्यावर बातम्या अगर काही विशेष कार्यक्रम चाले. एकदा तर ओळीने दोन दिवस आपल्याकडे देवळात जशी वारकरी पंथाच्या लोकांची भजने होतात, अभंग, भारुडे,

वगैरेंसारखे कार्यक्रम होतात अगदी तसेच कार्यक्रम चालू होते. असेच एक दिवस टी. व्ही. वर एका बाईचे कीर्तन सुद्धा लागले होते. तिच्या साथीला दोन स्त्रिया एका बाजूला उभ्या होत्या. समोर सगळी म्हातारी मंडळी होती. फक्त भाषा निराळी. कीर्तन सांगण्याची पद्धत, ढंग अगदी आपल्याकडील पद्धतीची तंतोतंत आठवण करून देत होती. प्रचंड हॉलमधील दुसऱ्या एका बाजूला कंपनीच्या ऑडिओ / व्हिडिओची नवीन मॉडेल्स ठेवलेली असत. त्यावर रेकॉर्डेड ऑडिओ व व्हिडिओ कॅसेट द्वारा कार्यक्रम सादर केला जात असे. कधीतरी एखाद्या कोपऱ्यात एखादा जपानी विक्रेता टाय-सूट घातलेल्या पोषाखात हिरे विकताना दिसे. लांबच लांब टेबलांच्या रांगाच्या दोन्ही बाजूंस बसून एकाच पोषाखातील जपानी खाना घेतानाचे दृश्य विशेष निराळे दिसे. या जेवणाच्या वेळेत कॅन्टिनचे पॅक डबे सुद्धा मिळत. कामाच्या ठिकाणाजवळील हॉलमध्ये टेबलाभोवती एकत्र बसून गप्पा-गोष्टी करीत काही जण जेवण उरकीत असत.

कॅन्टिनमध्ये एखादा आरामात रेंगाळत जेवत बसला आहे हे दृश्य विरळेच १५-२० मिनिटांत जेवण उरकण्याकडेच बहुतेकांचा कल असे. जेवणानंतर काही-जण फॅक्टरीच्या मधल्या मोकळ्या जागेत बॅडमिंटन खेळत. काही जण फॅक्टरीच्या सर्वांत वरच्या मजल्यावरील बंदिस्त मोठ्या हॉलमधील लाकडी जमिनीवर ( फ्लोअर ) बॅडमिंटन, व्हॉलीबॉल खेळत. या ठिकाणी टेबल-टेनिस सुद्धा चालत असे. काहीजण मात्र ही वेळ खास आपल्या गर्लफ्रेंड अगर बॉयफ्रेंडसाठी राखून ठेवीत व त्याबरोबर गप्पा-गोष्टी करण्यात मश्गुल असत. ही फ्रेंडशिप उघड उघड असते. ते अगदी गळ्यात हात टाकून हिंडत असले तरी इतरजण त्यांची विशेष निराळी अशी दखल घेत नसत. काहीजण मात्र फॅक्टरीसमोरील बागेतील छाटलेल्या गवतावर ताणून देत. तर काहीजण त्याच बागेच्या एका बाजूला असलेल्या तलावातील रंगीबेरंगी माशांच्या हालचालींकडे बघत रममाण होत असत.

सुट्टी संपण्यापूर्वी एक मिनिट आधी सुरू होणारे संगीत बागेमध्येसुद्धा व्यवस्थित ऐकू येई व सुट्टी संपत आल्याची जाणीव करून देई. सुट्टी संपताच हे संगीत थांबे. एक संगीताचा टोल पडे व कामाचा बेल्ट नेहमीचा खड्ऽखड्ऽ आवाज करीत पुढे सरके.

## कामाच्या वेळेत –

खरा जपानी बघावा तो त्याच्या कामाच्या वेळेत. या फॅक्टरीमध्ये प्रत्येक कामगार हा कुठल्यातरी एका गटाचा घटक असतो. एका गटात साधारणतः २९ ते ३० कामगार असतात. एकंदरीत गटाच्या कामाच्या त्या दिवसाच्या प्रकारा-

प्रमाणे ही संख्या कमी जास्त होते.

प्रत्येक कामगाराच्या खुर्चीसमोरील आडव्या लांबचलांब टेबलावरून अंदाजे एक फूट अंतर असलेल्या दोन चेन्स टेबलाच्या लांबीला समांतर, कामगारांच्या डावीकडून उजवीकडे संथ गतीने पुढे सरकत असतात. चेन्सच्या दोन्ही बाजूंना चेनच्या दिशेने अनेक लहान लहान बेअरिंग्ज ऊर्फ चाके असतात. या चेनवर सारख्या आकाराचे पाट ठेवलेले असतात. या पाटावर रेकॉर्डरचे मॉडेल आकार घेत पुढे जात असते. या चेन्स व त्यांमधील चाकांमुळे हा पाट त्यावरील वस्तूसकट डावीकडून उजवीकडे पुढे सरकत असतो. प्रत्येक कामगारासमोर पाट येताच दोन चेन्सच्या मधल्या जागेतून एक दट्ट्या वरती आलेला असतो. त्यामुळे हा पाट कामगारासमोर धरून ठेवला जातो. प्रत्येक कामगार हा त्याच्या समोरील पाटावर आकार घेत असलेल्या रेकॉर्डरमध्ये दोन – चार कॉम्पोनंट्स् ( घटकभाग ) ची भर घालतो. कामगाराचे त्याच्या समोरील रेकॉर्डरवर, त्याला नेमून दिलेले ठराविक काम पूर्ण होताच तो त्याच्या पायाजवळील लहानशी फळी पायाने दाबतो. इतक्या वेळ त्या कामगाराच्या समोरील पाट धरून ठेवणारा दट्ट्या या लहानशा फळीला एका चेनने जोडलेला असतो. ही लहान फळी दाबताच दट्ट्या खाली जातो; व टेबलावरून आडव्या दिशेने फिरणाऱ्या दोन चेन्स व त्याला जोडलेल्या लहान चाकांमुळे आपोआप पाट त्यावरील युनिटसकट पुढील कामगाराकडे जातो. व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डवर चढविण्यासाठी लागणारे घटक भाग हे त्या कामगाराच्या डाव्या उजव्या हाताला तसेच त्याला विनासायास घेता येतील या दृष्टीने ट्रेमध्ये ठेवलेले असतात. काही कामगार हातात पांढरे मोजे घालून काम करणे पसंत करतात.

प्रत्येक कामगाराला जे काम नेमून दिलेले असते त्याबद्दलची माहिती त्या मॉडेलच्या चित्रासकट त्याच्या समोर, थोड्याश्या अंतरावर लिहिलेली असते. कारखान्यातून दाबाच्या हवेचा पुरवठा करणाऱ्या नळ्या गेलेल्या असतात. काही कामगारांना पुरविलेल्या स्क्रू-ड्रायव्हरसाठी अशा दाबाच्या हवेची गरज असते. असे स्क्रू ड्रायव्हर कामगाराच्यासमोर स्प्रिंगच्या सहाय्याने लटकत असतात. स्क्रू-ड्रायव्हर खाली खेचून दाब देताच या स्क्रू ड्रायव्हरचे पुढील टोक फिरू लागते. स्क्रू-ड्रायव्हर सोडताच तो स्प्रिंगमुळे वरती जातो. प्रत्येक कामगारापुढील कामही साधारणत: ३० ते ४० सेकंदांत पूर्ण होते. मेकॅनिकल-असेंब्ली सेक्शनमध्ये समोरील पाटावर असलेल्या चासीसवर जोडणाऱ्या पट्ट्या, स्प्रिंग, स्क्रू, कॉलर, स्पेसर, मोटारी ब्रेक्स, सॉलीनाईड, रिंग्ज, पुली वगैरेंसारख्या एक – एक मेकॅनिकल घटक-भागांची भर पडत जाते. प्रत्येक कामगार भराभर त्याला नेमून दिलेल्या घटक-भागांची भर घालीत असतो.

प्रत्येक गटामध्ये साधारणतः दोघेजण हे फक्त त्या गटातील सर्व कामगारांना लागणाऱ्या घटकभागांचा त्या कामगारांपर्यंत पुरवठा करीत असतात. गटामधील एक किंवा दोन ज्येष्ठ कामगार हे सतत त्यांच्या गटातील कामगारांच्या भोवती लाईनवर लक्ष ठेवतात. जर एखाद्या कामगाराजवळ डावीकडे जास्त युनिट्स् साठत जात असतील तर त्या कामगाराच्या कामात बिनबोभाट मदत करून तेथे तुंबत जात असलेल्या कामात सहाय्य करणे हेच या ज्येष्ठ कामगारांचे काम असते. गटातील सर्व कामगारांच्या कामावर लक्ष ठेवणे, उत्पादनातील अडीअडचणींवर तात्काळ मात करणे, वरील अधिकारीवर्गाशी संपर्क साधणे वगैरे कामे ही गट-प्रमुखाकडे असून आपल्या गटातील सर्व कामगारांचे काम सहज दिसेल अशा सोईच्या ठिकाणी त्याची टेबलखुर्ची असते.

मेकॅनिकल असेंब्ली-सेक्शनमधील शेवटच्या कामगाराचे काम पूर्ण होताच वाटेतील काउंटर मशीनमार्फत त्याची नोंद घेऊन ही चासीस त्याखालील पाटा-सकट आपोआप पुढील लहान, अंदाजे ३ फूट × ३ फूट लिफ्टद्वारे आतील मजल्यावर जाई आणि तेथील बेल्टमध्ये गुंफली जाऊन यापुढील वायरिंग असेंब्ली-विभागात येई. या विभागात पण एकंदरीत कामाची पद्धत तीच. फक्त मेकॅनिकल घटकभागांऐवजी या ठिकाणी लहान लहान प्रिंटेड बोर्डस्, वायरचे पुंजके, ट्रॅन्स्फॉर्मर्स, फ्यूज वगैरेंची भर पडे व ते एकमेकांस जोडण्यामध्ये एक एक कामगार दंग असे. यानंतर अशाच प्रकारे ही चासीस पुन्हा लिफ्ट अगर फिरणाऱ्या बेल्टच्या सहाय्याने फायनल ॲडजस्टमेंट व अलाइनमेंट-विभागात येई. या ठिकाणी कामगारांच्या बाजूस लहान लहान टेलिव्हिजन, मल्टिमीटर, ऑसिलोस्कोप, ऑडिओ टेस्टर, वो ॲन्ड फ्लटर मीटर, मिली व्होल्टमीटर, निरनिराळ्या विशेष चाचणी-टेप्स, वगैरे असत. काही ठराविक सिग्नल्सपण वायरमार्फत त्यांच्या समोरील प्लगमध्ये हजर असत. या विभागाच्या नावांप्रमाणेच या ठिकाणी शेवटची असेंब्ली व सेटची अलाइनमेंट पूर्ण होई.

येथील कामगारांच्या समोरून अजून एक जादा बेल्ट गेलेला असे. जर कामगाराला त्याच्या समोरील युनिटमध्ये काही दोष आढळला तर तो हा सेट पुढे ढकलून या दुसऱ्या बेल्टवर सरकवीत असे. असा हा सेट आपोआप त्या गटातील दोष निवारण – फॉल्ट फाईंडिंग – करणाऱ्या दोघा कामगारांसमोर येत असे. त्या सेटवर आतापावेतो झालेल्या असेंब्लीवरून तो सेट कोठून आला आहे याची जाणीव या दोषनिवारण कामगारास होते. तो या सेटमधील दोष दूर करून हा सेट उचलून ज्या कामगाराकडून हा सेट आला त्या कामगाराच्या डावीकडील बाजूस लाईनवर नेऊन ठेवीत असे.

शेवटची असेंब्ली पूर्ण झाल्यावर प्रत्येक सेट हा कमीत कमी २४ तास विद्युत्पुरवठा चालू करून ठेवलेल्या स्थितीत कामगारांच्या कामाच्या जागेच्या वरील भागातून गेलेल्या लांबलचक बेल्टवरून अतिशय संथ गतीने पुढे सरकत असतो.

सेटवरील मेकॅनिकल-इलेक्ट्रिकल असेंब्ली, अॅड्जस्टमेंट व अलाइनमेंटचे काम पूर्ण होताच त्यावर शेवटी व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरच्या बाहेरील बाजूस दिसणारी बटणे, वरील कव्हर वगैरे बसविण्यात येई. हे बसवत असतानासुद्धा वाटेमध्ये सतत निरनिराळ्या कामगारांमार्फत सेटच्या मेकॅनिकल भागांची तपासणी तसेच इलेक्ट्रिकल सिग्नल मार्फतची तपासणी चालूच असे. सरतेशेवटी सेट प्लॅस्टिक बॅगेमध्ये पद्धतशीर पॅक करताना या सेटसोबत त्याचे माहितीपत्रक पण टाकले जाई. त्यानंतर मात्र हा सेट लहानश्या लिफ्टमार्फत सर्वांत खालील मजल्यावर येई. तेथे रोबोटमार्फत तो पुठ्ठ्याच्या खोक्यात व्यवस्थित पॅक होऊन त्यावर चिकटपट्टी लावून बाहेरील गोडाऊनकडे रवाना होई. या गोडाऊनमधून बॅटरीवर चालणाऱ्या लहान टोयोटा गाड्यांमार्फत एकाच वेळी वीस अगर जास्त सेट थेट बाहेर उभ्या असलेल्या बंदिस्त ट्रकच्या मागील भागात पद्धतशीररित्या ठेवण्यात येई. फॅक्टरीच्या आतील रस्त्यावर पिवळा पट्टा आखलेला असतो. गोडाऊन ते पिवळा पट्टा या दरम्यानच्या जागेतच ट्रकमध्ये व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर सेट भरण्याचे काम चालत असे.

प्रत्येक कामगार हा अगदी यंत्रवत व फार झपाट्याने आपल्या पुढील काम उरकतो. प्रत्येक गटप्रमुख हा त्या गटातूनच वरती आला असल्याने त्याला त्या गटातील प्रत्येक कामाची इत्थंभूत माहिती असते.

जपानमध्ये नोकरीसाठी कमीत कमी वयाची मर्यादा १६ वर्षे आहे. प्रथम कामगार म्हणून कुठल्याही कंपनीत दाखल झाल्यावर साधारणतः पाच वर्षे त्याच केडरमध्ये काम केल्यावर त्या गटाचा प्रमुख म्हणून कामाची संधी मिळते. जपानमध्ये बहुतेक सर्व ठिकाणी नोकरीमध्ये प्रमोशन मिळण्याची पद्धत सारखीच असते, व ती म्हणजे सिनिऑरिटीप्रमाणे. अनुभवानेच माणूस त्या त्या गटामार्फत वर वर चढत जातो. बाहेरून नवीन आलाय व एकदम वरती बॉस म्हणून टपकलाय हे जवळजवळ नाहीच. सर्वत्र फॅक्टरीमधे गणवेश, सकाळी व्यायाम, फॅक्टरीची प्रार्थना, मधल्या सुट्टया, वगैरे सर्व प्रकार सर्वांना सारखाच. पगारसुद्धा साधारणतः त्या त्या केडरला निरनिराळ्या कंपनीत सारखाच असल्यामुळे नोकरी बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. याचमुळे बहुतेकजण एकदा एका कारखान्यात चिकटले की जन्मभर तिथेच.

इमाने-इतबारे काम करणाऱ्या आपल्या कामगारांसाठी फॅक्टरीपण अजून काही देत असते. उदाहरणार्थ, माझा मित्र मसाकीला अजून एका वर्षाने कंपनीतर्फे फ्लॅट मिळणार होता. तर त्यानंतर दोन वर्षांनी टोयोटा कार मिळणार होती. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सर्वांना एकत्र जमवून ओळीने बंद पाकिटातून पगार वाटप केले जाई. प्रत्येकाचा पगार हा गुप्त असतो. तरीपण बरेचजण आपल्या पगारासोबत मिळणारी पगाराच्या तपशिलाची चिठ्ठी एकमेकांस दाखवीत असत. कित्येकांना पगार अपेक्षेपेक्षा कमी मिळत असल्याची खंत असे. एक दोघांनी त्या दिवशी मला तसे बोलून पण दाखविले. सर्वसामान्य कामगाराला सुरुवातीचा दरमहा पगार हा साधारणतः दीड लाख येन असतो व दरवर्षी अंदाजे वीस हजार येनची वाढ मिळते.

## कामगारांचे एकमेकांशी संबंध

शेवटच्या असेंब्ली व अलाइनमेंट सेक्शनमधील काम करतानाची शांतता सोडली तर इतर बहुतेक ठिकाणी कामगार हाताने झपाझप काम करीत असले तरी शेजारच्या अगर समोरच्या कामगारांशी गप्पा मारणे व एकमेकांत त्यांचे हासणे खिदळणे पद्धतशीर चालू असे. भेंड्या लावण्याचा कार्यक्रमही चालायचा. कुठेही टेन्शन, कामाचा ताण, चेहऱ्यावर दिसतोय हा प्रकार नाही. बरेचसे कामगार हे २०–२५ वयोगटातील, शिक्षणाच्या मधल्या काळात काही वर्षे गॅप घेऊन जॉईन झालेले. यात मुलींचा भरणा अधिक, तर शेवटच्या असेंब्ली व अलाइनमेंट-गटात पुरुष व जाणकारांचा भरणा अधिक. गटप्रमुख व वरील अधिकारी व्यक्ती मात्र २५ च्या पुढील वयाचे होते. कामगारांमध्ये स्त्री–पुरुष भेदभाव नाही. एक-मेकांशी व्यवहार करताना बुजरेपणा आढळला नाही. एकदा तर एका लाइनवर मी काम करीत होतो त्या वेळी शेजारील विशीतील दोन पुरुष व एक स्त्री काम-गारांमध्ये सेक्स या विषयावर रंगात आलेली चर्चा मी ऐकलीय. अगदी हसत-खिदळत एकमेकांच्या खोड्या सुद्धा काढून झाल्या. यात गटप्रमुखही खूप वेळा सामील होई.

कामावाबत अतिशय तत्पर असणाऱ्या या मंडळींपैकी काही गटांतील बरीचशी मंडळी सकाळच्या व्यायामात मात्र चुकारपणा करीत. एका गटात मी प्रशिक्षण घेत होतो. त्या गटाचा प्रमुख बऱ्याचदा व्यायामाच्या वेळी व्यायामाचे हात कसे बसे करताना सतत हसत जांभई द्यायचा, मग काय ! त्याच्या गटातील इतर कामगारांचा व्यायामाच्या बाबतीत उजेडच ! शाळेतील चुकार मुलाप्रमाणे कसे तरी आपले हातवारे उरकायचे.

नवीन आलेल्या कामगाराला पहिले एक दोन दिवस गमतीने छेडछाड होत असे. पण नंतर मात्र तो त्या गटात समरस होई. नव्हे, त्यात जीव लावी. या सौम्य

रॅगिंगमधून मी पण सुटलो नाही.

कामात स्त्री अगर पुरुष हा भेदभाव अजिबात नाही. स्त्री कामगार सुद्धा एखादी चासीस त्याच्या खालील पाटासकट इकडून तिकडे उचलताना मी अनेकदा बघितले आहेत. चासीस उचलायला मदतनीस हा प्रकार मुळीच नाही. जेव्हा एखाद्या ठिकाणी सेट फारच तुंबत असतील तर मागील एका बाजूला चाक बसविलेले शेल्फ ठेवलेले असे. ते ओढून त्यात तो कामगार खालील पाटासकट सेट रचून ठेवीत असे.

असेच एकदा काम चालू असताना काही अडचणींमुळे गटप्रमुखाने हुकूम दिला ' काम थांबवा ' व त्याने बाजूचे लाल बटण दाबून बेल्ट थांबविला. गटप्रमुखाच्या सूचना संपल्यावर व योग्य ती कार्यवाही केल्यावर दंगामस्ती करणारी कामगार मंडळी मी बघितली. अशा वेळी गमत्या मंडळींना तर अगदी चेव येई. परंतु जेव्हा काम असते तेव्हा कामात कुचराई, ढिलाई हा प्रकार केवळ अशक्य. ते प्रथम संभाळून मगच बाकी सर्व काही.

एकंदर कामाचे येथील वातावरण हे फारच खेळकर असते. प्रत्येक गटप्रमुख हा हे खेळकर वातावरण टिकवून आपले दिवसाचे इप्सित उत्पादन पदरात पाडून घेत असतो. काही गटप्रमुखांच्या गटांतील काम तर इतक्या खेळीमेळीने चालते की कुणालाही तेथे आठ तासच काय पण दहा दहा तास काम करायला आवडेल.

त्या त्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिवसाकाठी एखाददुसरी चक्कर होत असे. पण अशा वेळी कामगारांच्या नेहमीच्या वागण्यात तसूभरही फरक पडत नसे. गप्पागोष्टींत अनेकांना याची दखलपण नसे. काम चोख झाल्याशी मतलब.

फॅक्टरीतील सर्वांचा पोशाख सारखा. त्यामुळे माझ्यासारख्या जपानी कांजी लिपी वाचता न येणाऱ्या परदेशी माणसाला चपराशी कोण व मॅनेजर कोण हे ओळखणे दुरापास्त गेले. सुरुवातीचे काही अंदाज पार कोसळले. सुट्टीच्या वेळेतील नियम सर्वांना सारखेच. अगदी मॅनेजरसुद्धा रांगेत उभा राहून कॅन्टिनमध्ये जेवण घेत असे अगर व्हेंडर मशीन समोरील रांगेत उभा राहून त्याचा नंबर येईल तेव्हाच शीत अगर गरम पेय घेत असे.

शेवटच्या असेम्ब्लीं व अलाइनमेन्ट-विभागात मात्र शांतपणे काम चाले. या ठिकाणी प्रत्येक कामगाराचे काम जरी विशेष काळजीपूर्वक होत असले तरी या भागातील कामगारांचे वयोमान सुद्धा २५ च्या पुढील होते. शिस्त, शांतता, संयम वगैरेंचा प्रत्यय येथे आला. काही दिवस मी एका लाइनवर काम करीत असताना दहा मिनिटांच्या सुट्टीत हमखास एक मुलगी माझ्याकडे येई. व आवर्जून निरनिराळ्या विषयांवर इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करी. त्यामागील हेतू विचारताच तिने सांगितले की, तिचा बॉयफ्रेंड पाच वर्षे अमेरिकेत होता व त्याचा आग्रह की,

तिने इंग्रजी शिकावे. म्हणून ती वेळ मिळेल तेव्हा इंग्रजीचा अभ्यास करीत असे. त्यासाठी हा अट्टहास.

## कामगारांमधील पार्ट्या, सहली वगैरे

मी जेव्हा जेव्हा, प्रत्येक गटाचा निरोप घेई त्या प्रत्येक वेळी त्या गटामार्फत मला पार्टी देण्यात येत असे. काही वेळा पार्टीच्या शेवटी सोरट प्रमाणे चिठ्ठ्या उचलून प्रत्येकास काही बक्षीस दिले जाई. पार्टीचे वेळी तर हास्य, विनोद, नाच, गाणे, हावभाव इत्यादींना ऊत येई. अशा वेळी पुरुष स्त्री असा भेदभाव राहात नसे. खटयाळपणा वर्ज्य नसे. फॅक्टरीच्या निळ्या पोषाखात काम करणाऱ्या जपान्यांचे पार्टीच्या वेळचे उंची पोषाख विशेष नजरेत भरत, तेव्हा श्रीमंत राष्टांत जपानची गणना होते हे ध्यानात येई. पार्टीच्यावेळी आवर्जून 'सिंगर मेट' च्या कॅसेट्सचा संच व ॲम्प्लिफायरची मदत घेण्यात येई. बहुतेक हॉटेलमध्ये त्याची सोय असते.



सिंगर मेट म्हणजे प्रसिद्ध जपानी गाण्यांमधील फक्त पार्श्वसंगीत असलेल्या ऑडिओ कॅसेट्स्. यांच्या मदतीने जपानी गाणे म्हणताना ते गाणे जास्त खुले. त्यामुळे पार्टीतील लज्जतपण वाढत असे. पार्टीच्या वेळी बिअर सर्रास पिण्यात येई. तेम्पुरा, सुकीयाकी वगैरे सारख्या डिशेश रिचविण्यात येत. खाणे आणि नाच-गाणे एकत्रितच चाले. अशा वेळी प्रत्येकाला आपल्या वयाचा विसर पडलेला असे. पार्टी चालू असतानाच अधूनमधून फोटोचे फ्लॅश उडत. एकदा ग्रूप फोटो काढताना हाताची घडी घालून उभा राहाणाऱ्या माझ्या पोझवर माझा मित्र सुगीमोतो याने फार आक्षेप घेतला होता. आसपास उभे राहिलेल्यांचे खांदे कशासाठी आहेत? असा उलट सवालही त्याने मला केला होता.

पार्टी संपता संपता विरहाची छटा स्पर्शून जाई. शेवटी इकडून तिकडून सर्वकडे माणसे सारखीच. दोन दिवस एकत्र येताच नकळत गुंफले गेलेले कच्चे धागे अलग करताना जड जाई.

फॅक्टरीत माझे प्रशिक्षण संपता संपता होंदा व वाकासा यांनी स्वतंत्रपणे मला योकोहामाच्या महाराजा हॉटेलमध्ये मोठी मेजवानी दिली होती. ती तर

विसरणे केवळ अशक्य. जपानी माणूस अशा वेळी फार खुलतो. बोलका होतो. त्याच्या हासण्याच्या व विनोदी बुद्धीच्या अनेक पैलूंचे दर्शन घडते.

फॅक्टरीतील प्रत्येक गट हे एक लहान कुटुंबच असते. गटप्रमुख त्यांचा पालक असतो. बहुतेक वेळा ही सर्व मंडळी कामाच्या वेळेनंतर अगर आठवड्या-तील दोन दिवसांच्या सुट्टीपैकी एक दिवस बाहेर कुठेतरी एकत्र भेटतात. मग त्यांच्या पार्ट्या होतात. सहली निघतात. यामुळे तो गट जास्तीत जास्त एकजीव होत जातो. म्हणूनच मी पूर्वी असे नमूद केले आहे की, प्रत्येक जपानी कामगाराची दोन कुटुंबे असतात. एक असते त्याचे स्वतःच्या बायका-मुलांचे, तर दुसरे असते हे त्याच्या फॅक्टरीतील या गटाचे. या दोन्ही कुटुंबांतील सुख-दुःखाचा तो वाटेकरी असतो.

## जपानी कामगार व मी

वायरिंग-सेक्शनमधील ट्रेनिंगच्या पहिल्या दिवशीच मिस् अिगाराशीने माझ्यावर रॅगिंगची चांगली झोड उठविली होती. गट प्रमुखाच्या मदतीने मी पण त्या सेक्शनची संपूर्ण माहिती देण्यासाठी तिला माझी मास्तरीण बनविली होती. रॅगिंगचा लवलेशही उरला नाही. उलट माझ्या त्या विभागातील ट्रेनिंगच्या वेळी इत्थंभूत तांत्रिक माहिती उपलब्ध करून देऊन उपकृत केले तर शेवटी वेताची स्वतः विणलेली एक वस्तू भेट म्हणून दिली. याच गटातील गटप्रमुख अिलाहीने माझे प्रशिक्षण पुढील एका गटामध्ये सुरू झाले तेव्हा सुरुवातीला स्वतः जातीने येऊन माझी विचारपूस केली. एवढेच नव्हे तर, स्वतःची टेबलखुर्ची आग्रहाने मला घेण्यास भाग पाडले. माझा जपानी लिपी शिकण्यातील उत्साह बघून सुगीमोतोने आपणहून एक दिवस मला जपानी लिपीचे एक पुस्तक आणून दिले.

मी स्कीअिंगला जाणार आहे हे कळताच त्यासाठीचा पोशाख मिळाला कां? असे विचारून दुसऱ्या दिवशी सातोने मला स्वतःचा स्कीअिंगचा सूट आणून दिला व स्कीअिंगच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक काम-गाराला प्रत्यक्ष कामाच्या जवळ आणखी एक लॉकर, पुस्तके, फाइल्स, नोट्स वगैरे ठेवण्यासाठी दिलेला असतो. सर्वांत शेवटच्या गटामधील माझे प्रशिक्षण संपून मी संध्याकाळी जेव्हा तो लॉकर गटप्रमुख वातानाबेला सुपूर्त केला तेव्हा तर त्याला फारच गहिवरून आले. किल्लीसहित माझा हात तसाच दोन मिनिटे दोन्ही उबदार हाताने त्याने धरला होता. अशा एक ना अनेक गोष्टी! थोडक्यात सांगायचे म्हणजे नर्म थट्टा-मस्करीबरोबर अपार प्रेम, सहकार्य व मार्गदर्शन मला लाभले या जपानी कामगार दोस्तांकडून.

## कामगारांबद्दल काही विशेष नोंदी

फॅक्टरीत बऱ्याचदा ओळख असो अगर नसो, फॅक्टरीचा पोषाख अंगावर दिसतो त्यास समोरून येता जाता ही मंडळी ओहाय्यो गोझाइमास (म्हणजे गुड मॉर्निंग) किंवा कोननिची वा (म्हणजे सुदिन, गुड आफ्टरनून) वगैरे म्हणत असत. चेहऱ्यावरील सततचे स्मित हे एक खास जपानी वैशिष्ट्य म्हणता येईल. मला वाटते जर चेहऱ्यावर काहीच भाव नसतील तर जपानी, विशेषतः स्त्रियांचा चेहरा हा करुण भासतो. ते दडविण्यासाठी तर चेहऱ्यावर या कायमच्या हास्याची ठेव नसेल ना ? फॅक्टरीत कुठल्याही कामात कमीपणा असा नसतो. एकदा एका गटप्रमुखाने त्याच्या गटातील एका मुलीला बोलावून दारातले मोठे पायपुसणे झटकण्यास सांगितले. तिने ते आनंदाने झटकून लांब दांड्याच्या झाडूने तेथील भाग स्वच्छ केला. मला त्या दिवशी वाटले की, तिला गटप्रमुखाने शिक्षा केली असावी. परंतु त्याबद्दलची माझी उत्सुकता दुसऱ्या दिवशी संपुष्टात आली. कारण दुसऱ्या दिवशी त्या गटप्रमुखाने हातात लांब दांड्याचा तो झाडू घेऊन स्वतःच तो भाग स्वच्छ केला. कोणीही कुठलेही काम करतो. मी बॉस आहे, मी मुलगी आहे. वगैरे म्हणून कोणीही काम नाकारत अगर टाळत नाहीत. अगदी हडकुळ्या मुलीला सुद्धा विशेष सायासाने व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरच्या मोठमोठ्या चासीस त्या खालील पाटासकट उचलून दुसरीकडे ठेवताना मी बघितले आहे.

बऱ्याचश्या मुली या चालताना शांतपणे, संथपणे चालतील हा प्रकार एकंदरीत कमीच, कारण चालताना नाचत, ठुमकत चालणेच विशेष. बोलताना स्वर लांबविणे, हसणे, खिदळणे अतिशय आश्चर्योद्‌गार काढणे हे अगदी सर्रास. येथील मुली सिगारेट फार पितात हा मात्र मला उगीचच खटकलेला एक भाग.

मराठीमध्ये आपण नकारार्थी, थोडा फार हेटाळणीदर्शक या आशयाने 'ज्या ऽ' हा शब्द उच्चारतो. बरोबर त्याच उच्चाराचा अर्थ जपानीत 'ठीक आहे तर मग !' असा होतो. अनेक वेळा एकमेकांचा निरोप घेताना हा शब्द उच्चारताना प्रथम प्रथम मला जड गेले.

भराभर स्वतःचे काम उरकून शेजाऱ्याला मदत करणे हे दृश्य फॅक्टरीत नवीन नाही. अगदी स्वतःची व शेजाऱ्याची केराची बास्केट हॉलच्या मोठ्या केराच्या बास्केटमध्ये रिकामी करताना मी काहींना बघितले आहे.

येथील तरुण कामगार-मुलींना आपण होऊन आपले वय सांगायची फार हौस. 'मी किती वर्षांची असेन ?' हा प्रश्न मला अनेक जणींनी विचारला होता. मी आपले नेहेमी ५-१० वर्षे कमीच अंदाज करायचो. त्यामुळे एकदा तर आनंदून जाऊन 'खरंच काय ?' असे म्हणत एकीने चक्क माझ्यावर सर्वांसमक्ष आणी-

वाणीचा प्रसंग आणला होता.

दर शुक्रवारी दुपारी पाचनंतर मी माझ्या आठवड्यातील कामाचा रिपोर्ट स्वतःच टाइप करून देत असे. काही वेळा टायपिंग मशीन मोकळे होईपर्यंत त्या विभागातील आसपास रेंगाळणाऱ्या मित्र-मैत्रिणींशी गप्पा मस्त रंगत. भारतातील साप, हत्ती वगैरे प्राणी, बत्तीस शिराळ्याची नागपंचमी, स्त्रियांचे दागिने, पोषाख, भारतातील विविध भाषा, देवळे, हिमालय पर्वत, गंगानदी तसेच पंडित नेहरू, श्रीमती गांधी वगैरे बद्दल उत्सुकतापूर्ण चर्चा करायला त्यांना फार आवडे. याच विभागातील मिस् सातो ही फारच चुणचुणीत व चाणाक्ष कामगार होती. फ्रेंच व इंग्रजी भाषेवर तिचे प्रभुत्व होते. इंग्रजी जाणणाऱ्या इतर जपान्यांप्रमाणेच तिचेही इंग्रजी, अमेरिकन धर्तीचे होते. एक प्रकारचा विनम्र आदर वाटावा अशांपैकी ती एक होती. त्या वेळी जपानमध्ये E. T. हा सिनेमा गाजत होता. त्या धर्तीवर मी तिला T. I. ( Tiny Intelligent ) ही उपाधी जोडली होती. अशाच एकदा गप्पा रंगात आल्या तेव्हा तिने 'तुमच्या मुंबई–पुण्याकडे भर रस्त्यात स्त्रियांच्या गळ्यातील सोन्याच्या चेन्स मारतात.' ही माहिती पुरवून मला अवाक् केले होते.

## शिस्त, वक्तशीरपणा, स्वच्छता, ओव्हर टाईम वगैरे बाबत

सोमवार ते शुक्रवार हा फॅक्टरीचा कामाचा आठवडा व कामाची वेळ सकाळी ८ ते दुपारी ५ असे. परंतु बरेचसे कामगार आणि अधिकारीवर्ग हे पाचच्या पुढे जादा काम करताना दिसतात. फॅक्टरीला जर एखाद्या मॉडेलचे उत्पादन जास्त व जलद हवे असेल तर जादा काम करण्यास कुणीच कांऽकूऽ करीत नाहीत. बहुतेक सर्व अधिकारीवर्ग पाच नंतर बराच काळपर्यन्त, अगदी रात्री दहापर्यंतसुद्धा थांबतो. आणि फॅक्टरीने नेमून दिलेले काम चोख करण्यात, ते जास्तीत जास्त चांगले व व्यवस्थित करून स्वतःचेच समाधान अधिक करीत असतो. कामात परकेपणाचा भाव अजिबात नसतो. मन लावून, जीव ओतून, घड्याळाकडे न बघता काम करणे, त्याला माहीत असते. त्याच्या घरातील कुटुंबीय मंडळीसुद्धा तो घरी लवकर येण्याची वाट बघत नाहीत.

अतांत्रिक विभागातील कामगारमंडळीसुद्धा बहुतेक वेळा पाचच्या पुढे थांबून आपले त्या दिवसाचे काम पूर्ण करून घरी परतत. नेमून दिलेल्या कामाला व ते मन लावून जीव ओतून पूर्ण करण्याला सर्वजण सर्वोच्च प्राधान्य देतात. अशा वेळी इतर कुठल्याही सबबी आड येत नाहीत. फॅक्टरीत पाच वाजता पडणारा संगीताचा टोल फक्त पाच वाजल्याचे दर्शविण्यासाठी ठरतो. जेव्हा उत्पादनाची जास्त आवश्यकता नसते त्या वेळी मात्र कामगारवर्गातील महिलामंडळी पाचचा ठोका

पडताच स्वतःच्या लॉकरकडे धाव घेत. काही वेळा तर पाचचा ठोका पडायची वाटच बघत रेसप्रमाणे तयार बसलेल्या असत.

माझा मित्र सुगीमोतो याच्या गटात सर्व स्त्री-कामगार होते. त्या स्त्रियांना स्वतःच्या मुलांना शाळेत सोडणे, बेबी सीटरकडे अगर पाळणा घरात ठेवणे वगैरे कामे असत. म्हणून त्यांच्या गटाला मात्र सकाळी नऊ ते दुपारी पाचपर्यंत काम करण्याची परवानगी होती. फॅक्टरीने दिलेली ही खास सवलत. परंतु स्वतःहून त्या सर्वजणी सहापर्यंत काम करून इतर गटांच्या बरोबरीने उत्पादनाचा कोटा पूर्ण करीत व आपला गट सवलत घेत असला तरी फॅक्टरीचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेत.

सोमवार, मंगळवार, तसेच गुरुवार व शुक्रवार दुपारी पाचनंतर कितीही वेळ थांबता येई. परंतु बुधवारी मात्र सक्तीने सर्वांना पाच वाजताच घरी परतावे लागे. दर शुक्रवारी दुपारी ४-५० ते ५ या वेळेत कामाचा बेल्ट बंद असतो. अधिकारीवर्गापासून ते कामगारवर्गापर्यन्त सर्वजण आपल्या कामाच्या आसपासचा परिसर स्वच्छ करण्यात गुंतलेला असे. प्रत्येक कामगाराच्या कामाच्या जागेजवळ एका बाजूला ब्रश, लहानसे केरभरणे आणि पायाजवळ केराची बास्केट असे. याच्या सहाय्याने कामगारमंडळी दिवसातून अधून मधून स्वतःच्या आसपासचा परिसर स्वच्छ करीत असत. ही स्वच्छता करीत असताना किंवा स्वतःच्या खुर्चीतून उठताना आपल्या डाव्या बाजूला लोंबत असलेली दोरी ओढून वरील ट्यूब बंद करून मगच ते पुढे जात. या दोरीच्या टोकाला लहान लहान विविध गंमतीदार वस्तू लटकत असत.

आठ दिवसांतून एकदा विक्री-विभागातील व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरमधील तंत्रज्ञ ओकुमुरांशी चर्चा करायला मला संधी मिळे. ते बरीच वर्षे अमेरिकेत राहिल्याने इंग्रजी छान बोलायचे. त्यामुळे व्हिडिओच्या विषयावर मी माझ्या अनेक प्रश्नांची, तसेच कामाच्या वेळच्या प्रत्यक्ष अडचणींची उत्तरे मिळवीत असे. ही आमची भेट दुपारी पाचच्या पुढे ठरलेली असायची. तरी त्यांच्या नेहमीच्या कामाच्या व्यापामुळे अनेकदा ही भेट संध्याकाळी सातच्या पुढे तास दोन तास चालायची.

बराच वेळ जादा काम करणारी ही मंडळी सकाळी मात्र आठच्या ठोक्याच्या आतच फॅक्टरीत हजर असत. सकाळी स्टेशनपाशी बस थांबताच आगगाडीकडे पळत सुटणारी, झपाझप लगबगीने गाड्या बदलणारी व फॅक्टरीकडे भराभर जाणारी जपानी जनता नजरेस पडते. कारण कामाची ठरलेली वेळ कधीही चुकू द्यायची नाही हा दंडक. अर्थात त्याचे श्रेय त्यांच्याबरोबरच अगदी वेळेवर धावणाऱ्या बसेस व आगगाड्यांना पण आहे. बर्फवृष्टीच्या दिवशी फॅक्टरीत वेळेवर

पोहोचण्यासाठी जपानी लोक त्यांच्या नेहमीच्या वेळेआधीच घराबाहेर पडत. फॅक्टरीत नेहमी सकाळी वेळेवर पोहोचता यावे यासाठी टीव्हीवर सुद्धा सकाळी कार्यक्रम चालू असताना एका कोपऱ्यात सातत्याने वेळ दाखविली जाते.

वक्तशीरपणाप्रमाणेच शिस्तीची ही सर्व मंडळी कट्टर पुरस्कर्ती आहेत. कुठलीही गोष्ट ही अगदी पूर्व-नियोजित असते. मला द्यावयाच्या ट्रेनिंगच्या संपूर्ण कालावधीचा कार्यक्रम, हे ट्रेनिंग सुरू होण्यापूर्वीच मला देण्यात आला होता. त्यामध्ये माझ्या व त्यांच्या सोईने पुरेसा काळ आधी फेरफार केला गेला; परंतु तो पुरेसा काळ आधी व त्याची एक प्रत मला -- देण्यात आली होती. फॅक्टरीत प्रशिक्षण सुरू होताच सुरुवातीलाच माझ्या होस्टेलपासून ते फॅक्टरीपर्यंतच्या आगगाडीचा पास आणि बसचे पैसे तयार होते. ते मला पहिल्याच दिवशी देण्यात आले.

शेवटच्या असेंब्ली व अलानइमेंट-सेक्शनमध्ये दोष निवारण करणारा मिशीवाला मसाकी हा माझा दोस्त. त्याच्याबरोबर काम करण्यात मला विशेष आनंद होई. व्ही. सी. आर्. च्या दोष निवारणाच्या अनेक लकवी त्याने मला समजावून दिल्या होत्या. शेवटी शेवटी तर तो व्ही. सी. आर्. मध्ये दोष निर्माण करी व मी तो दोष शोधून काढीत असे. आम्हा दोघांच्या या कामात त्यालासुद्धा विशेष आनंद वाटे. आमच्या दोघांची फारच गट्टी जमली होती. या कामासाठी कित्येक वेळा तो पाचच्यापुढे थांबला होता. पण पाच वाजायच्या आधी मात्र त्याची मदत घेण्यासाठी त्याच्या बॉसची मला दररोज परवानगी घ्यावी लागे. दोन-चार वेळा तर जरूरीच्या उत्पादनाच्या निमित्ताने त्याला त्याच्या बॉसने दुसरे काम दिले होते. माझ्याकडे यावे असे त्यास खूप वाटायचे तरी तो येऊ शकत नव्हता. परंतु त्यास दिलेले काम करण्यात मात्र तो पूर्ण मग्न असायचा.

दररोज सकाळी काम सुरू होण्यापूर्वी गटप्रमुख व कामगारवर्ग यांच्यातील मीटिंगमध्ये त्या दिवसाच्या संपूर्ण कार्यक्रमाबाबत आगाऊ चर्चा होत असे. जेव्हा व्ही. सी. आर्. चे एखादे मॉडेल बदलून नवीन मॉडेलची असेंब्ली सुरू होई त्या वेळी अवघ्या एक ते दीड तासामध्ये नवीन व्ही. सी. आर्. चे मॉडेल बेल्टवर सुरू होत असे. त्यासाठी प्रत्येक कामगाराला लागणाऱ्या घटकभागांचा पुरवठा तातडीने व अतिशय तत्परतेने होत असे.

एक दिवस उत्पादन भरपूर झाले होते. म्हणून त्या लाइनवरील काम चार वाजताच बंद झाले होते. उरलेल्या वेळात काही जण आपल्या जवळील मालाचा साठा मोजत होते. काही जण पुढे काही वेळाने लागणाऱ्या पट्ट्यांना ग्रीस लावत होते. काहीजण आपल्या प्रत्यक्ष कामाच्या वेळी कमीत कमी सायासाने असेंब्लीसाठी लागणारे घटकभाग घेता यावेत म्हणून त्या व्यवस्थेत मग्न होते, तर काहीजण आपल्या भोवतालचा परिसर स्वच्छ करीत होते. विविध विभागांत फॅक्टरी-

मध्ये काम चालू असताना दंडाला लाल फीत लावलेले काही कंपनीच्या पोषाखातील अधिकारी कामाच्या ठिकाणची स्वच्छता, टापटीप, माल ठेवायच्या पद्धती, त्यातील अडचणी वगैरेचे निरीक्षण करून व त्याची नोंद करून जाताना मी बघितले आहे. अर्थात् अशाही वेळी कामगारांच्या नेहेमीच्या काम करण्याच्या पद्धतीत काहीही फरक पडत नसे.

शिस्त, सहकार्य, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, सचोटी वगैरे गुण हे लहानपणापासून शाळेतच जोपासले जातात, असे मसाकी मला म्हणाला होता. त्यामुळे त्यांना यात काही नवल अगर निराळे असे वाटत नाही. परंतु जपानी लोकांच्या या सद्‌गुणांचा जपानी कंपन्यांना मात्र फार मोठा लाभ होत होता यात शंकाच नाही.

जपानी कारखान्यांनासुद्धा सणाच्या सुट्ट्या दिल्या जातात. साधारणतः महिन्याभरात अशा दोन किंवा तीन सुट्ट्या असतात. तर प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पहिले पाच दिवस कंपनी बंद असते. अशा सुट्ट्यांमध्ये फॅक्टरीतर्फे फॅक्टरीतच कधी कधी सेल भरतो. यात अगदी पेन्सिलीपासून ते मोटारीपर्यन्त सर्व वस्तूंचा समावेश केलेला असतो. कंपनीतील कामगारांसाठी ही खास सवलत असते. असाच एकदा कंपनीचा भरलेला सेल बघायला मी गेलो, तेव्हा प्रवेशद्वारातच येणाऱ्या प्रत्येकजणास क्रॉकरीचा एक सेट बक्षीस देण्यात येत होता. मग भले नंतर तो खरेदी करो अगर न करो.


## सहकारी रोबोट

एकापासून अनेक विविध पायऱ्यांपर्यन्त सातत्याने तेच ते काम करण्यासाठी व्ही. सी. आर. च्या उत्पादनात रोबोटचा उपयोग JVC फॅक्टरीत केला आहे. हिराता कंपनीने बनविलेल्या अनेक मल्टीॲक्सीस रोबोटचा या फॅक्टरीत विविध कामांसाठी वापर करण्यात आला आहे. उत्पादनातील एकापाठोपाठ दुसरी, अशा अनेक गुंतागुंतीच्या व जास्तीत जास्त एक हजार विविध पायऱ्यांपर्यन्तच्या कामासाठी एकच रोबोट वापरता येतो. येथे वापरात असलेल्या रोबोटच्या मशीनचे पूर्ण नाव ' न्यूमरिकली कंट्रोल्ड आर्टिक्युलेटेड रोबोट ' असे असून त्यास चार प्रोग्रॅमेबल अक्ष (Axes) असून त्यात अनुक्रमे शोल्डर (खांदा), एल्बो (कोपरा), रिस्ट (मनगट), व व्हर्टिकल ( उभी दिशा ) या नावाने ओळखतात. प्रत्येक अक्षाची विशिष्ट वेळात आणि ठराविक कोनापर्यन्त होणाऱ्या हालचालींसाठी एकापेक्षा जास्त हात, मोटारी, स्विचेस, फोटो डिटेक्टर्स, लेसर, तसेच कॉम्प्युटर, मायक्रोप्रोसेसर इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. निरनिराळ्या कॅसेट्स वापरून एकच रोबोट व्ही. सी. आर्. च्या विविध मॉडेल्सच्या उत्पादनात सहभागी

करता येत असे. रोबोट्च्या अनेक हातांमार्फत एकूण ४००×७०० मिलीमीटर एवढ्या क्षेत्रफळापर्यन्त ( ऑपरेशन एरिया ) काम करता येत असे.

सुरुवातीला मी जेव्हा व्ही. सी. आर्. च्या ऑटोमेशन (स्वयंचलन) असेंब्ली-विभागात गेलो होतो, तेव्हा तेथे अनेक रोबोट मशीन्स कार्यान्वित होती. एखाद्या मशीनमध्ये काही अडचण आली की, लगेच तेथील लाल लाइट लागत असे व कुईऽऽ कुईऽऽ असा आवाज यायला सुरुवात होई. गंमत वाटली. प्रिंटेड बोर्डाला भोके पाडणे, त्यात रेझिस्टर्स, कंडेन्सर्स, डायोड, वगैरेसारखे अनेक घटकभाग ओवणे, योग्य वेळी योग्य रेझिस्टर अगर कन्डेंसर निवडला जाणे. तो बरोबर योग्य ठिकाणी वाकवून प्रिंटेड बोर्डमध्ये बसविला जाणे वगैरे कामे झपाझप होताना दिसत होती. एक घटकभाग बसविण्यास चार दशांश सेकंद लागतो. या ठिकाणी एकाच मशीन-मार्फत प्रत्येकी चाळीस प्रकारचे रेझिस्टर्स व कंडेन्सर्स प्रिंटेड बोर्डावर पटापटा बसविण्यात येत होते. अशी एकूण ४३ मशीन्स त्या एका मोठ्या हॉलमध्ये होती. तीन शिफ्टमध्ये येथे एकूण २४ तास काम चाले. एक कामगार एकाच वेळी आठ मशीन्सवर लक्ष ठेवण्याचे व गरज पडल्यास त्यास त्वरीत दुरुस्ती करण्याचे काम करी. प्रत्येक रोबोट मशीन हे अंदाजे सर्वसामान्य लेथ मशीनच्या दुप्पट रुंदीचे होते.

एखादा घटकभाग जर सदोष असेल तर रोबोटमार्फत तो आपोआप नाकारला जाई. तसेच एखाद्या घटकभागाचा पुरवठा संपला तर ती पायरी वगळण्यात येई.



अशा प्रकारे मानवी कौशल्यात रोबोटच्या कार्यक्षमतेची साथ लाभल्याने उत्पादनात वेग व गुणवत्ता आली आहे.

## लायब्ररीत

एक दिवस काही तांत्रिक शब्दाबाबत अडचण आली तेव्हा इंग्रजी – जपानी तांत्रिक शब्दकोश दाखविण्यासाठी सातो मला या कंपनीच्या लायब्ररीत घेऊन गेला. मध्यवर्ती व बऱ्यापैकी मोठ्या असलेल्या या लायब्ररीत काही मंडळी, विशेषत: चाळीशी ओलांडलेली नियमाने जेवणानंतर उरलेल्या वेळात औद्योगिक क्षेत्रातील वर्तमानपत्रे व मासिके वाचण्यास येत असत. नंतर पुढे अनेक वेळा या लायब्ररीत मी गेलो होतो. अनेक वर्तमानपत्रे व मासिकाबरोबरच केमिस्ट्री, फिजिक्स, कॅलक्युलस, स्टॅटिस्टिक्स, सेमीकंडक्टर्स, थिन–फिल्म, लेसर, ऑडिओ, व्हिडिओ, वगैरे अनेक विषयांवर बरीच पुस्तके तेथे आढळली.

एका विभागात त्वरित झेरॉक्स प्रती काढण्याची सोय असलेले मशीन होते. त्याच्या सहाय्याने मॅनेजरच्या परवानगीने कोणीही कामगार कितीही प्रती काढू शकत असे. परंतु कंपनीच्या कामासाठीच फक्त कामगार याचा उपयोग करीत असत.

## मी एक दुभाष्या

महिन्यातून एखाद्-दुसऱ्या खेपेस कुणी तरी परदेशी पाहुणा JVC तील अधिकाऱ्यांबरोबर उत्पादन-विभागातून फेरफटका मारीत असे. एक दिवस सकाळीच होंदानी माझी गाठ घेतली व तीन दिवसांनी JVC कंपनीस भारतातील एक उद्योगपती भेट देणार आहेत असे सांगून तुला दुभाष्या म्हणून काम करायला आवडेल का ? असे विचारले. माझा होकार येताच दुसऱ्या दिवशी माझ्या हातात दोन दिवसांनी होऊ घातलेल्या भेटीच्या संदर्भातील माझा त्या दिवसाचा कार्यक्रम होता. सकाळी दहा ते बारा या दोन तासांकरिता त्या ठिकाणी माझी उपस्थिती आवश्यक होती.

ठरल्याप्रमाणे मी होदाच्या विभागात काम करणाऱ्या हुजीइ बरोबर महत्त्वाच्या व्यक्तींच्या गाठीभेटी घ्यावयाच्या खोलीमध्ये गेलो. विशेष श्रीमंती नजरेत भरावी असा जाडजूड गालिचा, झुंबरे वगैरेंनी सजविलेल्या त्या भव्य खोलीत भारतीय उद्योगपती मुंबईचे श्री. अंबू मोरारका त्यांच्या दोन जपानी मित्रां-समवेत आले. ते तेथे आल्यानंतरच मला त्यांचे नाव कळले. त्यांनी सोबत आणलेल्या सुगंधी सुपारी व पानाच्या डब्या समोरील टी-पॉय वर ठेवल्या. मुंबईच्या या उद्योगपतींना मला एका भारतीयाला बघून आनंद झाला. त्यांनी आपलेपणाने मला सुपारी व पान घेण्याचा आग्रह केला. बऱ्याच महिन्यांनी भारतीय पान खाण्याचा योग आला होता. परंतु गेले तीन महिने या फॅक्टरीच्या शिस्तीत वाढलेल्या माझी

स्थिती फारच चमत्कारिक झाली होती. त्यांच्या आग्रहाला नकार देताना थोडे जड वाटले.

होंदा त्यांना जपानीतून माहिती देत होते. मी ती कधी इंग्रजी तर कधी हिंदीतून त्यांना सांगत होतो. काही वेळाने त्यांना मी JVC फॅक्टरी हिंडून दाखविली. फॅक्टरीची माहिती दिल्यानंतर, तसेच फॅक्टरीची व्हिडिओ फिल्म बघितल्यावर त्यांची पण व्हिडिओ फिल्म घेण्यात आली ठरल्याप्रमाणे बारा वाजता त्यांची भेट आटोपली. त्या दिवशी माझ्यावर सोपविण्यात आलेली दुभाष्याची जबाबदारी पार पाडताना मला काही निराळेच पण बरे वाटत होते.

## क्वॉलिटी ॲश्युरन्स विभागात

जपानी कारखान्यात उत्पादनाची 'गुणवत्ता पारख', 'QC' म्हणजे 'क्वॉलिटी कंट्रोल' असे न म्हणता ते त्यास 'क्वॉलिटी ॲश्युरन्स' म्हणजे गुणवत्तेची खात्री देणे' असे संबोधतात.

तासाला एक हजार पंचावन्न व्ही. सी. आर्. सेट बाहेर पडणाऱ्या या फॅक्टरीत उत्पादन होत असताना, उत्पादन झालेल्या गटातील, तसेच उत्पादन होत असलेल्या गटातील काही सेट्स बाजूला काढून या QA विभागात आणले जात. या ठिकाणी व्ही. सी. आर्. च्या नेहेमीच्या कार्याच्या चाचण्याशिवाय त्याची तपमानातील उच्चनीचता, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल शॉक्स, विविध गॅसेसचा व्ही. सी. आर. वरील परिणाम वगैरेंच्या पण चाचण्या घेण्यात येतात. सर्व चांचण्यांतील कसोटीला उतरल्यावरच या सेटच्या संपूर्ण गटाला बाहेर पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येते. सेट सोबत पाठविण्यात येणाऱ्या वायरची सुद्धा कॉर्ड टेस्टिंग मशीन-मार्फत चाचणी घेण्यात येते.

येथे एक किस्सा मला नमूद करावासा वाटतो. मी शेवटच्या असेंब्ली-विभागात काम करीत होतो. एका सेटच्या वरील झाकणाचा स्क्रू बसविताना स्क्रू ड्रायव्हर किंचित सटकला व सेटच्या वरील झाकणावर फारच बारकाईने बघितले तरच दिसावा असा एक अगदी लहान, अंदाजे एक सेंटिमीटर लांबीचा ओरखडा उठला होता. त्या वेळी तेथील कामगाराने लगेच तो सेट बाजूला काढून नाकारलेल्या सेटच्या गटात ठेवला. मला न राहवून मी त्याला त्याबाबत विचारताच त्याने जे उत्तर दिले ते बरेच काही सांगून गेले. तो म्हणाला, "हा सेट परदेशात कुठेही जाणार. हा सेट जर गिऱ्हाईकाने बारकाईने पाहिला व त्यास हा ओरखडा दिसला तर त्यास ते खटकेल. तो हे दहा जणांना सांगेल व पुढे ते अनेक लोकांपर्यंत पोहोचेल. त्यामुळे आमच्या कंपनीच्या रेप्युटेशनला बट्टा लागेल. हे होऊ नये यासाठी एका सेटच्या झाकणावर पुन्हा प्रक्रिया केली तरी फरक पडत नाही. पण

कंपनीस कुठेही कमीपणा येता कामा नये. कंपनीची गुणवत्ता टिकली तरच आमची भाकरी शाबूत आहे." एका साध्या जपानी कामगाराच्या तोंडचे हे वाक्य. परंतु ते जपानी कंपनीला जगात विश्वास व नावलौकिक मिळवून का देते यामागचे रहस्य उलगडून दाखविते.

## फॅक्टरीतील तज्ज्ञांसमवेत

VHS व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डरचे जनक शिराशी यांच्या समवेत झालेली माझी गाठभेट ही एक महत्त्वाची व कायमच्या अनुभवाची ठेव असून ती 'फॅक्टरीतील सुरुवातीचा काळ' या मथळ्याखाली मी नमूद केली आहे.

माझ्या ट्रेनिंगचा कालावधी साधारणत: निम्मा संपल्यावर एक दिवस JVC च्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागाचे मॅनेजिंग डायरेक्टर तनाका यांच्याशी माझी भेट घडवून आणली गेली. आत्तापर्यंतचे ट्रेनिंग कसे चालले आहे ? माझ्या काही अडीअडचणींचा त्यांनी टिपिकल बारकाईने जपानी दृष्टिकोनातून मागोवा, तसेच कानोसा घेतला. त्यांच्या भेटीपूर्वी फॅक्टरीतील एका मोठ्या जपानी अधिकाऱ्याशी माझी गाठ घालून देण्यात येणार आहे एवढेच मला सांगण्यात आले होते. परंतु तनाकांच्या खोलीत प्रवेश करताच मला आश्चर्याचा धक्का बसला होता. कारण त्या खोलीतील लांब रुंद टेबलाच्या पलीकडे बसलेली हीच व्यक्ती मेसमध्ये अनेक वेळा माझ्या मागे अगर पुढे हातात ताट घेऊन रांगेत उभी असायची. त्यांच्या छातीवरील हुद्दा व नाव, हे कांजी लिपीत असल्याने व त्या वेळी ही लिपी वाचता येत नसल्यामुळे मला त्याचे आकलन झाले नाही.

व्हिडिओ प्लॅनिंग डिव्हिजनचे मॅनेजर श्री. ओकुमुरा ही अशीच एक तल्लख व्यक्ती व व्हिडिओमधील एक तंत्रज्ञ. पाच वर्षे त्यांचे अमेरिकेत वास्तव्य होते. इंग्रजीवर प्रभुत्व यावे यासाठी मुद्दाम कंपनीने त्यांना अमेरिकेत कामावर पाचारण केले होते. इंग्रजी माध्यमातून त्यांच्याशी मी बोलू शकत असल्याने व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर संबंधी अनेक तांत्रिक प्रश्नांची उत्तरे मला त्यांच्याकडून सुंदर इंग्रजी भाषेतून मिळत असत. ओकुमुरांबरोबर माझ्या अनेक बैठका झाल्या. सर्व बैठका या ऑफिसच्या वेळेनंतरच असल्याने कोणताच अडसर नव्हता. त्यामुळे तांत्रिक बाबींबरोबर अतांत्रिक गोष्टींबाबत सुद्धा आमच्या गप्पा खूपच रंगत. वैयक्तिक प्रश्नांवर बोलताना ते भावनिक गोष्टींना मोरपिसाप्रमाणे स्पर्शून जात.

श्री. कोबायाशी हे पण पाच वर्षे न्यूयॉर्कला वास्तव्य करून आलेले JVC च्या इंजिनिअरिंग विभागातील तज्ज्ञ. पन्नाशी गाठलेला हा गृहस्थ चांगलाच मिस्कील होता. ओळख नसताना गंभीर भासणारी ही मंडळी बैठकीत बसली की, बुरखा काढून असली माल दाखवावा त्याप्रमाणे दिलखुलास बोलत, हसत, हास्य-

विनोद करीत. अशा वेळी आपल्या हुद्याचा व वयाचा त्यांना विसर पडतो. एखादा 'इनोदी' व 'लव्हाळी' प्रश्न खोदून विचारताना त्यांनी डोळाही मारला असेल परंतु तो मुळातच मारलेल्या आकाराप्रमाणे असल्याने माझ्या लक्षात आला नसेल. बोलण्याच्या ओघात 'Computer Aided Design Department.' बघण्याची इच्छा मी व्यक्त करताच "त्यात काय एवढे ? कम ऑन !" असे म्हणत त्यांनी खुर्ची मागे सरकविली व आम्ही दोघे तिकडे वळलो. तेथे CADAM (म्हणजे Computer - graphics Augmented Design And Manufacturing) च्या सहाय्याने इलेक्ट्रॉनिक सर्किटचे तसेच व्ही. सी. आर्. च्या मेकॅनिकल पार्टसचे डिझाईन कसे करतात ते बघितले. त्यांच्या इतरही काही डिव्हिजन्स त्यांनी आपणहून मला दाखविल्या. त्यांपैकी कायमचा लक्षात राहिला म्हणजे रेडिएशन मोजणारा हॉल. हा हॉल चांगलाच लांब रुंद व उंच होता. या हॉलमध्ये एका ठिकाणी टेबलावर रेकॉर्डर ठेवला होता. दुसऱ्या बाजूला वर खाली होणारी, तसेच ३६० अंशातून फिरणारी ॲन्टेना होती. व्ही. सी. आर्. मधील ऑसिलेटरच्यामुळे होणारे रेडिएशन या ॲंटेनामार्फत मोजण्यात येई. हे रेडिएशन पूर्णत्वाने मोजता यावे यासाठी या हॉलच्या आतील विशिष्ट भिंती व छतामुळे या हॉलचे स्वरूपच बदलले होते. चारी भिंती व छतावर सर्वत्र चार फूट लांबीच्या भाल्याच्या आकाराच्या स्पंजावर विशेष प्रकारचे सच्छिद्र कापड गुंडाळले होते. त्यामुळे किल्ल्याच्या दरवाज्यावर बाहेरील बाजूने जसे लोखंडी अणकुचीदार टोके असलेला भाग असतो. त्याप्रमाणे या हॉलच्या भिंती व छत होते. युद्धातील सिनेमाच्या शूटिंगच्या ठिकाणी तर आपण आलो नाहीत ना, असा काही क्षण भास होऊन गेला.

श्री.उएगिरी या सर्व्हिस इंजिनिअरिंग विभागाच्या मॅनेजरने जपानमध्ये आणि जगात इतरत्र JVC चे विक्रीनंतरच्या सेवेसाठी कसे जाळे आहे याची सविस्तर माहिती दिली. चांगलाच तरतरीत असलेला ओकुबा हा त्यांचा सहकारी आपल्या सखोल तांत्रिक ज्ञान व फार सुंदर इंग्रजी बोलण्यामुळे माझ्या कायमचा लक्षात राहिला आहे.

ट्रेनिंगचे शेवटचे तीन दिवस तर मला JVC तील अनेक तज्ज्ञांकडे भेटीगाठी साठी घेऊन जाण्यात आले. त्यामध्ये काहीजण सुंदर इंग्रजी बोलायचे तर काही चुकीचे इंग्रजी बोलण्याचा छान प्रयत्न करायचे. काहीजण इंग्रजी अज्ञानामुळे फक्त ऐकणे पसंत करायचे, तर काही तडक जपानीत बोलून मोकळे व्हायचे.

या तज्ज्ञ लोकांशी चर्चा करताना सर्व जण चांगले मनमोकळेपणाने बोलत. प्रत्येकाच्या बोलण्यात गोडवा व आपलेपणा भरपूर होता. वरकरणी तर असे वाटे की, केव्हाही अडचण येताच आपण त्यांना सरळ जाऊन भेटावे.

एकंदरीत JVC च्या तज्ज्ञांचा खजिना विशेषत्वाने शेवटचे तीन दिवस मला बघायला मिळाला. ही आंतरराष्ट्रीय कंपनी ख्यातनाम करून ती तिथे टिकवून धरणाऱ्या धुरंधरांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. त्यांच्या नेतृत्वाखाली चालणारी विविध व वैशिष्टयपूर्ण कामे नजरेखालून घालता आली, हा विशेष समाधानाचा भाग.

## कारखान्यातील समारोपाचा दिवस

कारखान्यातील पहिल्या दिवसाची मी आतुरतेने वाट पाहात होतो. तो आला. शेवटच्या दिवसाला मात्र अजून अवकाश आहे. अशी मनाची अधूनमधून समजूत काढीत होतो. मधले काही दिवस पुढे भराभर सरत होते. आणि शेवटी अखेरचा तो दिवस येऊन ठेपला. ' आहे. अजून वेळ आहे. उरकू केव्हा तरी ' अशा पद्धतीची उगीचच रेंगाळणारी कामे आज उरकणे भागच होते. या शेवटच्या दिवसाचा काही भाग कंपनीने आमच्यासाठी दे म्हणून आगाऊ ठरवून ठेवला होता. उरलेला दिवस संपूर्ण रिपोर्ट लिहिणे व भेटीगाठी यासाठी दिला होता.

बरेच दिवस रेंगाळलेली कामे गेल्यासरशी उरकून टाकली. संपूर्ण रिपोर्ट तसा आधीच होस्टेलमध्ये रूमवर लिहून तयार ठेवला होता. तो स्वतःच टाइप करून हाता वेगळा केला. ज्या ज्या विभागात मी काम करीत होतो त्या त्या विभागातील मंडळींना, विशेषतः ज्यांनी जीव लावला होता अशा मित्रांना सायो ऽ नारा करण्यासाठी गेलो. काहींना फारच गहिवरून आले. रेल्वेमध्ये सुद्धा काही तास एकत्र प्रवास केल्यावर आपले स्टेशन येताच उतरताना आपण शेजाऱ्याला ' अच्छा ' करतो, ' बराय तर ... ' म्हणून त्याचा निरोप घेतो. तेव्हा सुद्धा आपल्या मनात कोठे तरी गलबलते. मग हा तर तब्बल काही महिन्यांचा सहवास होता. अनेकांबरोबर एकत्र काम केले, जेवलो, खेळलो, भटकलो आणि पार्टीत रंगलो होतो. तांत्रिक व अतांत्रिक ज्ञानात खूप भर टाकणाऱ्या माझ्या या जपानी सवंगड्यांचा निरोप घेताना माझ्यासारखेच त्यांच्यापैकी काहींचे डोळेसुद्धा भरून आले. काही दिवस अजून वाढविता येणार नाहीत का ? असे ठिसूळ प्रश्न काहींनी तोंडाने विचारले तर काहींनी फक्त नजरेने पुसले. पुन्हा एकवार विरह हा कायम दाहक असतो, याची प्रचिती येऊन गेली. ' पुन्हा आता भेट केव्हा ? ' हा एक अनुत्तरित प्रश्न मित्रांच्या निरोपाच्या समयी सतत साथ देत होता.

कंपनीने ठरविलेल्या वेळेप्रमाणे होंदा व वाकासा या दोघांशी बैठक सुरू झाली. त्या वेळी सातो ही दुभाषी पण हजर होती. गेल्या काही महिन्यांचा आढावा घेतला जात असतानाच त्यांनी प्रश्न केला. " विलास ! तुला आमच्याकडून काही एक गोष्ट द्यायची राहिली आहे का ? तसेच तू काही तरी मागावेस असे आम्हाला वाटते ? " तेव्हा मी म्हणालो, " मी ज्या देशातून आपल्यासारख्या देशात आलो

तेव्हा मला एवढया सहकार्याची अपेक्षा नव्हती. त्या पार्श्वभूमीवर तुम्ही मला तांत्रिक तसेच इतरही जे ज्ञान दिले ते खरोखरच भरभरून दिलेत. मागण्यासारखे असे काही राहिलेच नाही. मग काय मागू ? द्यायच्या तर सदिच्छा द्या." "अरे त्या तर केव्हाच दिल्या आहेत" होंदा म्हणाले, "तरी पण तू काही तरी मागावेस" वाकासा उद्गारला. परंतु माझा तृप्त मूकपणा जास्त काळ टिकू न देता होंदा म्हणाले, "ठीक आहे. आम्ही तुझी येथील कामाची एक व्हिडिओ फिल्मच घेतो व ती तुला भेट देतो." त्याप्रमाणे मी ज्या ज्या विभागात काम करीत होतो, त्या त्या ठिकाणी माझी व्हिडिओ फिल्म घेण्यात आली. ती मला प्रेझेन्ट देण्यात आली. होंदाच्या विभागातील – माझ्या सहकाऱ्यांनी सोनेरी किनार असलेले भले मोठे भेटकार्ड त्यांच्या कॉमेन्ट्स् व काढलेल्या चित्रांसकट एकत्र येऊन दिले. त्यातील प्रेमाचा ओलावा मला जाणवत होता.

सरते शेवटी मी माझे लॉकर रिकामे केले. कंपनीचा ड्रेस घेऊन होंदांकडे सुपूर्त करण्यासाठी गेलो तेव्हा त्यांना सुद्धा गहिवरून आले. खुर्चीतून उठत माझे हात दोन्ही हातांनी धरत ते क्षणभर थांबले. नंतर म्हणाले, "तू आता जे. व्ही. सी. चा फॅमिली मेंबर आहेस. मग हा ड्रेस आम्ही तुझ्यापासून कसा बरं दूर करू ? तो कायम तुझाच आहे."

फॅक्टरीतून बाहेर पडत होतो. माझी निराळी पडणारी पावले चौकीदाराने हेरली. त्याच्याशीपण माजी गट्टी केव्हाच जमून गेली होती. "शेवटचा दिवस ना ! वाईट वाटत असेल ना ?" त्याच्या तोंडून उद्गार निघाले. त्याचा पण निरोप घेतला.

फॅक्टरीच्या दरवाज्यातून बाहेर पडलो. काही अंतर जाऊन मागे वळून पाहिले, काहीक्षण थांबलो. गेल्या काही महिन्यांचा चित्रपट डोळ्यांसमोरून भराभर सरकू लागला. हीच ती जागा, ज्या ठिकाणी व्ही. सी. आर्. चा जन्म झाला. त्याच्याही पूर्वीपासून या यंत्राशी निगडित असणाऱ्या जगातील अव्वल दर्जाच्या या जपानी लोकांबरोबर हसत खेळत काम करण्याची मला काही काळ संधी मिळाली. हे यंत्र सर्वांग दृष्टीने समजावून देताना त्या श्रीमंत राष्ट्रातील लोकांनी काहीही कारण नसताना माझ्यासारख्या गरीब राष्ट्रातून आलेल्यासाठी घेतलेले परिश्रम अनुभवले. वस्तुतः त्यांच्या मालाला जगाच्या बाजारपेठेत भरपूर मागणी आहे. शिवाय भारतात त्यांची थेट कुठलीही एजन्सी नाही. यामुळे तर त्यांनी माझ्या-साठी घेतलेले परिश्रम विशेष भावले. आपसूक मीपण त्यांच्यात समरस होऊन गेलो होतो. फॅक्टरीच्या स्टाफने कामाच्या वेळी, तसेच इतर वेळीसुद्धा एकंदरीत सहजीवन आनंदी करण्यातच भाग घेतला. तर काही जणांनी माझ्या मनाच्या गाभाऱ्यात जाऊन आपुलकीने एकलेपणावर फुंकर घातली होती. आता पुन्हा या


लोकांशी त्यांच्या कार्यमंदिरात गाठी–भेटी होतील की नाही हे एक दैवच जाणे ! हे सर्व प्रसंग ओल्या डोळ्यांत साठवत असतानाच फॅक्टरीच्या दारात बाहेर येऊन हसतमुखाने सायोनारा करणाऱ्या डार्क नेव्ही ब्ल्यू ब्लेझर ल्यालेल्या चौकीदारामधील जपानी माणसाच्या संथगतीने हलणाऱ्या हाताकडे माझे लक्ष गेले. मी दिवास्वप्नातून जागा झालो. हृदयात कालवाकालव झाली. न कळत माझापण हात उंचावून त्यास प्रतिसाद करून गेला. माझी जड पावले रेल्वेस्टेशनच्या दिशेने वळली. एक पर्व संपले होते.

कारखान्यातील माझ्या ट्रेनिंगच्या अखेरच्या दिवसाचा सूर्य मावळला होता. मन सुन्न होते. गेल्या काही महिन्यांतील आठवणींची पाने उलटसुलट चाळण्यात मन गुंतले होते, त्यामुळे होस्टेलवर केव्हा पोहोचलो ते कळलेसुद्धा नाही.

## भारताकडे प्रयाण

भारतात परतायला अजून एक आठवडा बाकी होता. या वेळेत भारतातील मित्रांना पत्रे, जपानमधील मित्रांच्या गाठीभेटी, स्कॉलरशिप ॲथॉरिटीला एकूण जपानमधील वास्तव्याचा रिपोर्ट लिहिणे, आणि मुख्य म्हणजे काही खरेदी व द्यावयाच्या तसेच घ्यावयाच्या पार्ट्या उरकल्या. एक-दोन दिवस शांतपणे होस्टेलमध्ये घालविले. अखेरची आवराआवर सुरू झाली. सामान बॅगेत आणि प्रसंग मनात भरणे चालू होते. रात्री एक दोन तास डोळा लागला असेल वा नसेल.

सकाळी होस्टेलच्या लॉबीमध्ये बॅगा घेऊन खाली आलो, किल्ली काऊंटरवर दिली. प्रसंग तोच. परंतु आलो तेव्हा मनाची पाटी कोरी होती. आज काऊंटरवर किल्ली देत असताना मात्र ही पाटी पूर्णपणे भरलेली होती. अनेक मित्र जोडले होते. आयुष्यातील काही सुखद क्षण कायमची ठेव म्हणून जमेस होते. काही महिन्यांच्या कालावधीनंतर आपल्या कुटुंबियांशी गाठ पडणार या आनंदात जसे मन होते तसेच ते येथे जोडलेल्या मित्रांच्या विरहाने व्याकूळ झाले होते. होस्टेलमधील मित्रांचा निरोप घेताना मनात अनेक संमिश्र भावना एकवटून आल्या होत्या. होस्टेलमधील स्टाफचा निरोप घेतला. अिनोअे होस्टेलमधील माझा खास जपानी दोस्त. अिनोअे बरोबर टॅक्सीने योकोहामा एअर टर्मिनल बसपर्यंत आलो. भारतात यावयाच्या अिनोअेच्या आश्वासनानंतरच त्याचा पण साश्रु-नयनाने निरोप घेतला. ३१०० येनचे तिकीट घेऊन बरोबर साडेदहाला ल्यूमिनस बस निघाली. ती थेट १२ ला नारिता एअरपोर्टला घेऊन आली. या बस प्रवासात डोळे सताड उघडे होते. सर्व काही दिसत होते पण मी ते पाहू शकत नव्हतो. कारण मनात उठलेले काहूर. अंतश्चक्षूसमोर अनेक प्रसंगांची घालमेल व उलथापालथ अस्वस्थ करीत होती.



विमानतळावर सुरक्षितता चाचणी, सामानाची तपासणी, जवळ बाळगावयाच्या सामानातील बॅटऱ्या व कॅमेरा काढून पुन्हा तपासणी झाली. लांबलचक बेल्टने संथगतीने आम्हाला एका ठिकाणी आणून सोडले. तेथे काचेच्या भिंती पलीकडे तिन्ही बाजूला उभी असलेली विमाने स्पष्ट दिसत होती. दुपारचा एक वाजला होता. तेथे अमेरिकेत स्थायिक झालेल्या एका भारतीय प्राध्यापकाची गाठ पडली. ते भारतातून जपानमार्गे अमेरिकेस चालले होते. दोन महिन्यांच्या दिल्लीतील वास्तव्यातील आपली मित्रमंडळी व आजी-आजोबांना सोडून जबरदस्तीने ओढत आणलेल्या त्यांच्या ५-६ वर्षांच्या मुलाची हकीगत ऐकली. मुलगा दिल्ली विमानतळावरच नव्हे तर विमानात सुद्धा बराच वेळ रडत होता. वडिलांच्या चेहऱ्यावरील नाईलाजाने ओढवलेल्या अपराधीपणाची जाणीव मी टिपली होती. बाजूला असलेल्या मुलाच्या चेहऱ्यावर तर खाटिकखान्यात ओढत नेत असलेल्या मेंढराच्या चेहऱ्यावरचे भाव उतरले होते. अनेक तास रडून थकलेला, म्लान झालेला चेहरा माझ्याकडे एकवार आशेने कटाक्ष टाकून गेला. माझ्याशी बोलणाऱ्या त्याच्या वडिलांच्या शेजारी त्यांचा हात धरून त्यांना टेकून तो उभा होता. आमच्या बोलण्यावरून मी भारतात परत चाललो आहे हे लक्षात येताच " अंकल ! अंकल ! मुझे ले चलो ना वापस इंडिया में " त्याच्या तोंडातून भर्रदिशी उद्गार निघाले. चेहऱ्यावर प्रचंड आशावादी भाव उमटले होते. नकळतच मी त्याला उचलून घेतले. त्याची समजूत घालणे माझ्यापलीकडचे होते. वडिलांनी स्वतःचे पाणावलेले डोळे चष्मा काढून रुमालाने टिपले. त्यांची विलक्षण मानसिक ओढाताण कळत होती. त्यांनी माझ्यापाशी दुःख हलके केले. "...ज्यांच्यासाठी एवढे करायचे तेच जर तयार नसतील तर काय करायचे तेथे राहून ? पण काय करणार ?

दिल्लीत त्या स्टेटसचा जॉबच मिळत नाही...." ते बोलत होते. आमच्या दोघांचे मार्ग भिन्न होते.

मला भारतात परत घेऊन येणारे एअर इंडियाचे अकबर नावाचे जंबो विमान समोर उभे होते. पुन्हा विमान प्रवास. नाही म्हटले तरी ते एक भीती दडलेले आकर्षण असते. दुपारी अडीचला टोकियो सोडले. दिवसा विमान समुद्रावरून अंदाजे पस्तीस हजार फुटावरून, जाताना खाली फक्त पांढऱ्या सफेद ढगांचे प्रचंड पुंजकेच्या पुंजके दिसत होते. रात्री मात्र काही ठिकाणी खालील भाग व्यवस्थित दिसत होता. अधून मधून एक आश्चर्यही दृष्टोपत्तीस येत होते. ते म्हणजे डोंगरावर अधून मधून उजेड दिसत असे. एका बाजूने संपूर्ण प्रकाश यावा तस घनदाट जंगलातील डोंगरावर हा उजेड दिसत होता. न राहावून मी विमानातील एका कर्मचाऱ्याला ते दाखवून त्याबद्दल विचारले, तेव्हा तो म्हणाला, "उजेड दिसतोय खरा, पण काही माहिती नाही." रात्रीच्या प्रवासात संपूर्णपणे न झोपता खिडकीतून बाहेरील दृश्य सतत टिपणारा सर्व विमानात एखाद वेळेस मी एकटाच प्रवासी असेन, विमानाच्या उजव्या बाजूच्या पहिल्या इंजिनाच्या खालच्या अर्ध्या भागात दिव्यांच्या नारिंगी रंगाच्या उजेडाची होणारी उघडझाप स्पष्ट दिसत होती. विमान ज्या वेळी दाट ढगांतून जात होते त्यावेळी पंखाच्या टोकाकडील भागात लागलेला हिरवा दिवा अंधुक दिसत असे. परंतु दाट ढगातून जाताना मात्र तो पूर्णतः दिसेनासा होई.

प्रवासात 'पायल की झंकार' हा चित्रपट दाखविण्यात आला. तो वेळ छान गेला. हाँगकाँग, बँकॉक मार्गे विमान पहाटे पूर्वी साडेतीन वाजता दिल्लीत उतरले. दिल्लीतील उड्डाणापूर्वी तपासणीमध्ये एका इंजिनात दोष निर्माण झाला होता. दिल्लीतील उन्हाळ्याच्या सुरुवातीच्या दिवसातील पहाटेची विशिष्ट थंडगार हवा होती. मस्त वारे वाहात होते. त्या दिवशी दिल्लीतील सरलेली रात्र, पहाट व सकाळ आम्ही विमानातच काढली. बराच काळ प्रयत्न करूनही विमानाच्या इंजिनातील दोष दूर करण्यात यश येत नव्हते. म्हणून दुसऱ्या विमानातून जायचे ठरले. त्या प्रमाणे पहिल्या विमानातून उतरून बसने आम्हाला एअर-इंडियाच्या चंद्रगुप्त नावाच्या दुसऱ्या विमानाकडे नेण्यात आले. नेहमीप्रमाणे मग लोकांची गर्दी, पहिल्या विमानात सामान विसरल्यामुळे उडालेला गोंधळ, विमान कर्मचारी व विमानतळावरील अधिकारी यांचे अपेक्षेप्रमाणे सहकार्य न लाभल्याने वैतागलेले प्रवासी, सर्व काही बघायला मिळाले.

नवीन विमानात सामान चढविण्याचे काम संथ गतीने रमत गमत चालले होते. सामान भरणाऱ्यांपैकी कोणालाच घाई नव्हती. आतमधे विमानात मात्र मुंबईला जोडून पुढील विमान पकडणारी काही फ्रेंच मंडळी चांगलीच

अस्वस्थ झाली होती. मी एका खिडकी जवळील सीटवर बसून बाहेर विमानतळावरील मजा बघत होतो. बाजूलाच एअर इंडियाचे कनिष्क उभे होते. इंडियन एअरलाईन, टेलस्टार वगैरे विमाने आली व गेली. सकाळचे साडेदहा वाजले होते. प्रवाशांच्या सामानाच्या लोडिंगचे काम संपून विमानात आता स्वतंत्रपणे केटरिंगचे सामान भरण्याचे काम सुरू झाले होते. अस्वस्थ प्रवासी विमानात इकडून तिकडे करीत होते. घड्याळात बघत होते तर कधी दारात वायरलेस सेट घेऊन उभ्या असलेल्या एअर-इंडियाच्या कर्मचाऱ्यांजवळ काही तरी विचारपूस करून परतत होते. केटरिंगचे सामान भरणे संपले होते व आता काम करणे आणि आनंद लुटणे या दोन्ही कल्पना एकत्रित होऊन विमानात ऑईल भरणाऱ्या लोकांचे काम सुरू झाले होते. प्रवाशांनी सुद्धा एव्हाना वैतागणे सोडून देऊन स्वतःची करमणूक करून घेण्यास घेण्यास सुरूवात केली होती. लोकांच्या भावना लक्षात घेऊन हवाई सुंदरींनी विमानात प्रवेश करताच लोकांना लंच, टिफीन बॉक्सेस दिल्या.

सकाळचे अकरा वाजले होते. अनाउन्समेंट झाली. दिल्ली-मुंबई प्रवासाची सुरुवात होणार होती. एक हवाई चाचेगिरी सोडली तर येऊ नयेत ते सर्व अनुभव आल्याची भावना प्रवाशांच्या चेहऱ्यावर दिसत होती. एव्हाना छान झोप घेऊन, ताजेतवाने होऊन नीटनेटकेपणाने मुंबईत जाण्यासाठी विमानात प्रवेश करणारा एअर इंडियाचा काही स्टाफ विमानात स्थानापन्न झाला. नकळत त्यांच्या सेंटचा घमघमाट आमच्या सर्वांच्या नाकात भरून गेला. प्रवाश्यांच्या पारुश्या नजरा त्यांच्या हालचालींकडे बाशाळभूतपणे पाहात असतानाच विमान रनवेवरून धावू लागले. काही वेळातच विमानाची सावली खाली जमिनीवरून धावताना दिसू लागली. विमानाने बऱ्यापैकी उंची घेतली.

लांबक्षितिजावर निळ्या, पांढऱ्या व फिक्कट राखी रंगाचे धूसर पट्टे एकाखाली एक असे दिसत होते. खालील नद्या, डोंगर अगदी स्पष्ट दिसत होते. काही क्षण विमान ढगात शिरत असे तर काही काळ ढगांचा मागमूसही नसे. एकदा तर ढगांमध्ये संपूर्ण गोलाकार इंद्रधनुष्य दिसले. वस्तुतः त्यास इंद्रधनुष्य म्हणण्याऐवजी इंद्रगोलच म्हणायला हवे. विमानाचा वेग, ताशी ९०० किलोमीटर होता. विरुद्ध दिशेने वेगाचे वारे वाहात आहेत असे सांगण्यात आले. काही काळ दाट ढग भेटले. वाटेत नद्या, पर्वतांच्या रांगा, एक मोठे धरणही दिसले, तर खालील बाजूच्या ढगांच्या जमिनीवरून सरकणाऱ्या सावल्या अधूनमधून भेटत होत्या. जंबो विमान हे साधारणतः पस्तीस हजार फुटांवरून जाते. जमिनीपासून अंदाजे पाच हजार फुटांवर एक व नंतर तीस हजार फुटांवर, असे ढगांचे दोन थर असतात. हा दुसरा थर तर चांगलाच म्हणजे एक दोन हजार फूट जाडीचा असावा.

" अटेंशन प्लीज ... " अनाउन्समेंट झाली. खिडकीतून बाहेर डोकावले दिमाखात उभ्या राहिलेल्या इमारती दिसल्या, तशीच तेथील झोपडपट्टी पण. मुंबई नजरेत भरली. लख्ख दिवसाच्या जंबो प्रवासाने माझ्या या एकंदरीत पहिल्या परदेश प्रवासाची सांगता झाली. अनेक चांगल्या गोष्टी बघितल्या होत्या, अनुभवल्या होत्या व उत्सुकता लागून राहिली होती ती हे सर्व तुमच्यापर्यंत पोहोचविण्याची. म्हणून मला जे जे दिसले, भावले, अनुभवले ते ते कागदावर उमटविण्याचा हा एक प्रयत्न.

धन्यवाद !



---

REFBK-0026472